

ब

नवीन मूल्यमापनाचे पद्धतीनुसार चित्र-कलेवरील अपेक्षित प्रश्न व त्यांची तंतोतंत उत्तरे यांचे मार्गदर्शन करण्यासाठी (तज्ज्ञ) मर्मज्ञाकडून लिहवून घेतलेले इयत्ता ९ व १० साठी पुरस्कृत नव्या अभ्यासक्रमावर आधारलेले एकमेव पुस्तक.

# कलेतिहास व कला-रसग्रहण प्रश्नोत्तरी

लेखक :
कलाभ्यासक

किंमत रु. ५=००

प्रकाशक :
**सौ. मंगला सुधाकर इंगळे, बी. ए.**
२१६४/६५-२ सदाशिव पेठ,
पुणे ३०.

प्रथमावृत्ती १९७४
द्वितीयावृत्ती नोव्हेंबर १९७५

मुद्रक :
**गो. य. हिरवे**
साथीदार प्रिंटर्स
४६१/१ सदाशिव पेठ,
पुणे ३०.

# प्रस्तावना

माध्यमिक शालान्त परीक्षेच्या चित्रकलेच्या अभ्यासक्रमासाठी नेमलेल्या 'कलेचा इतिहास आणि रसग्रहण' इयत्ता नववी व इयत्ता दहावी या दोन पुस्तकांच्या अनुरोधाने प्रस्तुत प्रश्नोत्तरी तयार करण्यात आली आहे. हिच्यात रिकाम्या जागी योग्य शब्द भरा, जोडया जुळवा, एकेका शब्दात वा वाक्यात उत्तरे लिहा, परिचयपर संक्षिप्त परिच्छेद लिहा इत्यादी स्वरूपाचे वस्तुनिष्ठ प्रश्न अन्तर्भूत करून वरील दोन्ही इयत्तांचा चित्रकलाविषयक अभ्यासक्रम पूर्णपणे हाताळला आहे. विद्यार्थ्यास अभ्यास-विषयांबद्दल अद्ययावत व अचूक माहिती मिळावी ह्या हेतूने प्रस्तुत प्रश्नोत्तरे तयार करताना इंग्रजीतील महत्त्वपूर्ण व विद्वन्मान्य संदर्भ-ग्रंथांची मदत घेतली आहे. स्वाभाविकपणे ह्या पुस्तकाचा अभ्यास करणाऱ्यांना परीक्षेतील उत्तरे तर उत्तम रीतीने लिहिता येतीलच, परंतु त्याखेरीज त्यांना चित्र, शिल्प व स्थापत्य या तीन ललित कलांच्या मूलतत्त्वांचेही चांगले आकलन होईल. त्याचा उपयोग पुढील व्यापक व सूक्ष्म व्यासंगाला निश्चितपणे होईल.

ज्या अभ्यासकांसाठी ही प्रश्नोत्तरी तयार केली आहे त्यांना योग्य मार्गदर्शन मिळून परीक्षेत उज्ज्वल यश लाभेल अशी खात्री आहे.

कलाभ्यासक

# अनुक्रमणिका


| प्रकरण | | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | प्रागैतिहासिक काळातील कला | १ |
| २. | सिंधुखोऱ्यातील नगररचनाकुशल लोक | ४ |
| ३. | मरणोत्तर जीवनात रंगलेले इजिप्शियन | ७ |
| ४. | संघर्षमय जीवनात गुरफटलेले मेसोपोटेमियन | १० |
| ५. | निसर्गप्रेमी चिनी लोक | १४ |
| ६. | आर्यकलेचे आरंभकाळातील स्वरूप | १७ |
| ७. | बौद्ध कलेचे आरंभीचे स्वरूप | १७ |
| ८. | मौर्यकाल | १८ |
| ९. | बौद्धकालीन कलेचा लोकाश्रयी विकास | २४ |
| १०. | गुहामंदिरांचे युग | २६ |
| ११. | बुद्ध प्रतिमेचा आरंभ | २९ |
| १२. | सौंदर्यप्रेमी ग्रीक लोक | ३३ |
| १३. | वैभवशाली रोमन संस्कृती | ३७ |
| १४. | कलेची व संकल्पाची मूलतत्त्वे | ४१ |
| १५. | चित्रकलेचे मूळ घटक | ४७ |

| | | |
|---|---|---|
| १६. | भारतीय कलांचे स्वरूप | ५४ |
| १७. | भारतीय कलेचे सुवर्णयुग | ५५ |
| १८. | सुवर्णयुगातील वास्तुकलेची वाटचाल | ५६ |
| १९. | गुप्तकाळातील अमर शिल्प | ५८ |
| २०. | भारतीय चित्रकलेचा दिव्य आविष्कार | ६१ |
| २१. | युरोपातील प्रबोधनकालीन कला | ६८ |
| २२. | हिंदू मंदिरांची रचना | ७७ |
| २३. | उत्तर भारतातील मंदिरे | ७८ |
| २४. | उत्तुंग गोपुरांच्या प्रदेशातील मंदिरे | ८२ |
| २५. | पालसेन काळातील कला | ८९ |
| २६. | ग्रंथ-सजावटीचा आरंभकाल | ९० |
| २७. | लोकजीवनाचे दर्शन घडविणारी राजपूत चित्रशैली | ९२ |
| २८. | मोगल दरबारात वाढलेली चित्रकला | ९३ |
| २९. | हिमालयाच्या कुशीत फुललेली कलापुष्पे | ९६ |
| ३०. | मुसलमानी वास्तुकलेचे स्वरूप | ९८ |
| ३१. | मुसलमानी वास्तुकलेचा उदय | ९९ |
| ३२. | विविध प्रांतांत विखुरलेली मुसलमानी वास्तुशैली | १०३ |
| ३३. | राजवैभवाने नटलेली मोगल वास्तुकला | १०५ |
| ३४. | वास्तववादी चित्रकलेचा श्रीगणेशा | १०९ |
| ३५. | बंगाली शैली | ११४ |
| ३६. | पाश्चात्त्य जगातील नवकलाप्रवाह | ११५ |
| ३७. | आधुनिक भारतीय कला | १३० |
| ३८. | चित्रकाराची साधने | १३२ |
| ३९. | दृक्संवेदना आणि कलावंत | १३३ |
| ४०. | रसिकाची दृष्टी | १३५ |
| ४१. | काव्यमय सौंदर्याने बहरलेली भारतीय चित्रकला | १३६ |
| ४२. | अध्यात्माला साकार करणारी भारतीय शिल्पकला | १३९ |
| ४३. | शिल्पसौंदर्याने नटलेली भारतीय वास्तुकला | १४२ |
| ४४. | परंपरेची जपणूक करणारी भारतीय हस्तकला | १४८ |

# प्रकरण १ : प्रागैतिहासिक काळातील कला

**प्रश्न १ : प्रागैतिहासिक कलेची वैशिष्ट्ये नमूद करा.**

**उत्तर :** प्राक् म्हणजे पूर्वी. प्रागैतिहासिक काळ म्हणजे लेखनकलेचा शोध लागण्यापूर्वीचा काळ (इ. स. पूर्व ५०००० ते इ. स. पूर्व ३४००). त्या कालखंडाची जी कला ती प्रागैतिहासिक कला. तिलाच आदिकालीन किंवा प्राथमिक अवस्थेतील कला असेही म्हणतात.

आदिकालीन कला आदिकालीन समाजात उगम पावली. त्या समाजाने या कलेला जन्म दिला व त्याच समाजाने या कलेचा उपयोग करून घेतला. या कलेचा उगम कोणत्या कालखंडात झाला ते ठामपणे सांगता येत नाही. परंतु, ज्या काळात मनुष्याला मनुष्यपणा लाभला त्याच काळात या कलेचा उदय झाला असला पाहिजे. आदिकालीन मानवाची कलाविषयक समज चित्रकला, शिल्पाकृती व अलंकरणात्मक वस्तू यांच्या योगे व्यक्त झाली. त्याची कला व्यवहारनिष्ठ किंवा उपयोगपर (functional) होती. त्याच्या कलाकृतींना धार्मिक आणि सामाजिक दृष्टींनी महत्त्व असे. तत्कालीन सर्वच्या सर्व कलाकृतींचे अर्थ व उपयोग आज निश्चितपणे सांगता येत नाहीत. परंतु, त्या सर्व कलावस्तू कलेसाठी किंवा निर्भेळ कलानंदासाठी निर्माण झालेल्या नसून उपयोगासाठी निर्माण झालेल्या होत्या एवढे मात्र निश्चित सांगता येते. (' Primitive sculpture, painting and decorations are functional in that they are usually of religious and social importance, while the meanings and uses of primitive art objects are not always known, it is better to assume them all to be useful rather than as made for art's sake '.)

आदिकालीन कलेचे उपयोगनिष्ठतेखेरीज दुसरे ठळक वैशिष्ट्य म्हणजे परिचित जगताचे चित्रण हे होय. प्राथमिक अवस्थेतील मानवाचा संबंध युद्धाशी व शिकारीशी अहर्निश येत असे. त्या परिचित अनुभवांचे प्रतिबिंब त्याच्या कलेत अपरिहार्यपणे उमटले आहे. त्याने चित्र-शिल्पादींत शिकार व युद्ध यांचीच दृश्ये प्राधान्याने रेखाटली आहेत. ती दृश्ये त्याच्या सूक्ष्म निरीक्षणशक्तीची निदर्शक आहेत. शिवाय त्यांत आकृतींचा सुडौलपणा, मनोवेधक रेखांकन व तपशिलाचे आकर्षक आलेखन हे कलागुण जाणवतात.

**प्रश्न २ : जुन्या व नव्या अश्मयुगांतील कलांमधील फरक थोडक्यात लिहा.**

**उत्तर :**

| जुने अश्मयुग | नवे अश्मयुग |
|---|---|
| (१) वास्तवानुसारी | (१) प्रतीकात्मक व भौमितिक स्वरूपाची |
| (२) जादूटोणा, मंत्रतंत्र हा उद्देश | (२) ऐहिक व धार्मिक दृष्टिकोण |
| (३) स्थापत्याचा अभाव | (३) स्थापत्यास प्रारंभ (घरे इ.) |
| (४) ओबडधोबड दगडी हत्यारे | (४) सफाईदार हत्यारे, अवजारे |
| (५) मुख्यत: मोठ्या आकाराची प्राणिचित्रे | (५) प्राण्यांची व मानवांची लहान आकारांची प्रसंगचित्रे |
| (६) गुहांच्या अंधाऱ्या अंतर्भागात कलाविलास | (६) गुहांच्या उघड्या प्रस्तरांवर कलाविष्कार |
| (७) मातीच्या भांड्यांचा अभाव | (७) विविध आकारांची नक्षीदार मातीची भांडी. |

**प्रश्न ३ : आदिकालीन कलेच्या प्रमुख पुराव्यांचा आढावा घ्या.**

**उत्तर :** आदिकालीन मानवाच्या ठायी प्राथमिक स्वरूपाची कलादृष्टी किंवा रसिकता निश्चितपणे जागृत झाली होती हे दर्शविणारी प्रमुख गमके पुढीलप्रमाणे आहेत :

(१) प्राचीन मानव उत्सवाच्या किंवा आनंदाच्या प्रसंगी ज्या आलंकारिक वस्तूंचा वापर करीत असे त्यांपैकी काही उत्खननान्ती सापडल्या आहेत. त्यांवरून प्राचीन मानवाच्या सौंदर्यदृष्टीचा सुगावा लागतो.

(२) आदिमानव युद्धासाठी किंवा शिकारीसाठी दगड, हाडे, सुळे, लाकूड, हस्तिदंत व प्राण्याची शिंगे या वस्तूंची विविध आकारांची हत्यारे बनवीत असे. त्यांना तो उपयुक्त, सुटसुटीत व सुबक आकार देत असे. अशा अनेक वस्तू खोदकामामधून हाती आल्या आहेत.

(३) फ्रान्समध्ये व स्पेन देशातील कँटेब्रिअन पर्वतात सापडलेल्या प्राचीन गुहा हा ह्या बाबतीतील सर्वांत मोठा पुरावा होय. अशांपैकी एका गुहेचा शोध इ. स. १८७९ साली एका स्पॅनिश मनुष्याने लावला. त्यानंतर संशोधकांनी युरोपात तशा ७० गुहा शोधून काढल्या. त्यांतील चित्रकलेल्या दर्शनाने विद्वान रसिक आश्चर्यचकित झाले. त्या गुहा सुमारे वीस हजार वर्षांपूर्वीच्या असून त्यांमध्ये बैल, हत्ती, रानरेडे, गवे, रानडुकरे, हरिणे, चौखूर उधळलेले घोडे इत्यादी प्राण्यांची तांबडा, पिवळा व काळा अशा रंगांत रंगविलेली चित्रे आढळून आली. ती चित्रे प्राण्यांच्या चरबीत रंग कालवून रंगविलेली होती. त्या चित्रांत आकारांचा डौलदारपणा, प्राण्यांच्या हालचालींचे मनोवेधक व प्रवाही रेखांकन आणि तपशिलाचे

आकर्षक आलेखन हे कलागुण प्रतीत होतात. ही अपूर्व कलासाधना लहानशा दिवटीच्या अंधूक उजेडात होत असे !

**प्रश्न ४ : खालील वाक्यांतील रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्दांची योजना करून वाक्ये पूर्ण करा व ती पुनः लिहा :**

(अ) प्राचीन मनुष्यप्राणी·········हत्यारांना·········आकार देत असे. (युद्धाच्या, शिकारीच्या; बेढब, कलात्मक)

(आ) आदिकालीन मानव आपले ·······विविध·········सुशोभित करीत असे. (शस्त्र; शरीर; दागिन्यांनी, रंगांनी)

(इ) प्राचीन कलासंपन्न गुहेचा शोध एका·········मनुष्याने इ. स.······· साली लावला. (डॅनिश, स्पॅनिश; १८७९, १९१९)

(ई) प्रागैतिहासिक चित्रकार ······· किंवा·········बनविलेले रंग वापरीत असे. (मातीपासून, चिखलापासून, धातूपासून, हाडांपासून, दगडांपासून)

(उ) आग्नेय स्पेनमधील गुहाचित्रांत······ ··आकृतींचे प्रमाण अधिक आहे. (मनुष्याच्या, पशूंच्या, झाडांच्या)

(ऊ) लेखनकलेचा शोध लागण्यापूर्वीच्या काळाला·········काळ म्हणतात. (ऐतिहासिक प्रागैतिहासिक)

(ए) इ. स. पूर्व सुमारे १०००० पर्यंतच्या काळाला ············ अश्मयुग म्हणतात. (जुने, नवे)

(ऐ) ला ग्रीझ्रं येथील उभ्या गव्याचे चित्र ········· पद्धतीच्या चित्राचा नमुना आहे. (बाह्यरेखांकित, उत्थित)

(ओ) लास्को गुहेतील '··········' हे चित्र विशेष प्रसिद्ध आहे. (चिनी घोडा, जपानी गाय)

(औ) अल्टामिरा गुहेत रेखाटलेली ········· चित्रे असामान्य आहेत. (वास्तवानुसारी, कल्पित)

(अं) व्हीनस ऑफ विलेंडॉर्फ हे प्रसिद्ध शिल्प फक्त·········सें. मी. उंचीचे आहे. (७·९, ९·७)

(अः) जुन्या अश्मयुगातील कला ········आहे तर नव्या अश्मयुगातील कला······· आहे. (काल्पनिक, निसर्गानुसारी, प्रतिकात्मक ढोबळ)

**उत्तर :** (अ) प्राचीन मनुष्यप्राणी **युद्धाच्या/शिकारीच्या** हत्यारांना **कलात्मक** आकार देत असे.

(आ) आदिकालीन मानव आपले **शरीर** विविध **रंगांनी** सुशोभित करीत असे.

(इ) प्राचीन कलासंपन्न गुहेचा शोध एका **स्पॅनिश** मनुष्याने इ. स. १८७९ साली लावला.

(इ) प्रागैतिहासिक चित्रकार **मातीपासून** किंवा **दगडापासून** बनविलेले रंग वापरीत असे.

(उ) आग्नेय स्पेनमधील गुहाचित्रांत **मनुष्याच्या** आकृतींचे प्रमाण अधिक आहे.

(ऊ) लेखनकलेचा शोध लागण्यापूर्वीच्या काळाला **प्रागैतिहासिक** काळ म्हणतात.

(ए) इ. स. पूर्व सुमारे १०००० पर्यंतच्या काळाला **जुने** अश्मयुग म्हणतात.

(ऐ) ला ग्रीझे येथील उभ्या गव्याचे चित्र **बाह्यरेखांकित** पद्धतीच्या चित्राचा नमुना आहे.

(ओ) लास्को गुहेतील '**चिनी घोडा**' हे चित्र विशेष प्रसिद्ध आहे.

(औ) अल्टामिरा गुहेत रेखाटलेली **वास्तवानुसारी** चित्रे असामान्य आहेत.

(अं) व्हीनस ऑफ विलेंडॉर्फ हे प्रसिद्ध शिल्प फक्त ९.७ सें.मी. उंचीचे आहे.

(अः) जुन्या अश्मयुगातील कला **निसर्गानुसारी** आहे तर नव्या अश्मयुगातील कला **प्रतीकात्मक** आहे.

# प्रकरण २ : सिंधुखोऱ्यातील नगररचनाकुशल लोक

**प्रश्न १ : मोहेंजोदाडो संस्कृतीच्या कलेविषयी माहिती लिहा.**

**उत्तर** : मोहेंजोदाडोच्या संस्कृतीला हरप्पाची संस्कृती असेही म्हणतात. मोहेंजोदाडो शहर सिंध प्रांतात (पाकिस्तानात) असून हरप्पा दक्षिण पंजाबात आहे. ह्या शहरांमधील टापू हिमालयाच्या पायथ्यापासून दक्षिणेस गुजरात-सौराष्ट्रापर्यंत व पूर्वेस गंगेच्या खोऱ्यापर्यंत पसरलेला असून सांस्कृतिक दृष्ट्या एकरूप आहे. हा टापू १००० मैल लांब व ८०० मैल रुंद आहे. वरील दोन शहरांत सुमारे ४०० मैलांचे अंतर आहे. प्रत्येक शहर तीन मैल घेराचे आहे. प्राचीन काळी आलेल्या प्रचंड पुरामुळे मोहेंजोदाडोचे खूप नुकसान झाले. इ. स. १९२० व १९३० मध्ये या दोन शहरांचे उत्खनन झाले. इसवी सनापूर्वी ३००० च्या सुमारास येथे एक प्रगत संस्कृती नांदत होती. ती प्राचीन भारतीय संस्कृतीचे उगमस्थान मानली जाते. मोहेंजोदाडोचे लोक मुळात सुमेरियन वंशाचे असून त्यांची संस्कृती इजिप्त, मेसोपोटेमिया इत्यादी संस्कृतींशी समकालीन होती.

**नगररचना** : या संस्कृतीच्या प्रजेने नगररचना-शास्त्रात विशेष प्रावीण्य संपादिले होते. वरील दोन्ही शहरांची रचना अतिशय रेखीव आहे. शहराचे ४००

मीटर लांब व २५० मीटर रुंद असे विभाग पाडलेले आहेत. शहरातील रस्ते सरळ एकमेकांना काटकोनात छेदणारे आहेत. पश्चिमेकडील मधला भाग ६ ते १२ मीटर उंच असून त्याच्या सभोवार टॉवर्स आहेत. शहरातील सर्व इमारती योजनापूर्ण रीतीने बांधलेल्या आहेत. त्या सर्व पक्क्या विटांच्या असून प्रत्येक इमारतीत स्नानगृह, व्हरांडा, पाण्याचे हौद, धान्याची कोठारे व सभागृहे इत्यादी सोयी केलेल्या आहेत. शहरात जागोजागी सार्वजनिक स्नानगृहे असून त्यांपैकी एक ११·७ मी. लांब, ६·९ मी. रुंद व १·२ मी. खोल आहे. स्नानगृहात उतरण्यासाठी पक्क्या पायऱ्या बांधलेल्या असून पाणी काढण्या-भरण्याची सुंदर व्यवस्था केलेली आहे. सांडपाण्याची उत्तम व्यवस्था आढळून येते. ह्या स्नानगृहाच्या उत्तरेला आंघोळीसाठी छोट्या-छोट्या आठ खोल्या आहेत. स्नानगृहात एक मध्यवर्ती आयताकार तलाव असून त्याच्याभोवती कट्टा आहे. इमारती अनेक मजल्यांच्या आहेत. भिंतींना चिखलाचा गिलावा दिलेला आहे.

**शिल्प** : उपलब्ध झालेल्या शिल्पाकृती मोजक्या आहेत. एका दाढीवाल्या पुरुषाचे डोके व खांद्यापर्यंतचा भाग असलेले २४·५ सें. मी. उंचीचे एक शिल्प मिळाले आहे. हे प्राचीन भारतातील पहिले व्यक्तिशिल्प असावे. त्याच्या अंगावर त्रिदल नक्षीची शाल आहे. हे शिल्प पुरोहिताचे असावे. मानवी आकृती व प्राणी यांच्या मूर्तीही उपलब्ध झाल्या आहेत. येथील सर्वोत्तम कृती म्हणजे एका नग्न नर्तिकेचे शिल्प. या नर्तिकेच्या अंगावर थोडे दागिने आहेत. तिच्या चेहऱ्यावर वियोगाचे दुःख आहे. तिचा एक हात मनगटापर्यंत बांगड्यांनी भरलेला असून तिची केशरचना वैशिष्ट्यपूर्ण आहे. बैल व गायी यांचीही काही प्रभावी शिल्पे उपलब्ध झाली आहेत.

**खोदीव काम** : मुद्रा (Seals), मातीची खेळणी, भांडी, धातूच्या मूर्ती, दागदागिने इत्यादी इतर कला-अवशेष उपलब्ध झाले आहेत. मुद्रांवर हरप्पा लिपीतील लेख व बैल, घोडे, हत्ती, गेंडे इत्यादी प्राणी कोरलेले आहेत. मातीच्या भांड्यांवर प्राण्यांची चित्रे आहेत. शिवाय भौमितिक आकारांची साधी पण सुंदर नक्षी आहे. रंगकाम फक्त दोन रंगांमध्ये आहे. येथील धातुविद्या बरीच पुढारलेली होती. लोक कापसाचे कपडे वापरीत असत. लोकांना वजने व मापे ठाऊक होती. आरसे, सुऱ्या, फण्या दागिने इत्यादी अनेक वस्तू लोकांच्या वापरात होत्या. एकंदरीने समाज सुस्थितीत असून शिस्तप्रिय होता. त्याची संस्कृती सुधारलेली होती. •

**प्रश्न २ : रिकाम्या जागी योग्य शब्द भरून खालील वाक्ये पूर्ण करा व पुन्हा लिहा.**

(अ) सिंधू नदीच्या खोऱ्यातील संस्कृती ही भारतातील······संस्कृती होय.

(आ) सिंधुखोऱ्यातील संस्कृती इ. स. पूर्व······च्या सुमारास भरभराटीस आली.

(इ) इमारतींचें कोपरे बांधण्यासाठी ······ अक्षरांच्या आकाराच्या विटा वापरीत असत.

(ई) घरांचे जिने·········किंवा·········असत.

(उ) सार्वजनिक······हा सिंधुसंस्कृतीच्या नगररचनेचा खास विशेष होय.

(ऊ) '··········' हे दगडी शिल्प विशेष प्रसिद्ध आहे.

(ए) ······अवयव तयार करून ते जोडण्याची शिल्पपद्धत प्रचलित होती·

(ऐ) ···· ब्राँझमधील शिल्प हा सिंधु-शिल्पकलेचा उत्कृष्ट नमुना होय·

(ओ) सिंधुखोऱ्यात सापडलेल्या मुद्रा अतिशय·········आहेत.

(औ) अलंकृत व साधी ·····भांडी हा या कलेचा आणखी एक विशेष होय.

(अं) माती, शिंपले व ·········यांची खेळणी सिंधुखोऱ्यात आढळून आली.

(अः) ·····हलविणारा बैल व····हलविणारा माकडासारखा प्राणी यांचीही गमतीदार खेळणी आहेत.

**उत्तर** : (अ) सिंधू नदीच्या खोऱ्यातील संस्कृती ही भारतातील **प्राचीन** संस्कृती होय.

(आ) सिंधुखोऱ्यातील संस्कृती इ. स. पूर्व ३००० च्या सुमारास भरभराटीस आली.

(इ) इमारतींचे कोपरे बांधण्यासाठी **L** अक्षराच्या आकाराच्या विटा वापरीत असत.

(ई) घरांचे जिने **विटांचे** किंवा **लाकडाचे** असत.

(उ) सार्वजनिक **स्नानगृहे** हा सिंधुसंस्कृतीच्या नगररचनेचा खास विशेष होय.

(ऊ) '**दाढीवाला पुरुष**' हे दगडी शिल्प विशेष प्रसिद्ध आहे.

(ए) **सुटे** अवयव तयार करून ते जोडण्याची शिल्पपद्धत प्रचलित होती.

(ऐ) **नर्तिकेचे** ब्राँझमधील शिल्प हा सिंधु-शिल्पकलेचा उत्कृष्ट नमुना होय.

(ओ) सिंधुखोऱ्यात सापडलेल्या मुद्रा अतिशय **कलात्मक** आहेत.

(औ) अलंकृत व साधी **मातीची** भांडी हा या कलेचा आणखी एक विशेष होय.

(अं) माती, शिंपले व **हस्तिदंत** यांची खेळणी सिंधुखोऱ्यात आढळून आली.

(अः) **डोके** हलविणारा बैल व **हात** हलविणारा माकडासारखा प्राणी यांचीही गमतीदार खेळणी आहेत.

# प्रकरण ३ : मरणोत्तर जीवनात रंगलेले इजिप्शियन

**प्रश्न १ : खालील 'अ' गटातील शब्दांच्या 'ब' गटातील शब्दांशी जोड्या जुळवून त्या लिहा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) इजिप्त | खुफूचे ग्रेट पिरॅमिड |
| (२) मृत शरीर | 'रा' |
| (३) गीझा | 'नाईलची देणगी' |
| (४) सूर्यदेव | ममी |
| (५) छोटा बाक | झोसर राजाचा पिरॅमिड |
| (६) सक्कारा | मस्ताबा |
| (७) ओबेलिस्क | नाईलच्या पश्चिमेकडील निर्जन जागा |
| (८) राजाच्या थडग्यांचे खोरे | प्रचंड व निमुळते स्तंभ |
| (९) हायरोग्लिफिक्स | हंसांची भित्तिचित्रे |
| (१०) मेदम | चित्रलिपी |

**उत्तर :**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) इजिप्त | 'नाईलची देणगी' |
| (२) मृत शरीर | ममी |
| (३) गीझा | खुफूचे ग्रेट पिरॅमिड |
| (४) सूर्यदेव | 'रा' |
| (५) छोटा बाक | मस्ताबा |
| (६) सक्कारा | झोसर राजाचा पिरॅमिड |
| (७) ओबेलिस्क | प्रचंड व निमुळते स्तंभ |
| (८) राजाच्या थडग्यांचे खोरे | नाईलच्या पश्चिमेकडील निर्जन जागा |
| (९) हायरोग्लिफिक्स | चित्रलिपी |
| (१०) मेदम | हंसांची भित्तिचित्रे |

**प्रश्न २ : खालील विषयांवर टीपा लिहा.**

(१) पिरॅमिड, (२) राणी नेफ्रेटेचे व्यक्तिशिल्प.

**उत्तर :** (१) **पिरॅमिड :** पिरॅमिड म्हणजे भव्य थडगे. इजिप्ती स्थापत्यकलेचा हा एक श्रेष्ठ आविष्कार आहे. अशी सुमारे ३० पिरॅमिडस् इजिप्तमध्ये अस्तित्वात

आहेत. पिरॅमिड हे सूचीच्या आकाराचे किंवा त्रिकोणी आकाराचे स्थापत्य असून साधे, घन, नियमित व प्रचंड असते. मस्ताबा हे पिरॅमिडचे मूळ रूप. पिरॅमिडस् चुन्याच्या दगडाची बांधलेली असून अत्यंत रेखीव असतात. गीझाची पिरॅमिडस् सर्वाधिक महत्त्वाची आहेत. खुफूचे पिरॅमिड १४४ मी. उंच असून त्याच्या पायाचा घेर १३ एकर आहे. याच्या बांधकामासाठी २३ लक्ष दगड लागले. पिरॅमिडच्या आतील भागात अनेक मोठी दालने असतात. त्यांत शिल्पाकृती खोदलेल्या असून चित्रे रेखाटलेली असतात. पिरॅमिडच्या आतील भागातील खांब भडक रंगांनी रंगविलेले असतात. ज्या दालनात शव ठेवलेले असते त्याला सरदाब म्हणतात व ते दालन सुंदर वस्तूंनी सजविलेले असते. शिवाय, राजाच्या शवाबरोबर त्याला परलोकात उपयोगी पडाव्यात म्हणून खाण्यापिण्याच्या वस्तू, दागदागिने, उंची वस्त्रप्रावरणे व दासदासी यांनाही पुरण्यात येत असे. शवपेटिका चांदी-सोन्याच्या पत्र्यांनी मढविलेल्या असत. काही थडग्यांवर सोन्याचे सुंदर नक्षीकाम व धातुकाम केलेले आहे. काही पिरॅमिडस्‌मध्ये मंदिरेही आहेत. अशा मंदिरांपैकी राणी हॅतशेपसुतचे दॅर-एल-बाही नावाचे मंदिर सर्वांत भव्य आहे. पिरॅमिडमध्ये 'का' (आत्मा) व शव यांचे जतन करण्यात येते. अशी थडगीच इजिप्ती कलेचे मूळ उगमस्थान आहे.

**(२) राणी नेफ्रेटेचे व्यक्तिशिल्प** : राणी नेफ्रेटे ही इजिप्तची प्राचीन राणी. तिचे व्यक्ति-शिल्प (Portrait sculpture) प्राचीन इजिप्ती शिल्पकारांनी दगडात खोदलेले आहे. त्यातील कोरीव कामात सरळ व टोकदार रेषांचे प्राधान्य आहे. कानशिलाजवळचा, गाल व हनुवटीचे हाड यांमधला तसेच खालचा ओठ व हनुवटी यांमधील खोलगट भाग हे भाग स्पष्टपणे खोदले गेले आहेत. डोळे कमालीचे भावपूर्ण असून ओठ अतिशय बोलके वाटतात. नाकाच्या सरळपणावरून राणीच्या सरळ स्वभावाचा जणू प्रत्यय येतो. एकूण समस्त शिल्प साधे व निरलंकृत असूनही जिवंत आहे. राणीच्या मुखाची मृदुता स्पष्टतया प्रतीत होते. डोळे, कान, नाक, ओठ इत्यादी अवयवांच्या तपशिलांचे रेखाटन खुबीदार व उठावदार आहे. एकंदरीने शिल्पकाराने दगडासारख्या कठीण माध्यमात जणू प्राण ओतला आहे असा भास होतो.

**प्रश्न ३ : इजिप्ती कलेचे वर्णन थोडक्यात करा.**

**(अ) इजिप्ती कला** : इ. स. पूर्वी ३००० वर्षांच्या सुमारास नाईल नदीच्या काठी ज्या प्राचीन लोकांनी वसाहत स्थापन केली त्यांनीच इजिप्ती संस्कृतीचे बीजारोपण केले. त्या लोकांनी मनुष्याचा आत्मा (का) व प्रेत यांच्या जतनाची जी विशिष्ट पद्धत रूढ केली तीच इजिप्ती कलेचे उगमस्थान आहे. त्या कलेचा

आविष्कार व विलास खाली नमूद केलेल्या अवशेषांच्या साहृयाने समजावून घेता येतो.

(१) **व्यक्तिगत थडगी** : मृत मनुष्याचे शव थडग्यात पुरत असत. शवास औषधे लावून ते शवपेटिकेत ठेवीत असत. आत्म्याच्या संतोषासाठी कबरीवर सोन्याचे सुंदर नक्षीकाम व धातुकाम करीत असत. शिवाय शव घराच्या ज्या भागात पुरून ठेवत असत त्या भागातही दैनिक जीवन व धार्मिक कथा यांस धरून चित्रे काढीत असत व कोरीव काम करीत असत.

(२) **पिरॅमिड** : प्रश्न २ (१) चे उत्तर पाहा.

(३) **मंदिरे** : इजिप्तमध्ये भव्य मंदिरे आहेत. ती उपासनेसाठी बांधलेली आहेत. प्रवेशद्वारापाशी एडक्यांच्या शिल्पांच्या रांगा असतात. त्यानंतर दुतर्फा प्रचंड व निमुळते स्तंभ (ओबेलिस्क) असतात, ते ३० मी. उंच असतात. त्यांवर मजकूर कोरलेला असतो. दरवाज्यांपाशी राजांचे भव्य पुतळे असतात. मंदिरा-प्रमाणेच स्फिक्स हा इजिप्ती कलेचा आणखी एक विशेष. स्फिक्सशिल्प म्हणजे मानवी मस्तक व सिंहाचे शरीर असलेला प्राणी स्फिक्सशिल्प भव्य असते.

(आ) **शिल्पकला** : इजिप्ती कलाकारांनी प्राचीन काळात सर्वतोरचित शिल्प (round sculpture) व उत्थित शिल्प (relief) यांकडे विशेष लक्ष पुरविले. शिल्पाकृतीत शिकारीची व दैनंदिन जीवनाची (मिरवणुका, मेजवान्या, पशुपालन इ.) दृश्ये सुंदरपणे रेखाटलेली आहेत. सर्वतोरचित शिल्पात दगड चारी बाजूंनी खोदून मनुष्यदेहाची समस्त घनता संमुखतेच्या नियमानुसार दाखविलेली असते, तर कोरीव शिल्पात दगडाचा सपाट पृष्ठभाग थोडाथोडा खोदलेला असतो व त्याच्या योगे आकारांची लांबी, रुंदी व जाडी ही परिमाणे दर्शविलेली असतात. यात आकाराच्या सुंदर मांडणीस महत्त्व असते. शिल्पात मनुष्याकृती खोदण्याची एक विशिष्ट शैली इजिप्ती कलाकारांनी निश्चित केलेली होती. इजिप्ती शिल्पातील रेखांकन व कोरीव काम यांत सरळ व टोकदार रेषा अधिक प्रमाणात असतात. त्या कलाकृतींचे खरे सौंदर्य आकारांचे सुंदर आयोजन व साधेपणा यांत सामाव-लेले आहे. इजिप्ती शिल्पाकृती रुबाबदार वाटतात. इजिप्ती कलावंतांनी व्यक्ति-शिल्पे (Portrait sculptures) बनविण्यातही अपूर्व कौशल्य प्रकट केले. रेनॉफेर, खाफ्रे हे सर्वतोरचित शिल्पांचे उत्कृष्ट नमुने असून राहोतेप राजाचा पुतळा पूर्णपणे रंगविलेला आहे. नारमेर राजाची तबकडी, शिकार करणारा 'ती', हेसिरेची चित्रपट्टी ही उत्थित शिल्पाची नमुनेदार उदाहरणे आहेत.

(इ) **चित्रकला** : इजिप्ती चित्रातील आकृती सरळ व ऐटबाज असतात. रंगकामात मोकळेपणा व सफाईदारपणा प्रतीत होतो. चित्राचे समग्र संयोजन कुशलतापूर्ण असते. सरळ व टोकदार रेषांमुळे रेखाटन अस्सल व जिवंत वाटते.

इजिप्ती चित्रकार कमीत कमी रेषा व रंग वापरून अधिकाधिक परिणाम साधतो. यातच त्याची श्रेष्ठता सामावलेली आहे. चित्रांत शिकार, मेजवानी, कुस्ती, मासेमारी इत्यादी दृश्ये रंगविलेली असतात.

एकंदरीने इजिप्ती कलेने Neolithic age च्या कलेचा वारसा जतन केला व तीच परंपरा पुढे चालू ठेवली. इजिप्ती कला काहीशी उत्सवी किंवा दरबारी होती. तीत राज्यकर्त्यांच्या वैभवाचे व दिमाखाचे प्रतिबिंब पडले होते. तिच्यात शिष्टाचारांचा बंदिस्तपणा व संकेताविषयीचा आदर हे विशेष प्रत्ययास येतात. तिच्यात सांकेतिकता व प्रतिरूपता (prototypeness) यांचे वर्चस्व झाल्यामुळे तिच्यातील व्यक्तिविशिष्टता लोप पावली. ती कला प्राधान्याने राज्यकर्त्यांच्या शक्तिसामर्थ्याचा दबदबा निर्माण करण्यासाठी किंवा त्यांची शरीरे कायमची जतन करून ठेवण्यासाठी जन्माला आली होती. ती प्रशंसेसाठी किंवा आस्वादासाठी जन्माला आलेली नव्हती. त्यामुळे त्या कलेच्या आविष्कारात स्फिंक्स (sphynx) व पिरॅमिडस् हेच प्रचंड व स्थिर आकार पुन:पुन्हा दृष्टीस पडतात. राजे व पुरोहित यांना स्वत:चा लौकिक टिकवून धरावयाचा असल्यामुळे त्यांच्या आदेशानुसार साकार झालेल्या कलाकृतीत अमानवी प्राण्यांना (Sub-human creatures) प्राधान्य मिळाले. किंबहुना प्राण्यांची चित्रे हीच कलेची मानवी बाजू समजली जाऊ लागली. परिणामी अॅखनेतोन राजा व राणी नेफ्रेटे (Nefertiti) यांच्या व्यक्तिशिल्पांत तेवढी व्यक्तिगतता आहे. बाकी सर्व कलाकृती प्राणिनिष्ठ आहेत. समग्र इजिप्ती कलेत सारखेपणा (sameness), एकरूपता (uniformity), अभ्यासपूर्णता व काटेकोर प्रमाणबद्धता ही वैशिष्टचे का उतरली आहेत त्याची कारणे वरील विवेचनावरून आता ध्यानात येतील.

# प्रकरण ४ : संघर्षमय जीवनात गुरफटलेले मेसोपोटेमियन

**प्रश्न १. : रिकाम्या जागी योग्य शब्द भरून खालील वाक्ये पूर्ण करा व पुन: लिहा.**

(अ) टैग्रीस व·········या दोन नद्यांमधील प्रदेशाला ·····असे संबोधिले जाई.

(आ) इजिप्ती शिल्पकलेप्रमाणेच मेसोपोटेमियाची शिल्पकलाही······आहे.

(इ) राजवाडे व······हे वास्तुकलेचे विशेष तर फरशांवरील रंगीत······ हा चित्रकलेचा विशेष होय.

(ई) मेसोपोटेमियात ······उपलब्ध नव्हता म्हणून तेथील बांधकामात······ व विटा यांचाच उपयोग करण्यात आला आहे.

(उ) ············हा सुमेरियन वास्तुकलेचा विशेष होय.

(ऊ) उर येथील 'निनखुरसाग' या मातृदेवतेच्या मंदिराच्या प्रवेशद्वारी ········ सिंह आहेत.

(ए) सुमेरियन वास्तुकलावंतांनी पिरॅमिडसारखे·········बांधले.

(ऐ) ·········हा सुमेरियन कलाकारांचा अत्यंत आवडता विषय.

(ओ) '········· ·········' हे सुमेरियन उत्थित शिल्पकलेचे उत्कृष्ट उदाहरण आहे.

(औ) ······ डोळे, अणीदार······व······नाक ही सुमेरियन शिल्पांची वैशिष्टये

(अं) सेमेटिक वंशीयांची राजधानी अक्कड येथे असल्यामुळे त्यांना ······ ······ म्हणतात.

(अः) असुर हा ॲसीरियन लोकांचा·········होता.

(क) 'मृत्युपंथाला लागलेली······' हे उत्थित शिल्प कलादृष्टया प्रेक्षणीय आहे.

उत्तर : (अ) टैग्रीस व **युफ्राटिस** या दोन नद्यांमधील प्रदेशाला **मेसोपोटेमिया** असे संबोधिले जाई.

(आ) इजिप्ती शिल्पकलेप्रमाणेच मेसोपोटेमियाची शिल्पकलाही **दर्जेदार** आहे.

(इ) राजवाडे व **मंदिरे** हे वास्तुकलेचे विशेष तर फरशांवरील रंगीत **चित्रे** हा चित्रकलेचा विशेष होय.

(ई) मेसोपोटेमियात **दगड** उपलब्ध नव्हता म्हणून तेथील बांधकामात **लाकूड** व विटा यांचाच उपयोग करण्यात आला आहे.

(उ) **मंदिर** हा सुमेरियन वास्तुकलेचा विशेष होय.

(ऊ) उर येथील 'निनखुरसाग' या मातृदेवतेच्या मंदिराच्या प्रवेशद्वारी **तांब्याचे** सिंह आहेत.

(ए) सुमेरियन वास्तुकलावंतांनी पिरॅमिडसारखे **झिग्गुरत** बांधले.

(ऐ) **लढत/संघर्ष/झुंज** हा सुमेरियन कलाकारांचा अत्यंत आवडता विषय.

(ओ) '**उरनाम्मुची स्मारकशिला**' हे सुमेरियन उत्थित शिल्पकलेचे उत्कृष्ट उदाहरण आहे.

(औ) **फुगीर** डोळे, अणीदार **कोपर** व **भलेमोठे** नाक ही सुमेरियन शिल्पांची वैशिष्टये.

(अं) सेमेटिक वंशीयांची राजधानी अक्कड येथे असल्यामुळे त्यांना **अक्काडियन** म्हणतात.

(अः) असुर हा ॲसीरियन लोकांचा **सूर्यदेव** होता.

(क) 'मृत्युपंथाला लागलेली **सिंहीण**' हे उत्थित शिल्प कलादृष्टया प्रेक्षणीय आहे.

**प्रश्न २ : खालील कलांची वैशिष्टये प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

(अ) मेसोपोटेमियाची कला, (आ) सुमेरियन वास्तुकला, (इ) अक्काडियन शिल्पकला, (ई) गुदेची व्यक्तिशिल्पे, (उ) बॅबिलोनियन वास्तुकला.

**उत्तर** : (अ) **मेसोपोटेमियाची कला**—राजवाडे व मंदिरे हे वास्तुकलेचे विशेष; फरशांवरील रंगीत चित्रे हा चित्रकलेचा विशेष आणि रुपे, तांबे व ब्रांझ या धातूंचा कलानिर्मितीसाठी उपयोग हा खास विशेष.

(आ) **सुमेरियन वास्तुकला**—मंदिरे व पिरॅमिडसारखे झिग्गुरत हे असाधारण विशेष.

(इ) **अक्काडियन शिल्पकला**—नरमसिन राजाने आपल्या विजयाच्या स्मृत्यर्थ बनविलेली स्मारकशिला आणि एका अक्काडियन राजपुरुषाचे ३·६ मी. उंचीचे ब्राँझमधील व्यक्तिशिल्प ही वैशिष्टये.

(ई) **गुदेची व्यक्तिशिल्पे**—गोल केलेले कोपरे, दंडगोलाधारित आकार व उघड्या हाताचे उठावदार स्नायू ही वैशिष्टये.

(उ) **बॅबिलोनियन वास्तुकला** : मजले असलेले प्रासाद, त्यांच्या गच्च्यांवर झाडे असलेल्या बागा, अर्धवर्तुळाकार कमानी, मध्यवर्ती मोकळे अंगण, भरभक्कम भिंती, छोटया खोल्या व झिग्गुरत हे विशेष.

**प्रश्न ३ : खालील विषयांवर प्रत्येकी पाच ओळींची टिपणे लिहा.**

(अ) झिग्गुरत, (आ) सुमेरियन शिल्पे, (इ) सारगाँ राजाची मुद्रा, (ई) गुदेची व्यक्तिशिल्पे, (उ) बॅबेलचा मनोरा, (ऊ) प्राणिशैली.

**उत्तर** : (अ) **झिग्गुरत**-सुमेरियन वास्तुकलेचा पिरॅमिडसारखा आविष्कार. उर व वारका येथील झिग्गुरत सुस्थितीत आहेत. उरचा झिग्गुरत विस्तृत चौथऱ्यावर व चार टप्प्यांचा असून त्यात चंद्रदेव, चंद्रदेवता व इतर देवता यांची मंदिरे आहेत. अगदी वरच्या टप्प्यावर उपासनामंदिर आहे. टप्प्यांना पाताळ, पृथ्वी, स्वर्ग व सूर्य यांचे प्रतीकरूप रंग दिलेले आहेत.

(आ) **सुमेरियन शिल्पे**-सुमेरियन शिल्पांचे उत्थित व सर्वतोरचित असे दोन प्रकार. उत्थित शिल्पांचा विषय झुंज किंवा लढत असून त्यांतील मनुष्याकृतींचे अवयव अतिशय रेखीवपणे कोरलेले असतात. सर्वतोरचित शिल्पे भौमितिक स्वरूपाची असून फुगीर डोळ्यांत केलेले रंगीत जडावकाम, अणीदार कोपर व मोठे नाक ही त्यांची वैशिष्ट्ये आहेत. सुमेरियन शिल्पातील आकार मुख्यतः शंकू व दंडगोल यांवर आधारित आहेत. प्राण्यांच्या स्वरूपातील देवदेवतांची शिल्पेही आढळतात, उदा. 'बकरा आणि झाड' नामक शिल्प.

(इ) **सारगॉं राजाची मुद्रा**-हा सुमेरियन मुद्राकलेचा वैशिष्टयपूर्ण नमुना होय. या मुद्रेवर जमिनीवर गुडघ टेकून व हातात खुजे घेऊन पाणी ओतणाऱ्या पौराणिक आकृती कोरलेल्या आहेत. शिवाय त्या आकृतींच्या समोर परस्परविरुद्ध दिशांना तोंडे करून उभ्या असलेल्या बैलांच्या आकृती आहेत. मुद्रेच्या खालील बाजूस पाण्याचा प्रवाह सूचित करणाऱ्या नागमोडी रेषा आहेत. एवढया छोटया दगडावर नाजूक, वास्तवतापूर्ण व सफाईदार काम कौशल्यपूर्ण रीतीने केलेले आहे.

(ई) **गुदेची व्यक्तिचित्रे**-गुदे या नवसुमेरियन राजाने लागाईश नामक राज्यात वीस मंदिरे बांधली. त्यांमध्ये वैयक्तिक महत्त्व व ऐश्वर्य वाढविण्यासाठी स्वतःचे अनेक पुतळे करवून बसविले. ते डायोराइट दगडांचे असून सफाईदारपणे घडविलेले आहेत. काही पुतळे बसलेल्या व काही उभ्या अवस्थेतील आहेत. गोल कोपरे, आणि दंडगोलाकार व उघडया हाताचे उठावदार स्नायू यांमुळे ही शिल्पे जिवंत भासतात.

(उ) **बॅबेलचा मनोरा** – नेबुचदनेझर नामक बॅबिलोनियन राजाने हा मनोरा बांधला. 'मार्दुकचे मंदिर' म्हणूनही ओळखल्या जाणाऱ्या या वास्तूचे बांधकाम भव्य व विस्तृत आहे. यात सिंहांची उत्थित शिल्पे आहेत. ही प्राणिशिल्पे जोषपूर्ण आहेत. ती पिवळा, तांबडा, व निळा अशा विविध रंगांत रंगविलेली आहेत.

(ऊ) **प्राणिशैली**-पर्शियन कारागिरांनी शस्त्रे, खागिरे, पेले, अलंकरणाच्या वस्तू इत्यादींवर जी विशिष्ट चित्रे काढली त्यांना 'प्राणिशैली'तील चित्रे म्हणतात. या शैलीत प्राण्यांच्या आकारांचा कल्पनासंपन्न उपयोग करून घेतला जातो. सुसा येथे सापडलेल्या मातीच्या रंगीत पेल्यावरील अलंकरण याच शैलीतील आहे. त्यावर बकरा, धावणारा कुत्रा, लांब मानेचा पक्षी यांची मोजक्या रेषांतील नक्षीदार व मोहक चित्रे आहेत.

# प्रकरण ५ : निसर्गप्रेमी चिनी लोक

**प्रश्न १ : खालील विषयांवर प्रत्येकी तीन वाक्यांत टिपणे लिहा.**

(अ) चिनी कलेतील एकात्मता, (आ) तत्त्वज्ञान व चिनी कला, (इ) प्रचंड भिंत, (ई) नव अश्मयुगीन चिनी कला, (उ) चिनी इमारती, (ऊ) चिनी वास्तुकला, (ए) मैत्रेय, (ऐ) चिनी चित्रकला.

**उत्तर** : (अ) **चिनी कलेतील एकात्मता**-हिचे उगमस्थान चिनी संस्कृतीत आहे. निसर्गपूजा, व्यक्तीपेक्षा कुटुंबाला समाजात महत्त्व, मृतांबद्दलची आदरबुद्धी, भविष्यकाळापेक्षा भूतकाळात रमणे ही चिनी संस्कृतीची वैशिष्ट्ये. त्यांचे प्रतिबिंब चिनी कलेत पडले आहे.

(आ) **तत्त्वज्ञान व चिनी कला**– कन्फ्यूशियस व लाओत्सू हे चीनमधील दोन थोर तत्त्ववेत्ते. त्यांच्या तत्त्वज्ञानांना अनुक्रमे कन्फ्युशियसवाद व ताओवाद म्हणतात. या दोन्ही तत्त्वज्ञानांचा चिनी कलेवर परिणाम झाला.

(इ) **प्रचंड भिंत** : चीनच्या सीमेवर तार्तर वंशाचे लोक राहात असत. ते त्सिन नावाने प्रसिद्ध होते. त्यांनी चीनवर राज्य करावयास सुरुवात केल्यावर मंगोलियन लोकांपासून आपले रक्षण करण्यासाठी **प्रचंड भिंत** बांधली.

(ई) **नव अश्मयुगीन चिनी कला**–चाउ घरे, कंगोरेदार खाचा असलेली गोल झाकणे, त्यावरील आकृती, पक्क्या मातीच्या लहान मूर्ती, मातीची भांडी, त्यांवरील नैसर्गिक वस्तूंची चित्रे व रंगीत भौमितिक आकार हे या कलेचे नमुने आहेत.

(उ) **चिनी इमारती**–चिनी इमारतीस बाकदार व विस्तृत असे एक किंवा अशी दोन छपरे असून सर्वांत वरचे छप्पर बाहेरून दिसू न शकणाऱ्या स्तंभांनी तोलून धरलेले असते. अशा या लाकडी छपरावर चुन्याची किंवा हिरव्यानिळ्या रंगांची कौले बसविलेली असून इमारतीचे सर्व भाग ड्रॅगॉन, मनुष्य, पशू, पक्षी इत्यादींच्या आकृतींनी अलंकृत केलेले असतात. या सर्व बांधकामात प्रामुख्याने लाकडाचा उपयोग करण्यात आलेला असतो.

(ऊ) **चिनी वास्तुकला**–स्वर्गमंदिर, पाओ-हे-तीनचा मंडप, पॅगोडा व प्रवेश-द्वारे हे चिनी वास्तुकलेचे ठळक नमुने. पैकी पेकिंगमधील स्वर्गमंदिर हे प्रार्थना-मंदीर असून प्रतीकात्मक वास्तुकलेचा उत्तम नमुना आहे; तर पॅगोडा हा भारतीय

स्तूपाचा चिनी अवतार होय. भारतीय स्तूपासमोरील तोरणांवरून प्रेरणा घेऊन प्रवेशद्वारे, श्रेष्ठ व्यक्तींच्या स्मृतिप्रीत्यर्थ, उभारली जात असत.

(ए) **मैत्रेय**–चुनखडीच्या दगडातील प्राचीन प्रेक्षणीय व चिनी शिल्प. मैत्रेय आसन घालून उपदेशकाच्या पवित्र्यात बसला आहे. हे शिल्प सर्वतोरचित असूनही उत्थित शिल्पासारखे वाटते.

(ऐ) **चिनी चित्रकला**–चिनी चित्रकलेचा आविष्कार भित्तिचित्रे, लघुपट चित्रे आणि विशालपट चित्रे अशा तीन स्वरूपांत आढळतो. चित्र हे कुटुंबाच्या मालमत्तेचा भाग मानले जाई. समारंभप्रसंगी ते दर्शनार्थ ठेवले जाई व त्यानंतर ते गुंडाळून ठेवले जाई.

**प्रश्न २ : खालील वाक्यांतील रिकाम्या जागी योग्य शब्द भरून वाक्ये पूर्ण करा व पुन्हा लिहा.**

(अ) चिनी कलेत·········आणि त्याची विविध रूपे यांना महत्त्व आहे.

(आ) ······घराण्यातील राजांनी चीन हे नाव त्या देशाला दिले.

(इ) भारतीय बोधिसत्त्व चीनमध्ये '·······' या नावाने ओळखला जाऊ लागला.

(ई) शांग राजवंशाच्या काळापासून·········धातूचा कलात्मक उपयोग सुरू झाला.

(उ) जपानप्रमाणे चीनमधील इमारत हा········एक अविभाज्य भाग असे.

(ऊ) पेकिंग येथील······हे प्रतीकात्मक चिनी वास्तुकलेचे उत्तम उदाहरण आहे.

(ए) पॅगोडा हा भारतीय············चिनी अवतार होय.

(ऐ) चिनी चित्रकलेत········· सर्वांत जास्त महत्त्व आहे.

(ओ) चिनी चित्रकार कवी असल्यामुळे चिनी चित्रकला व·········यांचे निकटचे नाते आहे.

(औ) 'राजघराण्यातील आचार्येचा उपदेश' हे वैशिष्टयपूर्ण चित्र········· नामक श्रेष्ठ चित्रकाराने·········शतकात रेखाटले.

(अं) चिनी निसर्गचित्रांचे विषय बहुधा ······व ········· हेच असतात.

(अः) निसर्गाची विविध रूपे चित्रित करण्याच्या चिनी चित्रकारांच्या विशिष्ट पद्धती '··················' या नावाने ओळखल्या जातात.

(क) अलंकृत·········· भांडी हा चिनी कलेचा एक विशेष होय.

(ख) चिनी कारागीर·····ह्या रत्नासारख्या दिसणाऱ्या दगडाचा उपयोग करीत असत.

**उत्तर** : (अ) चिनी कलेत **ड्रॅगॉन** आणि त्याची विविध रूपे यांना महत्त्व आहे.

(आ) **त्सिन** घराण्यातील राजांनी चीन हे नाव त्या देशाला दिले.

(इ) भारतीय बोधिसत्त्व चीनमध्ये **'कुर्वान यीन'** या नावाने ओळखला जाऊ लागला.

(ई) शांग राजवंशाच्या काळापासून **ब्रॉंझ** धातूचा कलात्मक उपयोग सुरू झाला.

(उ) जपानप्रमाणे चीनमधील इमारत हा **निसर्गाचा** एक अविभाज्य भाग असे.

(ऊ) पेकिंग येथील **स्वर्गमंदिर** हे प्रतीकात्मक चिनी वास्तुकलेचे उत्तम उदाहरण आहे.

(ए) पँगोडा हा भारतीय **स्तूपाचा** चिनी अवतार होय.

(ऐ) चिनी चित्रकलेत **रेषेला** सर्वांत जास्त महत्त्व आहे.

(ओ) चिनी चित्रकार कवी असल्यामुळे चिनी चित्रकला व **वाङ्मय** यांचे निकटचे नाते आहे.

(औ) 'राजघराण्यातील आचार्येचा उपदेश' हे वैशिष्टयपूर्ण चित्र '**कु-काय--चीह**' नामक श्रेष्ठ चित्रकाराने **चौथ्या** शतकात रेखाटले.

(अं) चिनी निसर्गचित्रांचे विषय बहुधा **पर्वत** व **नद्या** हेच असतात.

(अः) निसर्गाची विविध रूपे चित्रित करण्याच्या चिनी चित्रकारांच्या विशिष्ट पद्धती, **'पर्वताला पडलेल्या सोळा सुरकुत्या'** या नावाने ओळखल्या जातात.

(क) अलंकृत **ब्रॉंझची** भांडी हा चिनी कलेचा एक विशेष होय.

(ख) चिनी कारागीर **जेड** ह्या रत्नासारख्या दिसणाऱ्या दगडाचा उपयोग करीत असत.

# प्रकरण ६ : आर्यकलेचे आरंभकाळातील स्वरूप

**प्रश्न १. खालील मुद्यांवर एकेका वाक्यात टीपा लिहा.**

**(अ) सिंधू संस्कृतीचा नाश, (आ) सिंधू संस्कृतीचे आर्यकृत अनुसरण, (इ) आर्यांची घरे, (ई) रामायणकालीन कलाविकास, (उ) ऋग्वेदातील कलाविषयक निर्देश, (ऊ) महाभारतकालीन कला.**

**उत्तर –** (अ) सिंधू नदीच्या पुरामुळे किंवा परकीयांच्या आक्रमणामुळे सिंधू संस्कृतीचा नाश झाला असावा.

(आ) मातृपूजा, पशुपूजा, वृक्षपूजा व लिंगपूजा या सिंधू संस्कृतीच्या वैशिष्टयांचे आर्यांनी अनुसरण केले.

(इ) सुरुवातीस आर्य बांबूंच्या किंवा गवताच्या पेंढयांनी शाकारलेल्या झोपडयात राहात असत, परंतु उत्तर काळात ते मातीच्या व लाकडाच्या घरांत राहू लागले आणि त्या घरांत अग्नी ठेवण्याची खोली, स्त्रियांची खोली, बैठकीची खोली, विश्रांतीची खोली व धान्याच्या कोठाराची खोली अशी विविध दालने असत.

(ई) भव्य यज्ञशाळा, पद्म-स्वस्तिक-अंकुश-वज्रप्रभृती आकारांच्या अनेक-मजली इमारती, स्फटिकाचे / सोन्याचे हजारो स्तंभ, हस्तिदंती तोरणे, हिऱ्याचे चौथरे, विविध चित्रशाळा, पाषाणाचे पुतळे, धातुनिर्मित मूर्ती व रत्नजडित विमाने अशा बहुविध कलाकृतींची वर्णने रामायणात आढळतात.

(उ) ऋग्वेदात कातडयावर अग्नी, निशा, उषा इत्यादी दैवतांची प्रतीकात्मक चित्रे काढल्याचा उल्लेख आढळतो.

(ऊ) चित्रलेखेने उषेसाठी स्मरणाने रेखाटलेली राजपुत्रांची व्यक्तिचित्रे, दुर्योधनाने पांडवांना जाळण्यासाठी निर्मिलेले लाक्षागृह व पांडवांनी कौरवांच्या फजितीसाठी उभारलेली मयसभा इत्यादी चित्र-वास्तु-कलांचे निर्देश महाभारतात आले आहेत.

# प्रकरण ७ : बौद्ध कलेचे आरंभाचे स्वरूप

**प्रश्न १ : खालील विषयांची एकेका वाक्यात माहिती लिहा.**

(अ) बौद्ध धर्माने धर्मप्रचारार्थ वापरलेल्या कला.

(आ) बौद्ध कलेला आश्रय देणारे राजे.

(इ) बौद्धकालीन कलाकृतींचे मुख्य प्रकार.

**उत्तर (अ)** बौद्ध धर्माने धर्मग्रंथांखेरीज वास्तू, चित्र व शिल्प या कला प्रचारकार्याची माध्यमे म्हणून वापरल्या.

**(आ)** अशोक, मिलिंद, कनिष्क व हर्षवर्धन या राजांनी बौद्ध कलेला आश्रय दिला.

**(इ)** बौद्धकालीन कलाकृतींचे मुख्य प्रकार चार, ते असे–१. स्तंभ (धर्मप्रचारार्थ उभारण्यात आलेले खांब), २. स्तूप (बुद्ध व बौद्ध भिक्षू यांच्या अवशेषांवर उभारलेल्या समाध्या), ३. चैत्य (बौद्धांची प्रार्थनामंदिरे) व ४. विहार (बौद्ध भिक्षूंची डोंगरातील निवासस्थाने).

# प्रकरण ८ : मौर्यकाल

**प्रश्न १ : रिकाम्या जागी कंसांत दिलेल्या शब्दांपैकी योग्य शब्द भरून खालील वाक्ये पूर्ण करा व ती पुन्हा लिहा.**

(अ) अशोक-कालीन कलेवर.........कलेचा परिणाम झाला होता. (रोमनांच्या, सुमेरियनांच्या, ग्रीकांच्या)

**(ब)** चंद्रगुप्ताच्या काळात वास्तुकलेत........वापर मोठ्या प्रमाणात केला जाई. (लाकडाचा, दगडाचा, ब्राँझचा)

**(क)** लेणी.........जातात. (बांधली, उभारली, खोदली)

**(ड)** लोमश ऋषीच्या लेण्याच्या आतील भागात ......... रांगेचे शिल्प आहे. (बैलांच्या, हत्तींच्या, हरिणांच्या)

**(इ)** अशोकाने खोदलेल्या शिलालेखांत सर्वसामान्य ......... पाठ दिलेले आहेत. (धर्माचे, नीतीचे, तत्त्वज्ञानाचे)

**(ई)** अशोककालीन स्तंभ.........चकाकणारे आहेत. (सोन्याप्रमाणे, मोत्याप्रमाणे, काचेप्रमाणे)

**(उ)** भारतीय राजमुद्रा हे ......... येथील अशोकस्तंभाचे शीर्ष आहे. (सारनाथ, पाटलिपुत्र, दिल्ली)

**(ऊ)** घोडा, बैल, हत्ती व.........या प्राण्यांना बौद्ध कलेत विशेष महत्त्व आहे. ( सिंह, गाय, हरिण )

**(ए)** दीदारगंज येथील......ची मूर्ती प्रसिद्ध आहे. (देवी, यक्षिणी, सेविके)

**उत्तर :** (अ) अशोक-कालीन कलेवर **ग्रीकांच्या** कलेचा परिणाम झाला होता.

(ब) चंद्रगुप्ताच्या काळात वास्तुकलेत **लाकडाचा** वापर मोठ्या प्रमाणात केला जाई.

(क) लेणी **खोदली** जातात.

(ड) लोमश ऋषीच्या लेण्याच्या आतील भागात **हत्तींच्या** रांगेचे शिल्प आहे.

(इ) अशोकाने खोदलेल्या शिलालेखांत सर्वसामान्य **नीतीचे** पाठ दिलेले आहेत.

(ई) अशोक-कालीन स्तंभ **काचेप्रमाणे** चकाकणारे आहेत.

(उ) भारतीय राजमुद्रा हे **सारनाथ** येथील अशोकस्तंभाचे शीर्ष आहे.

(ऊ) घोडा, बैल, हत्ती व **हरिण** या प्राण्यांना बौद्ध कलेत विशेष महत्त्व आहे.

(ए) दीदारगंज येथील **यक्षिणीची** मूर्ती प्रसिद्ध आहे.

**प्रश्न २ : पुढील विषयांवर प्रत्येकी पाच वाक्यांची टिपणे लिहा :**

(अ) गुप्तकालीन पाटलिपुत्र, (ब) लोमश ऋषीचे लेणे, (क) अशोकस्तंभ.

**उत्तर** : (अ) **गुप्तकालीन पाटलिपुत्र**–गंगाकिनारी वसलेले हे शहर गुप्त-काळात राजधानीचे शहर असून शिवाय व्यापारी केंद्र होते. ९ मैल लांब व १½ मैल रुंद असलेल्या या शहराभोवती ५६० बुरुजांची व ६० प्रवेशद्वारांची भक्कम लाकडी तटबंदी होती. बाण मारता येतील अशी असंख्य गवाक्षे या तटाला ठेवण्यात आली होती व तटाबाहेर १८० मीटर रुंदीचा, १२ मीटर खोलीचा व सदैव पाण्याने भरलेला खंदक होता. चंद्रगुप्ताचा राजवाडा अतिशय भव्य असून त्याच्या लाकडी खांबांना सोन्याचे वेल गुंडाळलेले होते. मेगॅस्थेनीसच्या मते हा राजवाडा इराणच्या बादशाहाच्या राजवाड्याहून मोठा होता.

(ब) **लोमश ऋषीचे लेणे** : हे लेणे बाराबर डोंगरात असून ह्याचा दरवाजा दगडी असला तरी तत्कालीन लाकडी दरवाज्यासारखा आहे. या दरवा-ज्याला घोड्याच्या नालाच्या आकाराची कमान आहे. त्याच्या आतील अर्धवर्तुळा-कार पट्टीवर हत्तींच्या रांगेचे शिल्प असून त्याच्यावर चौकटीची जाळी आहे. या लेण्याच्या प्रवेशद्वाराचे उभे खांब आतल्या बाजूस झुकलेले आहेत.

(क) **अशोकस्तंभ**–अशोकाने चुनारच्या खाणीतील दगडांत अनेक उंच स्तंभ घडविले. चौथरा नसलेले हे स्मारकस्तंभ नारळाच्या झाडाप्रमाणे जमिनीतून वर आल्यासारखे दिसतात. या स्तंभांचे मुख्य दंड गोलाकार व वर निमुळते होत गेलेले असून एकसंधी दगडाचे बनविलेले असतात. 'कमलनाल' या नावाने ओळ-खल्या जाणाऱ्या या मुख्य दंडावर स्तंभाचे शीर्ष बसविण्यात येई. या शीर्षाच्या खालील बाजूस कमळ, कमळाच्या मध्यभागी चौथरा व त्याच्या मधोमध सिंह,

बैल, हत्ती इत्यादींची शिल्पे असत. दंड व शीर्ष तांब्याच्या खिळचाने एकमेकांस जोडलेले असत.

**प्रश्न ३ : खालील स्थळे कोणत्या कलाकृतींसाठी प्रसिद्ध आहेत? त्या कलाकृतींची माहिती लिहा.**

(अ) सारनाथ, (आ) सांची, (इ) भारहुत, (ई) अमरावती, (उ) दीदारगंज, (ऊ) पारखम, (ए) मथुरा, (ऐ) तक्षशिला, (ओ) रामपूर्वा.

**उत्तर :** (अ) **सारनाथ** – हे ठिकाण उत्तरप्रदेशात वाराणसी शहराच्या जवळ असून बुद्धकालीन अवशेषांसाठी प्रसिद्ध आहे. त्या अवशेषांमध्ये सिंहस्तंभशीर्ष मुख्य आहे. हा स्तंभ इ. स. पूर्व २४० मधील असून तो भगवान बुद्धाच्या प्रथम उपदेशाच्या जागी उभा करण्यात आला होता. त्याच्या चारी बाजूंस धर्मचक्रे असून त्यांच्या वरच्या भागात चार सिंहांच्या आकृती एकमेकांच्या पाठीस पाठ टेकून चार दिशांकडे तोंडे करून उभ्या असल्याचे दगडी शिल्पात दर्शविले आहे. सिंहाकृती रुबाबदार व धीरगंभीर आहेत. धर्मचक्राच्या खालच्या बाजूंस लहान चक्रे असून त्यांवर बैल, हरिण, हत्ती व घोडा ह्या बौद्ध धर्मात विशेष महत्त्व पावलेल्या प्राण्यांच्या आकृती खोदलेल्या आहेत. हे सर्व प्राणी अगदी स्वाभाविक भासतात ही शिल्पे तंत्रदृष्टचा परिपूर्ण व आकर्षक आहेत. ही शिल्पे प्रामुख्याने दगडांतच खोदलेली असून दगड उत्तम प्रकारे घासून गुळगुळीत व चमकदार बनविण्यात आला आहे. या शिल्पशैलीचा संबंध पश्चिम आशियाई (इराणी) कलेशी आहे. वरील सिंहाकृती शिल्पच भारताची राजमुद्रा (National emblem) म्हणून स्वीकारण्यात आले आहे.

वरील शिलास्तंभाखेरीज प्राचीन चैत्याचे व विहाराचे अवशेष सारनाथला उपलब्ध झाले आहेत. विहारातील दालने पक्क्या विटांची असून खूप मोठी आहेत. त्याखेरीज तेथे दोन स्तूप आहेत. त्यांची रचना इतरत्र आढळून आलेल्या स्तूपांसारखीच आहे. चैत्य व विहार यांची प्रवेशद्वारे, त्यांच्या कमानी, त्यांवरील शिल्पे, मातीची व धातूची भांडी इत्यादी अनेक वस्तू उत्खननामधून उपलब्ध झाल्या असून त्या सर्व वस्तुसंग्रहालयात जतन करून ठेवलेल्या आहेत.

(आ) **सांची** – हे मध्यप्रदेशातील एक खेडेगाव भोपाळपासून ४५ कि. मी. अंतरावर असून येथे मिळालेले अवशेष प्राचीन काळचे मानले जातात. येथे तीनशे फूट उंचीची टेकडी असून तिच्यावर बौद्ध स्तूप आहे. या स्तूपाच्या बांधकामाला मौर्य काळात (इ. स. पूर्व तिसऱ्या शतकात) सुरुवात झाली. ह्याचे बांधकाम अनेक शतके चालू होते. त्यामुळे याच्या रचनेत मौर्य, शुंग, कुशाण, व गुप्त अशा वेगवेगळचा शैलींचे दर्शन घडते. सांचीचा हा स्तूप त्या नगरीचे वैभव होय. तो अर्धवर्तुळाकार पायावर उभा असून तो आकार म्हणजे पृथ्वीला पोटात सामावून

घेणारा स्वर्ग होय अशी मुळातली कल्पना आहे. त्याच्या सभोवार चौरस हर्मिका असून जगद्रूप पर्वतामधून एक यष्टी (काठी) बाहेर पडते. त्या यष्टीवर छत्रावली असून तिचा अर्थ देवलोक असा आहे. पायाच्या वरील भागात सोळा फुटांवर प्रदक्षिणेसाठी वाट आहे. त्या सर्वांच्या भोवताली कठडे व तोरणे (१०.२० मी. उंच) आहेत. पायाचा व्यास ३७ मीटर असून सगळी उंची २३.१० मी. आहे. हा स्तूप इ. स. पूर्व दुसऱ्या शतकातील मानला जातो. कठड्याला असलेले दरवाजे ख्रिस्तोत्तर पहिल्या शतकातले आहेत. सबंध स्तूप म्हणजे शिल्प व खोदीव नक्षी यांचे भांडार आहे. येथील दगडात खोलवर खोदकाम करण्यात आलेले असल्यामुळे आकृती अधिक सजीव वाटतात. शिवाय, खोदकाम कारागिरीच्या दृष्टीनेही सफाईदार व सुबक आहे. येथील दगडी कमानींना मधोमध कोणताही आधार नाही. तसेच चौकोनी खांब बौद्ध कालीन कलेत प्रथमतः येथेच आढळतात.

स्तूपाच्या महाद्वारावर शिल्पाकृती खोदलेल्या असून त्या डौलदार आहेत. त्या आकृतींत बुद्धाच्या जीवनातील प्रसंग व जातक-कथा अंकित करण्यात आल्या आहेत. शिल्पकाम नाजूक असून ते हस्तिदंती कामाची आठवण करून देणारे आहे. किंबहुना, एका शिलालेखात असा उल्लेखच आहे की, भिलसाच्या हस्तिदंती कारागिरांनी येथील खोदकाम केले आहे. त्या खोदकामात तत्कालीन रीतिरिवाज, हत्यारे, प्रसाधने व प्रतीके यांचे विपुल दर्शन घडते. स्तंभाच्या पायाजवळील भागात अप्सरा, सिंह, हत्ती, गंधर्व व यक्ष यांच्या सुंदर मूर्ती आहेत. ते जणू संरक्षक असल्याचे दर्शविण्यात आले आहे. तोरणाच्या वरील भागात बौद्ध प्रतीके दाखविण्यात आली असून त्यांचे रक्षण चामरधारी यक्ष करीत आहेत. खुद्द बुद्धाचे अंकन मानवी स्वरूपात कोठेच करण्यात आलेले नाही. त्याचे दर्शन पादुका, छत्र, चक्र व वृक्ष या प्रतीकांच्या रूपाने होते. ही प्रतीके बुद्धाच्या उपस्थितीची निदर्शक आहेत. चक्र हे बुद्धाच्या प्रथम उपदेशाचे द्योतक आहे तर वृक्ष बुद्धाला झालेल्या आत्मज्ञानाचे प्रतीक आहे.

सांचीची कला विषयदृष्ट्या बौद्ध असली तरी आशयदृष्ट्या बौद्ध नाही. खोदलेल्या कथा उद्बोधक आहेत हे खरे. परंतु, त्या कथांची हाताळणी व मानवी आकारांची भावनात्मक जुळणी संन्यासमार्गानुरूप किंवा प्रेक्षकाला अंतर्मुख बनविणारी नाही, असा प्रत्यय खोदल्या गेलेल्या गौण आकृतींच्या संदर्भात विशेषकरून येतो. त्या आकृतींकडे पाहून जीवनातील समृद्धी व आनंद यांचाच प्रत्यय येतो, गंभीरतेचा येत नाही.

स्तूपाचे कठडे विशेष उल्लेखनीय आहेत. त्यांना पाये, ऊर्ध्वगामी स्तंभ, आडवे दांडे व मुंढेरी (coping) असे भाग आहेत. ही सर्व रचना लाकडी रचने-

सारखी आहे हे उघड आहे. सांची व बुद्ध गया या दोन्ही ठिकाणचे कठडे ख्रिस्तपूर्व १०० च्या सुमाराचे आहेत.

वर वर्णन केलेल्या मुख्य स्तूपाखेरीज सांचीला आणखी दोन स्तूप असून त्यांपैकी एक ख्रिस्तपूर्व दुसऱ्या शतकातील असून दुसरा ख्रिस्तोत्तर दुसऱ्या शतकातील आहे.

स्तूपांखेरीज पाचव्या शतकातील एक गुप्तकालीन मंदिर व चैत्य ही सांचीची आणखी दोन आकर्षणकेन्द्रे आहेत.

(इ) **भारहुत**--हे ठिकाण अलाहाबाद व जबलपूर यांमधील नागोदा जिल्ह्यात असून स्तूपासाठी प्रसिद्ध आहे. येथील प्रसिद्ध स्तूप ख्रिस्तपूर्व १७५-१५० च्या सुमारास बांधण्यात आला. त्याचे अवशेष सध्या कलकत्त्याच्या इंडियन म्युझियममध्ये जतन करून ठेवण्यात आले आहेत. एका इंग्रज सेनापतीस १८७७ साली येथे काही अवशेष सापडले, त्यानंतर येथे खोदकाम केल्यावर हा स्तूप उपलब्ध झाला. बौद्ध कालीन स्तूपांतील हा आद्य स्तूप आहे. ह्याला विस्तृतपणे अलंकृत केलेली वेदिका असून तोरणे आहेत. कठड्याच्या मुंढेरीवर पानाफुलांची नक्षी खोदलेली आहे. काही आकार निसर्गातील पानाफुलांचे असून काही हिऱ्या-माणकांचे म्हणजेच अलंकरणात्मक आहेत. नक्षीच्या मधला भाग बुद्धाच्या जीवनातील घटनाप्रसंग व जातककथा यांनी गजबजलेला आहे. कठड्यांवर कमळे किंवा जातक-कथा यांचे खोदकाम आहे. क्वचित ठिकाणी बुद्धाच्या जीवनातील प्रसंग खोदलेले आहेत. प्रवेशद्वारे व कठडे यांच्या खांबांवर देवता, गंधर्व, किन्नर, यक्ष व यक्षिणी यांच्या आकृती खोदण्यात आल्या असून त्यांपैकी काही आकृतींची नावेही (उदाहरणार्थ, कुबेर) खोदण्यात आली आहेत. आकृती जोमदार आहेत. अशा प्रकारे बुद्धधर्माने लोकप्रिय देवतांना आपल्या कलेत स्थान दिले. मानवी आकृतींच्या पोषाखात भाजा येथील लेण्यांतील आकृतींचे प्रतिबिंब दिसते. फुलांची किंवा भौमितिक आकारांची जी नक्षी खोदलेली आहे ती अतिशय प्रगत कलेची द्योतक आहे.

चपटया व उथळ आकृती हे भारहुतच्या शिल्पाचे वैशिष्टय आहे. येथील दगडी खोदकाम उथळ आहे. मानवी आकृतींपैकी स्त्रीची बेंबी वेरजेच्या ( + ) चिन्हांकनाने दाखविलेली आहे. नाभीचे अंकन अशा पद्धतीने केलेले इतरत्र कोठेही आढळत नाही. पुरुष आकृतीच्या डोक्यावर पगडी आहे. हेही भारहुतच्या शिल्पाचे वैशिष्टय आहे. अनेक प्रकारची नक्षी हे येथील शिल्पाचे आणखी एक वैशिष्टय होय. येथे कमळ, हरिण, हत्ती, फूल, वेली, वृक्ष इत्यादींच्या आकारांची नक्षी आढळून येते. नक्षीकामाच्या या शैलीमधून उत्तरकालीन कलाकाराने प्रेरणा मिळविली.

(ई) **अमरावती**-आंध्र प्रदेशातील गुंतूर जिल्ह्यात कृष्णा नदीच्या दक्षिण तीरावर हे ठिकाण आहे. येथे बौद्ध अवशेष उद्ध्वस्त स्थितीत उपलब्ध झाले आहेत.

मुळात ही नगरी सातवाहनांच्या (ख्रिस्तोत्तर दुसरे शतक) धन्यकटक नामक प्राचीन राजधानीच्या बाहेर वसलेली होती. येथे अशोकस्तंभाचे (ख्रिस्तपूर्व तिसरे शतक) काही अवशेष नुकतेच मिळाले आहेत. येथे उपलब्ध झालेला प्रचंड स्तूप सातवाहन वंशीय राजांनी बांधला. त्यावर शिल्पांकित दगडी फरशा जडवलेल्या होत्या (ख्रिस्तोत्तर पहिले ते तिसरे शतक). त्या आता मद्रास व लंडन येथील वस्तुसंग्रहालयांत आहेत. हा स्तूप प्रचंड व भव्य आहे. याच्या प्राकारासाठी विस्तृत कठडे बांधण्यात आले होते. ह्या स्तूपाचे सध्या अस्तित्वात असलेले अवशेषही भव्योत्तुंग प्राचीन भारतीय कलेची प्रतीती आणून देतात. ह्या अवशेषांकडे पाहून सहृदय प्रेक्षकांची समाधीच लागते. कलावंत कलाविषयाशी पूर्णपणे व अक्षरशः समरस झाला आहे. ही कला मानवी जीवन, भावना व हालचालींची भाषा यांची सखोल जाणीव अभिव्यक्त करते.

स्तूपावरील नक्षी भारहुत-सांचीच्या स्तूपावरील नक्षीहून अधिक सुंदर रीतीने आयोजित केलेली आहे. दगड कौशल्याने घडविलेला आहे. शिल्पातील मानवी आकृती अभ्यासपूर्ण पद्धतीने खोदलेल्या असून डौलदार आहेत. वेगवेगळ्या आकारांमध्ये विलोभनीय समतोल साधलेला आहे. एकूण रेखांकनात सहजता व प्रशंसनीय शक्ती प्रतीत होते. अमरावतीचा हा स्तूप म्हणजे बौद्ध कलेचा अंतिम नमुना होय. या स्तूपाबरोबरच जुन्या शैलीचा अस्त होऊन गुप्त वंशाच्या सुवर्णयुगाला सुरुवात झाली.

(उ) **दीदारगंज**– बिहारमधील हे ठिकाण 'चामरधारिणी' या शिल्पासाठी प्रसिद्ध आहे. मूर्तिकाराने ह्या आकृतीचे अवयव उठावदारपणे खोदले आहेत. सबंध शिल्पाकृतीला एक मनमोहक झळाळी लाभली आहे. शिल्पगत मूर्ती जणू संगमरवराची आहे असे भासते. आकृतीचे मुख डौलदार असून शरीर भरदार आहे. यक्षिणीच्या फक्त कमरेस वस्त्र आहे. कमरेवरील भाग उघडा आहे. दागिने नाजूक आहेत. मूर्तीची झिलई आश्चर्यकारक आहे. ही शिल्पाकृती म्हणजे प्रारंभिक बौद्ध कलेचा उत्तम नमुना आहे.

(ऊ) **पारखम** – हे ठिकाण गुजरातेत बडोद्याच्या जवळ असून दगडी शिल्पांसाठी प्रसिद्ध आहे. ही सर्वतोरचित दगडी शिल्पे मौर्य व शुंग (ख्रिस्तपूर्व १८५–७२) या काळातील असावीत. या शिल्पकृतींत अनेक मोठ्या आकृती असून त्यांच्या अंगावर बादशाही कपडे आहेत. त्या आकृती यक्ष व यक्षिणी यांच्या भासतात. दगड उत्तम प्रकारे गुळगुळीत करण्यात आला आहे. आकृतींत सौंदर्य उतरविण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न दिसत नाही. तंत्र प्राथमिकच आहे. एकूण आकार समोरून कल्पिल्यासारखे असून वेगवेगळ्या पातळ्यांतील संक्रमणे काहीशी आकस्मिक वाटतात. एकूण समग्र शिल्पात ओबडधोबडपणा अधिक आहे. ते काहीसे

सारखी आहे हे उघड आहे. सांची व बुद्ध गया या दोन्ही ठिकाणचे कठडे ख्रिस्तपूर्व १०० च्या सुमाराचे आहेत.

वर वर्णन केलेल्या मुख्य स्तूपाखेरीज सांचीला आणखी दोन स्तूप असून त्यांपैकी एक ख्रिस्तपूर्व दुसऱ्या शतकातील असून दुसरा ख्रिस्तोत्तर दुसऱ्या शतकातील आहे.

स्तूपांखेरीज पाचव्या शतकातील एक गुप्तकालीन मंदिर व चैत्य ही सांचीची आणखी दोन आकर्षणकेन्द्रे आहेत.

(इ) **भारहुत**—हे ठिकाण अलाहाबाद व जबलपूर यांमधील नागोदा जिल्ह्यात असून स्तूपासाठी प्रसिद्ध आहे. येथील प्रसिद्ध स्तूप ख्रिस्तपूर्व १७५–१५० च्या सुमारास बांधण्यात आला. त्याचे अवशेष सध्या कलकत्त्याच्या इंडियन म्युझियममध्ये जतन करून ठेवण्यात आले आहेत. एका इंग्रज सेनापतीस १८७७ साली येथे काही अवशेष सापडले, त्यानंतर येथे खोदकाम केल्यावर हा स्तूप उपलब्ध झाला. बौद्ध कालीन स्तूपांतील हा आद्य स्तूप आहे. ह्याला विस्तृतपणे अलंकृत केलेली वेदिका असून तोरणे आहेत. कठड्याच्या मुंढेरीवर पानाफुलांची नक्षी खोदलेली आहे. काही आकार निसर्गातील पानाफुलांचे असून काही हिऱ्या-माणकांचे म्हणजेच अलंकरणात्मक आहेत. नक्षीच्या मधला भाग बुद्धाच्या जीवनातील घटनाप्रसंग व जातककथा यांनी गजबजलेला आहे. कठड्यांवर कमळे किंवा जातक-कथा यांचे खोदकाम आहे. क्वचित ठिकाणी बुद्धाच्या जीवनातील प्रसंग खोदलेले आहेत. प्रवेशद्वारे व कठडे यांच्या खांबांवर देवता, गंधर्व, किन्नर, यक्ष व यक्षिणी यांच्या आकृती खोदण्यात आल्या असून त्यांपैकी काही आकृतींची नावेही (उदाहरणार्थ, कुबेर) खोदण्यात आली आहेत. आकृती जोमदार आहेत. अशा प्रकारे बुद्धधर्माने लोकप्रिय देवतांना आपल्या कलेत स्थान दिले. मानवी आकृतींच्या पोषाखात भाजा येथील लेण्यांतील आकृतींचे प्रतिबिंब दिसते. फुलांची किंवा भौमितिक आकारांची जी नक्षी खोदलेली आहे ती अतिशय प्रगत कलेची द्योतक आहे.

चपट्या व उथळ आकृती हे भारहुतच्या शिल्पाचे वैशिष्ट्य आहे. येथील दगडी खोदकाम उथळ आहे. मानवी आकृतींपैकी स्त्रीची बेंबी बेरजेच्या ( + ) चिन्हांकनाने दाखविलेली आहे. नाभीचे अंकन अशा पद्धतीने केलेले इतरत्र कोठेही आढळत नाही. पुरुष आकृतीच्या डोक्यावर पगडी आहे. हेही भारहुतच्या शिल्पाचे वैशिष्ट्य आहे. अनेक प्रकारची नक्षी हे येथील शिल्पाचे आणखी एक वैशिष्ट्य होय. येथे कमळ, हरिण, हत्ती, फूल, वेली, वृक्ष इत्यादींच्या आकारांची नक्षी आढळून येते. नक्षीकामाच्या या शैलीमधून उत्तरकालीन कलाकाराने प्रेरणा मिळविली.

(ई) **अमरावती**–आंध्र प्रदेशातील गुंटूर जिल्ह्यात कृष्णा नदीच्या दक्षिण तीरावर हे ठिकाण आहे. येथे बौद्ध अवशेष उद्ध्वस्त स्थितीत उपलब्ध झाले आहेत.

मुळात ही नगरी सातवाहनांच्या (ख्रिस्तोत्तर दुसरे शतक) धन्यकटक नामक प्राचीन राजधानीच्या बाहेर वसलेली होती. येथे अशोकस्तंभाचे (ख्रिस्तपूर्व तिसरे शतक) काही अवशेष नुकतेच मिळाले आहेत. येथे उपलब्ध झालेला प्रचंड स्तूप सातवाहन वंशीय राजांनी बांधला. त्यावर शिल्पांकित दगडी फरशा जडवलेल्या होत्या (ख्रिस्तोत्तर पहिले ते तिसरे शतक). त्या आता मद्रास व लंडन येथील वस्तुसंग्रहालयांत आहेत. हा स्तूप प्रचंड व भव्य आहे. याच्या प्राकारासाठी विस्तृत कठडे बांधण्यात आले होते. ह्या स्तूपाचे सध्या अस्तित्वात असलेले अवशेषही भव्योत्तुंग प्राचीन भारतीय कलेची प्रतीती आणून देतात. ह्या अवशेषांकडे पाहून सहृदय प्रेक्षकांची समाधीच लागते. कलावंत कलाविषयाशी पूर्णपणे व अक्षरशः समरस झाला आहे. ही कला मानवी जीवन, भावना व हालचालींची भाषा यांची सखोल जाणीव अभिव्यक्त करते.

स्तूपावरील नक्षी भारहुत–सांचीच्या स्तूपावरील नक्षीहून अधिक सुंदर रीतीने आयोजित केलेली आहे. दगड कौशल्याने घडविलेला आहे. शिल्पातील मानवी आकृती अभ्यासपूर्ण पद्धतीने खोदलेल्या असून डौलदार आहेत. वेगवेगळ्या आकारां-मध्ये विलोभनीय समतोल साधलेला आहे. एकूण रेखांकनात सहजता व प्रशंसनीय शक्ती प्रतीत होते. अमरावतीचा हा स्तूप म्हणजे बौद्ध कलेचा अंतिम नमुना होय. या स्तूपाबरोबरच जुन्या शैलीचा अस्त होऊन गुप्त वंशाच्या सुवर्णयुगाला सुरुवात झाली.

(उ) **दीदारगंज**– बिहारमधील हे ठिकाण 'चामरधारिणी' या शिल्पा-साठी प्रसिद्ध आहे. मूर्तिकाराने ह्या आकृतीचे अवयव उठावदारपणे खोदले आहेत. सबंध शिल्पाकृतीला एक मनमोहक झळाळी लाभली आहे. शिल्पगत मूर्ती जणू संगमरवराची आहे असे भासते. आकृतीचे मुख डौलदार असून शरीर भरदार आहे. यक्षिणीच्या फक्त कमरेस वस्त्र आहे. कमरेवरील भाग उघडा आहे. दागिने नाजूक आहेत. मूर्तीची झिलई आश्चर्यकारक आहे. ही शिल्पाकृती म्हणजे प्रारंभिक बौद्ध कलेचा उत्तम नमुना आहे.

(ऊ) **पारखम**– हे ठिकाण गुजरातेत बडोद्याच्या जवळ असून दगडी शिल्पांसाठी प्रसिद्ध आहे. ही सर्वतोरचित दगडी शिल्पे मौर्य व शुंग (ख्रिस्तपूर्व १८५–७२) या काळातील असावीत. या शिल्पकृतींत अनेक मोठ्या आकृती असून त्यांच्या अंगावर बादशाही कपडे आहेत. त्या आकृती यक्ष व यक्षिणी यांच्या भासतात. दगड उत्तम प्रकारे गुळगुळीत करण्यात आला आहे. आकृतींत सौंदर्य उतरविण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न दिसत नाही. तंत्र प्राथमिकच आहे. एकूण आकार समोरून कल्पिल्यासारखे असून वेगवेगळ्या पातळ्यांतील संक्रमणे काहीशी आकस्मिक वाटतात. एकूण समग्र शिल्पात ओबडधोबडपणा अधिक आहे. ते काहीसे

अचेतन भासते. पण कलावंताच्या जोमाचा व उत्साहाचा प्रत्यय या शिल्पावरून अवश्य येतो. एकूण मूर्तीत घनता व जोरकसपणा हे गुण प्रामुख्याने आहेत. येथील शिल्पशैलीच कित्येक शतकानंतर परिपूर्ण दशेस पोचली. तिचे उत्तम उदाहरण म्हणजे सारनाथची बुद्धमूर्ती.

**(ए) मथुरा**—हे हिंदूंच्या सात (वाराणसी, हरद्वार, अयोध्या, द्वारका, मथुरा, कांचीपुरम आणि उज्जैन) तीर्थक्षेत्रांपैकी एक आहे. हे जिल्ह्याचे ठिकाण उत्तर प्रदेशातील आग्रा विभागात यमुनेच्या काठी असून दिल्लीपासून ८० मैलांवर आहे. ख्रिस्तपूर्व सहाव्या शतकात ही शौरसेनांची राजधानी होती. येथील उठावदार शिल्पे मौर्यपूर्व काळातील आहेत. येथील प्राचीन शिल्पकार उत्तम मूर्ती घडवीत असे. त्या मूर्ती दगड खोदून बनविल्या जात असत व डौलदार असत. येथील स्त्री-शिल्पे अतिशय नाजूक आहेत. येथील बुद्धमूर्ती भावदर्शक व मुलायम आहेत. मथुरा शैली पूर्णतया भारतीय शैली होती.

**(ऐ) तक्षशिला**—हे शहर कुशाण वंशातील राजांच्या काळात (इ. स. २ ते २५०) कलाविलासाचे एक केंद्र म्हणून प्रसिद्ध होते. (येथेच भारतातील प्राचीनतम विश्वविद्यालय ख्रिस्तपूर्व ७ वे ते ३ रे शतक या काळात अस्तित्वात होते. तेथे ६० हून अधिक कला व शास्त्रे सत्पात्र शिष्यांना व्यासंगी आचार्यांकडून शिकविली जात असत.) हे गांधार शैलीच्या विलासाचे प्रमुख स्थान होते.

**(ओ) रामपूर्वा**—येथील वृषभस्तंभ प्रसिद्ध आहे. हे शिल्प खास भारतीय आहे या बैलाची आखूड शिंगे, मोठे वशिंड व बळकट शरीर ही वैशिष्ट्ये आहेत. शिल्प साधे असले तरी डौलदार व शक्तिशाली आहे. ते उद्योगशीलता, शक्ती व श्रमिकांबद्दलची आदरभावना यांचे प्रतीक आहे. याखेरीज येथे सिंहस्तंभही आहे.

# प्रकरण ९ : बौद्धकालीन कलेचा लोकाश्रयी विकास

**प्रश्न १ : रिकाम्या जागी योग्य शब्द भरून खालील वाक्ये पूर्ण करून पुन्हा लिहा.**

(अ) शुंग व कण्व काळांत बौद्ध कलेचा विकास·········झाला.

(ब) स्तूप म्हणजे बौद्ध धर्मीय·········होत.

(क) ·········येथील स्तूप प्राचीनतम स्तूप होय.

(ड) सांचीच्या स्तूपासाठी मजुरांच्या व कलावंतांच्या संघांनी······दिल्या.

(इ) स्तूपांत बहुधा बुद्धमूर्तीऐवजी·········वापरच केलेला दिसतो.

(फ) बुद्धगयेच्या स्तूपाचे कोरीव काम रेखीव व ·········आहे.

**उत्तर :** (अ) शुंग व कण्व काळात बौद्ध कलेचा विकास **लोकाश्रयावर** झाला.

(ब) स्तूप म्हणजे बौद्ध धर्मीय **समाध्या** होत.

(क) **भारहुत** येथील स्तूप प्राचीनतम स्तूप होय.

(ड) सांचीच्या स्तूपासाठी मजुरांच्या व कलावंतांच्या संघांनी **देणग्या** दिल्या.

(इ) स्तूपांत बहुधा बुद्धमूर्तीऐवजी **बुद्धप्रतीकांचा** वापरच केलेला दिसतो.

(फ) बुद्धगयेच्या स्तूपाचे कोरीव काम रेखीव व नाजूक आहे.

**प्रश्न २ : ' स्तूप ' या विषयावर माहितीपूर्ण टिपण लिहा.**

**उत्तर :** स्तूप म्हणजे बौद्ध धर्मीय समाधी. स्तूपाला tope किंवा dagoba असे म्हणतात. ज्या भांड्यात बुद्धाच्या किंवा बुद्ध-भिक्षूंच्या पवित्र अवशेषांचे जतन करून ठेवलेले असते त्या भांड्यावर जे विटांचे भक्कम बांधकाम केलेले असते तेच स्तूप म्हणून ओळखले जाते. हे स्तूप प्रांतातील प्रमुख रस्त्यांवर बांधण्यात येत व त्या ठिकाणी जत्राही भरत. प्राचीन काळी थडग्यावर मातीचा गोलाकार ढिगारा रचीत असत, त्यावरून स्तूपाची कल्पना सुचली असावी. ऐतिहासिक काळात स्तूपाची उंची वाढत गेली. आणि रचनेतही वैभवसंपन्नता आली. स्तूपावर एक चौथरा असे व त्याच्या मध्यभागी एक दंड बसवून त्यावर अनेक छत्र्या बसविण्यात येत. वर टोकावर कलश असे. स्तूपाभोवती वर्तुळाकार पायवाट असून तिला दगडी कठडा बांधलेला असे. त्यावर नक्षीचे खोदकाम व शिल्पकाम केलेले असे. त्या कठड्याला चारी बाजूंना चार दरवाजे असत व त्या दरवाज्यांवर सुंदर नक्षीच्या कमानी असत. स्तूपाच्या सर्व भागांना पुढीलप्रमाणे नावे असत — मेधी, बीज, अंड, हर्मिका, यष्टी प्रदक्षिणापथ, छत्रावली, वेदिका व तोरण.

भारतात शेकडो लहानमोठे स्तूप सापडलेले आहेत. त्यांपैकी अगदी सुरुवातीच्या काळातील म्हणजे इ. स. पूर्व दुसऱ्या शतकातील स्तूप खालच्या भागात डबीच्या आकाराचे असून त्या आकारावर वर्तुळाकृती घुमट असे. त्याच्यावर एक बशीच्या आकाराची छत्री असे. स्तूपांवर फार माफक नक्षी असे व तिच्यामध्ये आडव्या-उभ्या रेघाच मुख्यत्वेकरून असत. परंतु, स्तूपाचा बराचसा भाग नक्षीरहित असे.

वरील काळानंतर सुमारे चारशे वर्षांनी म्हणजे इसवी सनाच्या दुसऱ्या शतकात बांधले गेलेले स्तूप अर्धवर्तुळाकार असत. घुमटासारख्या वरच्या भागाच्या मध्यावर दोन उभे दगडी खांब असत. घुमटाच्या मध्यभागी नक्षीकाम केलेले असे.

त्यात भौमितिक आकारांशिवाय पानाच्या बाकदार आकारांसारखे आकार कोरलेले असत. स्तूपाभोवती कठडे असून स्तूपाला चारी बाजूंनी दरवाजे असत.

इसवी सनाच्या सहाव्या शतकाच्या सुमारास बांधल्या गेलेल्या स्तूपांची रचना काहीशी मंदिरासारखी असे. जमिनीपासून अनेक फूट उंचीपर्यंतचा भाग एखाद्या दंडगोलाकार इमारतीसारखा असे. त्याच्या भिंतीवर विविध स्वरूपाचे नक्षीकाम असे. भिंतीवर बुद्धाच्या प्रतिमाही खोदलेल्या असत. दंडगोलाकार इमारतीच्या वरच्या भागात अर्धवर्तुळाकार/लंबगोलाकार घुमट असे.

वर वर्णन केल्याप्रमाणे स्तूपाच्या बांधकामात व रचनेत इसवी सनापूर्वीच्या दुसऱ्या शतकापासून इसवी सनाच्या सहाव्या शतकापर्यंत खूपच स्थित्यंतरे झाली. ही कला मौर्य काळात सुरू झाली व थेट आंध्रवंशीय राजांच्या काळापर्यंत चालू राहिली. एकूण जे अनेक स्तूप उपलब्ध झाले आहेत त्यांपैकी भारहुत, सांची, अमरावती व नागार्जुनकोंडा या चार ठिकाणचे स्तूप कलादृष्टचा महत्त्वाचे आहेत. बहुतेक स्तूपांचे बांधकाम कित्येक शतके चालू असे. कोणताही स्तूप एखाद्या विशिष्ट राजाच्या कारकीर्दीत बांधून पुरा झाला असा प्रकार घडला नाही.

# प्रकरण १० : गुहामंदिरांचे युग

**प्रश्न १ : 'अ' गटातील शब्दांच्या 'ब' गटातील शब्दांशी जोड्या जुळवून त्या पुन्हा लिहा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| डोंगरात खोदलेली लेणी | चैत्य |
| बौद्ध भिक्षूंचे प्रार्थनामंदिर | दक्षिणेकडील बौद्ध स्मारके |
| भाजा | पांडव लेणे |
| नाशिक | अठरा लेणी |
| उभ्या बुद्धाची मूर्ती | अमरावतीचा स्तूप |
| मस्तीला आलेला नलगिरी हत्ती | नागार्जुनकोंड्याचा स्तूप. |

**उत्तर :**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| डोंगरात खोदलेली लेणी | दक्षिणेकडील बौद्ध स्मारके |
| बौद्ध भिक्षूंचे प्रार्थनामंदिर | चैत्य |
| भाजा | अठरा लेणी |
| नाशिक | पांडव लेणे |
| उभ्या बुद्धाची मूर्ती | नागार्जुनकोंड्याचा स्तूप |
| मस्तीला आलेला नलगिरी हत्ती | अमरावतीचा स्तूप |

**प्रश्न २ : खालील ठिकाणे कशासाठी प्रसिद्ध आहेत ते एकेका वाक्यात लिहा.**

भाजा, पितळखोरे, नाशिक, जुन्नर, कार्ले, कान्हेरी व अमरावती.

**उत्तर : भाजा** – इ. स. पूर्व २०० च्या सुमारास बौद्ध भिक्षुणींसाठी खोदलेल्या १८ बौद्ध लेण्यांसाठी प्रसिद्ध.

**पितळखोरे** – दगडाचे कोरीव काम प्राधान्याने असलेल्या बौद्ध स्तूपासाठी प्रसिद्ध.

**नाशिक** – उत्थित शिल्पांनी विशेष अलंकृत केल्या गेलेल्या पांडव लेण्यांसाठी प्रसिद्ध.

**जुन्नर** - बौद्धांच्या चैत्य मंडपासाठी प्रसिद्ध.

**कार्ले** – स्तूप व सिंहांचे स्तंभशीर्ष यांनी युक्त असलेल्या सर्वात मोठ्या चैत्य लेण्यासाठी प्रसिद्ध.

**कान्हेरी** – ६·५ मीटर उंचीचा बुद्धपुतळा व १०९ लेणी यांसाठी प्रसिद्ध.

**अमरावती** – सातवाहन राजांच्या कारकीर्दीत उभारण्यात आलेल्या प्रचंड स्तूपासाठी प्रसिद्ध.

**प्रश्न ३ : (अ) अमरावतीचा स्तूप, (ब) सुरुवातीची बौद्ध कला व (क) गुहामंदिरे या विषयांवर टीपा लिहा.**

**उत्तर : (अ) अमरावतीचा स्तूप** – सातवाहन राजांच्या कारकीर्दीत बांधण्यात आला. आज तो पूर्णपणे भग्नावस्थेत आहे. या स्तूपावर शिल्पयुक्त संगमरवरी फरशा बसविण्यात आल्या होत्या. कठड्यावर सुमारे १·५ हजार चौरस मीटराचे कोरीव काम होते. या स्तूपाच्या चारी बाजूंस पाच स्तंभ उभारण्यात आले होते. यातील शिल्पाकृती अप्रतिम आहेत. क्वचित बुद्धमूर्ती आढळतात. 'मस्तीला आलेला नलगिरी हत्ती' हे शिल्प जिवंत व नाट्यमय आहे.

**(ब) सुरवातीची बौद्धकला** – इसवी सनापूर्वी सुमारे ६०० वर्षे वैदिक धर्माच्या घसरगुंडीस प्रारंभ झाला आणि बौद्ध धर्माचा उदय होऊन झपाट्याने प्रसार होऊ लागला. त्या काळातील प्रजेचा संबंध ग्रीकांशी व पर्शियनांशी आला. त्याचा स्वाभाविक परिणाम तत्कालीन कलेवर झाला. त्या काळात मगध देशाची राजधानी पाटलिपुत्र (पाटणा) असून तिच्याभोवती लाकडी तटबंदी होती. तिला ५६० मनोरे व ६० दरवाजे होते. तत्कालीन सर्व इमारती लाकडाच्या बनविलेल्या होत्या.

मौर्यकालीन एक प्राथमिक व ओबडधोबड स्वरूपाचे शिल्प पारखम येथे उत्खननामध्ये मिळाले आहे. त्या मूर्तीत घनता व जोरकसपणा दिसून येतात.

अशोकाने बुद्धसंदेशाच्या प्रसारासाठी अनेक ठिकाणी मोठमोठे शिलालेख

खोदविले आणि बुद्धाच्या जीवनावर आधारलेल्या अनेक शिल्पाकृती बनवून घेतल्या. सम्राट अशोकाच्या काळात कोरीव कामासाठी दगड वापरण्यात येऊ लागला.

स्तंभ व स्तूप या बौद्ध कलेच्या प्रमुख देणग्या आहेत. चुनारच्या दगडापासून बनविलेले एकूण १३ शिलास्तंभ भारतामध्ये उपलब्ध झालेले असून त्यांपैकी सारनाथचा स्तंभ सर्वाधिक प्रसिद्ध व उत्कृष्ट आहे.

स्तूप ही बौद्ध कलेची दुसरी देणगी. स्तूपामध्ये बुद्धाच्या व बोधिसत्त्वांच्या अवशेषांचे जतन करीत असत. सामान्यपणे स्तूपाच्या भोवती प्रदक्षिणा घालण्यास जागा असून चार बाजूंना चार दरवाजे व फिरते कठडे असतात. कठड्यांवर व दरवाज्यांवर नक्षीकाम केलेले असते. इसवी सन पूर्व दुसऱ्या शतकापासून इसवी सनाच्या सहाव्या शतकापर्यंतच्या काळात बांधले गेलेले स्तूप उपलब्ध झाले आहेत. स्तूपांच्या आकारांत व त्यांवरील नक्षीकामात उत्तरोत्तर बदल होत गेलेला आढळतो. सुरुवातीचे स्तूप अर्धवर्तुळाकार असून त्यांवर माफक नक्षीकाम आहे. उत्तरकालीन स्तूप दंडगोलाकार असून त्यांवर विपुल नक्षीकाम आहे. उभ्या भारतात जरी शेंकडो लहानमोठे स्तूप उपलब्ध झालेले असले तरी त्यांपैकी भारहुत, सांची, अमरावती व नागार्जुनकोंडा येथील स्तूप स्थापत्य-शिल्पकलादृष्ट्या अधिक महत्त्वाचे आहेत. स्तूपांच्या पायाचा व्यास सामान्यपणे सव्वाशे फुटांचा असून उंची पन्नास फूट असते. अनेक स्तूपांवरील पानाफुलांच्या नैसर्गिक व कलात्मक आकारांचे कोरीव काम केवळ अप्रतिम आहे. गुप्तकालीन स्तूपांना स्थापत्यकलेच्या क्षेत्रात जोड नाही.

भित्तिचित्रे हे बौद्धकलेचे आणखी एक वैशिष्टय. ते थडगी व गुहामंदिरे यांमध्ये आढळते.

(आ) **गुहामंदिरे**—गुहामंदिरे हा बौद्धकालीन स्थापत्याचा महत्त्वाचा आविष्कार. बौद्ध भिक्षूंना राहण्यासाठी मठ बांधले गेले. हे मठ गुहांमध्ये असत. गुहा प्रचंड खडक खोदून बनविलेल्या असत. गुहांमध्ये विहार व चैत्य असे दोन भाग असत. विहार म्हणजे भिक्षूंना राहण्यासाठी बांधलेले चौरस भाग. यांत मधोमध मंडप असून त्याच्या तीन बाजूंना लहानलहान खोल्या असतात. या खोल्यांतून दगडी ओटे असतात. त्यांवर बौद्ध भिक्षू झोपतात. चैत्य म्हणजे प्रार्थना करण्याचे भाग. चैत्याचा आकार घोड्याच्या नालासारखा असून वरच्या बाजूस एक स्तूप असतो व त्याच्या दोन्ही बाजूंस खांबांच्या रांगा असतात. स्तूपाच्या समोरच्या बाजूस तीन दरवाजे असतात. अशा प्रकारच्या जुन्यातल्या जुन्या गुहा पश्चिम भारतात भाजा, कारले, नासिक, बेडसा, कोंडाणे व अजिंठा येथे आणि ओरिसा प्रांतात खंडगिरी व

उदयगिरी येथे सापडल्या आहेत. दगड खोदून गुहा बनविण्याची कला त्या काळात चांगलीच विकास पावली होती. मध्ययुगात या कलेत आणखी प्रगती झाल्यामुळेच बदामी, अहिहोळ, वेरूळ व महाबळिपुरम् अशी श्रेष्ठ गुहामंदिरे निर्माण झाली. अजिंठ्याची गुहामंदिरे (इ. स. १००–७००) भित्तिचित्रांच्या बाबतीत सर्वोत्कृष्ट आहेत. त्यांची रचना वैभवसंपन्न असून चित्रगत आकृतींची ठेवण लयसुंदर आहे. या शैलीचा पडसाद शिल्पकलेत उमटला.

# प्रकरण ११ : बुद्ध प्रतिमेचा आरंभ

## प्रश्न १ : गांधार शैली व मथुरा शैली यांची वैशिष्टे थोडक्यात लिहा.

(अ) **गांधार शैली** – भारताच्या वायव्य सरहद्द प्रांतावर ज्या अनेक परकीयांची आक्रमणे झाली त्यांमध्ये ग्रीक, शक, कुशाण व पर्शियन मुख्य होते. या परकीयांच्या कलेचा परिणामही भारतीय कलेवर मोठ्या प्रमाणावर झाला. सरहद्द प्रांताची म्हणजेच गांधार (सिंधू नदीच्या काठापासून कंदाहारपर्यंतचा प्रदेश) जिल्ह्याची राजधानी तक्षशिला नगरी होती. हे तत्कालीन कलेचे मुख्य केन्द्र होते. येथे विकसित झालेल्या शिल्प व स्थापत्य यांच्या शैलीला गांधार शैली असे म्हणतात. या शैलीवर ग्रीक व रोमन शैलींचा प्रभाव पडलेला असल्यामुळे ही शैली 'भारतीय-ग्रीक शैली' अथवा 'ग्रीक-रोमन शैली' या नावानेही ओळखली जाते. हिची सद्दी इ. स. पूर्व ५० ते इ. स. ७०० पर्यंत होती. या कलेत राजकन्या, तिच्या दासी, मद्यपान करणारे स्त्रीपुरुष, सिंह, नृत्यांगना, पंख असलेली हरणे, पुष्पमय नक्षी इत्यादी विषय हाताळलेले आहेत.

येथील शिल्पकाराने बुद्धाच्या मूर्ती घडविल्या. त्यांचे बाह्य स्वरूप जरी भारतीय असले तरी अंतःस्वरूप ग्रीक आहे. बुद्धाला मिशा दाखविण्यात आल्या आहेत, त्यामागील रहस्य हेच आहे. या शैलीतील मानवी आकार मोहक, जिवंत व डौलदार आहेत.

गांधार शैलीतील शिल्पामध्ये मनुष्यदेहाचे आलेखन यथातथ्यपणे केलेले आहे. ते ग्रीक कलेचे वैशिष्ट्य आहे. गांधार शैलीचे आणखी एक वैशिष्ट्य असे की, हिच्या शिल्पाकृतीत वस्त्र सैलसर असते. एकंदरीने गांधार शैलीचे साम्य विदेशी शैलीशीच आहे. या शैलीचा प्रभाव उत्तर भारतातील शैलींवर पडला.

गांधार शैलीचे स्थापत्य दगडी असून शिल्पाकृतींनी अलंकृत आहे.

(ब) **मथुरा शैली**–कुशाण वंशाच्या राजांच्या राजवटीमध्ये इसवी सनाच्या सुरुवातीच्या अडीचशे वर्षांच्या काळात मथुरेच्या आसपास जी कलाशैली विकास

पावली ती मथुरा शैली या नावाने प्रसिद्ध आहे. तिच्यावर अनेक संस्कृतींचा, धर्मांचा व कला-कल्पनांचा परिणाम झालेला दिसतो. मथुरा हे त्या काळात सर्व प्रकारच्या कलाप्रवृत्तींचे केंद्र होते. बौद्ध, जैन व वैदिक अशा तिन्ही धर्मांच्या देवतामूर्ती मथुरेलाच निर्माण झाल्या. तेथील शिल्पकार खूप मोठ्या प्रमाणावर मूर्ती घडवीत असत. त्यांना देशभर मागणी असे. मथुरेची ही मूर्तिकला भारहुत, सांची व मौर्य या परंपरांशी मिळतीजळती होती. मथुरेच्या उत्तरेस माट येथे देवकूल नावाचे शिल्पसंग्रहालय सापडले आहे, येथे राजांचे पुतळे बनविले जात असत. ते वास्तववादी असत. विम कॅडफिसस्, कनिष्क व चष्टाना या राजांचे पुतळे येथे आढळतात. हे सर्वच पुतळे भग्नावस्थेत आहेत. येथील शिल्पगत आकृती दगड खोदून बनविल्या जात असत व त्या सुडौल असत. स्त्रीशिल्पे कमालीची नाजूक असत. या शिल्पकारांनी भारतीय वाङमयातील स्त्रीविषयक संकेत शिल्पबद्ध केले. अशोक वृक्षाला फुलविणारी, शालवृक्षापाशी उभी असलेली, पोपटाशी खेळणारी अशी विविध स्वरूपांतील स्त्री त्याने साकार केली या शिल्पांमधून सौंदर्य, समृद्धी व मांगल्य यांचे दर्शन घडते. मथुरेच्या शिल्पकाराने घडविलेल्या बुद्धाच्या मूर्ती अतिशय भावदर्शक, मृदू व भारतीय परंपरेस धरून आहेत. ही शैली गांधार शैलीशी समकालीन असली तरी पूर्णतया देशी आहे. या शैलीनुसार बनविलेल्या शिल्पात स्त्री-पुरुषांचे वस्त्र शरीरास अगदी चिकटून असल्यासारखे आलेखिलेले असते. मथुरेच्या या कला शैलीचा पूर्ण विकास गुप्त युगात झाला.

**प्रश्न २ : ' अ ' गटातील शब्दांसमोर ' ब ' गटातील योग्य शब्द लिहून जोड्या जुळवा.**

| ' अ ' | ' ब ' |
|---|---|
| (१) गांधार शैली | चित्रलिपी |
| (२) प्रसाधिकेचे शिल्प | चिखलाच्या इमारती |
| (३) चैत्य | वाश्याच्या इमारती |
| (४) सांचीचा स्तूप | पारखम |
| (५) चपट्या आकृती | सिंहस्तंभशीर्ष |
| (६) गुप्तकालीन शिल्प | अमरावतीचा स्तूप |
| (७) आंध्र वंश | सारनाथची बुद्धमूर्ती |
| (८) सारनाथ | भारहुतचे शिल्प |
| (९) मौर्यकालीन शिल्प | अद्भुत नक्षीकाम |
| (१०) द्राविडी घरे | प्रार्थना करण्याचे दालन |
| (११) वेदकालीन स्थापत्य | मथुराशैली |
| (१२) मोहेंजोदाडोची कला | ग्रीक-रोमन शैली |

उत्तर : 'अ' 'ब'

| | |
|---|---|
| (१) गांधार शैली | ग्रीक-रोमन शैली |
| (२) प्रसाधिकेचे शिल्प | मथुरा शैली |
| (३) चैत्य | प्रार्थना करण्याचे दालन |
| (४) सांचीचा स्तूप | अद्‌भुत नक्षीकाम |
| (५) चपटया आकृती | भारहुतचे शिल्प |
| (६) गुप्तकालीन शिल्प | सारनाथची बुद्धमूर्ती |
| (७) आंध्र वंश | अमरावतीचा स्तूप |
| (८) सारनाथ | सिंहस्तंभशीर्ष |
| (९) मौर्यकालीन शिल्प | पारखम |
| (१०) द्राविडी घरे | वाश्याच्या इमारती |
| (११) वेदकालीन स्थापत्य | चिखलाच्या इमारती |
| (१२) मोहेंजोदाडोची कला | चित्र-लिपी |

**प्रश्न ३ : योग्य शब्द योजून खालील वाक्ये पूर्ण करा.**

(१) सुरुवातीच्या बौद्ध कलेवर·········व ········कलांचा प्रभाव होता.

(२) अशोकाच्या काळात कोरीव कामासाठी·········ऐवजी·········चा उपयोग करण्यात येऊ लागला.

(३) दगड घासून गुळगुळीत करण्याची कला भारतीय कारागिराने········ व·········कलाकारांकडून उचलली.

(४) स्तूप बांधण्याची कला········काळात सुरू झाली व········राजांच्या काळापर्यंत चालू राहिली.

(५) सांचीचा स्तूप म्हणजे·········व नक्षीकाम यांचा खजिना आहे.

(६) नानाविध स्वरूपाचे·········हे सांचीच्या स्तूपाचे सर्वाधिक चित्ता-कर्षक वैशिष्टय होय.

(७) भारहुत येथील शिल्पाकृतींमध्ये पुरुषाच्या डोक्यावर··········दाख-विलेली असते.

(८) सांचीच्या स्तूपात मौर्य, शुंग,·········व·········या वेगवेगळया शिल्पशैलींचे मिश्रण आढळते.

(९) सांचीच्या स्तूपाच्या दरवाज्यांना·········म्हणतात.

(१०) बौद्ध गुहेत·········व·········असे दोन भाग असत.

(११) कुशाण वंशाच्या काळात···········,···········व············ही भारतातील कलेची मुख्य केंद्रे होती.

(१२) गांधार शैली·········या नावानेही ओळखली जाते.

(१३) गांधार शैलीच्या काही मूर्तींमध्ये बुद्धाला········दाखविलेल्या आहेत.

(१४) गांधार शैलीत मूर्तीचे वस्त्र········आलेखिलेले असते.

(१५) गांधार शैली········शैलीची समकालीन होती.

(१६) अमरावतीचा स्तूप·········स्थितीत उपलब्ध आहे.

(१७) गुप्तांच्या कारकीर्दीला भारतीय कलेचे·········म्हणतात.

(१८) गुप्तकालीन सोन्याच्या मोहोरांवर सामान्य जीवनातले प्रसंग······ पद्धतीने अंकित केलेले आहेत.

**उत्तर** : (१) सुरुवातीच्या बौद्ध कलेवर **ग्रीक** व **पर्शियन** कलांचा प्रभाव होता.

(२) अशोकाच्या काळात कोरीव कामासाठी **लाकडाऐवजी दगडाचा** उपयोग करण्यात येऊ लागला.

(३) दगड घासून गुळगुळीत करण्याची कला भारतीय कारागिराने **ग्रीक** व **इराणी** कलाकारांकडून उचलली.

(४) स्तूप बांधण्याची कला **मौर्य** काळात सुरू झाली व **आंध्रवंशीय** राजांच्या काळापर्यंत चालू राहिली.

(५) सांचीचा स्तूप म्हणजे **शिल्प** व नक्षीकाम यांचा खजिना आहे.

(६) नानाविध स्वरूपाचे **अप्रतिम नक्षीकाम** हे सांचीच्या स्तूपाचे सर्वाधिक चित्ताकर्षक वैशिष्टय होय.

(७) भारहुत येथील शिल्पाकृतींमध्ये पुरुषाच्या डोक्यावर **पगडी** दाखविलेली असते.

(८) सांचीच्या स्तूपात मौर्य, शुंग, **कुशाण** व **गुप्त** या वेगवेगळ्या शिल्पशैलींचे मिश्रण आढळते.

(९) सांचीच्या स्तूपाच्या दरवाज्यांना **तोरण** म्हणतात.

(१०) बौद्ध गुहेत **विहार** व **चैत्य** असे दोन भाग असत.

(११) कुशाण वंशाच्या काळात **मथुरा**, **तक्षशिला** व **अमरावती** ही भारतातील कलेची मुख्य केंद्रे होती.

(१२) गांधार शैली '**भारतीय ग्रीक शैली**' या नावानेही ओळखली जाते.

(१३) गांधार शैलीच्या काही मूर्तींमध्ये बुद्धाला **मिश्या** दाखविलेल्या आहेत.

(१४) गांधार शैलीत मूर्तीचे वस्त्र **सैलसर** आलेखिलेले असते.

(१५) गांधार शैली **मथुरा** शैलीची समकालीन होती.

(१६) अमरावतीचा स्तूप **छिन्नभिन्न** स्थितीत उपलब्ध आहे.

(१७) गुप्तांच्या कारकीर्दीला भारतीय कलेचे **सुवर्णयुग** म्हणतात.

(१८) गुप्तकालीन सोन्याच्या मोहोरांवर सामान्य जीवनातले प्रसंग **कलापूर्ण** पद्धतीने अंकित केलेले आहेत.

# प्रकरण १२ : सौंदर्यप्रेमी ग्रीक लोक

**प्रश्न १ : खालील विषयांवर टिपणे लिहा :**

(अ) मिनोअन कला, (आ) मिसेनिअन कला, (इ) वास्तुरचनाशैली, (ई) ग्रीक शिल्पकला.

**उत्तर** : (अ) **मिनोअन कला**– ग्रीक कलेच्या दोन मुख्य ऐतिहासिक कालखंडांपैकी प्राक्-हेलेनिक (ख्रि. पू. ३००० ते ९००) कालखंडात मिनोअन कलेचा समावेश होतो. सायक्लॉडिस बेटांवर सापडलेल्या घट, रांजण, पेट्या, संगमरवरी मूर्ती इत्यादी कला-अवशेषांवरून या कलेची माहिती मिळते. **वास्तुकला** – प्रासाद हा विशेष. 'नॉससचा प्रासाद' सर्वांत मोठा व प्रसिद्ध. सभागृह, प्रार्थनामंदिर, शस्त्रागार, खोल्या इत्यादींनीं युक्त असलेल्या या प्रासादाचा पाया दगडांनी बांधलेला असून स्तंभ मात्र लाकडी होते. स्तंभ व भिंती रंगवलेल्या होत्या. नागदेवतेच्या सर्वतोरचित हस्तीदंती मूर्ती व मातीची स्त्रीशिल्पे या अवशेषांवरून **शिल्पकलेची** कल्पना येते. मिनोअन कलावंताने बैलांच्या झुंजी, मिरवणुका, बैलांवरील कसरत, उडणारे मासे, प्राणि-पक्षी इत्यादी ऐहिक जीवनातील दृश्यांवर आधारित अनेक भावदर्शी भित्तिचित्रे रेखाटली. मिनोअन कलेत कुंभारकामाचा विकास झाला. फुले व विविध वस्तू यांच्या चित्रांनी अलंकृत केलेली व डौलदार आकाराची मातीची भांडी आकर्षक आहेत. हा कलाकार सोने, चांदी, ब्रॉंझ यांसारख्या धातूंची भांडी करण्यातही वाकबगार होता.

(आ) **मिसेनिअन कला**–ख्रि. पू. ९०० ते ४८० हा कालखंड मिसेनिअन कलेचा कालखंड म्हणून ओळखला जातो. प्रासादाची प्रवेशद्वारे, मेगॅरॉन दालने, नक्षीची तबके, शिल्पालंकृत सोन्याच्या वस्तू व भव्य भित्तिचित्रे हे या कलेचे विशेष होत. पैकी सर्वाधिक महत्त्वाचा विशेष म्हणजे मेगॅरॉन दालने. अशी दालने प्रासादातील निवासी खोल्यांमध्ये असत. असे दालन म्हणजे एक आयताकृती

दिवाणखाना असून चार भव्य स्तंभांवर त्याचे छत आधारलेले असे. मेगॅरॉनच्या पद्धतीवरच मंदिरांतील गाभाऱ्यांची रचना झाली. मेगॅरॉनमधील भिंतींवर लढाई, शिकार, बैलांची कसरत इत्यादी दृश्ये दर्शविणारी चित्रे काढलेली असत.

(इ) **वास्तुरचनाशैली**-ग्रीक वास्तुकलेत छताचे आडवे बांधकाम तोलून धरण्यासाठी जी स्तंभव्यवस्था केली जात असे तीस वास्तुरचनाशैली म्हणत असत. तिचे डोरिक, आयोनिक व कोरिन्थियन असे तीन प्रकार आहेत. पैकी **डोरिक** ही प्रारंभीच्या काळातील शैली. हिच्यातील स्तंभ, दंडगोलाकृती तुकडे एकावर एक ठेवून व ते लाकडाच्या किंवा धातूच्या खुंटीने एकमेकांस जोडून, उभारण्यात येत. हे स्तंभ मध्यभागी थोडेसे फुगीर असून वरच्या बाजूस निमुळते होत जात असत व छप्पर व तुळईचा भार तोलून धरीत असत. स्तंभांवर खोदकाम असून सुमारे वीस सळया काढलेल्या असत. स्तंभांच्या वरील भागात रंगीत उत्थित शिल्पे असत.

आयोनियन टोळ्यांनी आणलेली ती आयोनिक शैली. हिच्यातील स्तंभ नाजूक, डौलदार व आलंकारिक असून त्यांचा मुख्य भाग अधिक नाजूक व कमी जाडीचा असतो. मणी, बाणांसारख्या पाकळ्या इत्यादींच्या नक्षीकामाने नटलेली स्तंभशीर्षे हे या शैलीतील स्तंभशीर्षांचे वैभव. सुमारे पाचव्या शतकात कोरिन्थियन शैलीचा उदय झाला. हिच्यात स्तंभशीर्षाच्या नाजूक व विपुल अलंकरणाला प्राधान्य असे. उलटया ठेवलेल्या घंटेच्या आकाराची ही स्तंभशीर्षे पानांच्या नक्षीने नटलेली असत.

(ई) **ग्रीक शिल्पकला**- ग्रीक शिल्पकला जगप्रसिद्ध आहे. संगमरवर व ब्राँझ धातू या दोन माध्यमांचा समर्थ व कलात्मक उपयोग करून ग्रीकांनी गतिमान व प्रभावी मानवमूर्ती निर्माण केल्या. सुरुवातीस लाकूड व चुनखडीचा दगड यांची छोटी शिल्पे बनवून ती नवसादाखल देवाला अर्पिली जात असत. कालांतराने संगमरवर व ब्राँझ यांचा उपयोग होऊ लागला. शिल्पातील वस्त्रांच्या घडया सोन्याने व शरीराचे अवयव हस्तिदंताने आच्छादिले जात. आर्षकाळातील (ख्रि.पू. ६२५-४८०) स्त्रीपुरुषशिल्पे ताठर व गतिशून्य वाटतात. ग्रीक शिल्पकारांची उत्थित शिल्पे संयोजन व तंत्र यांतील कौशल्य आणि गतिमत्ता यांसाठी प्रसिद्ध आहेत. या शिल्पकारांनी धार्मिक, पौराणिक, नागरी व घरगुती असेच विषय हाताळले. मिरॉन, फिडियस, पॉलिक्लिटस, प्रॅक्सायटिल्स, स्कोपास व लिस्सिपॉस हे श्रेष्ठ ग्रीक शिल्पकार होत.

**प्रश्न २ : रिकाम्या जागी योग्य शब्द भरून खालील वाक्ये पूर्ण करा व पुनः लिहा.**

(अ) प्राक्-हेलेनिक कालखंडात·········व मिसेनिअन या दोन कलांचा समावेश होतो.

(आ) '.........प्रासाद' हा सर्वांत भव्य व प्रसिद्ध प्रासाद होय.

(इ) मिनोअन कलावंत.........जीवनावर आधारित भावदर्शी भित्तिचित्रे रेखाटीत असे.

(ई) '...........' हे ग्रीकांच्या जीवनाचे व त्यामुळेच कलेचेही केंद्र होते.

(उ) क्रीटांनी बनविलेली डौलदार आकारांची.........भांडी प्रसिद्ध आहेत.

(ऊ) '........ दालने' हे मिसेनिअन कलेचे सर्वाधिक महत्त्वाचे वैशिष्टय होय.

(ए) तर्कशुद्ध रचना, काटेकोर.........व बांधकामाचे उत्कृष्ट ...... ही ग्रीक वास्तुकलेची वैशिष्टये होत.

(ऐ) छताचे आडवे बांधकाम तोलून धरण्यासाठी केलेल्या स्तंभांच्या व्यवस्थेला.........असे नाव आहे.

(ओ) आयोनिक हा.........वास्तुरचनाशैलीचा एक प्रकार आहे.

(औ) आयोनिक व कोरिन्थियन शैलींमध्ये अलंकृत.........सारखेच महत्त्व होते.

(अं) ग्रीकांनी आपले लक्ष.........इमारतींवरच केन्द्रित केले होते.

(अः) ग्रीकांच्या इमारतींत प्रकाश......व वैचित्र्य यांचा अभाव आढळतो.

(क) डोरियन शिल्पकारांच्या पुरुषप्रतिमांना .........व स्त्रीप्रतिमांना .........म्हणत असत.

**उत्तर** : (अ) प्राक्-हेलेनिक कालखंडात **मिनोअन** व मिसेनिअन या दोन कलांचा समावेश होतो.

(आ) '**नॉससचा** प्रासाद' हा सर्वांत भव्य व प्रसिद्ध प्रासाद होय.

(इ) मिनोअन कलावंत **ऐहिक** जीवनावर आधारित भावदर्शी भित्तिचित्रे रेखाटीत असे.

(ई) '**मनुष्य**' हे ग्रीकांच्या जीवनाचे व त्यामुळेच कलेचेही केन्द्र होते.

(उ) क्रीटांनी बनविलेली डौलदार आकारांची **मातीची** भांडी प्रसिद्ध आहेत.

(ऊ) '**मेगॅरॉन** दालने' हे मिसेनिअन कलेचे सर्वाधिक महत्त्वाचे वैशिष्टय होय.

(ए) तर्कशुद्ध रचना, काटेकोर **प्रमाण** व बांधकामाचे उत्कृष्ट **साहित्य** ही ग्रीक वास्तुकलेची वैशिष्टये होत.

(ऐ) छताचे आडवे बांधकाम तोलून धरण्यासाठी केलेल्या स्तंभांच्या व्यवस्थेला **वास्तुरचनाशैली** असे नाव आहे.

(ओ) आयोनिक हा **आलंकारिक** वास्तुरचनाशैलीचा एक प्रकार आहे.

(औ) आयोनिक व कोरिन्थियन शैलींमध्ये अलंकृत **स्तंभशीर्षांना** सारखेच महत्त्व होते.

(अं) ग्रीकांनी आपले लक्ष **सार्वजनिक** इमारतींवरच केन्द्रित केले होते.

(अः) ग्रीकांच्या इमारतींत प्रकाश, **अवकाश** व वैचित्र्य यांचा अभाव आढळतो.

(क) डोरियन शिल्पकारांच्या पुरुषप्रतिमांना **कुरॉस** किंवा **अपोलोशिल्पे** व स्त्रीप्रतिमांना **कोरे** म्हणत असत.

**प्रश्न ३ : 'अ' गटातील शब्दांना जुळणारे 'ब' गटातील शब्द निवडून जोड्या जुळवा व त्या लिहा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १. ग्रीक लोक | खि. पू. ३२३ ते १४६ |
| २. हेलेनिस्टिक काळ | हेलेनीस |
| ३. मिनोअन वास्तुकला | सिंहद्वार |
| ४. मिसेनिअन कला | नॉससचा प्रासाद |
| ५. पार्थिनॉन मंदिर | पुरुषप्रतिमा |
| ६. अपोलोशिल्पे | डोरिक शैली |
| ७. मिरॉन | पॉलिक्लिटस |
| ८. अॅमॅझॉन | थाळीफेक्या |
| ९. स्कोपास | अॅपॉक्सिओमेनॉस |
| १० लिस्सिपॉस | डिमांटर |
| ११. हेलेनिस्टिक शिल्पकला | अॅपेलस |
| १२. ग्रीक चित्रकार | लाओकून |

**उत्तर :**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १. ग्रीक लोक | हेलेनीस |
| २. हेलेनिस्टिक काळ | खि. पू. ३२३ ते १४६ |
| ३. मिनोअन वास्तुकला | नॉससचा प्रासाद |
| ४. मिसेनिअन कला | सिंहद्वार |
| ५. पार्थिनॉन मंदिर | डोरिक शैली |
| ६. अपोलोशिल्पे | पुरुषप्रतिमा |
| ७. मिरॉन | थाळीफेक्या |

| | |
|---|---|
| ८. ॲमॅझॉन | पॉलिक्लिटस |
| ९. स्कोपास | डिमीटर |
| १०. लिसिपॉस | ॲपॉक्सिओमेनॉस |
| ११. हेलेनिस्टिक शिल्पकला | लाओकून |
| १२. ग्रीक चित्रकार | ॲपेलस |

**प्रश्न ४ : व्हीनस-द्-मेलो या शिल्पाचे रसग्रहण लिहा.**

**व्हीनस-द्-मेलो** : हे सुप्रसिद्ध ग्रीक शिल्प आहे. व्हीनसच्या या शिल्पकृतीचे खोदकाम संगमरवरी दगडात झालेले आहे. शिल्पाचे दोन्ही हात तुटलेले आहेत, म्हणजेच शिल्प सध्या भंगलेल्या स्थितीत उपलब्ध आहे. तरीही त्याच्या अंग-प्रत्यंगांतून जिवंतपणा, रसरशीतपणा व सौन्दर्य ही वैशिष्टचे जणू निथळत आहेत. शिल्पाकृतीच्या चेहऱ्यावर गोडवा व हास्य आहे. व्हीनसच्या डोळ्यांतील चमक दगडातूनही जाणवते. शिल्पाकृतीचे अवयव प्रमाणबद्ध व रेखीव आहेत. कटि-खालच्या वस्त्राच्या सुरकुत्या कमालीच्या स्वाभाविक आहेत. संपूर्ण शिल्पात मनमोहक लय आहे.

# प्रकरण १३ : वैभवशाली रोमन संस्कृती

**प्रश्न १ : खालील विषयांवर टीपा लिहा.**

(अ) एत्रुस्कन कला, (आ) रोमन कलेची घडण, (इ) पँथेऑन मंदिर, (ई) कोलोसिअम.

**उत्तर (अ) एत्रुस्कन कला**—आशिया मायनरमधून इटलीत येऊन स्थायिक झालेल्या एत्रुस्कनांची कला काही अंशी परभृत व काही अंशी स्वतंत्र होती. त्यांची शहरे उंच टेकडयांवर असून दगडी तटबंदीने घेरलेली असत. कमानी, ठोकळ्यांचे बांधकाम, चौथऱ्यावरील देवालये, लाकडी मंदिरे व कोरलेली थडगी ही यांच्या **वास्तुकलेची** वैशिष्टचे होत. दैनंदिन जीवनातील प्रसंग, मेजवान्या, नृत्ये इत्यादींची भित्तिचित्रे व तबकडयांवरील चित्रे यांवरून त्यांच्या **चित्रकलेची** ओळख पटते. पक्की माती व ब्रॉंझ यांची रंगीत शिल्पे बनविण्यात ते कुशल होते. अपोलो देवता व वक्ता ही प्रसिद्ध शिल्पे असून वक्ता हे शिल्प वास्तवानुसारी आहे. एत्रुस्कन कलाकार धातुकाम व जडजवाहीर हे कलाकुसरीचे कामही करीत असे.

(आ) **रोमन कलेची घडण**–रोमन कला संमिश्र स्वरूपाची आहे. कारण मुळात रोमन संस्कृती मिश्र आहे. रोमन संस्कृतीने एत्रुस्कनांकडून शकुन-अपशकुन-विषयक कल्पना घेतल्या व ग्रीकांकडून देवताविषयक कल्पना उचलल्या. त्यांनी पूर्वेकडील देशांच्या अनेक चालीरीती आत्मसात केल्या; पर्शियन व ख्रिस्ती लोकांकडूनही अनेक कल्पना स्वीकारल्या. अशा प्रकारे रोमन संस्कृतीची व म्हणून कलेची जडणघडण अनेक वैशिष्टयांच्या परस्पर-मिश्रणामधून झाली. उदाहरणार्थ, रोमनांनी डोरिकप्रभृती ग्रीक वास्तुशैली आपल्याशा करून त्यांत स्वतःची वैशिष्टये समाविष्ट केली. गणतंत्रकाळाच्या सुरुवातीस रोमनांनी एत्रुस्कन व ग्रीक पद्धतींच्या इमारती बांधल्या.

(इ) **पँथेऑन मंदिर**–इसवी सनाच्या दुसऱ्या शतकात बांधण्यात आलेल्या या रोमन मंदिराचा अन्तर्भाव जगातील उत्कृष्ट इमारतींत होतो. ही इमारत गोल व भव्य आहे. या मंदिराचा घुमट ४३·२५ मी. व्यासाचा असून तो ६ मी. जाडीच्या भिंतीवर आधारलेला आहे. त्याच्या माथ्यावर प्रकाशासाठी ८·५ मी. व्यासाचे छिद्र ठेवण्यात आले आहे. याचे प्रवेशदालन १६ एकसंधी दगडी स्तंभांवर उभे असून आतील भिंती संगमरवरी फरश्यांनी आच्छादिलेल्या आहेत.

(ई) **कोलोसिअम**–कोलोसिअम म्हणजे सभोवती चढती प्रेक्षकासने असलेले गोल किंवा दीर्घगोल रंगमंदिर. असे एक भग्नावस्थेतील मंदिर अद्याप उपलब्ध आहे. त्यावरून या वास्तुविशेषाची कल्पना येते. याचा आकार दीर्घवर्तुळाकार असून परीघ ५३७ मी. आहे. याच्या बाहेरील भिंतीची उंची ४६ मी. असून आत एकूण ५० हजार माणसांची बसण्याची व्यवस्था आहे. चढत्या प्रेक्षकासनाच्या खाली पुष्कळ जिने, बऱ्याच खोल्या, पशूंच्या कोठड्या व खेळाडूंच्या सामान ठेवण्याच्या खोल्या आहेत. याच्या तीन मजल्यांवर अनुक्रमे डोरिक, आयोनिक व कोरिन्थियन शैलींतील स्तंभ असून ते अर्धवर्तुळाकार कमानीने युक्त आहेत.

**प्रश्न २ : खालील मुद्यांची दोन-दोन वाक्यांत माहिती लिहा.**

(अ) रोमन संस्कृतीचा विस्तार, (आ) टस्कन शैली, (इ) रोमन वास्तुकलेचे प्रमुख आविष्कार व (ई) पूल.

**उत्तर** (अ) एत्रुस्कन, लॅटिन, ग्रीक व केल्ट या लोकांचा समावेश रोमन साम्राज्यात झाला होता. त्याशिवाय कार्थेजियन साम्राज्याचा आणि पूर्वेकडील स्पेन, फ्रान्स इंग्लंड यांसारख्या प्रदेशांचा अन्तर्भाव रोमन संस्कृतीत झाला होता.

(आ) एत्रुस्कनांनी ग्रीकांच्या डोरिक शैलीत थोडाफार बदल करून टस्कन शैली सिद्ध केली. या शैलीत पाया, त्यावर कंगोरे व पन्हळ नसलेला उभा खांब

आणि खांबावर सांधे पण वर्तुळाकार कडीचे शीर्ष अशा पद्धतीच्या स्तंभाला फार महत्त्व आले.

(इ) उंच चौथरा, तीन भागांत विभागलेला गाभारा, व गोल आकार या वैशिष्टयांनी युक्त असलेली मंदिरे हा रोमन वास्तुकलेचा एक प्रमुख आविष्कार. याशिवाय बॅसिलिका, अॅम्फिथिएटर, स्नानगृह, फोरम, विजयतोरणे, विजयस्तंभ व पूल हे रोमन वास्तुकलेचे इतर आविष्कार होत.

(ई) **पूल**–रोमन स्थापत्यविशारदांनी अनेक पूल बांधले. स्पेनमधील अॅल्-कान्तारा येथील पूल प्रसिद्ध असून त्याची लांबी १८५१ मीटर व रुंदी ५४ मी. आहे; तो अद्याप वापरात आहे.

**प्रश्न ३ : रिकाम्या जागी योग्य शब्द भरून खालील वाक्ये पूर्ण करा व ती पुन्हा लिहा.**

(अ) रोमनांनी बांधलेल्या न्यायमंदिरांना……… म्हणतात.

(आ) पँथेऑन मंदिर इसवी सनाच्या……… शतकात बांधले गेले.

(इ) अॅम्फिथिएटर म्हणजे सभोवती चढती प्रेक्षासने असलेले गोलाकार किंवा दीर्घगोलाकार………

(ई) प्राचीन रोममधील प्रचंड रंगमंदिर………या नावाने ओळखले जाते.

(उ) व्यापार, राजकीय सभा किंवा नागरी कार्ये अशा विविध सार्वजनिक कार्यांसाठी वापरण्यात येणाऱ्या इमारतीला………म्हणत असत.

(ऊ) ऑगस्टस बादशाहाने आपल्या विजयाची स्मारके म्हणून ……… उभारल्या.

(ए) ट्राजन व मार्कस् ऑरिलियस या दोघांचे………प्रसिद्ध आहेत.

(ऐ) पॉम्पी येथे सापडलेले '………' हे रोमन गृहोपयोगी वास्तुकलेचे उत्तम उदाहरण आहे.

(ओ) रोमनांनी ग्रीस देशामधून जहाजे भरभरून………आणले.

(औ) …… हे रोमन शिल्पकलेचे खास वैशिष्टय होय.

(अं) 'बसलेली रोमन स्त्री' हे शिल्प……… व भावपूर्ण आहे.

(अः) 'गाय राखणारा गुराखी' ……… शिल्प असून 'अॅलेक्झांडर व दरायस यांचे युद्ध' हे ……… आहे.

**उत्तर** (अ) रोमनांनी बांधलेल्या न्यायमंदिरांना **बॅसिलिका** म्हणतात.

(आ) पँथेऑन मंदिर इसवी सनाच्या **दुसऱ्या** शतकात बांधले गेले.

(इ) अॅम्फिथिएटर म्हणजे सभोवती चढती प्रेक्षासने असलेले गोलाकार किंवा दीर्घगोलाकार **रंगमंदिर**.

(ई) प्राचीन रोममधील प्रचंड रंगमंदिर **कोलोसिअम** या नावाने ओळखले जाते.

(उ) व्यापार, राजकीय सभा किंवा नागरी कार्ये अशा विविध सार्वजनिक कार्यांसाठी वापरण्यात येणाऱ्या इमारतीला **फोरम** असे म्हणत असत.

(ऊ) ऑगस्टस बादशाहाने आपल्या विजयाची स्मारके म्हणून सतरा **कमानी** उभारल्या.

(ए) ट्राजन व मार्कस् ऑरिलियस या दोघांचे **विजयस्तंभ** प्रसिद्ध आहेत.

(ऐ) पॉम्पी येथे सापडलेले '**पान्साचे घर**' हे रोमन गृहोपयोगी वास्तु-कलेचे उत्तम उदाहरण आहे.

(ओ) रोमनांनी ग्रीस देशामधून जहाजे भरभरून **पुतळे** आणले.

(औ) **व्यक्तिशिल्पे** हे रोमन शिल्पकलेचे खास वैशिष्टय होय.

(अं) 'बसलेली रोमन स्त्री' हे शिल्प **वास्तवानुसारी** व भावपूर्ण आहे.

(अः) 'गाय राखणारा गुराखी' हे **उत्थित** शिल्प असून 'ॲलेक्झांडर व दरायस यांचे युद्ध' हे **भित्तिचित्र** आहे.

**प्रश्न ४ : खालील व्यक्तिशिल्पांचे रसग्रहण लिहा.**

(अ) मार्कस् ऑरिलियसचा ब्राँझचा पुतळा, (आ) बसलेली रोमन स्त्री, व (इ) ज्यूलियस सीझर.

**उत्तर (अ) मार्कस् ऑरिलियस**–हा विक्रमी रोमन सम्राट होता. याचे अश्वारूढ व्यक्तिशिल्प उपलब्ध आहे. ते ब्राँझचे बनविलेले असून कमालीचे बोलके आहे. मार्कस् एका सुदृढ व उमद्या घोड्यावर बसलेला असून त्याने एक हात लांब केलेला आहे असे शिल्पकाराने दाखवलेले आहे. सम्राटाच्या अंगावरील वस्त्रांचे व घोड्याच्या शरीराचे शिल्पांकन अत्यन्त वास्तववादी झाले आहे. प्राचीन काळात रोमन व्यक्तिशिल्पकलेने किती उंची गाठली होती त्याची यथार्थ कल्पना या व्यक्ति-शिल्पावरून येऊ शकते.

**(आ) बसलेली रोमन स्त्री**–हे एक अत्यन्त प्रेक्षणीय शिल्प आहे. एक स्त्री खुर्चीत आराम करीत बसली आहे, असे शिल्पकाराने दाखविले आहे. शिल्पगत स्त्रीचे केस कुरळे असून त्यांच्या बटा कपाळावर उडत आहेत. एकूण हे शिल्प इतके वास्तववादी व बोलके आहे की शिल्पगत स्त्री क्षणार्धात उठून उभी राहून चालू लागेल किंवा काय असे प्रेक्षकाला वाटते.

(इ) **ज्यूलियस सीझरचे व्यक्तिशिल्प**–ज्यूलियस सीझर (इ. स. पूर्व १०० ते ४४) हा रोमन सेनापती होता. त्याने स्वपराक्रमाने अनेक देशांवर मात

केली होती; ब्रिटन इत्यादी देशांवर यशस्वी चढाया केल्या होत्या. इ. स. पू. ४४ मध्ये तो रोमचा सम्राट झाला. त्याचे दगडात खोदलेले व्यक्तिशिल्प उपलब्ध आहे. त्यात या प्रसिद्ध योद्ध्याच्या चेहऱ्याचे सर्वच्या सर्व बारकावे स्पष्टपणे खोदण्यात आले आहेत. त्या शिल्पावरून हा लष्करी अंमलदार करडा व कडक होता अशी प्रतीती येते. शिवाय त्याचा आत्मविश्वास दगडी शिल्पातून स्पष्टतया प्रतीत होतो. त्याच्या डोळ्यांत पाहणाऱ्यांवर जरब बसविण्याची एक ताकद आहे. शिल्पातील ओठ व हनुवटी यांचे खोदकाम इतके प्रभावी झाले आहे की, जणू त्या दोन अवयवांवरून पाहणाऱ्याला सीझरच्या वज्रनिश्चयी स्वभावाचा प्रत्यय येतो. हे सर्व विशेष दगडी शिल्पात खोदले गेले आहेत, हे विशेष आहे. तात्पर्य, हे शिल्प कमालीचे सजीव व प्रभावी आहे. त्यामुळे शिल्पकाराच्या पदरी भारंभार यश टाकण्यात रसिकाला संदेह वाटत नाही.

# प्रकरण १४ : कलेची व संकल्पाची मूलतत्त्वे

## प्रश्न १ : कला म्हणजे काय ? कलावंताचे कार्य कोणते ?

**उत्तर** : मनुष्य स्वतःभोवती निसर्गाचे अनेक आविष्कार बघतो. त्याला उन्हाळ्यात मृगजळ पाहून साश्चर्य आनंद होतो. पावसाळ्यात आकाशातून अविरत कोसळणाऱ्या जलाधारा पाहून अतिशय आल्हाद होतो. पाऊस थांबताच आकाशात पडणाऱ्या इंद्रधनुष्याकडे बघून तर त्याचे भान हरपते. भोवतालची दाट हिरवळ पाहून त्याच्या डोळ्यांचे पारणे फिटते. डोंगरावरून कोसळणाऱ्या धबधब्याकडे तो अनिमिष नेत्रांनी बघत राहतो. खळाळत वाहाणाऱ्या नद्यांच्या आवाजाने त्याला अवर्णनीय आनंद होतो. तर भृंगांच्या मंजुळ गुंजारवाने तो मुग्ध होतो. अशा प्रकारे आजूबाजूच्या वातावरणामधून त्याला रूप, आकार, ध्वनी, सुगंध, स्वाद, स्पर्श इत्यादींच्या ज्या सुखावह अनुभूती येतात त्या इतरांना वर्णन करून सांगण्याची उत्कट इच्छा त्याला होते. त्या अनुभूतींमुळे त्याच्या मनात अनेक सूक्ष्म व सुखद भावना स्फुरण पावू लागतात आणि त्या शब्द, शिल्प, चित्र, संगीत इत्यादी अनेकविध माध्यमांतून व्यक्त होण्याची धडपड करू लागतात. सौंदर्यभावनांच्या या अभिव्यक्तीलाच कला असे म्हणतात. कलासंपन्न कृती निर्माण करणाऱ्यास आपण कलावंत म्हणतो.

कला म्हणजे कुशलता किंवा समर्थता. कला शब्दाच्या अर्थाचा इंग्रजी शब्द Art हा आहे. तो मूळ लॅटिन Ars या शब्दावरून आला आहे. कला व नवनिर्मिती

हे दोन्ही शब्द समानार्थक आहेत. कलेच्या मुळाशी कल्पकता असते. कल्पकता ही सौंदर्याची जननी होय. कला म्हणजे जणू प्रतिमाने व प्रतीके यांची भाषा. कलावंत त्या भाषेच्या मदतीने आपल्या अनुभूती, प्रतिक्रिया व भावना रसिकांच्या हृदयाला भिडतील अशा पद्धतीने व्यक्त करीत असतो. अशा प्रकारे कलावंत स्वतःभोवती पसरलेल्या स्पन्दनशील जगाच्या भौतिक, सामाजिक व आध्यात्मिक बाजूंचे स्पष्टीकरण करतो, त्यांची तीव्रता रसिकांच्या नजरेस आणतो, त्यांना नाट्यरूप देतो आणि त्यांच्या परस्परसंबंधांवर प्रकाशझोत टाकतो. कलावंत जीवनाच्या विविध अंगोपांगांचा अन्वयार्थ लावीत असल्यामुळे त्याला जीवनाचा भाष्यकार म्हणतात. (' The role of the artist is thus to clarify, intensify, dramatize and interpret the world about him in all its physical, social and spiritual aspects. ')

## प्रश्न २ : कलांच्या वर्गीकरणाच्या विविध पद्धती नमूद करा.

**उत्तर** : कलावंतांच्या सर्व मानसिक प्रतिक्रिया दृश्य स्वरूपात व्यक्त होतात. कधी त्या प्रतिक्रिया काव्याचे रूप धारण करतात, कधी त्या एखाद्या रमणीय चित्रात परिणत होतात, कधी त्यांना एखाद्या देखण्या शिल्पाचे रूप प्राप्त होते तर कधी त्या एखाद्या श्रवणमधुर गीताचा आकार घेतात. अशा प्रकारे कलावंताच्या कलात्मक जाणिवा विविध माध्यमांतून अभिव्यक्त होत असल्यामुळे कलांच्या वर्गीकरणाच्या पद्धती जन्मास आल्या आहेत. त्या अशा :

(अ) **प्रमुख** (Major) **व गौण** (Minor) **कला** : शिल्प, स्थापत्य, चित्र, साहित्य व संगीत या कलांना प्रमुख कला म्हणतात. चिनीमातीची भांडी बनविणे, फर्निचर बनविणे, कापडावर बुट्टी काढणे, हिऱ्याला पैलू पाडणे, सोन्याच्या आकर्षक वस्तू बनविणे, नाण्यांवर कोरीवकाम करणे, उठावदार खोदकामाचे दागिने बनविणे इत्यादी कलांना गौण कला म्हणतात.

(आ) **उच्चतर** (Higher) **व नीचतर** (Lower) **कला** : वरील ' अ ' मधील प्रमुख कलांनाच **उच्चतर कला** आणि गौण कलांना **नीचतर कला** असे म्हणतात.

(इ) **ललित** (Fine) **व उपयुक्त** (Applied) **कला** : वरील ' अ ' मधील प्रमुख कलांना **ललित कला** आणि गौण कलांना **उपयुक्त कला** असे म्हणतात. मात्र अलीकडे असा फरक केला जात नाही. पूर्वी उत्कृष्ट बनावटीची खुर्ची उपयुक्त कलेचा नमुना समजली जात असे. अलीकडे तिलाही ललित कलेची प्रतिष्ठा दिली जाते.

(ई) सध्या तत्त्वज्ञानाच्या पातळीवरून **दृष्टिगोचर** ( Concrete ), **गूढ**

(abstract), **आधिभौतिक** (material) व **आध्यात्मिक** (spiritual) कला असे नवे वर्गीकरण रूढ होऊ पाहात आहे.

कलांच्या वर्गीकरणाच्या वरील विविध पद्धतींच्या मुळाशी व्यावहारिक, विवेचक, सौन्दर्यात्मक अथवा दार्शनिक तत्त्वे आहेत.

**प्रश्न ३ : 'ललित कला' या विषयावर एक लहानसे माहितीवजा टिपण लिहा.**

**उत्तर** : मनुष्याने प्रयत्नपूर्वक निर्माण केलेल्या सौन्दर्यसंपन्न वस्तूला आपण कलाकृती म्हणतो. जीवनातील एखाद्या दृश्याच्या दर्शनाने किंवा अन्य अनुभवाने कलावंताला उत्कृष्ट आनंद झालेला असतो. तो रसिकांच्या हृदयापर्यंत पोचविणे हा कलेचा हेतू असतो. अशा प्रकारे जी कला सौन्दर्यसंपन्न व आनंदप्रद असते तिला आपण ललित कला ( Fine art) म्हणतो.

Fine arts शब्दांचा संबंध ' beaux arts' या फ्रेंच शब्दांशी आहे. ललित कलेत दृष्टिगोचर, शब्दमय किंवा श्रवणगोचर प्रतिमाने व प्रतीके वापरली जात असून त्यांचा उद्देश सौंदर्यात्मक अनुभूतींचा आविष्कार करणे हा असतो. ऑक्सफर्ड शब्दकोशानुसार Fine arts हे शब्द इ. स. १७६७ साली प्रथमतः वापरले गेले.

प्राचीन काळात ग्रीस देशात शिल्पकलेला प्रतिष्ठितपणा व पवित्रपणा लाभला होता. रोमन साम्राज्याच्या काळात सम्राटाचा गौरव करणे व व्यक्तीचा सन्मान करणे हा कलेचा हेतू मानण्यात येऊ लागला. त्याच काळात कारागीर व कलावंत यांमध्ये फरक करण्यात येऊ लागला. पुढे मध्य युगातील जीवन साधे पण सुसंघटित होते श्रीमंत सरदार-शिलेदारांनी मोठमोठ्या चित्रकारांना धार्मिक चित्रे रेखाटण्यासाठी आणि सामान्यांचे कपडे रंगविण्यासाठी आपल्या पदरी बाळगले. त्यामुळे कारागीर व कलावंत यांतील फरक लोप पावला. परंतु कालांतराने चित्रकला व शिल्पकला यांची विद्यालये स्थापन झाल्यावर ललित कला उच्चतर असल्याची जाणीव बळावली. फ्रान्सच्या चौदाव्या लुईने पॅरिसमध्ये १६४८ साली शिल्पकलेचे एक विद्यालय स्थापन केले. तेच त्या कलेचे प्राचीनतम विद्यालय होय.

युरोपात अठराव्या शतकात ललित व अलंकरणात्मक (fine and decorative) कलांतील फरक स्पष्ट झाला. त्याबरोबरच कलावंत व कारागीर यांमध्येही भेद मानण्यात येऊ लागला.

एकोणिसाव्या शतकात मध्यम वर्गाचा उदय झाला. त्याला स्वतःची घरे सुशोभित करावयाची होती. त्यायोगे त्याला प्रतिष्ठेच्या कल्पनेची जोपासना करावयाची होती. म्हणून त्याने एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी सहजपणे घेऊन जाता येतील अशी चित्रे काढण्यास चित्रकारांना प्रवृत्त केले. अशा प्रकारच्या चित्रांकनाची


प्रथा तेव्हापासून रूढ झाली. जी कला कलावंताची नवनिर्मितीची इच्छा पुरविते ती ललित कला अशी व्याख्या आज सर्वसंमत झाली आहे. (Fine art is that art which fulfills artist's desire for creation).

**प्रश्न ४ : संकल्पाची मूलतत्त्वे कोणती ? संक्षेपाने लिहा.**


**उत्तर** : निसर्गात संकल्पाची काही तत्त्वे समाविष्ट झालेली असतात. कलावंत त्यांचा कलेत मार्मिकपणे उपयोग करतो. ती मूलतत्त्वे अशी :

१. पुनरावृत्ती, २. बदल, ३. विरोध, ४. विस्तार, ५. प्रमाण, ६. तोल, व ७. लय. यांचेही काही उपप्रकार संभवतात. ते असे–


नियमित, अनियमित व सर्वव्यापी हे पुनरावृत्तीचे (एखाद्या आकाराच्या पुन्हापुन्हा केलेल्या योजनेस पुनरावृत्ती म्हणतात.) पोटप्रकार आहेत. तर बाह्य व आंतर हे बदलाचे मुख्य पोटभेद असून स्थिती, आकार, छायाभेद, रंग इत्यादींत बदल करून आंतरबदलाचे विविध प्रकार होऊ शकतात. रेषा, आकार, आकारमान, छायाभेद, रंग व पोत असे विरोधाचे सहा प्रकार आहेत. एका विशिष्ट स्थानापासून होणाऱ्या आकर्षक उत्सर्जनाला विस्तार म्हणतात व त्याचे बिंदू, मध्यबिंदू, आस व पाया यांपासून चार प्रकार होतात. चित्राच्या विविध घटकांतील परस्परसंबंधाला प्रमाण म्हणतात. याचे रेषा, आकार, क्षेत्र व रंग असे चार प्रकार असतात. चित्राच्या ज्या गुणधर्मामुळे प्रेक्षकांची दृष्टी चित्रातील सर्व आकारांवर योग्य प्रकारे खेळवली जाते त्या गुणधर्माला तोल म्हणतात. त्याचे समतोल व विषमतोल असे मुख्य दोन भेद आहेत. चित्रातील आकार व रेषा यांतील समकालिक विरामस्थानाला लय म्हणतात.




नियमित पुनरावृत्ती




स्थितिबदल




बाह्यबदल



आकारबदल



सर्वव्यापी पुनरावृत्ती



विषमतोल

**प्रश्न ५ : रिकाम्या जागी योग्य शब्द लिहून खालील वाक्ये पूर्ण करून लिहा.**

(अ) चित्रात एखाद्या आकाराची जी पुन्हापुन्हा योजना करतात तिला .........म्हणतात.

(आ) ज्याच्या दोन्ही बाजू सारख्या नाहीत अशा आकाराच्या पुनरावृत्तीस ...... .. पुनरावृत्ती म्हणतात.

(इ) चित्रातील आकाराच्या मांडणीत, आकारमानात किंवा रंगच्छटेत केल्या जाणाऱ्या फरकाला.........म्हणतात.

(ई) पुनरावृत्त आकाराच्या स्थितीत, आकारात, आकारमानात, छायाभेदात अथवा रंगात बदल करून.........साधता येतो.

(उ) एका विवक्षित स्थानापासून होणाऱ्या आकर्षक विस्ताराला ......... म्हणतात.

(ऊ) चित्रातील विविध घटकांचा जो परस्परांशी योग्य व तुलनात्मक संबंध असतो त्याला......... म्हणतात.

(ए) प्रमाण.........च ठरवावयाचे असते.

(ऐ) तोलाचे.........व विषमतोल असे दोन प्रकार असतात.

(ओ) चित्रातील आकार वा रेषा यांतील........विरामस्थानाला........ म्हणतात.

**उत्तर** : (अ) चित्रात एखाद्या आकाराची जी पुन्हापुन्हा योजना करतात तिला **पुनरावृत्ती** म्हणतात.

(आ) ज्याच्या दोन्ही बाजू सारख्या नाहीत अशा आकाराच्या पुनरावृत्तीस **अनियमित** पुनरावृत्ती म्हणतात.

(इ) चित्रातील आकाराच्या मांडणीत, आकारमानात किंवा रंगच्छटेत केल्या जाणाऱ्या फरकाला **बदल** म्हणतात.

(ई) पुनरावृत्त आकाराच्या स्थितीत, आकारात, आकारमानात, छाया-भेदात अथवा रंगात बदल करून **आंतर बदल** साधता येतो.

(उ) एका विवक्षित स्थानापासून होणाऱ्या आकर्षक विस्ताराला **उत्सर्जन** म्हणतात.

(ऊ) चित्रातील विविध घटकांचा जो परस्परांशी योग्य व तुलनात्मक संबंध असतो त्याला **प्रमाण** म्हणतात.

(ए) प्रमाण **नजरेनेच** ठरवावयाचे असते.

(ऐ) तोलाचे **समतोल** व विषमतोल असे दोन प्रकार असतात.

(ओ) चित्रातील आकार वा रेषा यांतील **समकालिक** विरामस्थानाला **लय** म्हणतात.

# प्रकरण १५ : चित्रकलेचे मूळ घटक

## प्रश्न १ : 'चित्रकला' या विषयावर परिचयात्मक परिच्छेद लिहा.

**उत्तर** : रेषांच्या साहाय्याने प्रतिमा निर्माण करण्याच्या कलेला चित्रकला म्हणतात. अशा प्रकारच्या प्रतिमा-निर्मितीच्या द्वारे कलाकार निसर्गात पाहिलेल्या वस्तूंचे चित्रण करतो. चित्रकार रेखांकनासाठी कागद, लाकूड कापड, चर्मपट (parchment), खडकांच्या भिंती यांपैकी कशाचाही वापर करतो कारण त्याचा संबंध मुख्यत्वेकरून आकारांशी असतो, रंगांशी नसतो. रेखांकनाचे पर्यवसान पुढे रंगीत चित्रात होते, ही बाब वेगळी.

चित्रकलेला Drawing असे इंग्रजीत म्हणतात. Drawing या एकाच शब्दाचा उपयोग विविध भाषांत व देशांत Drawing, Painting व Writing अशा विविध अर्थांनी होतो. सर जोशुआ रेनॉल्डसच्या मते कोणतेही चित्र पुढील

तीन अवस्थांमधून गेल्याशिवाय पूर्ण होऊच शकत नाही— १. बाह्य आकृतीच्या योगे बनावा(composition)ची योजना पक्की होते, ३. नंतर ती आकृती चित्रासाठी निवडलेल्या पृष्ठभागावर काढली जाते आणि ३. आकारात रंग भरले जातात. तात्पर्य, चित्रकलेच्या परिपूर्ण विकासाच्या या तीन आवश्यक पायऱ्या आहेत.

**प्रश्न २—'रेखा हा चित्राचा व रेखांकन हा चित्रकलेचा प्राण होय' या विधानाचे विवेचन करा.**

**उत्तर** : रेखा किंवा रेषा हे कोणत्याही चित्राचे अगदी तळघडीचे साहित्य आहे. बिंदूबिंदूंची रेषा बनते व अनेक रेषा सुसंगतपणे एकत्र आल्या की एक विशिष्ट आकार बनतो. अनेक आकारांच्या संयोजनाने चित्र सिद्ध होते. चित्रकलेत रेषांना इतके महत्त्वपूर्ण स्थान असल्यामुळेच रेषांच्या साहृयाने प्रतिमा निर्माण करण्याची कला म्हणजे चित्रकला अशी चित्रकलेची व्याख्याच करण्यात आली आहे. डॉ. जॉन्सन्च्या शब्दकोशात Drawing शब्दाचा अर्थ Delineation असा देण्यात आला आहे, तो देखील रेषांचा महिमाच सुचवितो.

रेषांमुळे चित्रातील विविध आकारांचा वेगळेपणा स्पष्ट होतो. शिवाय त्या आकारांच्या तपशिलाचे आलेखनही रेषांच्या योगेच होते. रेषांमध्ये दृष्टीला गती देण्याचे म्हणजे तिला खाली ढकलण्याचे व/वा वर खेचण्याचे सामर्थ्यही असते. रेषांमुळे छायाप्रकाशाचा भास उत्पन्न होऊन चित्रगत भाव प्रभावीपणे व्यक्त होतात.

वर वर्णन केल्याप्रमाणे रेषा चित्राचा कणाच असल्यामुळे चित्रकाराला रेषांचे उत्कृष्ट ज्ञान अवश्य हवे. चित्रातील आकाराची यथार्थ कल्पना देणारी रेषा समर्थ रेषा समजली जाते. जे. ए. डी. इन्ग्रेओ(J. A. D. Ingreo)ने म्हटले आहे की, 'Line is drawing and that is the whole of our art.' प्रत्येक रंगीत चित्रात रेषा असतातच, पण प्रत्येक रेखाकृतीत रंग असतातच असे नाही. अर्थात रंगरहित रेखा असू शकतात. म्हणूनच बहुतेक सर्व नवे-जुने चित्रकार रेषांना महत्त्व देतात. रेषांमुळे आकारांना निश्चित स्वरूप प्राप्त होत असल्यामुळे ज्यांना दृक्परिणाम साधावयाचे असतात असे 'hard edge school'चे चित्रकार पक्क्या रेषा अवश्यक काढतात. पिकासो, पॉल क्ली, बेन निकोल्सन इत्यादी आधुनिक कलाकार रेषांवर अधिक भर देतात.

प्राचीन कलावंत झाडे, दगड, प्राणी, पर्वत इत्यादींची रेखांकने सरावासाठी करीत असत. ती त्यांची चित्रकलेची किंवा शिल्पकलेची पूर्वतयारी असे. सवयीसाठी केलेली अशी रेखांकने जपून ठेवण्याची प्रथा सोळाव्या शतकापासून सुरू झाली. राफाएल, लिओनार्दो द विन्सी व मायकेल एन्जेलो यांनी अशी अगणित रेखांकने

केली. आपल्याला बिनचूक व निर्दोष रेखांकने साधावीत यासाठी राफाएलने नग्न आकृतीही रेखाटल्या.

अठराव्या शतकातील चित्रकार जुन्या चित्रांची रेखांकने सरावासाठी करू लागले. उदाहरणार्थ, व्हीनस द मेलो, लाओकून इत्यादी कलाकृतींची रेखाटने अनेक कलाकारांनी केली. शिवाय एकोणिसाव्या शतकात प्रत्यक्ष व्यक्तीला (Model) समोर बसवून रेखांकने करण्याची प्रथा सर्रास रूढ झाली.

चित्रकलेत बिनचूक, निर्दोष व समर्थ रेखांकनांचे महत्त्व आणखी एका कारणासाठी फार आहे. रेषा भाववाहक असतात. त्या कलावंताच्या मनातील भाव व्यक्त करतात. उदाहरणार्थ, सरळ रेषा स्थिरता व दृढता हे भाव सुचवितात, आडव्या सरळ रेषा शांतता सूचित करतात, वेड्यावाकड्या रेषा गोंधळ दाखवितात, एका बिंदूतून बाहेर पडणाऱ्या रेषा विकास दर्शवितात, तुटक रेषा कारुण्य व्यंजित करतात, तर वळणदार रेषा मंद गती सुचवितात. यावरून असे दिसून येते की, रेषा कमालीच्या भावसूचक व बोलक्या असतात. गटेने म्हटलेच आहे की, 'Drawings are invaluable because they bring immediately before us the mood of the artist's mind at the moment of creation.' अर्थात रेषांच्या योगे चित्रविषयातील भाव वा चित्रकाराच्या मनातील विकार अभिव्यक्त होत असल्यामुळे चित्राच्या एकूण बनावामध्ये रेखांकनास अपार महत्त्व आहे. म्हणूनच रेखांकन हा चित्रकलेचा प्राण होय असे यथार्थपणे म्हणता येईल.

**प्रश्न ३ : चित्रकलेचे मूळ घटक कोणते ते संक्षेपाने लिहा.**

**उत्तर** : रेखा, आकार, छायाभेद, रंग व पोत हे चित्रकलेचे मूळ घटक होत· जणू हे चित्रकलेचे पंचप्राणच होत. त्यांचे स्वरूप असे :

(अ) **रेखा**–रेखा (हिलाच रेषा असेही म्हणतात) कोणत्याही चित्राचे मूळ घटनाद्रव्य होय. रेषा बिंदूबिंदूंची बनलेली असते. आडवी, उभी, जाड, पातळ, सरळ, वाकडी, सलग व तुटक अशी रेषा वेगवेगळ्या प्रकारची असते. वेगवेगळ्या रेषांच्या साहृयाने वेगवेगळे आकार सिद्ध होतात. रेषा भाववाहक असल्यामुळे त्या कलावंताच्या मनातील भाव अभिव्यक्त करतात. उदाहरणार्थ, सरळ रेषा स्थिरता व दृढता सूचित करतात, आडव्या सरळ-रेषा शांततेच्या निदर्शक असतात, तुटक रेषा कारुण्याच्या द्योतक असतात तर वळणदार रेषा मंद गती ध्वनित करतात. म्हणजेच रेषा कमालीच्या बोलक्या असतात. रेषांमध्ये दृष्टीला गती देण्याचे सामर्थ्य असते. त्यामुळे प्रेक्षकाची दृष्टी समग्र चित्रावरून फिरून येते. विविध आकार स्पष्ट करणे, अंतर व छायाप्रकाश यांचा भास उत्पन्न करणे व चित्रपृष्ठाचे विभाजन करणे असे रेषांचे अनेक उपयोग आहेत. तात्पर्य, उत्कृष्ट रेखांकनावरच चित्राची यशस्विता अवलंबून असते.

(आ) **आकार**–कोणत्याही चित्रात केवळ रेषांना स्वतंत्र अस्तित्व नसते. नुसत्या रेषांना कोणी चित्र म्हणत नाही. रेषा एकमेकींना जोडल्या गेल्या की आकार तयार होतो. रेषा एकमेकींना वेगवेगळ्या प्रकारे जोडल्या गेल्या की वेगवेगळे आकार तयार होतात. अशा अनेक आकारांच्या योगाने चित्र सिद्ध होते. उत्कृष्ट चित्रात वेगवेगळ्या आकारांचे कौशल्यपूर्ण संयोजन केलेले असते. विविध आकारांत सुसंवादी संबंध असतो व त्यामुळेच ते आकार चित्रकाराला अभिप्रेत असलेली भावना व्यक्त करू शकतात. उत्तम चित्रातील वेगवेगळ्या आकारांत विविधता साधलेली असते. शिवाय त्यांतील काही कमी उठावदार असून काही जास्त उठावदार असतात. त्यामुळे सबंध चित्रात समतोल सांभाळला जाऊन चित्र आकर्षक बनते.

(इ) **छायाभेद**–प्रकाशाच्या कमीजास्त तीव्रतेमुळे वस्तूत छायाभेद दिसतो. चित्रात या छायाभेदामुळे त्रिमितीचा भास जाणवतो. छायाभेद छटांनी दर्शविला जातो. छटांमुळे चित्र आकर्षक होते. रंगात पाणी मिसळून छटा उत्पन्न करता येतात.

(ई) **रंग**–(Colour) रंग हे रंगीत चित्रकलेचे अंग आहे. चित्रातील आकारांत रंग भरले की चित्र रंगीत व सुंदर बनते. जांभळा, निळा, आकाशी, हिरवा, पिवळा, नारिंगी व तांबडा असे एकूण सात रंग असून, तांबडा, पिवळा व निळा हे मूळ रंग होत. यांनाच प्राथमिक रंग किंवा प्रथम श्रेणीचे रंग म्हणतात. हे प्राथमिक रंग स्वयंसिद्ध असतात; ते इतर रंगांच्या मिश्रणापासून बनविता येत नाहीत. या तीन रंगांपैकी कोणत्याही दोन रंगांच्या समप्रमाण मिश्रणापासून तयार होणाऱ्या रंगांना द्वितीय श्रेणीचे (Secondary) रंग म्हणतात. उदा० हिरवा, जांभळा व नारिंगी. दोन द्वितीय श्रेणीच्या रंगांच्या मिश्रणापासून तृतीय श्रेणीचे रंग उत्पन्न होतात. निरनिराळ्या रंगांमध्ये आंतरिक संबंध असतो. सजातीय रंगांच्या योजनेमुळे चित्रात सुसंगती (harmony) उत्पन्न होते. विजातीय रंगांच्या कौशल्यपूर्ण योजनेमुळे चित्रात वेगळाच गोडवा उत्पन्न होतो. वेगवेगळ्या रंगांमुळे प्रेक्षकांच्या मनामध्ये वेगवेगळ्या भावना उत्पन्न होतात. उदाहरणार्थ, लाल रंग प्रीतीचा व शौर्याचा भाव व्यक्त करतो, पिवळ्या रंगामधून आनंदाची प्रतीती येते, निळा रंग शांतता व अनंतता यांचा प्रत्यय देतो, भगवा रंग ज्ञानाचा व विरक्तीचा निदर्शक आहे तर सफेद रंग पवित्रतेचा द्योतक आहे. एकंदरीने रंगांमुळे चित्र नेत्राकर्षक बनत असल्यामुळे चित्रकाराची रंगांवर हुकमत असलीच पाहिजे. त्याने चित्रात भरलेले रंग अचूक, इष्ट परिणाम साधणारे व कायम टिकणारे असणे आवश्यक असते. पाच शतकांपूर्वीपर्यंत चित्रकार जलरंग वापरीत असत. परंतु जलरंग विशिष्ट कलाकृतींना व विशिष्ट शैलींना तेवढे साजतात. म्हणून चित्रकारांनी पंधराव्या

शतकापासून तैलरंग वापरण्यास सुरुवात केली. वाळणाऱ्या तेलात खललेल्या रंगांना तैलरंग म्हणतात. वस्तुसंग्रहालयातील सर्व चित्रे तैलरंगातच रंगविलेली असतात. अलीकडे तर painting शब्दाचा अर्थ oil painting असाच केला जातो. मात्र आधुनिक चित्रकलेच्या गरजा परंपरागत तैलरंग पुऱ्या करू शकत नाहीत.

(उ) **पोत**–पोत म्हणजे शाई, रंग किंवा ब्रश यांचा विशिष्ट वापर करून तयार केलेला पृष्ठभाग (A patterned surface). मेणावर शाईचा थर चढविल्यास पोताची प्रतीती येते. ड्रॉइंग-पेपरवर रंगाचा खूप जाड थर दिल्यास चित्रगत आकारांच्या घनतेचा प्रत्यय येतो. हा प्रत्यय ज्या गुणधर्मामुळे येतो त्यालाच पोत म्हणतात. उदाहरणार्थ, झाडाची खडबडीत साल रंगाचा जाड थर देऊन दाखविता येते. पाण्याचे रंगही वर्तुळाकार रेषांच्या द्वारे दाखविता येतात. पोताच्या मदतीने प्रभावी परिणाम साधता येतो. पोतामुळे चित्रात जिवंतपणा उत्पन्न होतो. पोत-रहित चित्र प्रेक्षकाच्या केवळ अन्तश्चक्षूला भिडते तर पोतसहित चित्र त्याच्या अन्तःकरणाच्या हातांना स्पर्श करते (‘The artist's appeal to the mind's hands besides to the mind's eye’). पोताचे स्पर्शजन्य व दृष्टिजन्य असे दोन प्रकार आहेत. आधुनिक चित्रकार पोताला विशेष महत्त्व देतात.

**प्रश्न ४ : ‘ रंगांची रसोत्पादनक्षमता ’ या विषयावर एक लहान निबंध लिहा.**

**उत्तर** : ‘ रंग ’ शब्द रञ्ज् (४ गण उभयपदी) या संस्कृत धातूपासून बनला आहे. त्या धातूचा अर्थ रंगणे वा रंगविणे असा आहे. स्वाभाविकपणे रंग प्रेक्षकाचे मन रिझवितो. मैदानावरील हिरवळीकडे किंवा झाडावरील गडद रंगांच्या फुलांकडे किंवा निळ्या आकाशाकडे पाहून दृष्टी निवते, मन प्रसन्न होते, उत्साह वाढतो व मनुष्य दुप्पट उभारीने कामास लागतो. यावरून हे आपोआपच सिद्ध होते की, रंगांचा मनातील भावनांशी निकटचा संबंध असतो. रंगांमुळे मनामध्ये वेगवेगळ्या भावना जागृत होतात. उदाहरणार्थ, शुभ्र रंगाच्या वस्तूकडे पाहून मनात शुद्धतेची किंवा पवित्रतेची भावना जागृत होते. काळ्या वस्तूच्या दर्शनाने मनामध्ये दुःखाची किंवा शोकाची छटा उत्पन्न होते. निळा रंग प्रेक्षकाच्या मनामध्ये शांतता व भव्यता हे भाव निर्माण करतो तर हिरवा रंग संतोषाची वा सफलतेची जाणीव उत्पन्न करतो. तांबडा व पिवळा हे रंग अनुक्रमे प्रीतीचे व आनंदाचे प्रतीक असून भगवा रंग ज्ञानाचा किंवा विरक्तीचा निदर्शक आहे. अशा प्रकारे वेगवेगळ्या रंगांच्या ठिकाणी पाहणाऱ्याच्या मनात वेगवेगळ्या भावच्छटा वा भावना उत्पन्न करण्याची शक्ती असल्यामुळे ते-ते रंग त्या-त्या भावच्छटांचे द्योतक मानण्यात आले आहेत. रंगांच्या या शक्तीलाच रंगांचे रसोत्पादनसामर्थ्य असे म्हणतात. हे लक्षात घेऊन

चित्रकाराने रंगांचा चतुराईने व समर्थपणे उपयोग केला तर चित्रांची आकर्षकता वाढून ती रसिकप्रिय बनतात.

**प्रश्न ५ : रिकाम्या जागी योग्य शब्द भरून खालील वाक्ये पूर्ण करा.**

(अ) रेषांनाच·········असेही म्हणतात.

(आ) रेषांच्या ठिकाणी········व········अशी दोन सामर्थ्ये असतात.

(इ) रेषांमधील गती ही·········गती असते.

(ई) रेषांच्या भावसूचनापेक्षा त्यांचे·········अधिक महत्त्वाचे असते.

(उ) उत्कृष्ट चित्रामध्ये विविध आकारांचा········सांभाळलेला असतो.

(ऊ) समतोल·········व·········असा दोन प्रकारचा असतो.

(ए) प्रत्यक्ष समतोल साधणे कठीण·········.

(ऐ) अप्रत्यक्ष समतोलयुक्त रचनेत अधिक·········असते.

(ओ) अप्रत्यक्ष समतोलाचा उपयोग विशेषेकरून········होतो तर प्रत्यक्ष समतोलाचा उपयोग········होतो.

(औ) चित्रातील आकारांच्या आजूबाजूच्या········जागेस········म्हणतात.

(अं) प्रमाणाची व्याख्या वेगवेगळ्या देशांत व वेगवेगळ्या कालखंडांत·········असते.

(अः) प्रमाणांच्या विविधतेमुळे चित्रशैलींचा········झाला आहे.

(क) ······,······व······हे मूळ रंग होत.

(ख) सजातीय रंगयोजना········साधते.

(ग) .........चित्रात घनता निर्माण होते.

(घ) भगवा रंग.........निदर्शक आहे.

(ङ) चित्रकाराचे.........व त्याच्या.........यांचे अस्सल आलेखन रंगांच्याच द्वारे होत असते.

(च) कोणत्याही उत्कृष्ट चित्राची······,······व······ही तीन मुख्य अंगे असतात.

(छ) चित्राचा सूक्ष्मातला सूक्ष्म घटक म्हणजे······.

(ज) चित्रातील आकृती········मदतीने रेखाटलेल्या असतात.

(झ) रेषांच्या द्वारे·········निर्माण होतो.

(ञ) चित्र तयार होते ते······निश्चित स्वरूपाच्या······संबंधामुळेच.

(ट) चित्राची गुणवत्ता·········अवलंबून असते.

(ठ) ······रंगभरणीमुळे चित्र परिणामकारक बनते.

(ड) चित्रात रंग भरताच······आकारांना······प्राप्त होते.

(ढ) रंगांच्या हलकेपणा–गडदपणाला······किंवा tone-value म्हणतात.

(ण) पोताचा उपयोग·········केल्यास चित्रात अधिक·········उत्पन्न होते.

(त) रेषा, आकार व रंग ही अंगे एकमेकांना ········ असतात.

(थ) सर्वांगसुंदर चित्रात एक प्रकारची········जाणवते.

**उत्तर** : (अ) रेषांनाच **रेखा** असेही म्हणतात.

(आ) रेषांच्या ठिकाणी **गतिसूचकता** व **भावसूचकता** अशी दोन सामर्थ्ये असतात.

(इ) रेषांमधील गती ही **दृष्टीची** गती असते.

(ई) रेषांच्या भावसूचनापेक्षा त्यांचे **गतिसूचन** अधिक महत्त्वाचे असते.

(उ) उत्कृष्ट चित्रामध्ये विविध आकारांचा **समतोल** सांभाळलेला असतो.

(ऊ) समतोल **प्रत्यक्ष** व **अप्रत्यक्ष** असा दोन प्रकारचा असतो.

(ए) प्रत्यक्ष समतोल साधणे कठीण **नाही**.

(ऐ) अप्रत्यक्ष समतोलयुक्त रचनेत अधिक **कलासौन्दर्य** असते.

(ओ) अप्रत्यक्ष समतोलाचा उपयोग विशेषेकरून **चित्रात** होतो तर प्रत्यक्ष समतोलाचा उपयोग **नक्षीत** होतो.

(औ) चित्रातील आकारांच्या आजूबाजूच्या **मोकळ्या** जागेस **विस्तार** म्हणतात.

(अं) प्रमाणाची व्याख्या वेगवेगळ्या देशांत व वेगवेगळ्या कालखंडांत **वेगवेगळी** असते.

(अः) प्रमाणांच्या विविधतेमुळे चित्रशैलींचा **विकास** झाला आहे.

(क) **तांबडा, पिवळा** व **निळा** हे मूळ रंग होत.

(ख) सजातीय रंगयोजना **रंगसंगती** साधते.

(ग) **छायाभेदामुळे** चित्रात घनता निर्माण होते.

(घ) भगवा रंग **विरवतीचा, ज्ञानाचा** निदर्शक आहे.

(ङ) चित्रकाराचे **भाव** व त्याच्या **कल्पना** यांचे अस्सल आलेखन रंगांच्याच द्वारे होत असते.

(च) कोणत्याही उत्कृष्ट चित्राची **रेषा, आकार** व **रंग** ही तीन मुख्य अंगे असतात.

(छ) चित्राचा सूक्ष्मातला सूक्ष्म घटक म्हणजे **बिंदू**.

(ज) चित्रातील आकृती **रेषांच्या** मदतीने रेखाटलेल्या असतात.

(झ) रेषांच्या द्वारे **आकार** निर्माण होतो.

(ञ) चित्र तयार होते ते **आकारांच्या** निश्चित स्वरूपाच्या **परस्परसंबंधामुळेच**.

(ट) चित्राची गुणवत्ता **आकारांच्या संयोजनावर** अवलंबून असते.

(ठ) **कुशल** रंगभरणीमुळे चित्र परिणामकारक बनते.

(ड) चित्रात रंग भरताच **सपाट** आकारांना **घनता** प्राप्त होते.

(ढ) रंगांच्या हलकेपणा–गडदपणाला **छायाभेद** किंवा tone-value म्हणतात.

(ण) पोताचा उपयोग **विवेकाने** केल्यास चित्रात अधिक **सौन्दर्य** उत्पन्न होते.

(त) रेषा, आकार व रंग ही अंगे एकमेकांना **पूरक** असतात.

(थ) सर्वांगसुन्दर चित्रात एक प्रकारची **लय** जाणवते.

# प्रकरण १६ : भारतीय कलांचे स्वरूप

**प्रश्न १ : रिकाम्या जागी योग्य शब्द भरून खालील वाक्य पूर्ण करून पुन्हा लिहा :**

(अ) चित्र, शिल्प इत्यादी कलांचा आनंद आपण मुख्यतः डोळ्यांनी घेतो, त्यामुळे या कलांना·········म्हणतात.

(आ) प्राचीन भारतीय कलेत वास्तूचाच भाग म्हणून ·········घडविण्यात येत असे.

(इ) भारतीय हस्तकलेवर शिल्पाचा व·········परिणाम दिसून येतो.

(ई) भारतीय शिल्पचित्रांतून·········तत्त्वविचार मांडला गेला आहे.

(उ) भारतीय चित्रकलेत·········महत्त्व आहे.

(ऊ) भारतीय मूर्तिकलेत संकेत व·········यांना महत्त्व प्राप्त झाले.

(ए) भारतीय वास्तुकलाकार वास्तू हे·········स्वरूप आहे, असे मानीत.

(ऐ) भारतीय हस्तकलेत सौंदर्यपूर्ण आकार व·········यांना प्राधान्य आहे.

**उत्तर**: (अ) चित्र, शिल्प इत्यादी कलांचा आनंद आपण मुख्यतः डोळ्यांनी घेतो, त्यामुळे या कलांना **दृक्कला** म्हणतात.

(आ) प्राचीन भारतीय कलेत वास्तूचाच भाग म्हणून **शिल्प** घडविण्यात येत असे.

(इ) भारतीय हस्तकलेवर शिल्पाचा व **चित्राचा** परिणाम दिसून येतो.

(ई) भारतीय शिल्पचित्रांतून **आध्यात्मिक** तत्त्वविचार मांडला गेला आहे.

(उ) भारतीय चित्रकलेत **रेषांना** महत्त्व आहे.

(ऊ) भारतीय मूर्तिकलेत संकेत व **प्रतीक** यांना महत्त्व प्राप्त झाले.

(ए) भारतीय वास्तुकलाकार वास्तू हे **ईश्वराचे** स्वरूप आहे, असे मानीत.

(ऐ) भारतीय हस्तकलेत सौंदर्यपूर्ण आकार व **नक्षीकाम** यांना प्राधान्य आहे.

**प्रश्न २ : पुढील कलांची प्रत्येकी दोन वैशिष्ट्ये लिहा.**

(१) भारतीय चित्रकला, (२) भारतीय मूर्तिकला व (३) भारतीय वास्तुकला.

**उत्तर : (१) भारतीय चित्रकला :** (अ) रेषाकृतीला सर्वाधिक महत्त्व, (ब) रंगांची भावनोद्दीपक योजना.

**(२) भारतीय मूर्तिकला :** (अ) मूर्तीच्या सर्व अवयवांची घडण लयबद्ध व आलंकारिक, (ब) संकेत व प्रतीके यांना महत्त्व.

**(३) भारतीय वास्तुकला :** (अ) भारतीय मंदिरवास्तू पूजायंत्राधारित व ईश्वरस्वरूप मानीत. (ब) वास्तू शिल्पाप्रमाणे व शिल्पांनी नटलेल्या.

**प्रश्न ३ : 'भारतीय हस्तकला' या विषयावर संक्षिप्त टीप लिहा.**

**उत्तर :** भारतीय हस्तकलेत कलाकुसरीवर भर देण्यात येतो. वेतकाम, मातकाम, विणकाम, भरतकाम, सोनारकाम इत्यादी कलांत सुंदर आकार व नक्षी यांना महत्त्व आहे. भारतीय हस्तकलेत उपयुक्तता व सुंदरता यांचा समन्वय साधला जातो.

## प्रकरण १७ : भारतीय कलेचे सुवर्णयुग

**प्रश्न १ : रिकाम्या जागी योग्य शब्द भरून खालील वाक्ये पूर्ण करून पुन्हा लिहा :**

(अ) मौर्यकालाप्रमाणेच········हे गुप्त-साम्राज्याचे केन्द्र होते.

(आ) गुप्त-काळात मथुरा व··········ही दोन शहरे बौद्ध धर्माची केन्द्रे बनली.

(इ) गुप्त राजे········धर्माचे अनुयायी होते.

(ई) गुप्त काळात भारतीय ध्येये व········ यांचा आविष्कार मोठ्या प्रमाणावर झाला.

(उ) गुप्त काळाला भारतीय कलेतिहासातील·········असे संबोधितात.

(ऊ) गुप्त काळातील विविध कलांत आविष्कारदृष्टया········जाणवते.

**उत्तर** : (अ) मौर्यकालाप्रमाणेच **मगध** हे गुप्त-साम्राज्याचे केन्द्र होते.

(आ) गुप्त-काळात मथुरा व **पाटलिपुत्र** ही दोन शहरे **बौद्ध** धर्माची केन्द्रे बनली.

(इ) गुप्त राजे **हिंदू** धर्माचे अनुयायी होते.

(ई) गुप्त काळात भारतीय ध्येये व **परंपरा** यांचा आविष्कार मोठया प्रमाणावर झाला.

(उ) गुप्त काळाला भारतीय कलेतिहासातील **सुवर्णयुग** असे संबोधितात.

(ऊ) गुप्त काळातील विविध कलांत आविष्कारदृष्टया **एकात्मता** जाणवते.

# प्रकरण १८ : सुवर्णयुगातील वास्तुकलेची वाटचाल

**प्रश्न १ : गुप्तकालातील वास्तुकलेच्या कोणत्याही पाच प्रातिनिधिक नमुन्यांचा निर्देश करा :**

**उत्तर :** गुप्तकालातील वास्तुकलेचे पाच प्रातिनिधिक नमुने असे :

(१) अजंठ्याची गुहामंदिरे, (२) सांची येथील सतरा क्रमांकाचे मंदिर, (३) अहिहोळीचे दुर्गामंदिर, (४) देवगड येथील विष्णुमंदिर, (५) भीतरगावचे मंदिर.

**प्रश्न २ : अजंठा, अहिहोळी, देवगड व भीतरगाव येथील मंदिरांची दोनदोन ठळक वैशिष्ट्ये लिहा.**

(अ) **अजंठा :** (१) वरच्या बेळकेवजा स्तंभशीर्षाखाली एक कमळाकार गोल भाग. (२) वरच्या बाजूच्या कमानदार छतामध्ये स्तंभशीर्षाच्या वरील बाजूस कंगणी व त्यावर उभे कोनाडे.

(आ) **अहिहोळी :** (१) दुर्गामंदिर – अर्धवर्तुळाकार गाभाऱ्यावर एक लहानसे शिखर. (२) **लाड खान मंदिर** – देवालय आयताकृती, त्यास दगडी शिलांचे सपाट छत व दोन्ही बाजूंच्या भिंतींत दगडी जाळ्या.

(इ) **देवगड :** (१) पेटीसारख्या खोल कोनाड्यातील, रंगमंचावरील दृश्यांचा आभास निर्माण करणारी, उंच उठावाची शिल्पे. (२) सुंदर अलंकरणयुक्त प्रवेशद्वार.

(ई) **भीतरगाव** : (१) वर निमुळत्या होत जाणाऱ्या शिखरावर चैत्य-गवाक्षांचे अलंकरण. (२) सफाईदार, मृदू व तपशीलवार मातीची उत्थित शिल्पे.

**प्रश्न ३ : गुप्तकालीन वास्तुकलेची पाच वैशिष्टये नमूद करा.**

**उत्तर** : (१) गुहामंदिरे अधिक अलंकृत व सफाईदार बनविण्यात येऊन स्तूप, स्तंभ, छत व प्रवेशद्वारे उत्थित शिल्पे, बुद्धमूर्ती व चित्रे यांनी सजविण्यात आली.

(२) राजवाडे, सामान्यांची घरे व मंदिरे यांच्या रचनांना प्रारंभ झाला. प्रारंभकालीन शिखरे कमी उंचीची होती. पुढे ती उंच-उंच होत गेली.

(३) वास्तुशास्त्र व शिल्पशास्त्र ही शास्त्रे निर्माण झाली, वास्तुशिल्पांची प्रमाणे व आकार निश्चित झाले व त्यांनुसार रचना होऊ लागल्या.

(४) विविध नमुन्यांचे व अलंकरणयुक्त स्तंभ करण्यात आले. स्तंभशीर्षावर प्राण्यांच्या किंवा पक्ष्यांच्या आकृती कोरण्यात येऊ लागल्या.

(५) वास्तू व शिल्प या दोन्ही कला एकजीव झाल्या. वास्तूंच्या सजावटीसाठी शिल्पांचा उपयोग करण्यात येऊ लागला.

**प्रश्न ४ : 'अ' गटातील शब्दासमोर 'ब' गटातील योग्य शब्द लिहून जोड्या जुळवा व पुन्हा लिहा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) निमुळते चैत्यगवाक्ष | (१) विष्णुमंदिर |
| (२) धम्मेख स्तूप | (२) भीतरगाव |
| (३) देवगड | (३) सारनाथ |
| (४) सांची | (४) अहिहोळी |
| (५) दुर्गामंदिर | (५) इराणी स्तंभशीर्ष |

**उत्तर** :

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) निमुळते चैत्यगवाक्ष | (१) भीतरगाव. |
| (२) धम्मेख स्तूप | (२) सारनाथ. |
| (३) देवगड | (३) विष्णुमंदिर. |
| (४) सांची | (४) इराणी स्तंभशीर्ष. |
| (५) दुर्गामंदिर | (५) अहिहोळी. |

**प्रश्न ५ : सारनाथ येथील धम्मेख स्तूपाविषयी माहिती लिहा (४ वाक्ये)**

**उत्तर** :(अ) बुद्धाचा उत्तराधिकारी म्हणून मैत्रेयाची नेमणूक झाली, त्या घटनेच्या स्मरणार्थ हा स्तूप उभारला गेला.

(ब) स्तूपाचा पाया उंच असून त्यावर स्तूपाचा दंडगोलाकार व अलंकरण-पूर्ण भाग उभा आहे.

(क) ह्यावरील नाजुक नक्षी भौमितिक आकार, द्राक्षवेली, कमळे, पाने-फुले इत्यादींची असून तिच्यावरील छायाप्रकाशाचा खेळ मनोरंजक आहे.

(ड) येथील नक्षीकाम अजंठ्याच्या गुहामंदिरातील छतावरील भव्य व सुंदर नक्षीकामासारखे आहे.

# प्रकरण १९ : गुप्तकाळातील अमर शिल्प

**प्रश्न १ : रिकाम्या जागी योग्य शब्द लिहून वाक्ये पूर्ण करून पुन्हा लिहा :**

(अ) गुप्त काळात·········हे शहर बौद्ध धर्मीय कलेचे प्रख्यात केंद्र होते.

(आ) गुप्तकालीन बुद्धमूर्तीचे शरीर·········आच्छादिलेले असते.

(इ) गांधारकलेत·········कल्पनांची उसनवारी दिसते.

(ई) गुप्तकालीन शिल्पाकृती प्रतिष्ठा व·········यांच्या द्योतक आहेत.

(उ) सारनाथच्या कलाकारांनी चुनारच्या खाणीमधील·····उपयोग केला.

(ऊ) सारनाथ येथील सर्वप्रसिद्ध शिल्प म्हणजे······अवस्थेतील बुद्धाची मूर्ती.

(ए) उत्तरकालीन पाल-सेन कलाशैली·········येथील शिल्पशैलीवरच आधारित आहे.

(ऐ) उदयगिरीचे वराहावताराचे शिल्प·········व उल्लेखनीय आहे.

**उत्तर** : (अ) गुप्तकाळात **मथुरा** हे शहर बौद्ध धर्मीय कलेचे प्रख्यात केंद्र होते.

(आ) गुप्तकालीन बुद्धमूर्तीचे शरीर **वस्त्रांनी** आच्छादिलेले असते.

(इ) गांधारकलेत **ग्रीक** कल्पनांची उसनवारी दिसते.

(ई) गुप्तकालीन शिल्पाकृती प्रतिष्ठा व **सामर्थ्य** यांच्या द्योतक आहेत.

(उ) सारनाथच्या कलाकारांनी चुनारच्या खाणीमधील **वालुकाश्माचा** उपयोग केला.

(ऊ) सारनाथ येथील सर्वप्रसिद्ध शिल्प म्हणजे **बसलेल्या** अवस्थेतील बुद्धाची मूर्ती.

(ए) उत्तरकालीन पाल-सेन कलाशैली **सारनाथ** येथील शिल्पशैलीवरच आधारित आहे.

(ऐ) उदयगिरीचे वराहावताराचे शिल्प **प्रचंड** व उल्लेखनीय आहे.

**प्रश्न २ : खालील दोन मूर्तिशिल्पांचे रसग्रहण करा :**

(अ) मथुरेचा उभा बुद्ध, (ब) सारनाथचा बसलेला बुद्ध.

**उत्तर :(अ) मथुरेचा उभा बुद्ध :** हे गुप्तकालीन मूर्तिशिल्प असून त्याची संकल्पना पूर्णपणे भारतीय आहे. बुद्धाची ही उभी मूर्ती तांबडया वालुकाश्माची बनविलेली असून तिची एकूण उंची ३.१७ मी. आहे. ही मूर्ती किंचित अधिक उंच असल्यामुळे बुद्धाची प्रतिष्ठा व शक्ती यांची द्योतक वाटते. ही मूर्ती निश्चित केल्या गेलेल्या प्रमाणांस अनुसरून बनविलेली आहे. इसवी सनाच्या पाचव्या शत–कातील या मूर्तीतील बुद्धाची शरीरयष्टी सडसडीत असून मुद्रा योग्याची आहे. मूर्तीच्या शिरामागे प्रभामंडळ दाखविलेले असून त्यावर पानाफुलांची विपुल, नाजूक व सुंदर नक्षी कोरलेली आहे. शरीराच्या मानाने डोके लहान आहे. संपूर्ण शरीर वस्त्राने आच्छादिलेले असून ते वस्त्र अत्यंत तलम व पारदर्शक आहे. वस्त्राच्या चुण्या परिश्रमपूर्वक कोरलेल्या आहेत. चेहऱ्यावर उदात्त व सौम्य भाव प्रतीत होतो. डोळ्यांच्या खोबणीच्या वर भुवयांच्या काटेकोर रेषा, कमळासारखे डोळे, जाड ओठ, गोगलगाईच्या घरासारखा केसांचा झुपका व डोक्यावर उष्णिशा नावाची केसांची गाठ हा सर्व तपशील बारकाईने कोरण्यात आला आहे. डोक्यामागील प्रभामंडळावरील नक्षीकाम केवळ अपूर्व आहे. त्या प्रभामंडळामुळे मूर्तीच्या उभ्या रेषा खंडित होऊन समतोल व मनोहर संयोजन झाले आहे. ह्या मूर्तीकडे पाहिल्यावर मनात सात्त्विक भाव उत्पन्न होतात.

**(ब) सारनाथचा बसलेला बुद्ध :** हे सारनाथ येथील प्रसिद्ध व सर्वोत्कृष्ट शिल्प समजण्यात येते. बुद्धाची ही मूर्ती बसलेल्या अवस्थेतील असून बुद्ध ज्ञान–प्राप्तीनंतरचे पहिलेच प्रवचन देत आहे असे शिल्प कोरण्यात आले आहे. ते चुनारच्या वालुकाश्माचे घडविलेले असून सध्या सारनाथच्या संग्रहालयात आहे. बुद्धाने योगासन घातले असून हातांची धर्मचक्रमुद्रा दाखविली आहे. खालच्या बैठकीवर बुद्धानुयायांच्या आकृत्या कोरलेल्या आहेत. ते गुडघे टेकून धर्मचक्रप्रवर्तन करीत आहेत. बुद्धमूर्तीच्या दोन्ही बाजूंस वाघासारखे प्राणी व मकर यांच्या आकृती आहेत. बुद्धाची आकृती अनुयायांच्या आकृतींच्या मानाने खूप मोठी आहे. एकूण शिल्प-संयोजन त्रिकोणाधारित आहे—बुद्धशिर हा त्रिकोणाचा शिरोबिंदू असून मांडी हा पाया आहे. ही बौद्ध धर्मपंथाची उपासनीय मूर्ती आहे. मूर्तीच्या भुवया धनुष्याकार असून डोळे कमळासारखे आहेत, चेहरा अंडयाच्या आकाराचा असून सामर्थ्य व

सौन्दर्य यांनी मूर्ती युक्त आहे. चेहऱ्यामागील प्रभावळीवरील कोरीव काम उत्कृष्ट आहे. बुद्धाच्या मागील बाजूस आकाशगामी अप्सरांची शिल्पे असून त्या बुद्धावर पुष्पवृष्टी करीत असल्याचे दाखविले आहे. एकंदरीने हे मूर्तिशिल्प अजोड आहे.

**प्रश्न ३ : मथुराशैली व सारनाथशैली यांतील ठळक साम्यभेद लिहा.**

**उत्तर** : ( १ ) मथुराशैली व सारनाथशैली या दोन्ही भारतीय कलाशैली आहेत हे खरे. परंतु, मथुराशैली ही गांधारशैलीला थोडी अधिक जवळची आहे.

( २ ) मथुराशैलीतील शिल्पाच्या वस्त्रांना दोरीसारख्या चुण्या दाखविलेल्या असतात, सारनाथशैलीत त्यांचा अभाव असतो.

( ३ ) मथुराशैलीतील मूर्ती सरळ व काहीशी ताठर वाटते, तर सारनाथशैलीतील मूर्तीचे शरीर कमरेत थोडेसे वाकलेले दाखविलेले असते.त्यामुळे सारनाथशैलीतील मूर्तीत अधिक गतिमत्ता जाणवते.

(४) मथुराशैलीमध्ये बुद्ध व अनुयायी यांच्या आकृती सारख्याच आकारमानाच्या दाखविलेल्या असतात, तर सारनाथशैलीतील बुद्धमूर्ती अनुयायांच्या मूर्तींहून खूपच प्रचंड दाखविलेली असते.

( ५ ) दोन्ही शैलींतील मूर्तींची प्रमाणे शास्त्रात सांगितल्याप्रमाणे असतात.

( ६ ) मथुराशैलीवर ग्रीक शैलीची किंचित छाप असते, सारनाथशैली निर्भेळ भारतीय आहे.

**प्रश्न ४ : गुप्तकालीन शिल्पकलेची पाच प्रमुख वैशिष्ट्ये एकेका शब्दात नमूद करा :**

**उत्तर** : (१) गांधार-कुशाण-शैलींचे परिणत रूप, (२) सुबक, भव्योदात्त, भावदर्शी व प्रसन्न, (३)मूर्तिविधान मूर्तिविज्ञानानुसार, (४) मूर्ती उंच, वस्त्रांकित व कलापूर्ण, (५) वालुकाश्म हे प्रमुख माध्यम.

# प्रकरण २० : भारतीय चित्रकलेचा दिव्य आविष्कार

**प्रश्न १ : खालील प्रश्नांची प्रत्येकी एक शब्दात उत्तरे लिहा :**

(अ) भारतीय चित्रकलेसंबंधी सौन्दर्यशास्त्रीय चर्चा करणाऱ्या ग्रंथाचे नाव काय ?

(आ) कोणत्या ग्रंथात चित्रकलेच्या सहा अंगांचे विवरण आहे ?

(इ) चित्रकलेच्या या सहा अंगांपैकी तिसरे अंग कोणते ?

(ई) कोणत्या कलेचे ज्ञान चित्रातील भावदर्शनास आवश्यक मानण्यात आले आहे ?

(उ) गुप्तकाळात चित्रकला धर्मप्रसाराखेरीज आणखी कोणत्या प्रयोजनाची परिपूर्ती करीत असे ?

(ऊ) अजंठ्याचा चित्रकार शारीरिक सौन्दर्य हे दुसऱ्या कोणत्या सौन्दर्याचे निदर्शक मानीत असे ?

(ए) अजंठ्याच्या भित्तिचित्रांच्या निर्मितीच्या तंत्राने आणखी कुठली भित्ति-चित्रे रगविलेली होती ?

(ऐ) ओल्या पृष्ठभागावर काढलेल्या चित्राला कोणत्या पद्धतीचे चित्र म्हणतात ?

(ओ) अजंठा येथील क्र. १ च्या गुहेतील चित्रण कोणत्या पद्धतीचे आहे ?

(औ) बाघ गुंफांतील भित्तिचित्रे बौद्ध चित्रशैलीच्या काणत्या अवस्थेची साक्ष देतात ?

**उत्तर :** (अ) विष्णुधर्मोत्तरपुराण. (आ) कामसूत्रांवरील यशोधराची टीका. (इ) भावयोजनम्. (ई) नृत्यकला. (उ) सुसंस्कृतपणाचे संवर्धन. (ऊ) आध्यात्मिक (ए) अफगाणिस्तानातील बमियान येथील. (ऐ) फ्रेस्को. (ओ). चारण. (औ) अखेरीच्या.

**प्रश्न २ : गुप्तकालीन चित्रकलेची पाच मुख्य वैशिष्ट्ये लिहा.**

**उत्तर :** (१) ही चित्रकला परंपरानिष्ठ असून विष्णुधर्मोत्तरासारख्या ग्रंथात प्रतिपादिलेल्या चित्रशास्त्रीय नियमांस पूर्णपणे धरून आहे.

(२) पृष्ठभाग तयार करणे, रेखांकन, पहिले रंगकाम, नंतरचे रंगलेपन, त्यावरील चकाकी इत्यादी भित्तिचित्ररंग–तंत्र विकसित झाले होते.

(३) चित्रांची शैली प्रामुख्याने आलंकारिक असून या शैलीतील चित्रांत ऐहिक व आध्यात्मिक मानवी जीवनाचा सुंदर समन्वय साधला आहे.

(४) लयबद्ध रेषा, मनोरम, रंगसंगती, आकृतींच्या दर्जानुसार लहानमोठे आकार, मुख्य आकृतीला प्राधान्य, शरीरावरील छायाप्रकाशाचे वैशिष्टयपूर्ण दर्शन, गतिमत्ता व चैतन्य ही या चित्रांची वैशिष्टये.

(५) सजावटीतील नक्षीकाम प्रेक्षणीय असून विशेषेकरून मुकुट व इतर अलंकार यांचे चित्रण संपन्न व कलापूर्ण आहे.

**प्रश्न ३ : 'पद्मपाणि बोधिसत्त्व' व 'बुद्धाच्या स्वागतासाठी निघालला देवेंद्र' या चित्रांचे थोडक्यात रसग्रहण करा.**

**उत्तर : पद्मपाणि बोधिसत्त्व** : अजंठा येथील क्रमांक १ च्या गुहेत हे सुप्रसिद्ध चित्र आहे. यातील बोधिसत्त्वाच्या उजव्या हातात एक निळे कमळ आहे. बोधिसत्त्वाची आकृती मध्यभागी असून भव्य आहे. पार्श्वभूमीत भरगच्च निसर्गदृश्ये आहेत; शिवाय त्याची शक्ती, अनुयायी, पार्षद, गंधर्वकिन्नर, माकडे इत्यादींच्या आकृती आहेत. प्रेक्षकाची दृष्टी सबंध चित्रावरून फिरून येऊन बोधिसत्त्वावर स्थिरावते. बोधिसत्त्वाचा आकार खूप मोठा असल्यामुळे समस्त चित्राला उभा अक्ष लाभला आहे. बोधिसत्त्वाचे शिर झुकलेले असून हाताचा आविर्भाव अपूर्व आहे. अंडाकृती चेहरा, धनुष्याकृती भुवया, हत्तीसारखे पुष्ट खांदे, सिंहासारखे शरीर व फुललेल्या कमळासारखा डौलदार उजवा हात ही देवाची सर्व सौंदर्यलक्षणे बोधिसत्त्वाच्या आकृतीत दाखविलेली आहेत. शरीराच्या उघड्या भागावर छायाप्रकाश दाखवून गोलाईचा भास निर्माण केला आहे. या चित्रात शारीरिक व आध्यात्मिक सौंदर्य यांचा समन्वय साधला आहे. ह्या बोधिसत्त्वाच्या ठायी कारुण्य, दया इत्यादी भाव जणू साकार झाल्यासारखे भासते. एकंदर आकृतीत सजीवता व ऐट प्रत्ययास येते. या बोधिसत्त्वाचे सौंदर्य स्वर्गीय आहे.

**बुद्धाच्या स्वागतासाठी निघालेला देवेंद्र** : हे चित्र अजंठा येथील गुहा क्र : १७ मध्ये आहे. बुद्ध स्वर्गाला भेट देण्यासाठी आला असून त्याच्या स्वागतासाठी देवेन्द्र लवाजमा घेऊन निघाला आहे, असे दृश्य या चित्रात रेखाटले आहे. वाकलेले पाय, गळ्यातील दागिन्यांना गतीमुळे मिळालेला झोक, आकृतींच्या मागे दिसणारे गोल, झुपकेदार पांढरे ढग इत्यादींमुळे आकाशगमनाच्या वेगाचा भास होतो. देवेन्द्राची प्रतिमा उजळ वर्ण, रत्नखचित मुकुट व अलंकार यांमुळे इतरांहून वेगळी दिसते. हे अजंठा येथील एक उत्कृष्ट चित्र आहे.

**प्रश्न ४ : गुप्तकालात इतर कोणत्या कला विकसित झाल्या होत्या ? प्रत्येकीचे एकेक उदाहरण लिहा.**

**उत्तर** : गुप्तकालात (१) हस्तिदंती कोरीव काम, (२) दागिन्यांची निर्मिती,

(३) विणकामाची कला, (४) धातुकाम व (५) नाणकनिर्मिती, या कला विकास पावल्या होत्या. त्यांची उदाहरणे अशी :

(१) **हस्तिदंती कोरीवकाम** : मध्यभागी बुद्ध व दोन्ही बाजूंस बोधिसत्त्व असलेली मूर्ती.

(२) **दागिने** : आकाशसंचारी अप्सरेच्या चित्रातील आकृतीच्या गळ्यात, कानांत व डोक्यात दाखविलेले हिऱ्यामाणकांचे अलंकार.

(३) **विणकाम** : भरतकाम, किनखाप, मलमल इत्यादी विणकाम प्रदर्शित करणारी अजंठा येथील भित्तिचित्रे.

(४) **धातुकाम** : लोखंड, ब्राँझ, तांबे इत्यादी धातूंच्या नक्षीदार वस्तू.

(५) **नाणकनिर्मिती** : तंतुवादक समुद्रगुप्त, शिकारी चंद्रगुप्त इत्यादींची उत्थित शिल्पे असलेली सोन्याची नाणी.

## प्रश्न ५ : भारतीय चित्रकलेची सहा अंगे कोणती? विवरण करा.

**उत्तर** : ऋग्वेदादी प्राचीन ग्रंथांतील चित्रकलाविषयक उल्लेखांवरून विद्वानांनी असे अनुमान काढले आहे की, प्राचीन भारतात चित्रकला विकसित झाली असावी. परंतु या अनुमानास सबळ पुरावा नाही. या संदर्भात असे मानण्यात येते की, त्या प्राचीन काळात चित्रशास्त्राच्या नियमांची रचना झाली. हे नियम षडंग म्हणून ओळखले जातात. भारतीय चित्रकलेचे हे पायाभूत सहा नियम खालील कारिकेमध्ये गुंफलेले आहेत.

रूपभेदा: प्रमाणानि भाव-लावण्य-योजनम्।
सादृश्यं वर्णिकाभङ्गं इति चित्रं षडङ्गकम्॥

यांचे स्पष्टीकरण असे :

(१) **रूपभेद** : चित्रात अनेक मनुष्याकृती रेखाटल्या गेलेल्या असतात. त्यांपैकी प्रत्येकीचे रूप भिन्न रेखाटणे म्हणजे 'रूपभेद.' प्रत्येक वस्तूचे यथातथ्य रेखाटन त्या वस्तूचे स्वरूप व वैशिष्टय यांच्या ज्ञानानेच संभवते. प्राचीन शास्त्रांमध्ये राजा, मनुष्य, योगी, योद्धा इत्यादींची जी लक्षणे सांगितलेली आहेत त्यांचे पालन कलावंताकडून अपेक्षित असे.

(२) **प्रमाण** : मानवी शरीराचे आकारमान म्हणजे प्रमाण. भारतीय शिल्पशास्त्रात पुरुष, स्त्री, बालक, देवता इत्यादींची वेगवेगळी प्रमाणे वर्णिलेली आहेत. या ज्ञानाचा उपयोग व प्रयोग कलाकाराने करावा, अशी शास्त्राची अपेक्षा असे.

(३) **भावयोजना** : भारतीय चित्रकलेचे सर्वप्रमुख वैशिष्टय. चित्रकाराने चित्रगत पात्राच्या किंवा चित्रगत पात्राविषयीच्या स्वत:च्या भावना पूर्णपणे समजून

घेऊन व त्यांच्याशी समरस होऊन त्यांचे आलेखन चित्रामध्ये करावे. अशा चित्रामध्ये भावाला महत्त्व असते, चित्राच्या बाह्य आकाराला नसते.

(४) **लावण्ययोजना** : चित्र ही कलाकृती असल्यामुळे तिच्यात सौंदर्य असणे अत्यावश्यक असते. ते लावण्य म्हणजे बाह्य सौंदर्य. अर्थात चित्राचा बाह्य आकार सुंदर असला पाहिजे.

(५) **सादृश्य** : सादृश्य म्हणजे साम्य किंवा यथातथ्यता. चित्र प्रत्यक्षातल्या एखाद्या वस्तूचे असो किंवा कल्पनेतल्या वस्तूचे असो, ते त्या वस्तूच्या स्वरूपाबरहुकूम व आकाराप्रमाणे तंतोतंत असणे आवश्यक असते. तरच चित्र पाहून प्रेक्षकाला त्या वस्तूचा भास होऊ शकेल. तात्पर्य, हुबेहूब वस्तुरेखाटन म्हणजे सादृश्य.

(६) **वर्णिकाभंग** : चित्रकाराने कुंचल्याचा सफाईदार वापर करून समुचित रंगभरणी साधली पाहिजे. रंगयोजना अगदी भडक किंवा हलकी होऊ देता कामा नये. विविध रंगांमध्ये परस्परमेळ साधलेला असला पाहिजे. रंगयोजनेमुळे चित्राला उठाव मिळाला पाहिजे.

प्राचीन भारतीय चित्रकार वरील सहा नियमांचे कटाक्षाने पालन करून चित्रकृती सिद्ध करीत असे. ह्यासंबंधीचा उत्तम पुरावा मध्यप्रदेशातील सरगुंजा जिल्ह्यातील जोगीमारा गुहांतील चित्रकलेच्या स्वरूपात उपलब्ध आहे.

## प्रश्न ६ : अजंठ्याची चित्रकला या विषयावर एक निबंध लिहा.

**उत्तर** : अजंठा येथे प्राचीन उत्कृष्ट गुहाचित्रे उपलब्ध झाली आहेत. ती भावपूर्ण व निर्दोष आहेत. जरी ती बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी रेखाटलेली असली तरी त्यांनी भारतीय कलेचा विकास साधला. इ. स. १८२४ साली एका इंग्रज सैनिकाच्या दृष्टोत्पत्तीस ह्या गुहा अगदी योगायोगाने आल्या. या गुहांचे खोदकाम कैक वर्षे चालू होते. इसवी सनपूर्व पहिल्या शतकापासून इसवी सनाच्या सातव्या शतकापर्यंत ही ३० गुहांची कलानिर्मिती चालू होती.

अजंठ्यास दगडी भिंतींच्या ओल्या पृष्ठभागावर चित्रांकन करण्यात आलेले आहे. चित्रांकनाच्या ह्या पद्धतीस फ्रेस्को पद्धती म्हणतात. शेण, माती, दगडांची पूड, प्राण्यांचे केस व चुना यांच्या मिश्रणाने तत्कालीन कलाकार गुळगुळीत पृष्ठभाग बनवीत असे व अशा भिंतीवर रेखाटन करीत असे. अशा प्रकारच्या भित्तिचित्रांच्या बाबतीत अजंठ्याची लेणी अद्वितीय आहेत.

अजंठ्याचा कलाकार तेथे मिळणाऱ्या दगडाची पूड करून तिच्यापासून पोपटी रंग बनवीत असे. पिवळा, मातकट वगैरे रंगही मातीपासून बनविले जात असत.

रेषांची निर्दोषता व भावपूर्णता हे अजंठ्याच्या चित्रकलेचे आद्य वैशिष्ट्य

आहे. त्या कलेत रेखांच्या अंकनाला प्राधान्य असल्यामुळे रंगरहित चित्रेही सध्याच्या अवस्थेतील रंगीत चित्रांइतकीच आकर्षक वाटली असती.

अजंठ्याच्या कलावंताने कलाकृतींच्या द्वारे मानवी देहाचा सूक्ष्म अभ्यास प्रदर्शित केला आहे. त्याच्या कलाकृतीमधील बोटांची लययुक्त रचना विशेष चित्त-वेधक असते. अजंठ्याच्या कलावंताने भिक्षुक, ब्राह्मण, कंचुकी, सेवक, तपस्वी, साधुवेषधारी, धूर्त, परिचारिका इत्यादी विविध व्यक्तींमधील रूपभेद अत्यंत मार्मिकपणे दर्शविण्यात अपूर्व यश मिळविले आहे. तसेच क्रोध, प्रेम, लज्जा, हर्ष, उत्साह इत्यादी भावही (भावयोजना) दाखविले आहेत.

नक्षीच्या चित्रांचे अजठा हे जणू भांडार आहे. देवदेवता, पशू, पक्षी, कमळे तसेच अन्य फळे–फुले यांच्या सालंकृत नक्षींची सुंदर मांडणी व अपार विविधता खरोखरच अद्‌भुत आहे.

अजंठ्याच्या कलावंताने स्वकालीन लोकस्थितीचा अभ्यास केलेला असल्याने त्याच्या कलाकृतींत तत्कालीन समाजजीवनाचे दर्शन घडते.

अजंठ्याची चित्रे बुद्धाच्या कारुण्य-भावनेची जणू मूर्त स्वरूपे आहेत. बुद्धाच्या जीवनातले प्रसंग आणि जातककथा यांच्या द्वारे बुद्धाचा संदेश अजंठ्याच्या कलेत अमर करण्यात आला आहे. शिबिजातक, गजजातक, पद्मपाणि, बोधिसत्त्व व मारविजय, मायास्वप्न व बुद्धजन्म, बुद्धाचा उपदेश, अप्सरा, दिव्यगायक इत्यादी चित्रे विशेष वाखाणण्याजोगी आहेत.

**प्रश्न ७ : बुद्धकालीन गुहाचित्रे भारतात कोठेकोठे आहेत? थोडक्यात माहिती लिहा.**

**उत्तर** : इ. स. ५० ते ७०० या प्रदीर्घ कालखंडात अजंठा, बाघ व बदामी अशा तीन ठिकाणी बौद्ध शैलीची गुहाचित्रे खोदण्यात आली. ती निर्दोष, भावपूर्ण व उत्कृष्ट आहेत. त्यांवरून भारतातील चित्रकलोपासनेची दीर्घकालीन व अतूट परंपरा ध्यानात येते. या चित्रांनी एकीकडे चित्रकलेच्या विकासाचे व दुसरीकडे बौद्ध धर्माच्या प्रचार–प्रसाराचे असे दुहेरी कार्य साधले.

(अ) **अजंठा** : ही गुहाचित्रे इ. स. १८२४ साली उजेडात आली. या चित्रांच्या निर्मितीचे काम सुमारे ७०० वर्षे चालू होते. या एकूण ३० गुहांमध्ये फ्रेस्को पद्धतीने ( दगडी भिंतीच्या ओल्या पृष्ठभागावर रेखांकन करणे ) चित्रे काढण्यात आली आहेत. दगडाच्या पुडीपासून विविध रंग बनविण्यात येत असत. या चित्रांतील रेषा अत्यंत निर्दोष व भावपूर्ण आहेत; मानवी आकृती अभ्यासपूर्ण असून बोटांची लययुक्त रचना खास चित्ताकर्षक आहे. भिक्षुक, ब्राह्मण, दासी

इत्यादी विविध व्यक्तींमधील भेद या चित्रांमध्ये मार्मिकपणे दर्शविण्यात आले आहेत. तसेच क्रोध, प्रेम, लज्जा इत्यादी भावही प्रभावीपणे चित्रित झाले आहेत.

येथील नक्षीकामही समृद्ध आहे. देवदेवता, पशू, पक्षी, कमळे इत्यादींच्या नक्षीची मांडणी सुंदर व विविधतापूर्ण आहे. या चित्रांत तत्कालीन लोकजीवनाचे प्रतिबिंब पडलेले असून बुद्धप्रतिपादित कारुण्याची भावना विशेष उत्कटपणे अभिव्यक्त झाली आहे. या चित्रांच्या द्वारे बुद्धसंदेश अमर झाला आहे. ही गुहामंदिरे म्हणजे प्राचीन भारतातील भित्तिचित्रकलेचे व जीवनाचे महत्त्वपूर्ण उदाहरण होय.

(ब) **बाघ** : ह्या गुहा अजंठ्याच्या गुहांच्या काळातील असून विंध्याच्या पर्वतश्रेणीत ग्वाल्हेरपाशी आहेत. येथील एकूण ९ गुहांमध्ये ६७५ मीटर लांब भिंतींवर चित्रे मुळात होती, पण आता फारच थोडी शिल्लक आहेत. या चित्रांची शैली अजंठा-शैलीशी जुळणारी असली तरी कलाकाराने धर्मभावनेला प्राधान्य दिलेले नाही. या चित्रांत बुद्धोत्तर सामाजिक जीवन प्रामुख्याने चित्रित झाले आहे. या गुहांतील २७ चौ. मीटर क्षेत्राचा एक सभामंडप विशेष प्रेक्षणीय आहे. त्यातील छत, छप्पर, खांब इत्यादी सर्व भागांवर चित्रांची भरगच्च सजावट आहे. हत्तींची मिरवणूक हे त्यांतील एक प्रसिद्ध चित्र आहे. हल्लीसक नृत्य हे या चित्रांतील सर्वांत आकर्षक चित्र असून त्यात एका राजपुरुषाभोवती नृत्य करणाऱ्या तरुण स्त्रियांच्या सुंदर व लयबद्ध आकृती रंगविलेल्या आहेत.

(क) **बदामी** : कर्नाटकातील अहिहोळनजीक चालुक्यराजांनी ही मंदिरे बांधली. त्यांचे बांधकाम इ. स. ५७८ च्या सुमारास झाले. त्यात शिल्पाव्यतिरिक्त भित्तिचित्रेही काढण्यात आली आहेत. ती अजंठाकालीन आहेत. हे काम सुमारे पाऊणशे वर्षे चालले होते. या चित्रांतही, बाघच्या चित्रातल्याप्रमाणे, सामाजिक जीवन, धार्मिक उत्सव, सण, राजदरबार इत्यादींचे रेखाटन झाले आहे. एका चित्रात भगवान बुद्ध मध्यभागी असून बाजूला परिचारिका उभ्या आहेत व त्या चवऱ्या ढाळीत आहेत, भगवानांच्या समोर नर्तिकांचे नृत्य चालू आहे; वादक वाद्ये वाजवीत असून एकाच वेळी तीन मृदंगांवर ताल धरला जात आहे; काही लोक खाली बसले असून अनेक लोक झरोक्यातून नृत्य बघत आहेत, असा मोठा प्रसंग रेखाटला आहे. सबंध प्रसंगाची योजनाच अतिशय सुंदर असून या प्रसंगावरून कलावंताच्या कल्पनाशक्तीची व कुंचल्याच्या सामर्थ्याची ओळख पटते. ही गुहाचित्रे म्हणजे अजंठा व सित्तनवासल येथील गुहाचित्रांना जोडणारा दुवा होय.

**प्रश्न ८ : सित्तनवासलची जैन गुहा व वेरूळची भित्तिचित्रे या विषयांवर टीपा लिहा.**

(अ) **सित्तनवासलची जैन गुहा** : सित्तनवासल त्रिचनापल्लीहून खूप दूर

आहे. त्यामुळे ते फार प्रसिद्ध नाही. तेथील गुहेतील चित्रे अजंठ्याच्या चित्रांइतकीच उत्कृष्ट आहेत. गुहेच्या प्रवेशद्वाराच्या खांबांवर दोन नर्तकींचे सुंदर रेखांकन आहे. त्यावरून कलावंताचे रेषांवरील असाधारण प्रभुत्व प्रत्ययास येते.

गुहेच्या आतल्या छतावर कमळांनी भरलेल्या सरोवराचे आलेखन आहे. पूर्णपण उमललेल्या मोहक कमळांनी डवरलेल्या या सरोवरात जलचर, मासे, मगरी, हत्तींचे कळप क्रीडा करीत आहेत. जागोजागी हंस पक्षी आहेत. कमळांचे गुच्छ घेऊन जाणारे पुरुष रेखाटलेले आहेत. भारतीय भित्तिचित्रांच्या इतिहासात या गुहाचित्रांना महत्त्वपूर्ण स्थान आहे.

**प्रश्न ९ : 'भित्तिचित्रकला' या विषयावर परिच्छेद लिहा.**

**उत्तर :** भित्तिचित्रकलेला mural painting असे म्हणतात. ही कला इमारतींच्या भिंती व छते यांच्या सुशोभनासाठी वापरण्यात येते. ही कला इतर सर्व प्रकारच्या सचित्र कलांहून मूलतः वेगळी आहे. कारण हिचा जवळचा संबंध स्थापत्याशी आहे. भिंतीवर काढलेल्या चित्रांचे रंग, नक्षी व त्यांसाठी निवडलेले विषय या सर्वांमुळे भिंतीच्या आकारांचे प्रमाण आमूलाग्र बदलते. या दृष्टीने विचार करता ही कला खऱ्या अर्थाने त्रिमितियुक्त (three dimensional) आहे. म्हणजेच या कलेच्या द्वारे लांबी, रुंदी व जाडी ही तिन्ही परिमाणे दाखविता येतात. या कलेमुळे भिंतीचा विशिष्ट भाग व्यापला जाऊन वेगळाच दिसू लागतो. या कलेला सार्वजनिक जीवनात महत्त्वाचे स्थान आहे. अशी चित्रे काढणाऱ्या कलावंताला एखादा सामाजिक, धार्मिक किंवा देशप्रेमपर विषय मनात ठेवून तो भिंतीची लांबी-रुंदी व विषयाचा व्यापविस्तार यांच्या अनुरोधाने भिंतीवर चित्रित करावा लागतो. तसे करताना त्याला योग्य ते परिमाण (scale) राखावे लागते. या कलेत ओल्या भिंतीवर चित्रांकन करणे (fresco), तैलरंग वापरणे, भाजलेल्या विटांच्या भिंतीवर चित्रे काढणे, भिंतीवर गुळगुळीत पृष्ठभाग (canvas) तयार करून घेऊन त्यावर चित्रे रेखाटणे इत्यादी विविध तंत्रे (techniques) वापरली जातात.

# प्रकरण २१ : युरोपातील प्रबोधनकालीन कला

**प्रश्न १ : खालील वाक्ये सुधारून लिहा.**

(अ) रोमन उमरावांनी हिन्दू मंदिरे जाळून नष्ट केली.
(आ) कॉन्स्टंटाईन राजाने उत्तर व दक्षिण या कलाशैलींचा संगम साधला.
(इ) बायझेन्टाईन कला म्हणजे दक्षिण अमेरिकेची ख्रिस्ती कला.
(ई) ख्रिस्ती कलेचा आद्य नमुना ग्रीकांच्या स्मशानभूमीत पाहावयास मिळतो.
(उ) प्रार्थनामंदिर (चर्च) हा ग्रीक कलेचा सर्वांत महत्त्वाचा आविष्कार.
(ऊ) इजिप्ती कलेत शिल्पाचे अस्तित्व आढळून येत नाही.
(ए) सोळाव्या शतकात पुन: चित्रकलेस महत्त्व लाभले.
(ऐ) बायझेन्टाईन कलेची सर्वांत मोठी देणगी म्हणजे मातीची भांडी.
(ओ) मोझेईक चित्र म्हणजे रंगीत लाकूड व दगडाचे तुकडे सिमेंटमध्ये बसवून तयार केलेले चित्र.
(औ) महंमद पैगंबराचे जीवन हा मोझेईक चित्राचा विषय असतो.
(अं) धष्टपुष्ट शरीराकृती हे बायझेन्टाईन कलेचे वैशिष्ट्य होय.
(अ:) रोमनेस्क कलाकारांनी काल्पनिकतेचे तत्त्व झुगारून दिले.
(क) हस्तलिखित पत्रांच्या पद्धतीस मोगल शैलीत प्रारंभ झाला.
(ख) गॉथिक कलाशैली रानटी होती.
(ग) लघुचित्र बनविण्याची प्रवृत्ती ही कलेतिहासातील गौण घटना आहे.

**उत्तर :**

(अ) रोमन उमरावांनी ख्रिस्ती प्रार्थनामंदिरे जाळून नष्ट केली.
(आ) कॉन्स्टंटाईन राजाने पूर्व व पश्चिम या कलाशैलींचा संगम साधला.
(इ) बायझेन्टाईन कला म्हणजे मध्यपूर्वेकडील ख्रिस्ती कला.
(ई) ख्रिस्ती कलेचा आद्य नमुना रोमनांच्या भुयारातील दफनगृहांत (Catacombs) पाहावयास मिळतो.
(उ) प्रार्थनामंदिर (चर्च) हा ख्रिस्ती कलेचा सर्वांत महत्त्वाचा आविष्कार.
(ऊ) बायझेन्टाईन कलेत शिल्पाचे अस्तित्व आढळून येत नाही.
(ए) सोळाव्या शतकात पुन: शिल्पकलेस महत्त्व लाभले.
(ऐ) बायझेन्टाईन कलेची सर्वांत मोठी देणगी म्हणजे मोझेईक चित्रे.

(ओ) मोझेईक चित्र म्हणजे रंगीत दगड व काचेचे तुकडे चुन्याच्या गिलाव्यात बसवून तयार केलेले चित्र.
(औ) येशू ख्रिस्ताचे जीवन हा मोझेईक चित्राचा विषय असतो.
(अं ) कृश शरीराकृती हे वायझेन्टाईन कलेचे वैशिष्टय होय.
(अ:) रोमनेस्क कलाकारांनी वास्तवतेचे तत्त्व झुगारून दिले.
(क ) हस्तलिखित पत्रांच्या पद्धतीस रोमनेस्क शैलीत प्रारंभ झाला.
(ख ) गॉथिक कलाशैली पूर्णतया विकसित होती.
(ग ) लघुचित्र बनविण्याची प्रवृत्ती ही कलेतिहासातील महत्त्वपूर्ण घटना आहे.

**प्रश्न २ : बायझेन्टाईन कलेची वैशिष्टये लिहा.**

**उत्तर :** रोमचा मध्ययुगीन राजा कॉन्स्टंटाईन याने राजधानी रोमहून हलवून बायझेन्टिअम (याच शहराला त्याचे कॉन्स्टॅटिनोपल असे नाव दिले) येथे नेली. हे शहर पूर्वेकडे असल्यामुळे पश्चिम व पूर्व दिशांतील संस्कृतींच्या कलांचा संगम झाला. या संगमामधून जी कला उदयाला आली तिलाच बायझेन्टाईन कला (इ. स. १०० ते १४५३) म्हणतात.

सुरुवातीस लोकांनी लहानलहान प्रार्थनामंदिरे बांधली. नंतर हळूहळू भुयारी दफनगृहे बांधली. त्यांच्या भिंतींवर ख्रिस्ती धर्मातील कथांवर आधारित चित्रे काढलेली असत व काही प्रसंगदृश्ये खोदलेली असत.

बायझेन्टाईन कलाकारांनी भित्तिचित्रे व नक्षीकाम यांच्या मदतीने प्रार्थनामंदिरे सुशोभित केली. त्यांनी शिल्पकला कटाक्षाने वर्ज्य मानली.

बायझेन्टाईन कलावंतांनी लाकडी पेटयांवर आकर्षक नक्षी व चित्रे काढली. ते हस्तीदंत, एनॅमल व सोने ह्यांवर उत्कृष्ट कलाकुसर करीत असत.

वायझेन्टाईन कलेची सर्वांत मोठी देणगी म्हणजे मोझेईक चित्रे. मोझेईक म्हणजे रंगीत दगड व काचेचे तुकडे चुन्याच्या गिलाव्यात बसवून तयार केलेले चित्र. अशा चित्रांच्या द्वारे प्रार्थनामंदिरांच्या भिंती अलंकृत करण्यात येत असत. येशूचे जीवन व बायबलमधील इतर प्रसंग हे या चित्रांचे विषय असत. या चित्रांतील मनुष्याकृती अतिशय कृश असत. या चित्रांत साधेपणा असून उच्च आदर्शाची अभिव्यक्ती साधलेली असे. ह्या चित्रशैलीवर पूर्वेकडील कलाशैलीचा प्रभाव असे. 'हाजिया सोफिया' ही इमारत वायझेन्टाईन वास्तुकलेचा एक उत्कृष्ट नमुना आहे. डेरेदार घुमट, स्तंभ व कमानी, संगमरवरी जाळी व मोझेईक चित्रे, वास्तूत खेळणारा प्रकाश व भव्यपणा हे या वास्तूचे खास विशेष होत. 'सांता पुदेन्झिआना' हे चर्चही मोझेईक चित्रांसाठी प्रसिद्ध आहे.

गरीब बायझेन्टाईन कलाकार साध्या रंगांच्या साहृयाने भित्तिचित्रे काढीत असत. ते रंग व कुंचली यांचा मुक्तपणे व सरळपणे उपयोग करीत असत.

चित्रांनी सजविलेले धार्मिक ग्रंथ व पोथ्या हा या कलेचा आणखी एक विशेष. सुरेख व वळणदार अक्षरांतील मजकूर संदर्भानुरूप चित्रांनी सजविला जाई.

बायझेन्टाईन कलाकाराने प्रतिमा ठेवण्याच्या बैठकी व लाकडी पेट्या ह्यांवरही अतिशय सुबक रंगीबेरंगी चित्रे व नक्षी काढण्यात अपूर्व यश मिळविले. बायझेन्टाईन कलावंताने चित्र व मोझेईक यांची एक स्वतंत्र शैली शोधून काढली. तिचे महत्त्व आधुनिक काळात गेल्या शतकात प्रतीत झाले.

## प्रश्न ३ : खालील विषयांवर टिपणे लिहा.

(अ) रोमनेस्क कला. (ब) गॉथिक कला. (क) भुयारातील दफनगृहे.

**उत्तर** : (अ) **रोमनेस्क कला** : इ. स. १०० ते ११५० या कालखंडात पश्चिम युरोपातील फ्रान्स, इंग्लंड, जर्मनी, इटली इत्यादी देशांमध्ये विखुरलेल्या स्वरूपात अस्तित्वात असलेल्या कलेला 'रोमनेस्क कला' म्हणतात. वास्तुकला, शिल्पकला, ग्रंथवेष्टन, सजावट व वस्त्रभूषा या कलाक्षेत्रांत रोमनेस्क कलेने महत्त्वपूर्ण कार्य केले. सुरुवातीस अनेक प्रार्थनामंदिरे बांधण्यात आली. 'एम्परर्स कोर्ट चॅपेल्', 'दी गेस्ट हाऊस' ही त्यांपैकी प्रमुख होत. शिवाय गॉस्पेल, दर्रोचे पुस्तक, केल्सचे पुस्तक अशा ग्रंथांची उत्कृष्ट सजावट करण्यात आली. 'सेंट त्रोफिम'चा पुतळा हा फ्रेंच रोमनेस्क शिल्पशैलीचा उत्तम नमुना होय. सेंट पीटरचे चर्च व हम्बरचर्च हे इंग्लंडमधील रोमनेस्क वास्तुकलेचे प्रातिनिधिक नमुने होत. जर्मनीतील रोमनेस्क कलाकारांनी जोमदार शिल्पे व थडग्यात पुरावयाच्या प्रतिमा सिद्ध केल्या. बिशप बर्नवॉर्डचा दरवाजा हे जर्मन रोमनेस्क कलेचे असाधारण उदाहरण होय. इटलीने रोमनेस्क वास्तुकलेत मोलाची भर घातली. 'झुकता मनोरा' व कॅथिड्रल ही इटालियन रोमनेस्क वास्तुकलेची उत्कृष्ट उदाहरणे आहेत. रंगीत सुताने ऐतिहासिक व धार्मिक प्रसंगांचे विणकाम करण्याची कला या कालखंडात नव्याने उदयास आली. एकंदरीने मात्र रोमनेस्क कला धर्मावर आधारित होती. शिवाय या कलेत मृदुतेपेक्षा जोमदारपणाच प्राधान्याने आहे.

(ब) **गॉथिक कला** ( सुमारे इ. स. ११५० ते १४०० ): बाराव्या शतकात रोमनेस्क कलेचे रूपान्तर गॉथिक कलेत झाले. तिच्यात ख्रिस्ती कलेचे पूर्ण विकसित स्वरूप पाहावयास मिळते. मध्ययुगीन विचार व कल्पना साकार करणारी ही एक उच्च प्रकारची कलाशैली होती. या शैलीच्या संकेतांस धरून इ. स. ११५०–१४०० या काळात प्रार्थनामंदिरांच्या (कॅथिड्रलसच्या) अनेक इमारती बांधण्यात आल्या. या

/

शैलीतील बांधकामात उभे आकार, उंच मनोरे व टोकदार शिखरे यांचे प्राबल्य असते. उंच मनोरे बांधण्याची प्रथा ख्रिस्ती सरदारांनी आपले वर्चस्व व सत्ता प्रदर्शित करण्यासाठी पाडली (Towers denote power. They were erected to show superiority.) मनोरे जणू सत्ता-प्रतीके होती. या इमारती बहुढंगी, बहुरंगी व अवाढव्य असत. लोकांपाशी भरपूर पैसा असल्यामुळे टाऊन हॉल्स, गिल्ड हॉल्स, बाजार, खाजगी निवासस्थाने यांसारख्या इमारती उभारल्या जाऊ लागल्या. यांच्या भिंतींवरील व स्तंभांवरील कोरीव कलाकुसर प्रेक्षणीय असे. या पद्धतीच्या बांधकामात वक्र रेषांचे आकार, सरळ रेषांचे आकार, स्मारकवजा शिल्पाकृती, वाढता वास्तववाद व निसर्गवाद ही वैशिष्टये प्रतीत होतात. गॉथिक शैलीच्या प्रार्थनामंदिरांना खिडक्या असतात, त्यांवरच काचचित्रांचे नक्षीकाम केलेले असते. काचेचे तुकडे लोखंडी पट्टयांत मढवून बनविलेल्या खिडक्यांना stained glass windows म्हणतात. हे या कलाशैलीचे आकर्षक वैशिष्टय आहे. उत्तर काळात गॉथिक प्रार्थनामंदिरांच्या बाहेरच्या बाजूस मोठमोठी मानवी शिल्पे निर्माण होऊ लागली परंतु, ती स्थापत्याचाच एक भाग असत. अशा शिल्पगत मानवी आकृतींच्या वस्त्रांच्या घड्या वळणदार दाखविलेल्या असतात. गॉथिक कला ख्रिस्ती धर्मावरील अढळ श्रद्धेमधून निर्माण झाली. गॉथिक कलाकारांनी लघुचित्रांची (हस्तलिखित प्रतींची) सजावटही कुशलतेने साधली. ही सिद्धी कलेच्या इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा समजली जाते.

**(क) भुयारातील दफनगृहे :** (catacombs) – Catacomb म्हणजे जमिनीखालील दफनस्थान. यामध्ये चित्रकलेचा एक स्वतंत्र नमुना विकसित करण्यात आला. ही चित्रकला प्रारंभिक ख्रिस्ती कला असून तिचा काळ इ. स. १८० ते ४१० असा मानण्यात येतो. सुरुवातीस ख्रिस्ती धर्माचा कलेला विरोध होता, परंतु कालांतराने तो मावळल्यामुळेच ही एक वेगळी चित्रप्रवृत्ती रूढ झाली. डॉमिटिला (Domitilla) व प्रिसिला (Priscilla) येथील अशा प्रकारची थडगी विशेष प्रसिद्ध आहेत. यांतील चित्रांचे विषय जोनाह, डॅनियल, नोह इत्यादींच्या कथा हे असतात. या ख्रिस्ती चित्रकारांनी रोमन चित्रकारांपासून कलेची उसनवारी केली. या चित्रकारांचे तंत्र शिथिल असून उद्दिष्ट रूपकात्मक व प्रतीकात्मक असे. ह्या थडग्यांना पुढेपुढे शहरांचे रूप प्राप्त झाले. थडग्यात खोल्या व वर-खाली जाण्यासाठी जिने बांधण्यात येऊ लागले. भिंतींवर साधी व रंगीत रेखांकने केली जाऊ लागली. रोम, नेपल्स, सिसिली, माल्टा आणि इजिप्तमध्ये अशी अनेक थडगी आहेत.

**प्रश्न ४ : प्रबोधन युग या विषयावर संक्षिप्त टीप लिहा.**

**उत्तर :** मध्ययुगात अनेक धर्मयुद्धे झाली. त्यामुळे पाश्चात्त्य जगाला नवीन

आचारविचार, संस्कार इत्यादींचा परिचय झाला. भौगोलिक व वैज्ञानिक संशोधनामुळे लोकांची ज्ञानपिपासा वाढली व विचारसरणी बदलली. शिक्षण, ज्ञानविकास, वाङ्मय, कला, संशोधन इत्यादी सर्व क्षेत्रांत नवे विचार व्यक्त होऊ लागले. एकूणच जीवनाचे मूल्यमापन मानवी मूल्यांच्या आधारे होऊ लागले. या वैचारिक क्रांतीला प्रबोधन युग म्हणतात. या युगाचे लोण कलाक्षेत्रातही पसरले. मध्ययुगात कलाकाराच्या कलाभिव्यक्तीवर धर्माची जी जाचक बंधने होती ती प्रबोधन युगात कलाकाराने झुगारून दिली. आता कलाकार मोकळेपणाने आपल्या कल्पनांची अभिव्यक्ती करू लागला. या युगातील कला ही उत्क्रान्ती होती, क्रान्ती नव्हती. तिच्यामुळे विज्ञान व कला एकमेकांच्या अधिक जवळ आली. कलाकार संशोधक व प्रयोगकर्ते बनले. त्यांनी शास्त्रीय प्रगतीची दखल घेतली. मनुष्य हा सर्व कृतींचे केन्द्र बनला व सर्व मानवी गोष्टी कलावंताला प्रिय बनल्या. कलाकार भौतिक वस्तूंच्या अन्तःस्थ मूल्यांवर लक्ष खिळवू लागले व प्रतीकात्मक मूल्यांचा वेध घेऊ लागले. एकंदरीने या युगात मानवतावादाला उधाण आले.

**प्रश्न ५: प्रबोधन युगातील खालील कलावंतांची चरित्रे थोडक्यात लिहा.**

(अ) लिओनार्दो–द–विन्ची, (आ) मिकालान्जेलो, (इ) राफाएल.

(अ) **लिओनार्दो-द-विन्ची** (Leonardo da Vinci-1452-1519) : हा अष्टपैलू प्रतिभावंत होता. तो केवळ चित्रकार नव्हता तर श्रेष्ठ दर्जाचा शिल्पकार, स्थापत्यशास्त्रज्ञ, संगीतज्ञ व गणितशास्त्रज्ञही होता. त्याचा जन्म १४५२ साली विन्ची येथे झाला. त्याने आंद्रियाच्या स्टुडियोत प्रारंभिक शिक्षण घेतले व नंतर तो १४८२ साली मिलानला स्थायिक झाला. 'Last supper'–'येशूचे अंतिम भोजन' हे त्याचे सुप्रसिद्ध चित्र १४९८ साली काढलेले असून ते मुळातच एका मठाच्या भोजनगृहाच्या भिंतीवर टांगण्यात आले होते. परंतु त्या खोलीतील सर्दपणामुळे ते लवकरच खराब झाले व त्यामुळे त्याची अनेकवार डागडुजी करण्यात आली. तरीदेखील ते जगातील सर्वोत्कृष्ट चित्रांपैकी एक समजण्यात येते ('still it is one of the world's masterpieces'.) लिओनार्दोने मिलानच्या ड्यूकच्या दोघा बायकांची चित्रेही रेखाटली. त्याचा आश्रयदाता ड्यूक लोडोव्हिको (Lodovico) १५०० साली मरण पावल्यावर तो फ्लॉरेन्सला आला आणि सीझर बोर्गिया नावाच्या ड्यूककडे स्थापत्यशास्त्रज्ञ व इंजिनियर म्हणून नोकरीस राहिला. तो व मिकालान्जेलो अशा दोघांना मिळून एका इमारतीत ऐतिहासिक चित्रे काढण्याचे काम देण्यात आले होते. लिओनार्दोने इ. स. १५०४ साली आपले प्रसिद्ध 'मोना लिसा' हे चित्र पूर्ण केले. त्याने Ginevra Benci नावाच्या एका रूपमतीचे चित्रही काढले

होते. परंतु ते आता उपलब्ध नाही. त्याने आणखी एका चित्रात ६० भौमितिक आकार गुंफले होते. फ्रान्सच्या बाराव्या लुईने त्याला इ. स. १५०६ साली दरबारी चित्रकार म्हणून नेमले. पहिल्या फ्रान्सिसने त्याला १५१६ साली कायमचे वर्षासन नेमून दिले. तो २-५-१५१९ रोजी Chateau Cloux येथे निधन पावला. त्याने उत्तर आयुष्यात 'दि व्हर्जिन ऑव् दि रॉक्स', 'सेंट जॉन दि बॅप्टिस्ट', 'सेंट अॅन' अशी चित्रे काढली. त्याच्या हातचे एकही शिल्प सध्या उपलब्ध नाही. पण फ्लॉरेन्स-मधील एका दीक्षामंदिराच्या दरवाज्यावरील तीन मूर्ती त्याने काढलेल्या असाव्यात असा कयास आहे. एका घोडेस्वाराचा पंचरस धातूचा पुतळा आणि फ्लोराचा मेणाचा अर्धपुतळा ह्या शिल्पकृती त्याच्याच मानण्यात येतात. त्याच्या कलाशैलीवर प्राचीन प्रणालीचा परिणाम मुळीच झाला नव्हता. त्याने अत्यंत धीमेपणाने आणि शोधक बुद्धीने निसर्गाचा आणि विशेषेकरून छायाप्रकाशाचा अभ्यास केला होता. जरी तो फार मोठा कलाकार होता तरी त्याच्या हातच्या फार थोड्या कलाकृती आपल्यापर्यंत पोचल्या आहेत. त्यामुळे त्याच्या रेखाटनांचे जे मोठे संग्रह मिलान, फ्लॉरेन्स, पॅरिस, व्हिएन्ना इत्यादी ठिकाणी आहेत त्यांच्या आधारानेच त्याच्या कलेचा अभ्यास करावा लागतो. चित्रकलेवरील त्याच्या एका ग्रंथाचे अपूर्ण हस्तलिखित १६५१ साली ग्रंथरूपाने प्रकाशित झाले; पूर्ण हस्तलिखित १८१७ साली प्रसिद्ध झाले. त्याने जीवशास्त्र, शरीररचनाशास्त्र, उदकगतिस्थितिशास्त्र (Hydrodynamics) व आकाशसंचारशास्त्र या शास्त्रांचा व्यासंग केलेला होता. म्हणूनच 'Leonardo is one of the greatest all-round geniuses the world has known', असे त्याचे वर्णन करण्यात आले आहे.

(आ) **मिकालान्जेलो** : (Michelangelo – १४७५ ते १५६४). याचे संपूर्ण नाव Michelangniolo di Lodovico Buonarroti असे होते. हा इटालियन शिल्पकार, चित्रकार आणि कवी ६–३–१४७५ रोजी जन्माला आला. त्याचे वडील महापौर असून ते बालपणीच फ्लॉरेन्सला आले. त्यांनी मुलाला एका गवंड्याच्या देखरेखीखाली ठेवले. मिकालान्जेलोचे लक्ष शाळेतल्या अभ्यासापेक्षा चित्रकलेकडे अधिक असे. तो लोरेन्झोच्या आश्रयाने राहिला. त्याने १४९० च्या सुमारास Centaurs व Madonna नावाची दोन चित्रे काढली. १४९२ साली लोरेन्झो वारला. पुढे १४९३ साली मिकालने कामदेवाचे संगमरवरी शिल्प तयार केले. त्याच्या एका परिचिताने ते शिल्प जमिनीत गाडले आणि मिकालला असा सल्ला दिला की, काही दिवसांनी प्राचीन अवशेष म्हणून ते जमिनीतून बाहेर काढ आणि भरमसाठ किंमतीला वीक. मिकालने तसे केले. कार्डिनल साननेते शिल्प विकत घेऊन १४९६ साली मिकालला रोमला बोलाविले. मिकालने १४९७ साली Picta नावाचे वास्तववादी चित्र रेखाटले. पुढे १५०० सालच्या सुमारास त्याने

डेव्हिड (David) नावाचे शिल्प संगमरवराच्या प्रचंड दगडांमधून खोदून काढले. ते गॉथिक शैलीचे शिल्प असून त्यात रुबाबदारपणा व गंभीरपणा आहे. मिकालची " The Holy Family of the Tribune " व " Madonna " ही दोन प्रसिद्ध शिल्पे त्याच काळात सिद्ध झाली. त्याला रंगांपेक्षा आकारांचे आकर्षण अधिक होते. १५०३ साली ज्यूलियस नावाच्या पोपने आपले थडगे उभारण्यासाठी मिकालला रोमला बोलावले. तेथील सिस्टीन चॅपेलच्या छतावर सुंदर चित्रे काढण्याचा आदेश त्याला देण्यात आला. त्याने तो आदेश पाळून जी अपूर्व कलाकृती सिद्ध केली तिच्यामध्ये अतिमानवी कल्पकता, अद्‌भुत विविधता, शारीरिक सौष्ठव इत्यादी गुणांचा अपूर्व संगम झाला आहे. मिकाल १५१४–१५२२ या काळात निष्क्रिय होता. १५२८ साली त्याच्या आवडत्या फ्लॉरेन्स नगरीस धोका उत्पन्न झाल्यामुळे त्याचे लक्ष दुर्गरचनेकडे वळले व त्याने फ्लॉरेन्सच्या तटबंदीच्या कामात प्रामुख्याने भाग घेऊन एक सामाजिक ऋण फेडले (१५२९). त्यानंतर त्याने दोन अप्रतिम स्मारके उभारली. ती त्याची सर्वोत्तम कला समजली जाते. त्याने १५३७ साली 'The Last Judgement' नावाचे प्रसिद्ध चित्र रंगवावयास सुरुवात केली. तेच त्याच्या हातून झालेले शेवटचे चित्र. १५३८ साली त्याची सेंट पीटर्स चर्चचा स्थापत्यशास्त्रज्ञ म्हणून नेमणूक झाली. ते काम त्याने १५६४ पर्यंत निष्ठेने केले. मिकाल हा तैलबुद्धीचा प्रतिभावंत होता. तो इटालियन प्रबोधन-युगाचा श्रेष्ठ प्रतिनिधी म्हणून ओळखला जातो. त्याच्या चित्रकलेत व शिल्पकलेत सुंदरतेपेक्षा उदात्तता व भव्यता यांवर भर होता. तो कवी, स्थापत्यशास्त्रज्ञ व इंजिनियरही होता. तात्पर्य, त्याच्या काळातील सर्व विद्या त्याला अवगत होत्या. म्हणूनच जागतिक कीर्तीच्या प्रतिभाशाली व्यक्तींमध्ये त्याला बहुमानाचे स्थान प्राप्त झाले आहे.

(इ) **राफाएल :** Raphael properly Raffaello Santior Sanzio—१४८३ ते १५२०. हा इटालियन चित्रकार उर्बिनो येथे जन्मला. त्याचे चित्रकलेतील गुरू Perugino हे होते. त्यांचे तो सहीसही अनुकरण करीत असे. परिणामी सुरुवातीच्या काळातील त्याची चित्रे त्याची की त्याच्या गुरुजींची ते ओळखू येत नाही. Crucifixion, Assumption of the Virgin, Marriage of the Virgin ही त्याची सुरुवातीची चित्रे होत. १५०५–०६ सालच्या सुमारास त्याच्या मनाने घेतले की, आपण मिकालाएन्जेलोचा ठसठशीतपणा व लिओनार्दोचा गोडपणा आपल्या स्वतःच्या चित्रांमध्ये उतरविला पाहिजे. त्यामुळे त्याच्या व्यक्तिचित्रांवर लिओनार्दोचा प्रभाव स्पष्टपणे पडू लागला. त्याने Mona Lisa पाहून प्रेरणा घेतली व Moddalena Doni हे चित्र रेखाटले. त्याच्या Entombment (१५०७) मध्ये सर्व कलातत्त्वे प्रकट झाली आहेत. त्याने फ्लॉरेन्सला बरीच चित्रे

काढली, ती सर्व उत्कृष्ट उतरली. त्यांमध्ये Holy Family, St. Catharine, Bridgewater, Virgin and Sleeping Infant या चित्रांचा प्रामुख्याने समावेश होतो. त्याने १५०९ साली रोमच्या व्हॅटिकन वाडयात पोपच्या आदेशाने चित्रे काढली. त्याने १५११–१५१४ या तीन वर्षांच्या काळात हाताखाली शिष्य तयार करून घेतले आणि त्यांच्या मदतीने अनेक लहानमोठी चित्रे काढली. त्याच्या चित्रांतील व्यक्तींच्या अवयवांचे रेखाटन परिपूर्ण असे आणि व्यक्तींच्या चेहऱ्यावरील भाव कमालीचे बोलके असत. १५१४ साली त्याची सेंट पीटर्सचा स्थापत्यशास्त्रज्ञ म्हणून नेमणूक झाली. त्याने cartoons (व्यंग्यचित्रे)ही मोठ्या प्रमाणात काढली. "The Transfiguration" या चित्राला त्याने म्हातारपणी प्रारंभ केला व ते त्याने मृत्युसमयी पुरे केले. त्याची अनेक चित्रे लंडनमधील व्हिक्टोरिया व आल्बर्ट म्युझियम्समध्ये तसेच राष्ट्रीय वस्तुसंग्रहालयामध्ये (National Gallery) जतन करून ठेवण्यात आली आहेत.

**प्रश्न ६ : 'कलापरंपरांच्या क्रिया–प्रतिक्रियांमधून विविध कलासंप्रदाय अस्तित्वात आले.' या विधानाची चर्चा करा.**

**उत्तर** : कोणताही कलासंप्रदाय एकाएकी निर्माण होत नाही. तो हळूहळू आकार घेत असतो. विशिष्ट प्रवृत्तींचा पुन:पुन्हा पुरस्कार झाल्याने त्या प्रवृत्ती हळूहळू कलावंतांमध्ये मूळ धरू लागतात. रसिकांसमोर त्या वारंवार आल्याने त्यांनाही त्या आवडू लागतात. धीरे-धीरे त्यांना परंपरांची प्रतिष्ठा प्राप्त होते व ह्या परंपरा सुप्रतिष्ठित वा सुस्थिर झाल्या की, त्यांच्या एकत्रित परिणामामधून एक कलासंप्रदाय जन्मास येतो. त्या संप्रदायाची वैशिष्ट्ये चिरकाल कायम राहतात अशातला भाग नाही. तसे झाल्यास कलासंप्रदायांत बदल होणार नाहीत व विविध कलाशैली उदयास येणार नाहीत. कलाशैलींचे आघात-प्रत्याघात निरंतर चालू असतात. व या क्रिया-प्रतिक्रियांमधून कलासंप्रदाय अस्तित्वात येतात, मावळतात, नवे अस्तित्वात येतात व तेही आणखी नव्यांना जागा देण्यासाठी स्वत: अस्तंगत होतात. हा क्रम सतत चालू असतो. खाली नमूद केलेल्या काही शेलक्या उदाहरणांवरून हे स्पष्ट होईल :

(अ) मध्ययुगात बायझेन्टाईन व गॉथिक कला आदर्श मानण्यात येत असे, प्रबोधन-युगात ती रानटी मानण्यात येऊ लागली.

(ब) मध्ययुगात धर्म-संस्थेच्या वर्चस्वामुळे कलेतील नवीन व स्वतंत्र प्रवृत्तीचा कोंडमारा झाला होता. प्रबोधन-युगात धर्मसंस्थेचे बंधन झुगारून देण्यात आल्यामुळे कलेत नवता व ताजेपणा हे गुण उतरले.

(क) गॉथिक कलाकाराने वास्तवतेची उपेक्षा केली होती. प्रबोधन-युगातील कलाकार वास्तवाभिमुख झाला.

(ड) मध्ययुगात कलाकारांनी शिल्पकलेकडे पाठ फिरवली होती तर प्रबोधन युगात शिल्पकलेला पुन: चांगले दिवस आले.

अशा अनेक उदाहरणांनी वरील तात्त्विक विचारांचे समर्थन करता येईल.

**प्रश्न ७ : (अ) 'येशूचे अंतिम भोजन' व (ब) 'मोना लिसा' या चित्रांची रसग्रहणे लिहा.**

**उत्तर : (अ) येशूचे अंतिम भोजन** : ज्याचे "one of the greatest all-round geniuses the world has known", असे वर्णन करण्यात आलेले आहे त्या लिओनार्दो-द-विन्चीने रेखाटलेले हे प्रसिद्ध चित्र आहे. प्रबोधन-युगाचा हा श्रेष्ठ चित्रकार पंधराव्या शतकात (जन्म १४५२, मृत्यू १५१९) होऊन गेला. या अलौकिक चित्रकाराने येशू ख्रिस्ताच्या जीवनातील ह्या अंतिम प्रसंगाचे मोठे प्रभावी दृश्य या चित्रात रेखाटलेले आहे. प्रस्तुत चित्रामध्ये लिओनार्दोने येशू व त्याचे अनेक अनुयायी यांच्या व्यक्तिरेखा रेखाटल्या आहेत. प्रत्येक व्यक्तीच्या चेहऱ्यावर भिन्न भाव रेखाटलेला असल्यामुळे चित्रातील सर्व व्यक्ती कमालीच्या बोलक्या वाटतात. त्या जणू आपापसात संभाषण करीत आहेत असाच भास क्षण-भर होतो. शिवाय, चित्रातील ह्या विविध व्यक्तींच्या रेखाटनात तपशिलाचा बडिवार माजविण्यात आलेला नाही. त्यामुळे चित्राच्या समग्र बांधणीस धक्का लागलेला नाही. ह्या चित्रकृतीच्या बाबतीत सर्वाधिक महत्त्वाचे वैशिष्ट्य हे की, चित्रात येशूचे रेखाटन इतके प्रभावी झाले आहे की, त्यावरून प्रेक्षकाची नजर ढळत नाही. येशू हे या चित्राचे आकर्षण-केन्द्र आहे. या चित्रातील विविध आकारांचे आयोजन अतिशय सुंदरपणे करण्यात आले आहे. ह्या चित्राची मांडणी भार-साम्य-युक्त (Symmetrical) आहे. भावनात्मकता, धार्मिकता, वास्तवता आणि व्यक्तिनिष्ठता अशा अनेक वैशिष्ट्यांचा मनोज्ञ मिलाफ या चित्रात झाला आहे. एकंदरीत या चित्राच्या संकल्पनात व संयोजनात चित्रकार पूर्णतया यशस्वी झाला आहे. म्हणूनच हे चित्र सर्वोच्च दर्जाचे मानले जाते.

**(ब) मोना लिसा** – मोना लिसा हे सुप्रसिद्ध चित्रही लिओनार्दोनेच काढलेले आहे. चित्रकाराने जरी एका जिवंत व्यक्तीचे चित्रांकन या कलाकृतीत केलेले असले तरी ते कलादृष्ट्या काल्पनिक (ideal) आहे. लिओनार्दोने आपला मित्र Francesco-del-Giocondo याच्या पत्नीचे व्यक्तिचित्र रेखाटले. तेच प्रसिद्ध 'मोना लिसा' चित्र (इ. स. १५०४). हे चित्र इतके सुंदर आहे की, चित्रगत स्त्री जणू सजीव आहे, असा भास रसिकाला होतो. मोना लिसाचा पोषाख

साधा आहे. तिच्या मस्तकाची व हातांची ठेवण आणि एकूण कलाकृतीचा त्रिकोणीपणा या वैशिष्टयांमुळे मोना लिसा राजघराण्यातील असावी असे वाटून तिची प्रेक्षकांवर छाप पडते. तिच्या चेहऱ्याकडे पाहिले की, ही व्यक्ती निव्वळ हाडामांसाची नाही तर तिच्या व्यक्तिमत्त्वातील चैतन्यच जणू चेहऱ्यावाटे ओसंडत आहे अशी प्रेक्षकाची खात्री पटते. शिवाय तो चेहरा इतका भावक्षोभक व गूढार्थक आहे की, त्याने आजवर हजारो अंतःकरणांना चाळविले व झुलविले आहे ! ही भुरळ Louvre येथील संग्रहालयातील मूळ चित्रकृती पाहताना तर पडतेच पण तिची प्रतिकृती बघतानाही पडते हे वैशिष्टय आहे ! मोना लिसाच्या आकृतीच्या मागे चितारलेले निसर्गदृश्य तितकेच गूढरम्य आहे. एकूण समग्र चित्राचा संबंध वास्तवसृष्टीपेक्षा कल्पनासृष्टीशीच निकटचा आहे असे वाटते. मोना लिसा हे साधे व सामान्य व्यक्तिचित्र नाही तर त्याच्या कणाकणातून कल्पनेचे किरण अक्षरशः बाहेर फाकत आहेत. म्हणूनच जगातील ही एक अद्वितीय कलाकृती मानण्यात येते.

# प्रकरण २२ : हिंदू मंदिराची रचना

**प्रश्न १ : हिंदू मंदिराचे मुख्य भाग नमूद करा.**

**उत्तर** : गर्भगृह, अंतराल, महामंडप, मंडप, अर्धमंडप व प्रदक्षिणा मार्ग हे हिंदू मंदिराचे मुख्य भाग होत.

**प्रश्न २ : खालील शब्दांच्या व्याख्या एकेका वाक्यात लिहा.**

विमान, अंतराल, अर्धमंडप, अंतेवासिक, चौकट पद्धत.

**उत्तर** : **विमान**–आयताकृती किंवा चौरस गर्भगृह व त्यावरील उंच निमुळते शिखर यांना मिळून विमान म्हणतात.

**अंतराल**-गर्भगृहातून मंडपात जाण्यासाठी जो चिंचोळा मार्ग असतो त्याला अंतराल म्हणतात.

**अर्धमंडप** : सभामंडपापुढे द्वारमंडपासारख्या असलेल्या अरुंद भागाला अर्धमंडप म्हणतात.

**अंतेवासिक**–बांधकाम करणाऱ्या कारागिरांच्या हाताखालील शिकाऊ उमेदवार.

**चौकट पद्धत**–दोन उभ्या खांबांवर आडवी तुळई बसविण्याची पद्धत.

**प्रश्न ३ : मंदिर-बांधणीच्या तीन शैली कोणत्या? त्या कोठेकोठे प्रचारात होत्या?**

**उत्तर :** (१) नागर, (२) द्राविड व (३) वेसर या मंदिर-बांधणीच्या तीन शैली होत. नागरशैली हिमालयापासून विंध्याचलापर्यंतच्या प्रदेशात, द्राविड शैली कृष्णानदीपासून कन्याकुमारीपर्यंतच्या प्रदेशात आणि वेसर शैली विंध्याद्रीपासून कृष्णानदीपर्यंतच्या प्रदेशात प्रचलित होती.

# प्रकरण २३ : उत्तर भारतातील मंदिरे

**प्रश्न १ : कंसात दिलेल्या शब्दांपैकी योग्य शब्द निवडून खालील वाक्ये पूर्ण करा व पुन्हा लिहा.**

(अ) नागर पद्धतीची मंदिरे·········भारतात आहेत (पूर्व, उत्तर, दक्षिण).

(आ) नागर शैलीच्या मंदिराचे गर्भगृह आतून ········· आकाराचे असते (गोल, चौरस, लंबचौकोनी).

(इ) फुगीर, किंचित बहिर्वक्र········· व कंगोऱ्यांनी युक्त आमलक ही उत्तरेकडील देवालयांची वैशिष्टचे होत (गर्भगृह, शिखरे, मंडप).

(ई) पट्टदकल या गावी असलेले·········मंदिर विशेष प्रसिद्ध आहे (रामाचे, विरूपाक्षाचे, शिवाचे).

(उ) ओरिसात सातव्या शतकापासून तेराव्या शतकापर्यंत·······बांधणीचे काम मोठ्या प्रमाणावर चालू होते (स्तूपांच्या, मंदिरांच्या, इमारतींच्या).

(ऊ) ओरिसा शैलीच्या मंदिरांचे प्रमुख केंद्र········· येथे होते (कटक, महाबलिपुरम्, भुवनेश्वर).

(ए) ओरिसा शैलीच्या पूर्ण विकसित स्वरूपाचे दर्शन ········· मंदिरात घडते (परशुरामेश्वर, लिंगराज, मुक्तेश्वर).

(ऐ) लिंगराज मंदिराचे मुख्य शिखर·········मीटर उंचीचे आहे (५५, ४५, ८०).

(ओ) खजुराहोच्या मंदिरांचे सौन्दर्य त्यांच्या प्रमाणबद्धतेत व ········· साठविलेले आहे (गर्भगृहात, सभामंडपात, आकारात).

(औ) गुजरातेतील मंदिरे तत्कालीन.........दिलेल्या देणग्यांतून उभारली गेली (राजांनी, समाजाने, सरदारांनी).

**उत्तर** : (अ) नागर पद्धतीची मंदिरे **उत्तर** भारतात आहेत.

(आ) नागर शैलीच्या मंदिराचे गर्भगृह आतून **चौरस** आकाराचे असते.

(इ) फुगीर, किंचित बहिर्वक्र **शिखरे** व कंगोऱ्यांनी युक्त आमलक ही उत्तरेकडील देवालयांची वैशिष्ट्ये होत.

(ई) पट्टदकल या गावी असलेले **विरूपाक्षाचे** मंदिर विशेष प्रसिद्ध आहे.

(उ) ओरिसात सातव्या शतकापासून तेराव्या शतकापर्यंत **मंदिरांच्या** बांधणीचे काम मोठ्या प्रमाणावर चालू होते.

(ऊ) ओरिसा शैलीच्या मंदिरांचे प्रमुख केंद्र **भुवनेश्वर** येथे होते.

(ए) ओरिसा शैलीच्या पूर्ण विकसित स्वरूपाचे दर्शन **लिंगराज** मंदिरात घडते.

(ऐ) लिंगराज मंदिराचे मुख्य शिखर **४५** मीटर उंचीचे आहे.

(ओ) खजुराहोच्या मंदिरांचे सौन्दर्य त्यांच्या प्रमाणबद्धतेत व **आकारात** साठविलेले आहे.

(औ) गुजरातेतील मंदिरे तत्कालीन **समाजाने** दिलेल्या देणग्यांतून उभारली गेली.

**प्रश्न २ : खालील शिल्पे भारताच्या कोणत्या भागांत आहेत? त्या शिल्पांविषयी माहिती लिहा.**

(अ) मोढेराचे सूर्यमंदिर, (आ) कोणार्कचे सूर्यमंदिर, (इ) खजुराहोची मंदिरे, (ई) दिलवाड्याचे मंदिर.

**उत्तर** :(अ) **मोढेराचे सूर्यमंदिर** : गुजरातेतील हिंदू मंदिरांपैकी प्रमुख मंदिर आहे. परंतु हे पूर्णपणे भग्नावस्थेत आहे. तरीही त्याचा जेवढा भाग शिल्लक आहे, तेवढ्यावरूनही त्याच्या भव्यतेची यथार्थ कल्पना येते. हे मंदिर पिवळट करड्या रंगाच्या वालुकाश्मात बांधलेले आहे. मंदिराच्या पूर्वेला तीर्थस्नानासाठी बांधलेला तलाव आहे, त्यात मंदिराचे वैभवसंपन्न प्रतिबिंब पडते. या मंदिराच्या विविध भागांची उपासनेच्या दृष्टीने एकात्मता साधलेली आहे. मंदिरासमोर एक उघडा स्तंभयुक्त द्वारमंडप आहे, त्यातून एका अरुंद मार्गाने मुख्य इमारतीत प्रवेश करता येतो. या इमारतीत सभामंडप व गर्भगृह असे दोन भाग आहेत. इमारतीवर आडव्या रेषांचे नक्षीकाम आहे. येथील शिल्पकाम अबूच्या शिल्पकामापेक्षा जोमदार व चैतन्यपूर्ण आहे. त्याच्या छताच्या कोरीव कामाची छाप अबूच्या मंदिराच्या छत-कामावर पडली आहे.

**(आ) कोणार्कचे सूर्यमंदिर :** कोणार्क हे शहर ओरिसा राज्यातील पुरी जिल्ह्यात असून मध्ययुगीन मंदिरांसाठी प्रसिद्ध आहे. सूर्याच्या आशीर्वादाने कृष्णपुत्र सांब याचा कुष्ठरोग या शहरात बरा झाला अशी एक पौराणिक कथा आहे. येथे एक अद्वितीय सूर्यमंदिर आहे. त्याच्या सध्या अस्तित्वात असलेल्या भग्न अवशेषां-वरूनही मुळात ते किती भव्य असेल त्याची कल्पना येऊ शकते. हे मंदिर पहिल्या नरसिंह देवाच्या कारकीर्दीत (१२३८–६४) बांधले गेले. मात्र ते कधीच पुरे झाले नाही. हे मंदिर ओरिसा शैलीचा उत्कृष्ट व वैशिष्टयपूर्ण नमुना आहे. याचे भद्र प्रकारचे शिखर ओवडधोबड आहे. त्याच्या खाली गर्भगृह आहे. ते सभागृहाशी दगडी पायऱ्यांच्या द्वारे संलग्न करण्यात आले आहे. दगडी पायऱ्यांसमोर नृत्यगृह (नाटच-मंडप) आहे. सबंध मंदिर एक सूर्यरथ आहे अशी भव्य कल्पना करण्यात आली आहे. एका दगडी चौथऱ्यावर रथ उभा आहे. त्याला चोवीस दगडी खोदीव चाके आहेत. या रथाला सात दगडी घोडे जुंपण्यात आले आहेत. सभागृह चौरस घनाकृती असून त्याची प्रत्येक बाजू ३० मी. लांब आहे. त्याच्या दगडी छताला लोखंडी खांबांचा आधार आहे. हे खास ओरिसा शैलीचे वैशिष्टच होय. संपूर्ण मंदिर बांधून पुरे झाले असते तर ६० मीटर उंचीचे झाले असते. मंदिराच्या बाहेरच्या बाजूवर शिल्पाकृती असून त्या सर्व शृंगारिक आहेत. त्यांचा संबंध तांत्रिक कर्मकांडाशी असावा असे मानले जाते. तथापि, त्यांचे निश्चित प्रयोजन ठाऊक नाही. हिरव्या रंगाच्या क्लोराइट दगडात केलेले हे शिल्पकाम अप्रतिम आहे. शिल्पांत अप्सरा, देवता, खरे व कल्पित प्राणी इत्यादींचा समावेश आहे. या मंदिराच्या एकूण उभा-रणीत नागर व द्राविड ह्या दोन्ही शैली प्रतीत होतात. या मंदिराची सुंदरता व भव्यता केवळ अवर्णनीय आहे.

**(इ) खजुराहोची मंदिरे :** खजुराहो हे मध्य प्रदेशातील छतरपूर जिल्ह्या-तील झाशी-माणिकपूर मार्गावरील एक खेडेगाव आहे. तेथे बुंदेलखंडाच्या चंदेल रजपूत राजांनी एकूण ८५ मंदिरे बांधली (इ. स. ९५० ते १०५०). परंतु त्यांपैकी फक्त २१ मंदिरे अस्तित्वात आहेत. ही मंदिरे शिव-विष्णू या हिंदू देवतांची व जैन तीर्थंकरांची आहेत. या सर्वांमध्ये विशेष उल्लेखनीय मंदिर कन्दर्प महादेवाचे आहे. ते सुमारे इ. स. १०२५ मध्ये बांधले गेले. ते ३५ मीटर लांबरुंद आहे. खजुराहोच्या मंदिरांना भिंतींचा आधार नाही. ती सगळी उंच पायावर उभारलेली असून कमालीची प्रमाणबद्ध आहेत. प्रत्येक मंदिराचे गाभारा, सभामंडप व अर्ध-सभामंडप असे तीन भाग आहेत. मंदिरांची शिखरे टोकदार असल्यामुळे मंदिरे उंच असल्याचा भास होतो. येथील मंदिरांमध्ये उभ्या रेषांचे प्राचुर्य आहे. सर्व मंदिरे उत्कृष्ट शिल्पांनी मढविलेली आहेत. शिल्पे नाजूक व मोहक असून आकृतींत डौलदारपणा आहे. इतकी लालित्यसंपन्न शिल्पे भारतात इतरत्र कोठेच आढळत

नाहीत. येथील शिल्पकलेत सौन्दर्य, चैतन्य व मार्दव यांची परकाष्ठा आहे. शिल्पगत आकृतींतील व्यक्तीच्या ठायी चपळपणा, लालित्य व सामर्थ्य असल्याचा प्रत्यय येतो. व्यक्तींची शरीरे नाजुक असूनही कणखर आहेत. एकंदरीने शिल्पाचे लावण्य वाखाणण्याजोगे आहे.

**(ई) दिलवाड्याचे मंदिर :** राजस्थानच्या दक्षिण सीमेवर व अहमदाबादच्या उत्तरेस ११० मैलांवर अबू पर्वत आहे. हा महाभारतकाली 'अर्बुद' पर्वत म्हणून ओळखला जात असे. त्याच्या पठारावर जैन व हिंदू मंदिरे आणि थडगी आहेत. पर्वताच्या माथ्यावर एक वाटोळा चौथरा असून त्याच्या मध्यावर दिलवाड्याची दोन मंदिरे आहेत. ती पांढऱ्या संगमरवराची आहेत. त्यात गुजरातेतील स्थापत्यकलेची जणू बारोक (Baroque) अवस्था शिगेस पोचलेली असल्याचे प्रतीत होते, इतकी ती मंदिरे सुंदर आहेत. त्यांपैकी एक मंदिर बरेच अलीकडचे आहे. ते दोन श्रीमंत व्यापाऱ्यांनी इ. स. ११९७-१२४७ मध्ये बांधविले. त्याचे खोदकाम नाजुक व विविधतापूर्ण आहे. त्यात खोदलेला तपशील सुंदर आहे. त्याच्या घुमटाच्या छतावरील नक्षीकाम केवळ अप्रतिम आहे. या मंदिराच्या स्तंभयुक्त सभामंडपातील अंतर्भाग डोळे दिपवून टाकणारा आहे. या मंदिराचा घुमट ठेंगण्या अलंकृत खांबांवर आधारलेला आहे व ते खांब तोरणरूप कमानींच्या द्वारे एकमेकांना जोडलेले आहेत. हे घुमटाकार छत एकाबाहेर एक याप्रमाणे नक्षीच्या अनेक वर्तुळांचे बनलेले आहे. दुसरे मंदिर सोळंकी राजांच्या विमल नावाच्या स्थानिक राज्यपालाने इ. स. १०३२ मध्ये बांधले. ते साधे असले तरी ठसठशीत आहे. ते मंदिर म्हणजे जैन स्थापत्याचा सर्वांत जुना व परिपूर्ण नमुना आहे. त्याच्या गाभाऱ्यात पार्श्वनाथाची बैठी मूर्ती आहे. त्या मंदिराच्या सभामंडपात ४८ खांब असून मंदिराचे आवार १४०'×९०' इतके मोठे आहे. त्यात लहानलहान खांब असून एकूण ५२ दालने आहेत. प्रत्येक दालन पार्श्वनाथाच्या मूर्तींनी अलंकृत करण्यात आले आहे. काही कलासमीक्षकांच्या मते येथील कलाकाराने शिल्पाचाही काहीसा अतिरेक केला आहे.

**प्रश्न ३ : खालील शब्दांच्या एकेका वाक्यात व्याख्या लिहा.**

(१) त्रिरथ मंदिर, (२) नवरथ मंदिर, (३) रेखा देऊळ, (४) पीढा देऊळ, (५) नाट्यमंडप, (६) भोगमंडप, (७) भूमी, (८) आयुध, (९) ऊरुशृंग.

**उत्तर (१) त्रिरथ मंदिर :** नागर शैलीच्या ज्या मंदिराच्या गर्भगृहाच्या प्रत्येक बाजूस एकेक भाग पुढे आलेला असतो त्या मंदिरास त्रिरथ मंदिर म्हणतात.

**(२) नवरथ मंदिर :** नागर शैलीच्या ज्या मंदिराच्या गर्भगृहाच्या प्रत्येक बाजूस चार भाग पुढे आलेले असतात त्यास नवरथ मंदिर म्हणतात.

**(३) रेखा देऊळ :** ओरिसा शैलीतील मंदिराच्या विमान नामक भागाला रेखा देऊळ म्हणतात.

(४) **पीढा देऊळ**–ओरिसा शैलीतील मंदिराच्या सभामंडपाला (म्हणजेच जगमोहनाला) पीढा देऊळ म्हणतात.

(५) **नाट्यमंडप**–ओरिसा शैलीच्या मंदिरामधील नृत्यासाठी असलेल्या दालनाला नाटयमंडप म्हणतात.

(६) **भोगमंडप**–ओरिसा शैलीच्या मंदिरामध्ये देवतेला विविध वस्तू अर्पण करावयाच्या विधीसाठी जो भाग असतो त्यास भोगमंडप म्हणतात.

(७) **भूमी**–ओरिसा शैलीच्या शिखरावरील आडव्या विभाजनांना भूमी म्हणतात.

(८) **आयुध**–ओरिसा शैलीच्या मंदिरातील मुख्य देवतेच्या प्रतीकात्मक चिन्हाला आयुध म्हणतात.

(९) **ऊरुशृंग**–खजुराहोच्या मंदिरातील मुख्य शिखराच्या रचनेत जी अनेक लहान शिखरे असतात त्यांवरील आमलक व कळस यांना ऊरुशृंग म्हणतात.

# प्रकरण २४ : उत्तुंग गोपुरांच्या प्रदेशातील मंदिरे

**प्रश्न १ : खालील पारिभाषिक शब्दांचे एकेका वाक्यात स्पष्टीकरण करा :**

भूमी, हार, कूट, शाला, प्राकार, रथ, कुडू.

**उत्तर : भूमी**–द्राविड शैलीनुसार बांधलेल्या मंदिरात तळमजल्याच्या वर आकाराने कमी-कमी होत जाणारे जे मजले बांधलेले असतात त्यांना भूमी म्हणतात.

**हार**–वरील प्रकारच्या प्रत्येक भूमीवर चारी बाजूंस लहान-लहान मंदिरांच्या ज्या रांगा असतात त्यांना हार म्हणतात.

**कूट**–वरील प्रकारची जी मंदिरे कोपऱ्यांवर असतात त्यांना कूट म्हणतात.

**शाला**–शाला म्हणजे लहान मंदिरे.

**प्राकार**–दक्षिण भारतीय मंदिराभोवती असलेल्या भिंतीला प्राकार म्हणतात.

**रथ**–मामल्लपुरम् येथे एकसंध दगडात जी मंदिरे कोरलेली आहेत त्यांना रथ म्हणतात.

**कुडू**–दक्षिण भारतीय मंदिरांच्या दर दोन मजल्यांच्या मध्ये असलेल्या कंगणीवर जे अश्वनालाकृती/ कोनाडे असतात त्यांना तमिळ भाषेत कुडू म्हणतात

**प्रश्न २ : कंसांत दिलेल्या शब्दांपैकी योग्य शब्द रिकाम्या जागी भरून खालील वाक्ये पूर्ण करा व पुन्हा लिहा.**

(अ) सध्याच्या········प्रांतात द्राविड शैलीच्या मंदिरांचा विकास झाला. (राजस्थान, केरळ, तामिळनाडू)

(आ) गोपूर हा······· भारतीय वास्तूंचा विशेष प्रकार होय. (उत्तर, दक्षिण, पूर्व)

(इ) दक्षिण भारतीय मंदिराभोवती असलेल्या भिंतीला··· ·····म्हणतात. (हार, प्राकार, कूट)

(ई) छप्परयुक्त पण भिंती नसलेले उघडे मंडप··········· आढळत नाहीत. (दक्षिणेत, उत्तरेत, पश्चिमेत)

(उ) दक्षिण भारतीय कला मुख्यत:······विकास पावली. (लोकाश्रयानेच, राजाश्रयानेच, शासनाश्रयानेच)

(ऊ) द्रौपदी-रथमंदिर··········आकाराचे आहे. (हत्तीच्या, झोपडीच्या, राजवाड्याच्या)

(ए) महाबलिपुरम येथील दोन··········शिल्प भारतीय कलेतील चैतन्याचे मूर्तिमंत प्रतीक आहे. (घोड्यांचे, माकडांचे, हत्तींचे)

(ऐ) घारापुरी येथील त्रिमूर्तीचे मधले मुख शंकराचे असून उजवीकडील मुख········आहे. (विष्णूचे, वामदेवाचे, श्रीकृष्णाचे)

(ओ) चोल वंशाच्या काळातील वास्तूंच्या रचनेचा प्रभाव ········आशियातील स्थापत्यावर झाला. (पूर्व, आग्नेय, पश्चिम)

(औ) कृष्णदेव राजाने बांधलेले प्रख्यात विठ्ठल-मंदिर········येथे आहे. (कांची, विजयनगर, तंजावर)

(अं) कर्नाटकातील होयसाळ राजांच्या अमदानीतील मंदिरे········शैलीची आहेत. (द्राविड, वेसर, नागर)

(अः) मदुरेच्या नायक वंशाच्या कारकीर्दीतील मंदिरे हा द्राविड वास्तुकलेचा ········अध्याय होय. (सुरुवातीचा, शेवटचा, मधला)

(क) एलेफंटाची········प्रसिद्ध आहे. (त्रिमूर्ती, गणेशमूर्ती, लक्ष्मीमूर्ती)

(ख) मीनाक्षीमंदिरम्········ येथे आहे आणि श्रीरंगम् मंदिर········ जवळ आहे (त्रिवेंद्रम, मदुरा, मद्रास; तिरुचिरापल्ली, मद्रास, हैदराबाद)

(ग) कांचीला·······असे म्हणतात; तेथे एकूण········मंदिरे आहेत. (दक्षिण काशी, उत्तर काशी; पाचशे, साडेचारशे, तीनशे)

(घ) दक्षिणेतील मंदिरांच्या प्रवेशद्वाराला······· म्हणतात. (गोपुरम्, महाद्वार, द्वार)

(ङ) गोपुरे·········व कलात्मक असतात (उंच, ठेंगणी, आडवी)

(च)·········व·········यांचे सुंदर शिल्प हे दक्षिणेतील मंदिरांचे खास वैशिष्टय आहे. (सिंह, हत्ती, वाघ व गाय)

(छ) ·········काश्याची मूर्ती विलक्षण सुंदर आहे (सरस्वतीची, नटराजाची, शंकराची)

**उत्तर** : (अ) सध्याच्या **तामिळनाडू** प्रांतात द्राविड शैलीच्या मंदिरांचा विकास झाला.

(आ) गोपूर हा **दक्षिण** भारतीय वास्तूंचा विशेष प्रकार होय.

(इ) दक्षिण भारतीय मंदिराभोवती असलेल्या भिंतीला **प्राकार** म्हणतात.

(ई) छप्परयुक्त पण भिंती नसलेले उघडे मंडप **उत्तरेत** आढळत नाहीत.

(उ) दक्षिण भारतीय कला मुख्यत: **राजाश्रयानेच** विकास पावली.

(ऊ) द्रौपदी–रथमंदिर **झोपडीच्या** आकाराचे आहे.

(ए) महाबलिपुरम् येथील **दोन** माकडांचे शिल्प भारतीय कलेतील चैतन्याचे मूर्तिमंत प्रतीक आहे.

(ऐ) घारापुरी येथील त्रिमूर्तीचे मधले मुख शंकराचे असून उजवीकडील मुख **वामदेवाचे** आहे.

(ओ) चोल वंशाच्या काळातील वास्तूंच्या रचनेचा प्रभाव **आग्नेय** आशियातील स्थापत्यावर झाला.

(औ) कृष्णदेव राजाने बांधलेले प्रख्यात विठ्ठलमंदिर **विजयनगर** येथे आहे.

(अं) कर्नाटकातील होयसाळ राजांच्या अमदानीतील मंदिरे **वेसर** शैलीची आहेत.

(अ:) मदुरेच्या नायक वंशाच्या कारकीर्दीतील मंदिरे हा द्राविड वास्तुकलेचा **शेवटचा** अध्याय होय.

(क) एलेफंटाची **त्रिमूर्ती** प्रसिद्ध आहे.

(ख) मीनाक्षीमंदिरम् **मदुरा** येथे आहे आणि श्रीरंगम् मंदिर **तिरुचिरापल्ली**जवळ आहे.

(ग) कांचीला **दक्षिण काशी** असे म्हणतात; तेथे एकूण **तीनशे** मंदिरे आहेत.

(घ) दक्षिणेतील मंदिरांच्या प्रवेशद्वाराला **गोपुरम्** म्हणतात.

(ङ) गोपुरे **उंच** व कलात्मक असतात.

(च) **सिंह** व **हत्ती** यांचे सुंदर शिल्प हे दक्षिणेतील मंदिरांचे खास वैशिष्टय आहे.

(छ) **नटराजाची** काश्याची मूर्ती विलक्षण सुंदर आहे.

**प्रश्न ३ : खालील वास्तूंविषयी थोडक्यात माहिती लिहा.**

(अ) गोपुर, (आ) महाबलिपुरम्ची मंदिरे, (इ) कैलास मंदिर, (ई) एलेफंटाच्या गुहा, (उ) राजराजेश्वर मंदिर व (ऊ) मीनाक्षी मंदिर.

**उत्तर** : (अ) **गोपुर**–दक्षिण भारतीय वास्तूंचा एक विशेष प्रकार. गोपुर म्हणजे मंदिराचे प्रवेशद्वार. ते आयताकृती असते. त्याच्या तळमजल्याच्या मध्यभागी प्रवेशद्वार असते. त्याच्या भिंतींवर कोनाडे व अर्धे भिंतींत गेलेले खांब असतात. दर दोन मजल्यांच्या (भूमींच्या) मध्ये आडवा कंगणीदार भाग असतो. एकूण सर्व रचना वर-वर निमुळती होत जाते व तिच्यात अनेक मजले असतात. प्रत्येक मजल्यावर लहान मंदिरांचा हार असतो. सर्वात शेवटी वर अर्धदंडगोलाकार आडवे छप्पर असून त्याच्या वरच्या बाजूला कलशांची रांग असते. गोपुर हा वास्तू व शिल्प या कलांचा उत्कृष्ट नमुना होय.

(आ) **महाबलिपुरमची मंदिरे**–(इ. स. ६७५-७५०)–महाबलिपुरम किंवा मामल्लपुरम हे तामिळनाडू प्रांतातील चिंगलपुट जिल्ह्यातील ऐतिहासिक महत्त्वाचे ठिकाण आहे. समुद्रकिनाऱ्यावरील हे शहर नरसिंहवर्मन नावाच्या पल्लव–वंशीय राजाने मद्रासपासून ५१½ कि. मी. अंतरावर इ. स. ६७४ मध्ये वसविले. येथे सध्या अस्तित्वात असलेल्या अवशेषांत एकसंध दगडांत कोरलेली सात मंदिरे आहेत. त्यांना रथ म्हणतात. त्यांपैकी पाच रथमंदिरे द्रौपदी, अर्जुन, भीम, धर्मराज व सहदेव या नावांनी ओळखली जातात. द्रौपदी रथमंदिर झोपडीच्या आकाराचे असून सहदेव रथमंदिर हत्तीच्या पाठीसारखे गोलाकार आहे. उत्तरकाळात धर्मार्जुनरथांचा परिणाम मंदिरबांधणीवर आणि गणेशभीमरथांचा परिणाम गोपुरांच्या बांधणीवर झाला. शिवाय येथे ९६′ लांब व ४३′ रुंद एवढ्या मापाचा एक कोरीव कामाचा खडक आहे. येथील मंदिरे म्हणजे भारतीय कलेचा एक उच्च नमुना होय. येथील शिल्प जोषपूर्ण व श्रेष्ठ दर्जाचे आहे. त्यांत गंगावतरण, भगीरथाची तपश्चर्या इत्यादी पौराणिक प्रसंग सुबकपणे साकार केले आहेत. येथील शिल्पात वैचित्र्यपूर्ण आयोजन प्रतीत होते. बदामाकृती चेहेरे, गालाची थोडी उंच हाडे व नळीप्रमाणे कृश हातपाय ही ती विचित्र वैशिष्ट्ये होत. ९६′ × ४३′ आकाराच्या खडकावर कोरलेले भगीरथाच्या तपश्चर्येचे दृश्य ही येथील सर्वांत भव्य कलाकृती होय. हा प्रचंड खडक मानव व हत्तीसारखे प्राणी यांच्या मुळातल्याइतक्या मोठ्या अशा शंभराहून अधिक आकृतींनी भरून टाकला आहे यांत गंगावतरणाचे भव्य दृश्य रेखाटले आहे. समस्त शिल्प ४० फूट उंचीचे, जोमदार व वेगवान आहे. त्यातील दोन हत्ती व त्यांची पिल्ले जिवंत भासतात.

राजसिंह राजाने आठव्या शतकात येथे मठ बांधले तेदेखील पाहावयास सापडतात.

(इ) **कैलास मंदिर** – हे मंदिर महाराष्ट्रात वेरूळ येथे असून त्याचे पल्लववंशीय द्राविड मंदिरांशी साम्य आहे. हे शैवमंदिर राष्ट्रकूट वंशातील कृष्णदेव राजाने (इ. स. ७५७-७८३) बांधले. एक प्रचंड प्रस्तर कोरून त्याला मंदिराचे स्वरूप देण्यात आले आहे. मुख्य मंदिर, सभामंडप वगैरे सर्व भाग या पद्धतीने बनविण्यात आले आहेत. मंदिराच्या बाहेर सुटे स्तंभ व हत्तींची शिल्पे आहेत. हे सर्व कोरीव काम सुयोजित आहे. मुख्य मंदिर लहान मंदिरांशी पुलांनी जोडलेले आहे. मंदिराच्या पायाचा चबुतरा ७·५ मीटर उंच असल्यामुळे मंदिराचे ऐश्वर्य दुरूनच लक्षात येते. मंदिराच्या गाभाऱ्यात खूप मोठे शिवलिंग आहे. या मंदिराच्या शिखराला अनेक मजले असून त्यांवर कूट, शाला इत्यादी वास्तू आहेत. गर्भगृहाच्या अलिकडे सभामंडप असून त्याच्या दोन्ही बाजूंस स्तंभयुक्त मंडप आहेत. नंदीसाठी स्वतंत्र मंडप आहे. गाभाऱ्याच्या सभोवार पाच लहान मंदिरे आहेत. भिंतींवर देवदेवतांच्या मूर्ती कोरलेल्या आहेत. मंदिराच्या चबुतऱ्यावर सिंह व हत्ती यांची कोरीव शिल्पपट्टी आहे. हे सर्व मंदिर शिवमाहात्म्य व रामायणातील प्रसंग या विषयांवरील उत्थित शिल्पांनी सजविलेले आहे. या शिल्पांपैकी सर्वांत नाट्यपूर्ण व प्रभावी शिल्प म्हणजे रावण कैलास पर्वत हालवीत आहे हे होय. खोदीव कैलास पर्वतावर शिव व पार्वती बसलेली असून खालील भागात रावण आपल्या अनेक हातांनी पर्वत उपटून टाकण्याच्या प्रयत्नात असल्याचे दाखविले आहे. पर्वत हलल्यामुळे पार्वती भयभीत झालेली असून ती शंकराला बिलगली आहे. शंकर पायाने पर्वत खाली दाबून टाकीत आहे. ही सर्वच दृश्य-मालिका जिवंत, भव्य व कल्पकतापूर्ण आहे. या नाट्यमय शिल्पाच्या योगे कला-वंताच्या उत्तुंग प्रतिभेचा प्रत्यय येतो. याखेरीज कैलास मंदिरात गंगावतरण, त्रिपुरांतक शिव व गरुडवाहन विष्णू अशी शिल्पे आहेत.

(ई) **एलेफंटाच्या गुहा** – यांना घारापुरीची लेणी असेही म्हणतात. पश्चिम भारतातील वास्तुशिल्पाचा हा उत्कृष्ट नमुना आहे. आठव्या शतकाच्या उत्तरार्धात शैव सांप्रदायिकांनी ही गुहामंदिरे मुंबईपासून ६-७ मैलांवर कोरली. येथे दक्षिण दिशेस दगडी हत्ती आहे. त्यावरून या गुहांना एलेफंटा हे नाव पडले. येथे एकूण ८ लेणी असून पहिलेच महत्त्वाचे आहे. त्यात शिवाची कथा दगडात खोदून निवे-दिली आहे. त्या लेण्यात १२३′×५५′ एवढे मध्यवर्ती दालन आहे. त्याच्या पश्चिमेस १८′ चौरस दालन आहे. त्यात सहा-सहा खांबांच्या सहा रांगा आहेत. या लेण्याला एकूण चार प्रवेशद्वारे असून त्यांच्या बाहेर प्रचंड द्वारपालांच्या शिल्पा-कृती आहेत. मुख्य देवतामूर्ती भिंतीला चिकटून कोरलेली आहे. येथील स्तंभ अनियमित असून त्यांचा पाया उंच व दंडाच्यावर अनेक कडी असलेला गोल कंठ आहे. त्यावर गोल उशीसारखे स्तंभशीर्ष आहेत. शिवकथांवर उत्थित शिल्पे प्रचंड

आकाराची व प्रेक्षणीय आहेत. या शिल्पांपैकी त्रिमूर्ती हे शिल्प जगप्रसिद्ध आहे. यात शिवाची शंकर, अघोरभैरव व वामदेव अशी अनुक्रमे स्थिती, प्रलय व उत्पत्ती यांची निदर्शक तीन स्वरूपे कोरलेली आहेत. या तीन मुखांवर कार्यानुरूप भाव दाखविलेले आहेत. ही त्रिमूर्ती अमर्याद, अथांग व अंधकारमय अवकाशातून प्रकट झाल्यासारखी वाटते. येथील इतर उत्थित शिल्पे उंच उठावाची असल्यामुळे छाया-प्रकाशाचा अद्‌भूत खेळ निर्माण होतो. ही सर्व शिल्पे जीवन हे एक महानाट्य आहे, या सत्याची निदर्शक आहेत.

(उ) **राजराजेश्वर मंदिर**–चोलवंशीय राजराजाने (इ.स. ९८५–१०१८) तंजावर येथे इ. स. १००० च्या सुमारास हे मंदिर बांधले. याची लांबी ५४ मीटर असून उंची (शिखरासह) ५७ मीटर आहे. याचा पाया चौरस व शिखर पिरॅमिड-सारखे आहे. केवळ शिखर १५ मीटर उंचीचे आहे. त्यावरील स्तूपिका ८० टन वजनाची आहे. या मंदिराची रचना प्रमाणबद्ध व सुंदर आहे. शिखराच्या बांधणीत एकूण १३ मजले आहेत. वरील स्तूपिकेच्या चारी बाजूंना चैत्याकार कमानी असून त्यांवर नागांची नक्षी आहे. पायाच्या चबुतऱ्यावरील आडव्या पट्ट्यांत देवदेवतांच्या सर्वतोरचित मूर्ती आहेत. एका पट्टीत राजराजाचा शिलालेख आहे. या मंदिराची रचना गाभारा, वर उंच शिखर व पुढे स्तंभयुक्त मंडप अशी साधी असली तरी भव्य आहे. कारागिरांनी उभ्याआडव्या आकारांचा प्रशंसनीय समतोल साधला आहे.

(ऊ) **मीनाक्षी मंदिर**- मदुरेच्या नायक वंशाच्या अमदानीत सतराव्या शतकात मदुरेस मीनाक्षी मंदिर बांधण्यात आले. या मंदिराचे विस्तृत प्राकार (भोवतालच्या भिंती) हे आद्य वैशिष्ट्य आहे. धार्मिक विधी यथासांग करता यावेत व उत्सवप्रसंगी मिरवणुका काढणे सोयीचे व्हावे म्हणून हे प्राकार बांधण्यात आले. या प्राकारांभोवती उंच तट बांधण्यात आले. या मंदिराची गोपुरे आयताकृती असून त्यांच्या टोकाला वेसर पद्धतीच्या अर्धदंडगोलाकार स्तूपिका आहेत. गोपुरांवर चुन्याचा जाड लेप दिलेल्या देवतामूर्ती आहेत. पण ही शिल्पे निकृष्ट आहेत. तट-बंदीच्या आत स्तंभांच्या अनेक रांगा व छपराची आच्छादित अंगणे आहेत. येथील खांबांची संख्या अगणित आहे. या मंदिरात एक तीर्थ किंवा तलाव बांधण्यात आला आहे. तलावाभोवती सस्तंभ ओवऱ्या आहेत. प्रचंडपणा हे या मंदिराचे मुख्य वैशिष्ट्य आहे. पण हा प्रचंडपणा प्रमाणाबाहेर असल्यामुळे एकूण मंदिर अस्ताव्यस्त बनले आहे.

**प्रश्न ४ : 'नटराज' या कलाकृतीचे रसग्रहण लिहा :**

**उत्तर : नटराज**- काश्याच्या शिल्पाचा हा प्रसिद्ध व आकर्षक नमुना आहे. हे शिल्प कला व कारागिरी (Art & craftsmanship) या दोन्ही दृष्टींनी अप्रतिम

आहे. नटराजाच्या या मूर्तीचा बाकदारपणा कमालीचा मोहक आहे. तिचे शरीर सुंदर व प्रमाणबद्ध आहे. डावा पाय व हात यांच्या विशिष्ट आविर्भावामधून सहजसुंदर गतीची प्रतीती येते. ही मूर्ती तेराव्या शतकात चोल राजाच्या कारकीर्दीत तयार झाली. नाचणाऱ्या शंकरार्ची ही मूर्ती चतुर्भुज असून तिचा नृत्याचा पविश्रा डौलदार आहे. शंकर उजव्या पायाने एका अनामिक राक्षसाला मारीत आहे, असे दाखविण्यात आले आहे. शंकराच्या भोवती ज्ञानाचे प्रतीक असलेले अग्नीचे वलय धगधगत आहे. समस्त शिल्पात विलक्षण लय व चापल्य आहे. म्हणूनच हे शिल्प जगप्रसिद्ध बनले आहे.

**प्रश्न ५ : 'शिखराचे प्रकार' या विषयावर परिचयपर परिच्छेद लिहा**

**उत्तर :** (अ) भारतातल्या वेगवेगळया प्रांतांतील मंदिरांच्या शिखरांची रचना वेगवेगळी आढळते. उदाहरणार्थ, ओरिसा शैलीच्या मंदिरांना दोन शिखरे असतात. त्या प्रकारच्या मंदिरांच्या ज्या भागात मूर्ती असते किंवा मूर्ती असतात, त्या भागाचे शिखर उंच असते. त्याच्या समोर सामान्यपणे चौरस आकाराचा जो सभामंडप असतो त्याला पिरॅमिडच्या आकाराचे व थोडे ठेंगणे शिखर असते. शिखरावरील खोदकामात आडव्या रेषांचे प्रमाण अधिक असते.

(आ) खजुराहोच्या मंदिरांची शिखरे ओरिसा शैलीच्या मंदिरांच्या शिखरांहून वेगळी असतात. ती अधिक टोकदार असतात. त्यामुळे ती अधिक उंच असल्याचा भास होतो. तेथील खोदकामात उभ्या रेषांचे प्रमाण सापेक्षतया जास्त असते.

(इ) पश्चिम भारतातील जैन मंदिरांची शिखरे बारीक नक्षीकाम व शिल्पाकृती यांनी सजविलेली असतात. या बारीक नक्षीकामात कलानियमांची बूज राखण्यात आलेली असली तरी हे नक्षीकाम गिचमीड-गिचमीड असल्यामुळे उच्च कलाभिरुचीला खटकते.

(इ) दक्षिण भारतातील मंदिरांची शिखरे खालच्या भागात खूप डेरेदार असून वर निमुळती होत जात-जात शेवटी अणकुचीदार होतात. ही शिखरे म्हणजे भारतीय स्थापत्याचा एक अपूर्व आविष्कार आहे.

वरीलप्रमाणे शिखरांचे विविध व कलापूर्ण प्रकार पाहावयास मिळतात.

**प्रश्न ६ : उत्तर भारतातील मंदिरे व दक्षिण भारतातील मंदिरे यांच्यातील साम्यवैषम्ये नमूद करा :**

**उत्तर :** (क) **उत्तर भारतातील मंदिरे**— ही ओरिसा शैलीशी जुळतीमिळती आहेत. यांत कोरीव काम अधिक प्रमाणात असते. एकूण ८५ मंदिरांपैकी सध्या फक्त वीसच मंदिरे अस्तित्वात आहेत. त्यांची वैशिष्टये अशी :(१) भिंतींना आधार नसणे, (२) पाया उंच असणे, (३) घनता कमी असणे, (४) गाभारा,

सभामंडप व प्रवेशद्वाराजवळील जागा असे तीन भाग असणे व (५) शिखरे टोकदार असून त्यांवर उभ्या रेषा जास्त असणे.

(ख) **दक्षिणेतील मंदिरे**– चोल राजांच्या कारकीर्दीत हजारो मंदिरे बांधली गेली. त्यांची प्रमुख वैशिष्टये अशी : (अ) ही प्रचंड शिळांची बांधलेली असतात. (आ) समग्र बांधणीत ऐक्य असते. (इ) बाहेरच्या भिंती, कोनाडे व इतर भाग नक्षीने सुशोभित केलेले असतात. (ई) शिखरे भव्य व कलात्मक असतात. ती खाली रुंद असून वर निमुळती होत जात-जात शेवटी अणकुचीदार होतात. (उ) चारी बाजूंना प्रवेशद्वारे असतात, त्यांनाच गोपुरे म्हणतात. (ऊ) मुख्य द्वार पूर्वेकडे असते. (ए) प्रत्येक मंदिरापुढे एकेक कुंड असते. (ऐ) आतील भागात अनेक लहान-लहान मंदिरे व चौक असतात. (ओ) एकूण मंदिर खूपच अलंकृत असते. (औ) मोठमोठ्या मूर्ती आणि सिंह व हत्ती यांची सुंदर शिल्पे असतात. मात्र त्यात ताकद वा लालित्य नसते. शिल्पगत आकृती सजीव नसतात. (अं) हळेबीडच्या मंदिरामध्ये अलंकारपूर्ण शिल्पे व प्राण्यांची सुंदर नक्षी यांची विपुलता दिसते.

उत्तर-दक्षिणेतील मंदिरांमध्ये वरीलप्रमाणे फरक आढळतात.

# प्रकरण २५ : पालसेन काळातील कला

**प्रश्न १ : खालील विषयांवर प्रत्येकी पाच ओळी लिहा :**

(अ) नालंदा विद्यापीठ, (आ) नालंदा येथील स्तूप, (इ) सेनकालीन बुद्धप्रतिमा, (ई) पालकालीन धातुविद्या, (उ) 'पाल चित्रशैली'.

**उत्तर** : (अ) **नालंदा विद्यापीठ** : १. संपूर्ण विद्यापीठाच्या सभोवार विटांची तटबंदी असून तिच्या एका प्रवेशद्वारातून मुख्य विद्यालयात प्रवेश करता येत असे. २ संघारामात आठ मोठी दालने होती आणि उंच बुरुज होते. ३. धर्मगुरूंच्या निवासाच्या इमारती चार-चार मजल्यांच्या होत्या. ४. त्यांच्या तांबूस रंगाच्या स्तंभांवर व कठड्यांवर प्रेक्षणीय नक्षीकाम होते. ५. त्यांच्या छपरावरील रंगीत फरशांवरून प्रकाश परावर्तित होत असे.

(आ) **नालंदा येथील स्तूप**–१. या स्तूपाचा पाया उंच असून त्यावर दोन मजले आहेत. २. पहिल्यावर स्तंभ व बुद्धमूर्ती असून दुसऱ्यावर अलंकृत

चैत्य कमानी व लहान मूर्ती आहेत. ३. दुसऱ्या मजल्यावरील उभा दंड अष्टकोनी असून त्याच्या चार बाजू मोकळ्या व उरलेल्या चार बाजू बुद्धमूर्तींनी अलंकृत आहेत. ४. स्तूपाचा घुमटाकार भाग बशीसारखा आहे. ५. हा स्तूप एका मोठ्या इमारतीच्या अवशेषांतून मिळाला.

(इ) **सेनकालीन बुद्धप्रतिमा**–१. सेनकालीन बसलेली बुद्धप्रतिमा सध्या बोस्टनच्या संग्रहालयात आहे. २. ती योग्याच्या रूपातील व भूमिस्पर्श मुद्रेतील आहे. ३. बुद्धाच्या मस्तकावर रत्नखचित मुकुट व शरीरावर राजेशाही अलंकार आहेत. ४. अलंकार व मुकुट बुद्धाच्या तेजाचे व दिव्य रूपाचे निदर्शक आहेत. ५. या प्रतिमेच्या निर्मितीत अलंकारांच्या काटेकोर व स्पष्ट चित्रणावर भर आहे.

(ई) **पालकालीन धातुविद्या**–१. नालंदा येथे अनेक धातुमूर्ती उपलब्ध झाल्या आहेत. २. ह्या पालकालीन धातुमूर्तींपैकी काही प्राक्कालीन महायान-पंथीय असून काही उत्तरकालीन शैव-वैष्णव पंथीय आहेत. ३. ही धातुशिल्पे म्हणजे गांधार-गुप्त-कालीन प्रतिमांच्या प्रतिकृती आहेत. ४. या मूर्तींत अतिरेकी अलंकरण, सफाईदारपणा, डौलदार स्वरूप, काटेकोर तपशील ही वैशिष्ट्ये आढळतात. ५. अशा मूर्ती आग्नेय आशियातील देशांमध्ये उपासनेसाठी पाठवीत असत.

(उ) **'पाल चित्रशैली'**–१. पाल काळात मोठी भित्तिचित्रे काढण्याची प्रवृत्ती मागे पडली. २. तिची जागा ग्रंथांच्या सजावटीसाठी लहान आकारांची चित्रे काढण्याच्या प्रथेने घेतली. ३. ही प्रथा पाल राजांच्या कारकीर्दीत सुरू झाली म्हणून हिला 'पाल चित्रशैली' म्हणतात. ४. ताडपत्रावरील हस्तलिखितांमध्ये काढलेल्या अशा चित्रांची पुढील वैशिष्ट्ये आहेत: आकृतीचे नाजुक व निश्चित रूप, चेहऱ्यावरील स्थिर व शांत भाव, अर्धे उघडलेले डोळे व अणकुचीदार नाक. ५. अशी अनेक लघुचित्रे इसवी सनाच्या १० व्या शतकापासून १३ व्या शतकापर्यंत बंगाल व बिहार या प्रांतांत काढली गेली.

# प्रकरण २६ : ग्रंथ-सजावटीचा आरंभकाल

**प्रश्न १ : पुढील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) भित्तिचित्रांचे युग कधी संपले ?

(आ) त्यानंतर कोणत्या युगाला सुरुवात झाली ?

(इ) हे युग किती वर्षे अस्तित्वात होते ?

(ई) या युगातील मुख्य शैली कोणत्या ?

(उ) या चित्रकलायुगात कोणते रंग वापरले गेले ?

(ऊ) या शैलीत कोणत्या चित्रकलांगाला महत्त्व दिले गेले ?

(ए) या शैलीचे डोळ्यात भरणारे वैशिष्ट्य कोणते ?

(ऐ) पाल चित्रशैलीचा इतिहास कोणी लिहून ठेविला आहे ?

(ओ) ही शैली कोणत्या राजांच्या आश्रयाखाली उदयाला आली ?

(औ) गुजरात शैली केव्हा उदयास आली ?

(अं) गुजरात शैलीत चित्रित झालेल्या पाच ग्रंथांची नावे लिहा.

(अः) राजा महेंद्र वर्मा याने कोणत्या ग्रंथाच्या आधारे चित्रनियमावली लिहिली ?

(क) विजयनगर शैलीच्या भित्तिचित्रांची दोन उदाहरणे लिहा.

(ख) ईस्माइल आदिलशहाच्या कारकीर्दीत कोणता चित्रग्रंथ तयार करण्यात आला ?

(ग) त्या ग्रंथात किती व कोणती चित्रे आहेत ?

**उत्तर** : (अ) भित्तिचित्राचे युग अजंठा, बाघ व सित्तनवासल यांच्याबरोबर संपले.

(आ) त्यानंतर ग्रंथसुशोभनाच्या युगाला सुरुवात झाली.

(इ) हे युग इसवी सनाच्या दहाव्या शतकापासून पंधराव्या शतकापर्यंत (म्हणजे पाच शतके) अस्तित्वात होते.

(ई) पाल, जैन व गुजरात या या युगातील मुख्य शैली होत.

(उ) या चित्रकला-युगात लाल, पिवळा, निळा, पांढरा व काळा हे मूळ रंग वापरले गेले.

(ऊ) या चित्रशैलीत पाने, फुले, पक्षी, दागदागिने यांच्या नक्षीला महत्त्व दिले गेले.

(ए) बाजूच्या चेहऱ्यालाही दोन डोळे दाखवून त्यांपैकी एक चेहरेपट्टीच्या बाहेर काढून दाखविणे हे या शैलीचे डोळ्यांत भरणारे वैशिष्ट्य होय.

(ऐ) पाल चित्रशैलीचा इतिहास 'लामा तारानाथ'ने लिहून ठेवला आहे.

(ओ) ही शैली धर्मपाल व देवपाल या पालवंशीय राजांच्या आश्रयाखाली उदयाला आली.

(औ) गुजरात शैली कुमारपाल (११४३–११७४) नामक सोळंकी राजाच्या कारकीर्दीत उदयास आली.

(अं) गुजरात शैलीत चित्रित झालेले पाच ग्रंथ—उत्तराध्ययनसूत्र, गीतगोविंद, देवीमाहात्म्य, भागवत, रतिरहस्य.

(अ:) राजा महेन्द्र वर्मा याने किमानदंडकल्प नामका ग्रंथाच्या आधारे चित्र-नियमावली (पुस्तिका) लिहिली.

(क) वर्धमान मंदिरातील संगीत मंडप व अनेगंडी येथील उचयाप मठ ही विजयनगर शैलीच्या भित्तिचित्रांची दोन उदाहरणे.

(ख) ईस्माइल आदिलशहाच्या कारकीर्दीत 'नुजूम-अल-उलूम' नावाचा चित्र-ग्रंथ तयार करण्यात आला.

(ग) त्या ग्रंथात माणसे, पशुपक्षी इत्यादींची ८७६ चित्रे आहेत.

# प्रकरण २७ : लोकजीवनाचे दर्शन घडविणारी राजपूत चित्रशैली

**प्रश्न १ : खालील 'अ' गटातील शब्दांसमोर 'ब' गटातील योग्य शब्द लिहून जोड्या जुळवा व त्या लिहून काढा :**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १. राजपूत चित्रशैलीचा उगम | १. अंबर शैली |
| २. राजा मानसिंह तोमर | २. किशनगढ शैली |
| ३. लोकाभिमुख शैली | ३. बुंदी शैली |
| ४. निहालचंद | ४. मेवाड शैली |
| ५. काळ्या शाईचा वापर | ५. पंधरावे शतक |
| ६. जयपूर शैली | ६. बिकानेर शैली |
| ७. राजे रायसिंह | ७. माधवसिंग |

**उत्तर :**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १. राजपूत चित्रशैलीचा उगम | १. पंधरावे शतक |
| २. राजा मानसिंह तोमर | २. अंबर शैली |
| ३. लोकाभिमुख शैली | ३. मेवाड शैली |
| ४. निहालचंद | ४. किशनगढ शैली |
| ५. काळ्या शाईचा वापर | ५. बुंदी शैली |
| ६. जयपूर शैली | ६. माधवसिंग |
| ७. राजे रायसिंह | ७. बिकानेर शैली |

**प्रश्न २ : राजपूत कलेत कोणत्या प्रमुख शैलींचा समावेश होतो ?**

**उत्तर** : राजपूत कलेत १. अंबर, २. मेवाड, ३. किशनगढ, ४. बुंदी, ५. बिकानेर व ६. जयपूर या सहा प्रमुख शैलींचा समावेश होतो.

**प्रश्न ३ : राजपूत कलेची पाच मुख्य वैशिष्टये लिहा.**

**उत्तर** : (१) राजपूत कलेत दरबारीपणा व लोककलेतील साधेपणा या दोहोंचे मिश्रण आढळते.

(२) या चित्रशैलीत रागरागिण्या, ऋतुवर्णने इत्यादी काव्यातील कोमलताही आहे आणि रामायण-महाभारत-भागवत इत्यादी पुराणांतील धार्मिकताही आहे.

(३) टवटवीत रंग व ओघवती जोमदार रेषा या वैशिष्टयांमुळे ही कला आनंददायक बनली आहे.

(४) कमलपूर्ण सरोवरे; पावसाळयातील दाट मेघ व विजा; पक्ष्यांनी गजबजलेले बगीचे; हरणे, मोर व बगळे यांच्या रांगा; दीपमाला; दास-दासी; प्रासाद, मंदिरे, घराच्या पडव्या, चौक इत्यादींची विपुल व समृद्ध चित्रणे आढळतात.

(५) या शैलीतील राजस्थानी स्त्रियांचे चित्रण सौन्दर्यसंपन्न आहे, आणि वृक्षांचे रेखाटन विविध आकारांचे व विस्तृत प्रमाणाचे आहे.

राजपूत कलेची मुख्य वैशिष्टये वरीलप्रमाणे आहेत.

# प्रकरण २८ : मोगल दरबारात वाढलेली चित्रकला

**प्रश्न १ : कंसांत दिलेल्या शब्दांपैकी योग्य शब्द रिकाम्या जागी भरून खालील वाक्ये पूर्ण करा व पुन्हा लिहा.**

(अ) ……… शैलीचा भारतीय कलेवर परिणाम होऊन मोगल चित्रशैली निर्माण झाली. (इजिप्ती, ग्रीक, इराणी)

(आ) मोगल चित्रकलेच्या विकासाला………बादशाहाच्या काळात खरा प्रारंभ झाला. (हुमायून, अकबर, बाबर)

(इ) इराणी चित्रकार ……… चित्रणात तरबेज होते. ( मनुष्यांच्या, पशूंच्या, निसर्गाच्या)

(ई) भारतीय कलाकार.........च्या कलेत प्रवीण होते. (रंगकामा, भावदर्शना, तपशील-रेखाटना)

(उ) एकाच ग्रंथावर............इराणी चित्रकार काम करीत. (पाच, तीन, दोन)

(ऊ) जहांगीराच्या काळात.........चित्रे निर्माण होऊ लागली. (भित्ति-सुशोभनासाठी, ग्रंथसजावटीसाठी, चित्रविषयासाठी)

(ए) जहांगीराच्या चित्रसंग्रहात.........पुष्पाच्या दीडशेहून अधिक जाती चित्रित झाल्या. (कमळ, गुलाब, जाई)

(ऐ) मार्थो हा......कालीन चित्रकार होता (जहांगीर, अकबर, शहाजहान.)

(ओ) जहांगीराने.........नामक चित्रकाराला 'या युगाचे आश्चर्य' अशी पदवी दिली होती. (मुहंमद नादिर, फरुखबेग, अबुलहसन)

**उत्तर** : (अ) **इराणी** शैलीचा भारतीय कलेवर परिणाम होऊन मोगल चित्रशैली निर्माण झाली.

(आ) मोगल चित्रकलेच्या विकासाला **अकबर** बादशाहाच्या काळात खरा प्रारंभ झाला.

(इ) इराणी चित्रकार **निसर्गाच्या** चित्रणात तरबेज होते.

(ई) भारतीय कलाकार **भावदर्शनाच्या** कलेत प्रवीण होते.

(उ) एकाच ग्रंथावर **तीन** इराणी चित्रकार काम करीत.

(ऊ) जहांगीराच्या काळात **चित्रविषयासाठी** चित्रे निर्माण होऊ लागली.

(ए) जहांगीराच्या चित्रसंग्रहात **गुलाब** पुष्पाच्या दीडशेहून अधिक जाती चित्रित झाल्या.

(ऐ) मार्थो हा **अकबरकालीन** चित्रकार होता.

(ओ) जहांगीराने **अबुलहसन** नामक चित्रकाराला 'या युगाचे आश्चर्य' अशी पदवी दिली होती.

**प्रश्न २ : अकबर व जहांगीर यांच्या काळांतील तीन-तीन प्रमुख चित्रकारांची नावे लिहा.**

**उत्तर** : अकबरकालीन तीन प्रमुख चित्रकार : दासवत, फरुखबेग, मुकुंद.

जहांगीरकालीन तीन प्रमुख चित्रकार : अबुलहसन, मुहंमद नादिर, सावळा.

**प्रश्न ३ : मोगल व राजपूत या दोन कलांतील साम्यभेद लिहा.**

| उत्तर : मोगल चित्रकला | राजपूत चित्रकला |
|---|---|
| १. उगम सोळाव्या शतकात. | १. उगम पंधराव्या शतकात. |
| २. सर्वथा दरबारी स्वरूपाची. | २. दरबारी व लौकिक असे दुहेरी स्वरूप. |
| ३. इराणी-भारतीय अशी मिश्र शली. | ३. शुद्ध भारतीय शैली. |
| ४. विषय व प्रतीके यांवर इराणी छाप अधिक. | ४. विषय व प्रतीके भारतीय. |
| ५. मुख्य विषय राजविलास. | ५. मुख्य विषय लोकजीवन. |
| ६. आकार एकमेकांपासून अलग. | ६. आकार एकमेकांत गुंतल्यासारखे. |
| ७. आरंभ छोटचा चित्रांनी. | ७. आरंभ भित्तिचित्रांनी. |
| ८ कलमाचा बारकावा व रंग-च्छटांची नाजुकता. | ८. रंगरेषांचा जोमदारपणा. |
| ९. चित्रकारांची नावे चित्रांवर आहेत. | ९. चित्रकारांची नावे चित्रांवर नाहीत. |
| १०. भिंतींवर काढलेली दिसत नाहीत. | १०. भिंतींवर काढलेली दिसतात. |
| ११. एक चित्र अनेक चित्रकार मिळून काढीत. | ११. एक चित्र एकच चित्रकार काढी. |
| १२. वेगवेगळथा शैली नाहीत. | १२. अंबर, मेवाड इत्यादी ६ शैली. |
| १३. प्रामुख्याने बादशहांचा आश्रय. | १३. प्राधान्याने सामान्य रसिकांचा आश्रय. |
| १४. युरोपियन व्यापारी व ख्रिस्ती धर्मप्रसारक यांच्या संबंधामुळे पाश्चिमात्य कलेचीही छाप. | १४. पाश्चिमात्य कलेची छाप नाही. |
| १५. इराणी ग्रंथांच्या भाषांतरांची चित्रसजावट. | १५. इराणी ग्रंथांच्या भाषांतरांचा अभाव. |
| १६. बादशाहांची वैशिष्टघपूर्ण व्यक्तिचित्रे. | १६. बादशाहांची चित्रे नाहीत. |
| १७. पशुपक्ष्यांच्या संग्रहालयासाठीही चित्रे काढून घेण्यात आली. | १७. संग्रहालयार्थ चित्रे काढली गेली नाहीत. |

# प्रकरण २९ : हिमालयाच्या कुशीत फुललेली कलापुष्पे

**प्रश्न १ : पहाडी कला म्हणजे काय? तिची ठळक वैशिष्ट्ये लिहा.**

**उत्तर :** कलाद्वेष्टया औरंगजेबाने घालवून दिलेल्या चित्रकारांपैकी जे चित्रकार हिमालयाच्या पहाडातील राजपूत राजांच्या आश्रयाला गेले त्या चित्रकारांनी निर्माण केलेल्या कलेला **पहाडी कला** म्हणतात.

पहाडी कलेची ठळक वैशिष्टये अशी :

(१) पहाडी कलाकार **मुक्तपणे** चित्रांकन करीत असे.

(२) **विषय**–विष्णुभक्ती व रागरागिण्या हे मुख्य विषय. गीतगोविंद, सतसई, भागवत, रामायण, महाभारत, श्रीकृष्णचरित्र या विषयांवर भर. त्याखेरीज लोकाचार, लोकसाहित्य, लोककला हेही चित्र विषय होते.

(३) **सामान्यांची चित्रकला**–ही लघुचित्रे होती. ही सामान्य रसिकांच्या घरात पोचली. सध्या सुमारे ५० हजार चित्रे उपलब्ध आहेत.

(४) **चित्रशाळा**-चित्रकारांच्या चित्रशाळा होत्या. तेथे चित्रांकनाचे सशास्त्र शिक्षण दिले जात असे.

(५) **चित्रपद्धत**–चित्राचे मूळ रेखाटन हरणाच्या चामड्यावर करीत असत. चित्रकार फुलाफळांपासून स्वत: रंग तयार करीत असत. सियालकोटी कागद हस्तव्यवसायाने तयार करीत असत. प्रथमत: तांबड्या रंगाने रेखाकृती काढून घेऊन मग संपूर्ण कागद घोटून त्याची चकाकी वाढविली जाई. नतर काळसर रंगाने पुन्हा रेखाकृती काढून प्रथम पार्श्वभूमीत व मग मनुष्याकृतीत अशा क्रमाने रंग भरण्यात येत. नंतर पुन्हा रेखाकृती काढण्यात येई.

(६) या कलेत बसौली, गुलेर, गढवाल, कांग्रा अशा विविध कलमांचा किंवा शैलींचा समावेश होतो. शिवाय या कलेत मोगल व राजपूत कलांचे परिणत रूप दिसते.

(७) मानवी भाव निसर्गावर आरोपित केलेले दिसतात. उदा. दु:खी नायिकेच्या मागील वृक्ष वठलेला दाखविण्यात येई, तर नायिका आनंदी असल्यास तिच्यामागील वृक्ष फुलाफळांनी डवरलेला दाखविला जाई. अनेक चित्रकार स्वरचित काव्यांवर चित्रे काढीत.

(८) नाजुक रेषा, मंदमधुर रंगच्छटा, लावण्य व रम्य निसर्गाचा पार्श्वभूमीदाखल उपयोग ही इतर उल्लेखनीय वैशिष्टये.

**प्रश्न २ : बसौली व कांग्रा कलमांतील साम्यभेद स्पष्ट करा.**

| उत्तर : बसौली कलम | कांग्रा कलम |
|---|---|
| १. पहाडी कलेची एक प्रमुख शैली. | १. पहाडी कलेची एक प्रमुख शैली. |
| २. सर्वांत आरंभीचे कलम. | २. सापेक्षतया नंतरचे कलम. |
| ३. सतरावे शतक हा उत्कर्षकाळ. | ३. अठरावे शतक हा उत्कर्षकाळ. |
| ४. या शैलीवर भित्तिचित्रांचा परिणाम. | ४. या शैलीवर लघुचित्रांचा परिणाम. |
| ५. ग्रामीण चित्रशैली. | ५. नागर चित्रशैली. |
| ६. रेषा ढोबळ, रंग भडक, स्त्रिया पुरुषी थाटाच्या व रचनेत जोमदारपणा. | ६. स्त्रिया स्त्रियांसारख्या नाजुक व एकूण रचना सुकुमार. |
| ७. मनुष्याकृतींच्या चित्रणास प्राधान्य. | ७. मनुष्य व निसर्ग या दोहोंचे सारखेच उत्कृष्ट चित्रण. |
| ८. प्रणयचित्रणात ग्रामीणपणा. | ८. प्रणयचित्रणात सुसंस्कृतपणा. |
| | ९. जगप्रसिद्ध शैली. मांडकु व नैनसुख हे मुख्य चित्रकार. |

**प्रश्न ३ : 'गढवाल कलम' या विषयावर टीप लिहा.**

**उत्तर** : पहाडी चित्रकलेच्या प्रमुख शैलींमध्ये गढवाल कलमाचा समावेश होतो. ही शैली गढवाल भागात अठराव्या शतकात कांग्रा शैलीच्या अनुकरणामधून जन्माला आली. या शैलीत रुक्मिणी-मंगल, नल-दमयन्ती, अष्टनायिका, रामायण, महाभारत, दशावतार, नवग्रह इत्यादी विषयांवर चित्रे काढलेली आढळतात. या शैलीतील कोणतेही एक चित्र दुसऱ्या चित्रासारखे नाही. या शैलीतील चित्रगत व्यक्तीच्या चेहरेपट्टीची ठेवण पृथगात्म आहे. ही शैली इतर शैलींहून वेगळी आहे. कवी भोलाराम हा या शैलीचा सर्वश्रेष्ठ चित्रकार. त्याने आपल्या अनेक चित्रांत स्वरचित काव्यपंक्ती उद्धृत केल्या आहेत.

# प्रकरण ३० : मुसलमानी वास्तुकलेचे स्वरूप

**प्रश्न १ : खालील 'अ' गटातील शब्दांना अनुरूप 'ब' गटातील शब्द निवडून जोड्या जुळवा व त्या लिहून काढा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १. मुसलमानांचे प्रार्थनामंदिर | १. मिम्बर |
| २. मशिदीतील मध्यवर्ती आयताकृती चौक | २. मिनार |
| ३. लिवाण | ३. जिच्यापुढे प्रार्थना करतात ती भित |
| ४. मिहराव | ४. चौकाभोवतीची स्तंभयुक्त पडवी |
| ५. इमामाचे व्यासपीठ | ५. हजरा |
| ६. मुआझिनची आरोळीची जागा | ६. सिह |
| ७. शव पुरण्याची खोली | ७. मशीद |
| ८. कबर | ८. मशीद व यात्रेसाठी सभागृह |
| ९. दरगा | ९. खालचे थडगे. |

**उत्तर :**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १. मुसलमानांचे प्रार्थनामंदिर | १. मशीद |
| २. मशिदीतील मध्यवर्ती आयताकृती चौक | २. सिह |
| ३. लिवाण | ३. चौकाभोवती स्तंभयुक्त पडवी |
| ४. मिहराव | ४. जिच्यापुढे प्रार्थना करतात ती भित |
| ५. इमामाचे व्यासपीठ | ५. मिम्बर |
| ६. मुआझिनची आरोळीची जागा | ६. मिनार |
| ७. शव पुरण्याची खोली | ७. हजरा |
| ८. कबर | ८. खालचे थडगे |
| ९. दरगा | ९. मशीद व यात्रेसाठी सभागृह |

**प्रश्न २ : खालील शब्दांची थोडक्यात स्पष्टीकरणे करा.**

१. खाना, २. मद्रसा, ३. महाल, ४. मद्रन, ५. सराई, ६. सरदाब,

७. इदगाह, ८. दिवाण-इ-आम, ९. हवामहल, १०. दरबार, ११. दिवाण-इ-खास व १२. छत्री.

**उत्तर : (१) खाना** – राहाण्याच्या ठिकाणास खाना म्हणतात.

(२) **मद्रसा** – कुराणप्रभृती धर्मग्रंथ शिकविण्याची शाळा.

(३) **महाल** – श्रीमंताचे घर महाल नावाने ओळखले जाते.

(४) **मर्द्रन** – मर्द्रन म्हणजे पुरुषांची राहाण्याची खोली.

(५) **सराई** – राजवाडा.

(६) **सरदाब**–तळघरातील थंड हवेच्या खोलीसाठी हा शब्द वापरण्यात येतो.

(७) **इदगाह** – सामुदायिक प्रार्थनेसाठी भिंतींनी चौफेर वेढलेले मैदान.

(८) **दिवाण-इ-आम**–जनतेच्या सभेच्या खोलीला दिवाण इ-आम म्हणतात.

(९) **हवामहल**–हवामहल म्हणजे वाऱ्यासाठी बांधलेली छपरावरील गच्ची.

(१०) **दरबार** – उत्सवाची जागा दरबार म्हणून संबोधली जाते.

(११) **दिवाण-इ-खास** – दरबारी लोकांच्या सभेची खोली.

(१२) **छत्री** – बगिचाच्या मधोमध असलेल्या मंडपास छत्री म्हणतात.

**प्रश्न ३ : मुसलमानी वास्तुकलेतील महत्त्वाचे प्रकार कोणते ?**

**उत्तर** : मशीद, खाना, मद्रसा, इदगाह, महाल, सराई, दिवाण-इ-आम, दिवाण-इ-खास व बगिचे हे मुसलमानी वास्तुकलेचे महत्त्वाचे प्रकार होत.

# प्रकरण ३१ : मुसलमानी वास्तुकलेचा उदय

**प्रश्न १ : 'जसा देश तशी त्याची कला' या विधानाची सत्यता पटवा.**

**उत्तर** : कोणतीही कला म्हणजे कलावंताच्या व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार होय. कलावंताचे वैयक्तिक संस्कार, त्याच्या परिसरातला भूगोल, त्याने मिळविलेले ज्ञान व विविध व्यक्तींशी आलेला त्याचा संबंध-संपर्क या सर्वांच्या आघात-प्रत्याघातांमधून वा मिश्रणामधून त्याचे व्यक्तिमत्त्व साकार होत असते. कलावंत संस्कारक्षम असल्यामुळे तो हे सर्व संस्कार साक्षेपाने आत्मसात करतो व त्यांच्या संकलित परिणामांमधून त्याची एक विशिष्ट कलादृष्टी स्थिरपद होते. या कलादृष्टीने त्याची कलासृष्टी रंगून निघत असते. मध्ययुगातील भारतीय कलाकाराचे उदाहरण घेऊन हा मुद्दा अधिक स्पष्ट करता येण्यासारखा आहे.

भारत हा देश फळाफुलांनी व निसर्गसौंदर्याने संपन्न असल्यामुळे प्राचीन

भारतीय कलाकाराने चित्र, शिल्प, स्थापत्य इत्यादी सर्वच कलांची सौंदर्यपूर्ण सजावट साधली. त्याची कला अलंकारप्रधान होती. परंतु, मध्ययुगात भारतीय कलाकाराचा मुसलमान, पठाण, मोगल इत्यादी सत्ताधीशांशी व कलाकारांशी संबंध आला. या संबंधाचा भारतीय कलावंताच्या कलादृष्टीवर अपरिहार्य परिणाम झाला. त्यामुळे त्याच्या कलेचे पूर्वीचे स्वरूप पालटले. इस्लामची भूमी शुष्क व वैराण असल्यामुळे इस्लामी स्थापत्यकला साधी, उंच व भव्य आहे. इजिप्तचे पिरॅमिडस हे याचे उत्तम उदाहरण होय. इस्लामी कला अलंकरणावर भर देत नाही याचे कारण तिच्या भोवतालचा परिसर हे आहे.

इस्लामी धर्मात शिल्प व चित्र बनविण्यास मनाई आहे. त्यामुळे इस्लामी इमारतीत शिल्पाकृती व चित्राकृती रेखाटलेल्या आढळत नाहीत. इस्लामी स्थापत्य निरलंकृत व साधे आहे. तरीही ते चित्ताकर्षक व सुंदर आहे.

तात्पर्य, एखाद्या कलाशैलीचे विशिष्ट स्वरूप ती ज्या देशात जन्माला येऊन बहरते त्या देशाचा भूगोल, हवामान, त्या देशातील लोकांचे धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक संकेत इत्यादी सर्वांवर अवलंबून असते. म्हणूनच **जसा देश तशी त्याची कला** हे विधान सत्य आहे.

### प्रश्न २ : इस्लामी कलेची वैशिष्ट्ये नमूद करा.

**उत्तर** : इस्लामी कलेचा जन्म इस्लामी भूमीत व धार्मिक वातावरणात झाला. इस्लामी भूमी शुष्क व वैराण आहे. तिचा परिणाम इस्लामी कलाकारांच्या मनावर झाला. त्यामुळे इस्लामी कलेत अलंकरणाला महत्त्व नाही. तिच्यात साधे-पणातील आकर्षकपणावर व सौंदर्यावर भर आहे. इजिप्तचे पिरॅमिडस याच कारणामुळे भव्य पण साधे आहेत.

इस्लामी धर्मात शिल्प व चित्र बनविण्यास मनाई आहे. त्यामुळे इस्लामी कलेत, विशेषत: इमारती व प्रार्थनामंदिरे यांत, चित्र-शिल्पांना स्थान नाही. या कारणामुळे साधेपणा हे इस्लामी कलेचे ठळक वैशिष्ट्य बनले आहे.

इस्लामी कलावंतांनी इमारती आकर्षक बनविण्यासाठी फक्त मोझेईकचा उपयोग केला. त्यांनी दगड व काचेचे रंगीत तुकडे इमारतीत बसवून नक्षी निर्माण केली. या नक्षीकामात सुंदरता व विविधता आहे आणि याबाबतीत तिचे स्थान अद्वितीय आहे. मोझेईकच्या नक्षीखेरीज इस्लामी कलाकारांनी इमारतींच्या अलंकरणासाठी सुंदर अक्षरलेखनाचाही उपयोग करून घेतला. त्यांनी कुराणातील वचने भिंतीवर खोदून इमारतींची शोभा वाढविली. हे खोदकाम नक्षीइतकेच सुबक व आकर्षक असते.

भारतावर पठाण, अफगाण, मोगल इत्यादी अनेक वंशांतील मुसलमानांनी स्वाऱ्या केल्या व या देशात राज्ये स्थापन केली. सुरुवातीच्या मुसलमानी राज्य-

कर्त्यांनी विटा व लाकडे यांच्या निरलंकृत इमारती बांधल्या. मुसलमानी रियासत दिल्लीत सुस्थिर झाल्यानंतर बांधकामाच्या कलेस गती लाभली. कुतुबुद्दीन ऐबक हा इमारती बांधण्याचा षौकीन होता. इ. स. १२१० मध्ये कुत्ब मशीद बांधण्यात आली. पण ती हिंदू मंदिरांचे भग्नावशेष गोळा करून बांधलेली होती. याच काळात 'अडीच दिवसांची झोपडी' या नावाने प्रसिद्ध असलेली एक मशीद अजमीरपाशी बांधण्यात आली. हिचे खांब, घुमट व कमानी यांची रचना जैन मंदिराच्या रचनेसारखी आहे. या काळातील सर्वश्रेष्ठ इमारत म्हणजे कुत्बमिनार. उंची व घाटदारपणा यांमुळे या इमारतीस वेगळीच भव्यता प्राप्त झाली आहे. हिची सजावट साधी पण सुंदर असून हिच्यावर खोदलेल्या कुफिक लिपीतील अक्षरांमुळे सौंदर्यात भर पडली आहे. शमसुद्दीन अल्तमशने दिल्लीत बांधलेली कबर प्रारंभिक इस्लामी स्थापत्याचा सुंदर नमुना आहे. ह्या इमारतीस अरबी अक्षरे व नक्षी यांच्या योगे मोहकपणा प्राप्त झाला आहे.

वरील कलाकृतींखेरीज खिलजी वंशीयांच्या कारकीर्दीत बांधण्यात आलेला अली दरवाजा हा इस्लामी स्थापत्याच्या विकासातील महत्त्वाचा टप्पा आहे. या एकसंध इमारतीत विविध आकारांचा समन्वय साधण्यात आला असून कलात्मक गुंफण केलेली आहे. मध्य व पश्चिम आशियातील इस्लामी कारागीर दिल्लीला आल्यामुळे वरीलसारख्या स्थापत्यात हिंदु-इस्लामी प्रवृत्तींचा समन्वय दिसू लागला.

तघलख वंशाच्या राज्यकर्त्यांनी किल्ले, गड व कबरी मोठ्या प्रमाणावर बांधल्या फिरोजशहाने अनेक इमारती बांधवल्या. उदाहरणार्थ, फिरोजशाह कोटला हा गढमहाल (fortress palace). हा वेगळ्या प्रकारच्या स्थापत्य-शैलीचा नमुना आहे. या शैलीचे संगोपन व संवर्धन अकबर व शाहजहान यांनी केले.

तैमूरलंग भारतीय कलाकारांना समरकंदला घेऊन गेला. त्यामुळे दिल्लीत कलाकारांची उणीव भासू लागली व बांधकामे मागे पडू लागली. सैय्यद व लोदी या वंशांच्या राजवटीत शांतता प्रस्थापित होऊन पुनः स्थापत्यकलेला बरे दिवस आले. परंतु, त्या बांधकामात उत्साह व जोमदारपणा नव्हता. या काळात फक्त मकबरे व कबरीच बांधल्या गेल्या. मात्र अष्टकोणी आकार हे एक नवे वैशिष्ट्य प्रचलित झाले. लोदीवंशाच्या पराभवाबरोबर इस्लामी स्थापत्याचाही अस्त झाला.

**प्रश्न ३ : खालील विषयांवर माहितीपूर्ण टिपणे लिहा :**

(क) कुत्ब मिनार, (ख) टॉवर.

**उत्तर : (क) कुत्ब मिनार** : ही इमारत दिल्लीला कुवत-उल-इस्लाम नामक मशिदीच्या आवारात असून जगातील एक परिपूर्ण टॉवर म्हणून ख्याती पावली आहे. कुत्बुद्दीन एबकाने बांधलेल्या या इमारतीची एकूण उंची ७१-४० मीटर असून

पायाचा घेर १४.८ मीटर आहे. हिला एकूण पाच मजले असून लाल रेतीचा दगड व संगमरवर यांचा बनविलेला वर्तुळाकार जिना आहे त्याला एकूण ३७९ पायऱ्या आहेत. अगदी वरचा मजला ३ मीटर व्यासाचा आहे. प्रत्येक मजल्यावर नक्षीकामाने युक्त कठडे आहेत. खालच्या तीन मजल्यांवर कुफिक व तुघरा लिपींतील कोरीव लेख आहेत. असे म्हणतात की मुळात येथे हिंदूंचे मंदिर होते. कालान्तराने त्याचे कुत्बमिनारात रूपान्तर करण्यात आले. हे फेरफार करण्यास कुत्बुद्दीनने इ. स. ११९९ साली सुरुवात केली व अल्तमशने ते काम इ. स १२२० मध्ये पुरे केले. इ. स. १३६८ साली या इमारतीवर वीज पडल्यामुळे हिचे खूप नुकसान झाले, तेव्हा फिरोजशहाने ही इमारत पुन: बांधविली. इ. स. १७८२ व १८०३ मध्ये भूकंपामुळे या इमारतीची फार मोडतोड झाली. परंतु, इ. स. १८२९ मध्ये या इमारतीचे पुन: बांधकाम करण्यात आले. हिची सजावट मोजकीच परंतु आकर्षक आहे. पहिल्या तीन मजल्यांवर उभे कंगोरे आहेत, त्यामुळे प्रेक्षकांचे लक्ष वर खेचले जाते. प्रस्तुत टॉवर हा हिंदु-मुस्लिम वास्तुशैलीचा भव्य आविष्कार आहे. ह्याच्या उंचीमुळे व घाटदार आकारामुळे ह्याला अपूर्वता लाभली आहे.

(ख) **टॉवर :** संरक्षणाचा हेतू डोळ्यांसमोर ठेवून बांधल्या गेलेल्या उंच इमारतीस मुळात टॉवर म्हणत असत. म्हणून कालान्तराने कोणत्याही उंच इमारतीस टॉवर म्हणण्याची प्रथा पडली. पूर्वी लष्करी हेतूने व धर्मकार्यासाठी अशा इमारती बांधण्यात येत असत. आक्रमण करीत येणाऱ्या शत्रूवर उंच ठिकाणावरून अस्त्र फेकणे सुलभ व्हावे हा लष्करी टॉवर्सचा उद्देश असे. कालांतराने भक्ताला सूर्य, चंद्र व तारे इत्यादी देवतांच्या अधिकाधिक जवळ जाऊन पूजा केल्याचे श्रेय मिळावे या धार्मिक उद्दिष्टाने टॉवर्स बांधण्यात येऊ लागले. पुढील काळात घड्याळासाठी शहरातील सभागृहाला टॉवर्स बांधण्यात येऊ लागले. पूर्वी फ्रान्स, जर्मनी व नेदर्लंड्स्-मधील हॉटेलांच्या इमारतींना टॉवर्स असत.

मध्य युगात मुस्लिम स्थापत्यशास्त्रज्ञांनी अनेक टॉवर्स बांधले. बहुसंख्य टॉवर्स नमाजाची बांग (प्रार्थनेचे निमंत्रण) देण्यासाठी बांधलेले असत. दिल्लीचा कुत्बमिनार हे भारतातील टॉवर्सचे सर्वोत्तम उदाहरण होय. हिंदूंच्या मंदिरातही टॉवर्ससारखे बांधकाम महत्त्वाचे मानले जात असे. दक्षिणेतील मंदिरांची गोपुरे म्हणजे एक प्रकारचे टॉवर्सच.

# प्रकरण ३२ : विविध प्रांतांत विखुरलेली मुसलमानी वास्तुशैली

**प्रश्न १ : खालील वाक्यांतील चुका दुरुस्त करून ती पुन्हा लिहा.**

(अ) मुसलमानी वास्तुकलेच्या पंधरा प्रमुख शैली निर्माण झाल्या.
(आ) मुसलमानी वास्तुशैलीस दिल्लीला आरंभ झाला.
(इ) पंजाब शैलीतील बांधकाम दगडातच केले गेले.
(ई) मुलतान येथील गयासुद्दीनची कबर पंजाब शैलीचे उत्तम उदाहरण होय.
(उ) रुख-इ-आलमच्या कबरीचा आकार षट्कोनी आहे.
(ऊ) बंगाली वास्तुशैलीत प्रामुख्याने संगमरवराचाच वापर केलेला आढळतो.
(ए) बंगाली शैली मुर्शिदाबाद जिल्ह्यात उदयास आली.
(ऐ) बंगाली शैलीतील आंदिना मशीद कलकत्त्यास आहे.
(ओ) सर्वोत्कृष्ट हस्तिदंती कामासाठी गुजरात भारतात प्रसिद्ध आहे.
(औ) गोवळकोंड्यास निर्माण झालेली शैली सुलतान शैली म्हणून ओळखली जाते.
(अं) दक्षिण शैलीवर प्रामुख्याने रोमन कलेचा परिणाम दिसतो.
(अः) गोलघुमट ही सुप्रसिद्ध इमारत हैदराबाद येथे आहे.
(क) गोलघुमट शहाजहान बादशाहाने बांधला.
(ख) गोलघुमटात आवाज परावर्तित होऊन चार वेळा ऐकू येतो असे म्हणतात.
(ग) शालिमार बाग हे प्रेक्षणीय स्थळ पंजाबात आहे.

**उत्तर :** (अ) मुसलमानी वास्तुकलेच्या **आठ** प्रमुख शैली निर्माण झाल्या.
(आ) मुसलमानी वास्तुशैलीस **मुलतान** व **लाहोर** येथे आरंभ झाला.
(इ) पंजाब शैलीतील बांधकाम **विटांतच** केले गेले.
(ई) मुलतान येथील **रुख-इ-आलमची** कबर पंजाबशैलीचे उत्तम उदाहरण होय.
(उ) रुख-इ-आलमच्या कबरीचा आकार **अष्टकोनी** आहे.
(ऊ) बंगाली वास्तुशैलीत प्रामुख्याने **लाकूड** व **बांबू** यांचाच वापर केलेला आढळतो.
(ए) बंगाली शैली **मालदा** जिल्ह्यात उदयास आली.
(ऐ) बंगाली शैलीतील आंदिना मशीद **पांडुआस** आहे.

(ओ) सर्वोत्कृष्ट **लाकुडकामासाठी** गुजरात भारतात प्रसिद्ध आहे.

(औ) गोवळकोंडयास निर्माण झालेली शैली **दक्षिण** शैली म्हणून ओळखली जाते.

(अं) दक्षिण शैलीवर प्रामुख्याने **पर्शियन/इराणी** कलेचा परिणाम दिसतो.

(अः) गोलघुमट ही सुप्रसिद्ध इमारत **विजापूर** येथे आहे.

(क) गोलघुमट **महमद आदिलशाह** बादशाहाने बांधला.

(ख) गोलघुमटात आवाज परावर्तित होऊन **सात** वेळा ऐकू येतो असे म्हणतात.

(ग) शालिमार बाग हे प्रेक्षणीय स्थळ **काश्मिरात** आहे.

**प्रश्न २ : मुसलमानी वास्तुकलेच्या प्रमुख शैली किती ? त्यांची नावे लिहा :**

**उत्तर :** मुसलमानी वास्तुकलेच्या प्रमुख शैली आठ. त्यांची नावे अशी : १. पंजाब, २. बंगाल, ३. गुजरात, ४. जौनपूर, ५. माळवा, ६. दक्षिण, ७. विजापूर व ८. काश्मीर.

**प्रश्न ३ : 'गोलघुमट' या विषयावर टीप लिहा.**

**उत्तर :** मुसलमानी वास्तुकलेच्या ज्या आठ प्रमुख शैली आहेत त्यांपैकी एकीला विजापूर शैली म्हणतात. विजापूरच्या राज्यकर्ता आदिलशाहाने या प्रांतिक शैलीस मनापासून प्रोत्साहन दिले व त्यामुळे या शैलीत अनेक कलापूर्ण व उत्कृष्ट इमारती बांधल्या गेल्या. गोलघुमट ही त्यांपैकी सर्वोत्कृष्ट इमारत होय. विजापूरच्या महमद आदिलशाहाने (इ. स. १६२६–१६६६) हा भव्य घुमट बांधला. ५० मीटरांच्या घनाकारावर अष्टकोनी चौथरा असून त्यावर ५३·४० मीटर उंचीचा अर्धवर्तुळाकार घुमट आहे. त्याच्या बाह्याकाराचा परिघ ४३·२० मीटर आहे. हे सबंध स्थापत्य परस्परांना छेदणाऱ्या कमानींवर आधारलेले आहे. याचे भौतिक क्षेत्रफळ २०२० चौरस मीटर आहे. या घुमटात आवाज परावर्तित होऊन सात वेळा ऐकू येतो असे सांगतात. एकाच दगडाच्या घुमटाचे हे स्थापत्य सबंध जगात दुसरीकडे कोठेही नाही.

✻ ✻

# प्रकरण ३३ : राजवैभवाने नटलेली मोगल वास्तुकला

**प्रश्न १ : खालील विधानांतील चुका दुरुस्त करून ती विधाने पुन्हा लिहा.**

(अ) मोगल वास्तुकलेच्या भरभराटीस हुमायूनच्या कारकीर्दीत सुरुवात झाली.

(आ) अकबराच्या विशिष्ट धोरणामुळे प्राचीन ग्रीक वास्तुविद्येचा मोगल वास्तुकलेवर अनुकूल परिणाम झाला.

(इ) हुमायूनची कबर बाबराने बांधली.

(ई) हुमायूनच्या कबरीत रोमन व ख्रिस्ती वास्तुकलांचा मधुर संगम घडला.

(उ) फत्तेपूर-शिक्री ही शाही नगरी बाबराने वसविली.

(ऊ) बुलंद दरवाजा आग्र्याला आहे.

(ए) शहाजहानची कारकीर्द म्हणजे मुसलमानी वास्तुकलेचा अगदी प्रारंभीचा काळ.

(ऐ) अकबरकालात मुख्यत: संगमरवर वापरलेला दिसतो तर शहाजहान-कालात मुख्यत: लाल वाळूचा दगड वापरलेला दिसतो.

(ओ) शहाजहानच्या काळात पाच पाकळ्यांच्या महिरपींनी नटलेल्या कमानी तयार होऊ लागल्या.

(औ) संगमरवरामुळे इमारतींच्या अंतरंगाची शुभ्रता वाढली.

(अं) ताजमहाल दिल्लीला असून तो गंगेच्या काठी आहे.

(अः) औरंगजेब चित्रवास्तुप्रभृती कलांचा अतिशय भोक्ता होता.

**उत्तर** : (अ) मोगल वास्तुकलेच्या भरभराटीस **अकबराच्या** कारकीर्दीत सुरुवात झाली.

(आ) अकबराच्या विशिष्ट धोरणामुळे प्राचीन **भारतीय** वास्तुविद्येचा मोगल वास्तुकलेवर अनुकूल परिणाम झाला.

(इ) हुमायूनची कबर **हर्जाबेगमने** बांधली.

(ई) हुमायूनच्या कबरीत **हिंदू** व **पर्शियन** वास्तुकलांचा मधुर संगम घडला.

(उ) फत्तेपूर-शिक्री ही शाही नगरी **अकबराने** वसविली.

(ऊ) बुलंद दरवाजा **फत्तेपूर-शिक्रीला** आहे.

(ए) शहाजहानची कारकीर्द म्हणजे मुसलमानी वास्तुकलेच्या **अपूर्व वैभवाचा** काळ.

(ऐ) अकबरकालात मुख्यत: **लाल वाळूचा** दगड वापरलेला दिसतो तर शहाजहानकालात मुख्यत: **संगमरवर** वापरलेला दिसतो.

(ओ) शहाजहानच्या काळात **नऊ** पाकळ्यांच्या महिरपींनी नटलेल्या कमानी तयार होऊ लागल्या.

(औ) संगमरवरामुळे इमारतींच्या अंतरंगाची **नाजुकता** वाढली.

(अं) ताजमहाल **आग्र्याला** असून तो **यमुनेच्या** काठी आहे.

(अ:) औरंगजेब चित्रवास्तुप्रभृती कलांचा अतिशय **द्वेष्टा** होता.

## प्रश्न २ मोगल युगाचे स्थापत्य या विषयावर निबंध लिहा.

**उत्तर :** मोगलांचे भारतात साम्राज्य स्थापन झाल्यानंतर हिंदु-इस्लामी स्थापत्याच्या नव्या मनूस प्रारंभ झाला. सम्राटांच्या समृद्धीमुळे कला फोफावली. सम्राट केवळ कलारसिक नव्हते तर त्यांना उच्च दर्जाची कलादृष्टीही होती. संपूर्ण भारत कलासंपन्न बनविण्याची त्यांची मनीषा होती.

मोगल शैलीला अकबराच्या काळात बळकट स्वरूप लाभले. त्याने बंगाल व गुजरात प्रांतांतून कसबी कारागीर आणवून त्यांच्याकरवी असंख्य महाल, कबरी, मशिदी व शहरे उभारली. अकबराने पूर्ण केलेली हुमायूनची कबर प्रारंभिक मोगल शैलीचा सुंदर नमुना आहे. प्रमाणबद्ध आकार, साधे व संयमपूर्ण कोरीव काम आणि लाल रेतीच्या दगडाशी संगमरवरी दगडाचे सांधलेले सुभग मिश्रण ही या कबरीची चित्तवेधक वैशिष्टये आहेत. अकबराच्या काळात बांधकामामध्ये लाल रेतीच्या दगडांचे प्राधान्य होते. त्याने अनेक ठिकाणी गढमहाल (fortress palaces) बांधविले. त्यांपैकी आग्र्याचा गढमहाल हा अगदी पहिला. तो महाल भरदार व दिमाखदार आहे. ही अकबरकालीन श्रेष्ठ इमारत मानली जाते.

अकबराने फत्तेपूर शिक्रीचे शहर बांधविले. भव्य स्थापत्याचा हा एक उत्कृष्ट नमुना आहे. हवामहल, जोधाबाईचा महाल, दीवान-इ-खास, जुम्मा मशीद, संत सलीम किश्तीची कबर, बुलंद दरवाजा ह्या फत्तेपूर शिक्रीतील प्रेक्षणीय इमारती आहेत. या सर्वच इमारती भव्य, बळकट व लालित्यपूर्ण आहेत. ह्या इमारती आकाराने प्रचंड असल्या तरी डोळ्यांस खुपणाऱ्या नाहीत. ह्या इमारतींवर बारीक-बारीक खोदकाम करण्यात आले आहे.

जहांगिराने सिकंदराबादेला बांधविलेली अकबराची कबर मोगल स्थापत्याच्या परंपरेला धरूनच आहे. हिचे प्रवेशद्वार भव्य असून हिला चार मनोरे आहेत. नूरजहानने बांधविलेली इतमद्-उद्-दौलाची कबर (१६२८–१६३०) अकबरकालीन व शाहजहानकालीन कला-परंपरांना सांधणारा जणू दुवा आहे. तिची सजावट नाजूक

व अलंकारप्रधान असून मोझेईकने साधलेली आहे. त्यात नाजूकपणा व लालित्य हे गुण आहेत. साक्षेपी बांधणीमुळे ह्या सबंध स्थापत्यात सफाईदारपणा व निर्दोषपणा उतरला आहे.

शाहजहानचा काळ मोगल स्थापत्याचे सुवर्णयुग मानले जाते. त्या काळात संगमरवराचा उपयोग मुख्यत्वेकरून झाला. त्या काळातील इमारतीत लालित्य व भव्यता हे दोन्ही गुण उतरले आहेत. शाहजहानने आग्र्यात बांधवून घेतलेल्या दीवान-इ-खास, दीवान इ-आम व मोती मशीद या तीन इमारती केवळ अप्रतिम आहेत. त्यानेच दिल्लीचा ३१०० फूट लांबीचा व १६५० फूट रुंदीचा लाल किल्ला बांधवून घेतला. त्यातील रंगमहाल व दीवान-इ-आम या इमारती विशेष प्रेक्षणीय आहेत. किल्ल्याची उंची ७५′ असून त्यात राजवाडे, बागा, लष्करी खोल्या व इतर इमारती आहेत. दीवान-इ-आमला ६० खांब असून दीवान-इ-खासमध्ये मोगल कलेचे परिपूर्ण रूप दिसून येते. जुम्मा मशीदही त्यानेच बांधवून घेतली. ती आकाराने प्रचंड असून स्थापत्यदृष्ट्या आकर्षक आहे.

परंतु शाहजहानने बेगम मुमताज महलसाठी बांधविलेला नाजुक व देखणा ताजमहाल म्हणजे जगातील कलाक्षेत्रामधील एक चमत्कार आहे. ही बेगमच्या स्मरणार्थ बांधविलेली कबर आहे. दुधासारख्या शुभ्र अशा या इमारतीमधून सौंदर्य जणू ओसंडून वाहात असते. ताजमहालाचा आकार अद्‌भुत असून आतील सजावट अपूर्व आहे. रंगीत दगड संगमरवरात बसवून साधलेली नक्षी विलोभनीय आहे. यमुनेच्या एका किनाऱ्यावर ताजमहाल असून दुसऱ्यावर शाहजहानची अपुरी राहिलेली काळ्या दगडांची कबर आहे.

औरंगजेब हा कलेचा शत्रू असल्यामुळे त्याच्या काळात औरंगाबादेच्या बीबीच्या मकबऱ्याखेरीज उल्लेखनीय असे कोणतेच कलाकार्य साकार झाले नाही. नंतरच्या काळात ज्या थोड्या उत्कृष्ट इमारती बांधण्यात आल्या त्यांमध्ये अमृतसरचे सुवर्णमंदिर, ग्वाल्हेर, लखनौ, जयपूर, जोधपूर व उदेपूर येथील इमारती यांचा समावेश होतो.

**प्रश्न ३ : पुढील बांधकामांविषयी माहिती लिहा.**

(अ) ताजमहाल, (ब) फत्तेपूर-शिक्री

**उत्तर : (अ) ताजमहाल** – हा स्थापत्यकलेचा जगातील सर्वोत्कृष्ट नमुना आहे. या संगमरवरी स्थापत्याचे वर्णन प्रवासी व कलासमीक्षक " the world's most sublime building " असे सातत्याने करीत आले आहेत. या स्थापत्यामुळे आग्रा शहर ' ताजमहालाची नगरी ' म्हणून ओळखले जाते. ही एक कबर असून

ती शाहजहान बादशाहाने मुमताज महल नावाच्या आपल्या पत्नीच्या स्मरणार्थ यमुनाकाठी बांधविली. मुमताजचे इ. स. १६१२ साली बादशाहाशी लग्न झाले. इ. स. १६३१ मध्ये ती प्रसूतीच्या वेळी वारली. तिच्या स्मरणासाठी बादशाहाने इ. स. १६३२ साली या कबरीच्या बांधकामास प्रारंभ केला. ह्या इमारतीचे नकाशे प्रथमतः भारतीय, पर्शियन व मध्य आशियाई स्थापत्यशास्त्रज्ञांनी काढले होते. परंतु अंतिम आराखडा उस्ताद इसा नावाच्या तुर्की (किंवा पर्शियन) स्थापत्य-शास्त्रज्ञाने पक्का केला. या इमारतीच्या बांधकामासाठी गवंडी, खोदकाम करणारे, बांधकाम करणारे व कोरीव-काम करणारे कारागीर सबंध भारतामधून व मध्य आशियातून बोलावण्यात आले होते आणि दगड मकरानच्या खाणीतून आणविला होता. या स्थापत्याच्या उभारणीसाठी दररोज २० हजार कामगार खपत होते. हे काम सतत १२ वर्षे चालू होते. ते इ. स. १६४३ साली पूर्ण झाले. या बांधकामास एकूण ४० कोटी रुपये खर्च झाला. ही इमारत ६.६० मीटर उंचीच्या चौथऱ्यावर उभी असून हिची वरच्या घुमटासह एकूण उंची ५६.१० मीटर आहे. या स्थाप-त्याची दक्षिणोत्तर लांबीरुंदी ६३४ यार्ड × ३३४ यार्ड अशी आहे. याच्या प्रत्येक बाजूस ३३४ चौरस यार्डांची सुंदर बाग आहे व तिच्यात तलाव आहेत. दक्षिणेस मुख्य प्रवेशद्वार असून उत्तरेस कबर आहे. पूर्वेस व पश्चिमेस सारख्या आकाराच्या इमारती आहेत. त्यांना मस्जीद व जबाव म्हणतात. चारी बाजूंस लाल दगडांची भिंत आहे बाहेरच्या बाजूस तबेले, रक्षकांची निवासस्थाने वगैरे इमारती आहेत. सबंध इमारत म्हणजे एक प्रचंड स्मारक असून मस्जीद व जबाब कबरीसमोरच आहेत. कबर संगमरवरी असून मस्जीद व जबाब लाल रेतीच्या दगडाच्या आहेत. कबर ३१२ चौरस फूट उंचीच्या चौथऱ्यावर आहे. ती २३ फूट उंच असून तिच्या प्रत्येक बाजूस प्रचंड कमानी आहेत. वर दोन घुमट असून त्यांच्या शिखरांच्या टोकांची उंची २४३ फूट आहे. चौथऱ्याच्या प्रत्येक कोपऱ्यावर ३ मजली मनोरे असून त्यांची उंची ४१.१० मीटर आहे. आतल्या भागात अष्टकोनी दालन आहे. या समग्र स्थापत्याचा एकूण आकार अद्भुत आहे. या स्थापत्याच्या कोनाकोपऱ्यातून सौंदर्य जणू ओसंडून वाहात आहे. या दुग्धशुभ्र इमारतीच्या आतील भागाची सजा-वटही अपूर्व आहे. रंगीत दगड संगमरवरी दगडात बसवून साधलेली नक्षी अविस्म-रणीय आहे. या स्थापत्यरत्नाबद्दल एच्. आर. नेव्हिल (H. R. Nevill) नामक कलामर्मज्ञाने पुढीलप्रमाणे गौरवपूर्ण उद्गार काढले आहेत. “The Taj····is within more measurable distance of perfection than any other work of man··· Tajmahal, is the finest jewel of the Moghuls.”

(ब) **फत्तेपूर शिक्री– ही** सुंदर नगरी अकबराने वसविली. पूर्वी येथे दाट जंगल असलेले एक टेकाड होते. त्या टेकाडावर सलीम किस्तीने अकबराला दिलेला

पुत्रप्राप्तीचा आशीर्वाद सफल झाल्यामुळे अकबराने त्या टेकाडावर हे शाही नगर वसविले. या शहराची रचना वैशिष्टचपूर्ण व अपूर्व आहे. येथे मधूनमधून चिरेबंदी पायऱ्या, प्रशस्त मैदाने व दरबारी लोकांचे लहानमोठे वाडे आहेत. तेथील रचनेत विविध शिल्पशैलींचे मनोरम दर्शन घडते. या नगरीतील जोधाबाईचा महाल, बिरबलाचा वाडा, दिवाण-इ-खासमधील कमलासन व बुलंद दरवाजा ही अत्यंत प्रेक्षणीय स्थळे आहेत. पैकी बुलंद दरवाजा वैभव व भव्यता यांचे प्रतीक असून अप्रतिम आहे. जमिनीपासून १२.६० मीटर उंचीपर्यंत पायऱ्या असून मग चौथऱ्यावर ४० मीटर उंच व तितकाच लांब असा हा शाही दरवाजा आहे. याच्या दुतर्फा दुमजली रचना आहेत, त्यामुळे तो अतिशय भव्य भासतो. या दरवाज्यावर 'आयुष्य हा एक घटकेचा खेळ आहे, म्हणून ही घटका ईश्वरचिंतनात घालवा, कारण बाकी सर्व अशाश्वत आहे,' अशी ख्रिस्ताची उदात्त वचने कोरलेली आहेत. या दरवाज्यासमोर संगमरवरी व नक्षीकामयुक्त कबर आहे. दरवाजा भव्य असून ही कबर कमालीची नाजूक आहे.

# प्रकरण ३४ : वास्तववादी चित्रकलेचा श्रीगणेशा

**प्रश्न १ : कंसांतील शब्दांपैकी योग्य शब्द निवडून खालील वाक्यांतील रिकाम्या जागा भरा व वाक्ये पुन्हा लिहून काढा :**

(अ) ब्रिटिश सत्ता भारतात स्थिर झाल्यानंतर नवीन कलेचा व कलातंत्राचा ········· झाला. (अस्त, उदय, उत्कर्ष)

(आ) नाना फडणीस, महादजी शिंदे इत्यादींची व्यक्तिचित्रे ········· नामक ब्रिटिश चित्रकाराने रंगविली. (वेल्स, मॅलेट, रॉबर्टस्)

(इ) पेशव्यांनी ········· च्या आवारात कलाविद्यालय सुरू केले. (नानावाड्या, शनिवारवाड्या)

(ई) इंग्रजी विद्वानांनी भारतीय कला······ व ········· आहे असे मत मांडावयास सुरुवात केली. (सजीव, निर्जीव; नियमबद्ध, अनियमित)

(उ) राजा रविवर्मा ········· महाराजांच्या आश्रयाला होते. (बडोद्याच्या, त्रावणकोरच्या, कोल्हापूरच्या)

(ऊ) इ. स. १८५० साली……… येथे पहिले कलाविद्यालय स्थापन झाले. (मुंबई, कलकत्ता, मद्रास)

(ए) मेयो स्कूल ऑफ आर्टस्‌ची स्थापना ……… येथे इ. स. ……… साली झाली. (मुंबई, लाहोर, दिल्ली; १८५७, १८७५, १८८०)

(ऐ) कोटीतीर्थ, पंचगंगा घाट इत्यादी उत्कृष्ट निसर्गचित्रे ……… यांनी काढली होती. (बोमनजी, त्रिनिदाद, आबालाल रहमान)

(ओ) त्रिनिदाद यांच्या चित्रांत………असामान्य जाण दिसून येते. (रेषांची, रंगांची, आकारांची)

(औ) जलरंगांवर ………यांचे विशेष प्रभुत्व आहे. (धुरंधर, बोमनजी, हळदणकर)

**उत्तर :** (अ) ब्रिटिश सत्ता भारतात स्थिर झाल्यानंतर नवीन **कलेचा व कलातंत्राचा उदय** झाला.

(आ) नाना फडणीस, महादजी शिंदे इत्यादींची व्यक्तिचित्रे **वेल्स** नामक **ब्रिटिश** चित्रकाराने रंगविली.

(इ) पेशव्यांनी **शनिवारवाड्याच्या** आवारात कलाविद्यालय सुरू केले.

(ई) इंग्रजी विद्वानांनी भारतीय कला **निर्जीव** व **अनियमित** आहे असे मत मांडावयास सुरुवात केली.

(उ) राजा रविवर्मा **त्रावणकोरच्या** महाराजांच्या आश्रयाला होते.

(ऊ) इ. स. १८५० साली **मद्रास** येथे पहिले कलाविद्यालय स्थापन झाले.

(ए) मेयो स्कूल ऑफ् आर्टस्‌ची स्थापना **लाहोर** येथे इ. स.**१८७५** साली झाली.

(ऐ) कोटीतीर्थ, पंचगंगाघाट इत्यादी उत्कृष्ट निसर्गचित्रे **आबालाल रहमान** यांनी काढली होती.

(ओ) त्रिनिदाद यांच्या चित्रांत **रंगांची** असामान्य जाण दिसून येते.

(औ) जलरंगांवर **हळदणकर** यांचे विशेष प्रभुत्व आहे.

**प्रश्न २ : (१) रावबहादूर धुरंधर व (२) राजा रविवर्मा यांच्या जीवनाचा व कलाविषयक कार्याचा संक्षिप्त परिचय लिहा.**

**उत्तर : (१) कै. रा. ब. धुरंधर** – यांचे संपूर्ण नाव माधवराव विश्वनाथ धुरंधर. त्यांचा जन्म १८–३–१८६७ रोजी झाला. ह्या महाराष्ट्रीय कलाकाराला

जागतिक कीर्ती मिळाली होती. त्यांनी मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण कोल्हापुरास संपवून इ. स. १८९० साली मुंबईच्या जे. जे. महाविद्यालयात प्रवेश घेतला. त्यांचा या संस्थेशी विविध नात्यांनी ४१ वर्षे संबंध होता. त्यांनी प्रथमतः ए. एम्. ची पदवी घेऊन जे जे. स्कूलमध्येच शिक्षक म्हणून कार्य करण्यास प्रारंभ केला. पुढे ते १९१० मध्ये स्कूलचे प्रमुख झाले व १९३० साली स्कूलचे संचालक झाले. ते त्या स्कूलचे पहिले भारतीय संचालक होत. १९२७ साली इंग्रज सरकारने त्यांना रावबहादूर हा किताब दिला. १९३८ साली त्यांनी युरोपचा दौरा केला. अनेक नात्यांनी यशस्वीपणे जीवन घालवून ते १–६–१९४४ रोजी दिवंगत झाले.

कै. धुरंधर एक निष्ठावान कलावंत असून त्यांनी अखेरच्या क्षणापर्यंत कला-सेवा केली. त्यांनी आपल्या शैलीत आलंकारिकपणा व वास्तविकता यांचा समन्वय साधला होता. पाणी, तेल, लेखणी व शाई या सर्वच माध्यमांवर त्यांचे असाधारण प्रभुत्व होते. त्यांचे फिनिशिंग काटेकोर व सुंदर असे. ते निसर्गचित्रे, व्यक्तिचित्रे, रेखाटने, स्थिर जीवनाचे आलेखन इत्यादी सर्व प्रकारची चित्रे सारख्याच प्रभुत्वाने काढीत असत. त्यातल्या त्यात त्यांचे व्यक्तिरेखाटन अपूर्व होते. असंख्य आकृतींची स्पष्ट रेखांकने करणारा त्यांच्यासारखा दुसरा नव्हताच. गती, प्रमाण, भाव व कल्पना या वैशिष्ट्यांनी त्यांची चित्रकला संपन्न होती.

धुरंधरांनी इ. स. १८९२ ते १९३० या कालखंडात अनेक देशी–विदेशी प्रदर्शनांत आपली चित्रे मांडून कैक सुवर्णपदके, रौप्य पदके व पुरस्कार मिळविले. रामायण, महाभारत, मेघदूत, शाकुंतल इत्यादी ग्रंथांतील प्रसंगांवर आधारित धुरंधरांची चित्रे परकीय कलातज्ज्ञांनीही गौरविली. त्यांनी मराठी, हिंदी, गुजराती व तेलुगू भाषांतील मासिकांमधून प्रसिद्ध होणाऱ्या कथांसाठी अनुरूप चित्रे काढली व अशा प्रकारे समाजजीवन व चित्रकला यांची सांगड घातली.

गौरी, नैवेद्य, करवल्या, दिल्ली दरबार, लक्ष्मी, वारकरी, नारायणरावांचा वध या त्यांच्या काही गाजलेल्या कलाकृती होत. त्यांची चित्रे मुंबई, औंध, नागपूर इत्यादी शहरांतील कला-संग्रहालयांत जतन करून ठेवण्यात आली आहेत.

कल्पकता, प्रतिभा, बुद्धिमत्ता व परिश्रमशीलता हे धुरंधरांचे प्रमुख गुण होते. त्यांनी कलाक्षेत्रात युगप्रवर्तन घडवून आणले.

(२) **राजा रविवर्मा**–यांचा जन्म किलिमनूर येथे (केरळ प्रांतात) १८४८ साली झाला. त्रावणकोरच्या राजघराण्याशी त्यांचे घनिष्ट संबंध होते. रामस्वामी नायडू व थिओडॉर जेम्सन या दोन चित्रकार-गुरूंच्या हाताखाली रविवर्मा यांचे शिक्षण झाले. मद्रासचे तत्कालीन राज्यपाल लॉर्ड नेपियर यांनी वार्षिक कला-प्रदर्शन भरविण्याची प्रथा सुरू केली. १८७४ ते १८७८ या दरम्यान भरलेल्या प्रदर्शनांत रविवर्मांना दोनदा राज्यपाल-पदक मिळाले. पहिल्या वेळेस 'सौंदर्य-

प्रसाधन करणारी नायर स्त्री ' व दुसऱ्या खेपेस ' शकुंतला-पत्रलेखन ' ही चित्रे बक्षीसपात्र ठरली. १८७९ मध्ये त्यांनी नेपियरचे व्यक्तिचित्र काढले. तेव्हापासून त्यांनी संस्थानिक व राजे-रजवाडे यांची अनेक कामे केली. त्यांनी पौराणिक विषयांवर काढलेली चित्रे हजारो घरी जाऊन पोचली. त्यांनी आपली चित्रे लिथो प्रेसवर छापली, त्यामुळे त्यांच्या कलेचा प्रसार खूप झाला.

रविवर्मा मानवी शरीराचे रेखाटन यथातथ्यपणे करीत असत. त्यांनी आपल्या चित्रांच्या द्वारे भारतीय विषय व पाश्चिमात्य आदर्श यांचा संगम घडवून आणला. लक्ष्मी, सरस्वती, सागरगर्वहरण, गंगावतरण, सैरंध्री, कृष्णशिष्टाई, शकुन्तला-पत्रलेखन इत्यादी त्यांची प्रसिद्ध चित्रे असून ती म्हैसूर, त्रिवेंद्रम, बडोदा, जयपूर, दिल्ली इत्यादी ठिकाणच्या राजवाड्यांत व चित्रसंग्रहालयांत पाहावयास मिळतात.

**प्रश्न ३ : प्रमुख महाराष्ट्रीय शिल्पकारांच्या कार्याचा थोडक्यात आढावा घ्या.**

**उत्तर :** महाराष्ट्रात शिल्पकलेचा विकास अगदी अलिकडच्या काळात झाला. भिवा सुतार व गणपतिकार गोखले हे सुरुवातीच्या कालखंडातील परंपरागत शिल्पकलेचे अनुयायी. भिवा सुतार संगमरवरी पुतळे करण्यात वाकबगार होते आणि गोखले गणपतीच्या सुबक व देखण्या मूर्ती बनवीत असत.

**रा. ब. म्हात्रे**–पश्चिम भारतातील आद्य प्रतिभाशाली व वास्तववादी शिल्पकार रावबहादूर म्हात्रे होत. त्यांनी पाश्चिमात्य तंत्र व शैली यांचा पुरस्कार केला. स्मारकवजा पुतळे तयार करणारे ते आद्य अर्वाचीन भारतीय शिल्पकार होत. त्यांच्या ' मंदिराकडे ' या शिल्पकृतीने खूप प्रसिद्धी मिळविली. त्यांची एक कलाकृती पॅरिसच्या प्रदर्शनात मांडली गेली होती. ते काही काळ मुंबईच्या कलाविद्यालयात शिक्षक होते.

**श्री. फडके** (१८८४–१९७२)–यांनी शिल्पकलेचे अध्ययन खाजगी रीतीने केले. ते प्लॅस्टरची विविध विषयांवरील हालती चित्रे बनवून त्यांची प्रदर्शने भरवीत असत. मुंबई, मद्रास, कलकत्ता अशा अनेक ठिकाणी त्यांनी प्रदर्शने भरविली होती. सामाजिक व राजकीय परिस्थितीवर ते आपल्या शिल्पकलेच्या द्वारे टीका करीत असत. त्यांच्या प्लॅस्टरच्या चित्रांची प्रदर्शने इंग्लंडात व अमेरिकेतही भरली होती. बॉंबे आर्ट सोसायटीचे शिल्पकलेचे सुवर्णपदक मिळविणारे पहिले शिल्पकार श्री. फडकेच (१९१४) होत. मुंबईच्या चौपाटीवरील टिळकांचा पुतळा त्यांनीच बनविलेला आहे. सरकारने त्यांना पद्मभूषण किताब देऊन त्यांच्या कलेचा गौरव केला. श्री. फडके पटाईत ज्योतिषी, पट्टीचे तबलावादक व परखड साहित्यविमर्शकही होते.

**श्री. तालीम**–हे फडके यांचे समकालीन असून जे. जे. महाविद्यालयाची परीक्षा सुवर्णपदक मिळवून उत्तीर्ण झाले होते. नंतर ते अनेक वर्षे तेथेच सन्माननीय प्राध्यापक होते. ते व्यावसायिक शिल्पकार असून त्यांनी बनविलेले दादाभाई नवरोजी, महात्मा गांधी, वल्लभभाई पटेल इत्यादींचे पुतळे कलाकौशल्यसंपन्न आहेत. त्यांनी Bombay Art Society चे सुवर्णपदक दोन वेळा मिळविले. त्यांनी सुमारे ३०० शिल्पकृती बनविल्या असून त्या अनेक खाजगी व सार्वजनिक संग्रहालयांत जपून ठेवण्यात आल्या आहेत.

**श्री. करमरकर** (१८९१)–हे पश्चिम भारतातील एक प्रख्यात शिल्पकार असून त्यांनी जागतिक कीर्ती संपादिली आहे. त्यांनी प्रथमतः जे. जे. स्कूलचा अभ्यासक्रम संपविला व मग इंग्लंडला जाऊन तेथील Royal Academy of Art-मध्ये कलाशिक्षण घेतले. त्यांनी १९१३ सालापासून शिल्पकार म्हणून स्वतंत्रपणे व्यवसाय सुरू केला. या बाबतीत त्यांना प्रेरणा व प्रोत्साहन श्री. ऑटो रॉथफील्ड नामक एका ब्रिटिश सनदी अधिकाऱ्याने दिले. त्यांनी कलकत्ता, लंडन इत्यादी अनेक ठिकाणी भ्रमंती करून शेवटी मुंबईस कायमचा मुक्काम ठोकला. भारतीय व परदेशी प्रदर्शनांमध्ये भाग घेऊन अनेक पदके, बक्षिसे व प्रशस्तिपत्रके मिळविली आहेत. पुण्यातील १४ फूट उंचीचा शिवाजीचा ब्राँझचा अश्वारूढ पुतळा श्री. करमरकरांनीच बनविलेला आहे. त्यांनी १९२९ साली Bombay Art Society चे सुवर्णपदक मिळविले. त्यांनी इंग्लंड, फ्रान्स, इटली, हंगेरी व अमेरिका या देशांचे दौरे केले आहेत. Bombay Art Society, Art Society of India, ललित कला अकादमी इत्यादी संस्थांशी त्यांचे निकटचे संबंध आहेत.

श्री. गोरेगांवकर, शामराव म्हात्रे, पानसरे, कामत, कोल्हटकर, वाघ, सावर्डेकर, सौ. शीला भाटे, जोग, बाक्रे हे अलीकडील काळातील काही प्रमुख पश्चिम भारतीय शिल्पकार आहेत. आजचा नव्या दमाचा शिल्पकार खूप नवे प्रयोग करीत आहे.

# प्रकरण ३५ : बंगाली शैली

**प्रश्न १ : खालील विषयांवर एकेका वाक्यात टीपा लिहा.**

(अ) बंगाली शैलीचे विशेष, (आ) मुंबई शैलीचा वेगळेपणा, (इ) रवीन्द्रनाथांच्या चित्रांतील आकार, (ई) यामिनी रॉय यांच्या शैलीची वैशिष्टचे, (उ) नंदलाल बोस यांची चित्रकला.

**उत्तर :** (अ) **बंगाली शैलीचे विशेष**–रेषांचे सौंदर्य, आलंकारिक आकार, सपाट रंगपटले व छायाप्रकाशदर्शनाचा अभाव.

(आ) **मुंबई शैलीचा वेगळेपणा**–वास्तववाद, जोमदारपणा व तर्कशुद्धता ही वेगळेपणाची अंगे.

(इ) **रवींद्रनाथांच्या चित्रांतील आकार**–स्वैर, संगीतमय व गूढरम्य.

(ई) **यामिनी रॉय यांच्या शैलीची वैशिष्टचे**–कालीघाट लोककलाशैली, मातीचे/वनस्पतींपासून बनविलेले रंग, जाड व समर्थ रेषा, सुस्पष्ट बाह्याकार, मर्यादित रंग व सरळसाधे संयोजन ही वैशिष्टचे.

(उ) **नंदलाल बोस यांची चित्रकला** – जोरदार रेषा, आलंकारिक आकार व धूसर रंग यांनी नटलेली चित्रकला.

**प्रश्न २ : अवनीन्द्रनाथ ठाकूर यांनी भारतीय चित्रकलेच्या पुनरुज्जीवनास कसा हातभार लावला ते स्पष्ट करा.**

**उत्तर :** राष्ट्रवादी विचारसरणीच्या विकासानंतर व श्री. हॅवेल व श्री. ब्राऊन यांच्या प्रभावी प्रोत्साहनानंतर बंगालमध्ये भारतीय कलेचे पुनरुजीवन झाले. हे महत्त्वपूर्ण कार्य श्री. अवनीन्द्रनाथ ठाकूर व गांगुली यांच्या नेतृत्वाखाली घडून आले. परंतु या चळवळीत जिवंतपणा नव्हता त्यामुळे पुनरुज्जीवनाची आशा मंदावली. तथापि, अनेक कलामहाविद्यालयांची स्थापना झाली व या चळवळीला चालना मिळाली. त्यामधूनच आजच्या व्यक्तिगत शैलीचा उदय झाला. हे काम ज्या कलावंतांच्या पुढाकारामुळे व प्रयत्नांमुळे घडून आले त्यांमध्ये श्री. अवनीन्द्रनाथ ठाकूर यांचा प्रामुख्याने समावेश होतो. ते भारतीय कलेचे पुनरुज्जीवक व प्रतिभाशाली कलावंत होते. त्यांनी प्राचीन भारतीय चित्रकला–परंपरांना पुन: उजाळा दिला. हे कार्य त्यांनी श्री. नंदलाल बोस, असितकुमार हल्दर, देवीप्रसाद रॉय चौधरी ह्या शिष्यांच्या सहकार्याने घडवून आणले. अवनीबाबूंच्या कलेमुळे, प्रेरणेमुळे व आदर्शामुळे चित्रकारांची एक नवी पिढीच उदयास आली.

अवनीबाबू एक असामान्य चित्रकार होते. ते इ. स. १९०५ साली कलकत्याच्या कलाविद्यालयाचे प्राचार्य झाले. त्यांनी सुरुवातीला मोगल लघुचित्रशैलीत चित्रे काढली. त्यांचे प्रारंभिक शिक्षण जरी पाश्चात्त्य पद्धतीचे झालेले असले तरी त्यांनी स्वत: मेहनत घेऊन चिनी-जपानी चित्रपद्धतींचाही अभ्यास केला; तथापि, स्वत:च्या कलेत मात्र भारतीय वैशिष्टयांचेच संगोपन केले. मुलायम रेखा, हलके रंग व कोमल पण अभ्यासपूर्ण मानवी आकृती ही त्यांच्या चित्रकलेची ठळक वैशिष्टये होत. अशा रीतीने त्यांनी प्रत्यक्षपणे व अप्रत्यक्षपणेही भारतीय कलेच्या पुनरुज्जीवनास हातभार लावला.

# प्रकरण ३६ : पाश्चात्य जगातील नवकलाप्रवाह

**प्रश्न १ : रिकाम्या जागी योग्य शब्द लिहून खालील वाक्ये पूर्ण करा व पुन्हा लिहा.**

(अ) बारोक कलेने प्रबोधनकाळ व ········ काळ या दोन काळांतील कलांना जोडले.

(आ) बारोक युगात निसर्गदृश्ये व सामान्यांची·········रंगविण्याची प्रथा सुरू झाली.

(इ) बारोक या शब्दाचा अर्थ 'अनावश्यक गैरवाजवी············' असा आहे.

(ई) पीटर रूबेन्स हा·········काळातील प्रमुख चित्रकार होय.

(उ) शिल्पकला व वास्तुकला यांच्या सीमारेषेवरचा········हा कलाप्रकार बारोक काळात निर्माण झाला.

(ऊ) बारोक काळात कला ही·········गोष्ट बनली.

(ए) यांत्रिक शोधांमुळे '············ कला' जन्माला आली.

(ऐ) छायाचित्रणाच्या कलेच्या शोधामुळे कलावंत 'दिसते तसे' रेखाटण्यापेक्षा '·········' रेखाटण्यावर भर देऊ लागला.

(ओ) उद्योगधंद्यांच्या वाढीमुळे 'उपयोजित कला व ·········' या दोन नव्या गोष्टी उदयास आल्या.

(औ) प्राचीन ग्रीक कलेचे संशोधन करून..........याने 'प्राचीन कलेचा इतिहास' नावाचे पुस्तक लिहिले.

(अं) नव-अभिजातवादी चित्रकाराच्या मतानुसार चित्रात..........सर्वांत अधिक महत्त्व असते.

(अः) तेओदॉर जेरिक्को या स्वच्छंदवादी कलावंताच्या जगप्रसिद्ध चित्राचे नाव '..............' असे आहे.

(क) क्लॉद मोने व..........हे दृक्प्रत्ययवादी प्रसिद्ध चित्रकार होत.

(ख) दृष्टिभ्रम, स्वप्नसृष्टी इत्यादी अनुभवांचे चित्रण .........कलावंताने केले.

(ग) ज्या चित्रशैलीमध्ये वस्तुविषयांना महत्त्व नसते त्या चित्रशैलीला .........असे म्हणतात.

(घ) अतिवास्तववादी संप्रदायाचा प्रवर्तक......... हा होय.

(ङ) ...........हा सध्याच्या काळातील आघाडीचा शिल्पकार असून त्याचे '.........' हे ब्राँझमधील शिल्प महत्त्वपूर्ण आहे.

**उत्तर** : (अ) बारोक कलेने प्रबोधनकाळ व **आधुनिक** काळ या दोन काळांतील कलांना जोडले.

(आ) बारोक युगात निसर्गदृश्ये व सामान्यांची **व्यक्तिचित्रे** रंगविण्याची प्रथा सुरू झाली.

(इ) बारोक या शब्दाचा अर्थ 'अनावश्यक गैरवाजवी **तपशील**' असा आहे.

(ई) पीटर रूबेन्स हा **बारोक** काळातील प्रमुख चित्रकार होय.

(उ) शिल्पकला व वास्तुकला यांच्या सीमारेषेवरचा '**कारंजी**' हा कलाप्रकार बारोक काळात निर्माण झाला.

(ऊ) बारोक काळात कला ही **चैनीची/छानछोकीची** गोष्ट बनली.

(ए) यांत्रिक शोधांमुळे '**औद्योगिक** कला' जन्माला आली.

(ऐ) छायाचित्रणाच्या कलेच्या शोधामुळे कलावंत 'दिसते तसे' रेखाटण्यापेक्षा '**वाटते/भासते तसे**' रेखाटण्यावर भर देऊ लागला.

(ओ) उद्योगधंद्यांच्या वाढीमुळे 'उपयोजित कला व **कलावंत** या दोन नव्या गोष्टी उदयास आल्या.

(औ) प्राचीन ग्रीक कलेचे संशोधन करून **विंकेलमन** याने 'प्राचीन कलेचा इतिहास' नावाचे पुस्तक लिहिले.

(अं) नव-अभिजातवादी चित्रकाराच्या मतानुसार चित्रात **घाटाला** सर्वांत अधिक महत्त्व असते.

(अः) तेओदॉर जेरिक्को या स्वच्छंदवादी कलावंताच्या जगप्रसिद्ध चित्राचे नाव '**रॅफ्ट ऑफ द् मेदुसा**' असे आहे.

(क) क्लॉद मोने व **एदार्द माने** हे दृक्प्रत्ययवादी प्रसिद्ध चित्रकार होत.

(ख) दृष्टिभ्रम, स्वप्नसृष्टी इत्यादी अनुभवांचे चित्रण **अतिवास्तववादी** कलावंताने केले.

(ग) ज्या चित्रशैलीमध्ये वस्तुविषयांना महत्त्व नसते त्या चित्रशैलीला **केवलवादी** असे म्हणतात,

(घ) अतिवास्तववादी संप्रदायाचा प्रवर्तक **साल्वादोर दाली** हा होय.

(ङ) **हेन्री मूर** हा सध्याच्या काळातील आघाडीचा शिल्पकार असून त्याचे '**कुटुंब**' हे ब्राँझमधील शिल्प महत्त्वपूर्ण आहे.

**प्रश्न २ : खालील विषयांवर टीपा लिहा.**

(अ) बारोक कला, (आ) आधुनिक वास्तुकला, (इ) अमूर्त कलाशैली.

**उत्तर**: (अ) **बारोक कला** (Baroque art) इ. स. १६०० ते १७१५ हा प्रबोधन काळ व अर्वाचीन काळ यांना जोडणारा कालखंड बारोक युग म्हणून ओळखला जातो. शिल्प, स्थापत्य व चित्र यांना अलंकाराचे स्वरूप आले. चित्रकला भ्रमोत्पादक (आभासिक) बनली तर शिल्प व स्थापत्य चित्रमय बनली. एकूण कला अनावश्यक व गैरवाजवी तपशीलाने नटली. विविध व दृक्परिणामी रंग, संपन्न साधने व विरोधयुक्त पृष्ठभाग यांचा उपयोग डोळ्यांना आनंद देण्यासाठी करण्यात येऊ लागला. Baroque या शब्दाचा संबंध शैली (Style)शी आहे, काळाशी नाही. धर्म व राजसत्ता यांवरील श्रद्धेच्या प्रचारार्थ बारोक स्थापत्याचा जन्म झाला. या कलेचा हेतू दर्शकाला अनन्तत्वाचा साक्षात्कार घडविणे हा होता. या कलेतील सर्व आकार केंद्रलक्ष्यी असत. कलेत जिवंतपणा व हालचाल यांची प्रतीती यावी यासाठी कलावंताने रेखीवपणा व सौष्ठव या गुणांचा त्याग केला. कलाकृतीत औचित्य व एकत्व साधलेले असे. या कलेचा अनुयायी कलाकार चित्राच्या अंगोपांगांपेक्षा समग्रतेला महत्त्व देत असे. या प्रणालीचा प्रणेता Maderno हा होता. लवकरच या कलाशैलीने मूळ धरले व तिचे चळवळीत रूपांतर होऊन ती अमेरिका, आफ्रिका, फ्रान्स, नेदर्लंडस्, स्पेन, इटली, मध्य युरोप व इंग्लंड या देशांत फैलावली. बर्निनि (Bernini–१५९८ ते १६८०)हा या युगाचा मोठा प्रातिनिधिक कलाकार होता. त्याच्या कलेत चित्र–शिल्प–स्थापत्यांचा अद्‌भुत संगम आढळून येतो. बारोक कला

त्याच्याच कलेत खऱ्या व पूर्ण अर्थाने आविष्कृत झाली. या कलेची वैशिष्ट्ये पुढील शब्दांत सांगण्यात आली आहेत–'Subordination of individual parts to create a total work of art, theatrical effects, spatial grandeur and dramatic use of natural light.'

(आ) **आधुनिक वास्तुकला**–पोलाद, काच, ॲल्युमिनियम व सिमेंट काँक्रीट यांचा उपयोग बांधकामात एकोणिसाव्या शतकात होऊ लागला. त्यामुळे स्थापत्य-शास्त्राचे परंपरागत नियम मागे पडले. दगड व विटा यांची जागा सिमेंट काँक्रीटने घेतली. पोलादी सळयांच्या मदतीने सरळ व लांब घरे बांधण्यास सुरुवात झाली. साधे-पणा व उपयुक्तता यांचेकडे अधिक लक्ष पुरविले जाऊ लागले. या सर्व कारणांमुळे एकोणिसाव्या शतकानंतरच्या घरबांधणीमधून एका नव्या शैलीचा उदय झाला.

पोलादी सळयांमुळे घराचा संपूर्ण सांगाडा आता प्रथम तयार करतात. सळयांमुळे खांब व भिंती यांची आवश्यकता उरलेली नाही. त्यामुळेच घुमट, कमानी, जाडच्या भिंती वगैरे गोष्टी दिसेनाशा झाल्या आहेत. काचेच्या भिंती उभारणे शक्य झालेले असल्यामुळे हवाउजेडाच्या दृष्टीने आजची घरे पूर्वीच्या घरांच्या मानाने अधिक सोयीची व चांगली आहेत. आजकालचे प्रत्येक घर, त्याची उपयुक्तता लक्षात घेऊन, बांधले जाते. उदाहरणार्थ, रेल्वेस्थानके, कारखाने, व्यापारी कचेऱ्या, विमानतळ, चित्रपटगृहे, नाट्यमंदिरे, राहण्याची घरे, सरकारी कचेरीच्या इमारती, शाळेच्या इमारती, इस्पितळे, कलासंग्रहालये इत्यादी. इंग्लंड, हॉलंड, फ्रान्स, जर्मनी, अमेरिका इत्यादी देशांतील मोठमोठ्या शहरांमध्ये जागेची टंचाई असल्यामुळे व विजेच्या पाळण्यांची सोय झालेली असल्यामुळे अनेक मजली इमारती बांधल्या जाऊ लागल्या आहेत. उदा. न्यू एम्पायर स्टेट, टाईम-लाईफ्, कॉकमॅन हाऊस, इत्यादी इमारती. न्यूयॉर्कच्या शे-सव्वाशे मजल्यांच्या इमारती प्रसिद्धच आहेत. अर्वाचीन काळातील प्रमुख स्थापत्यशास्त्रज्ञ कारबुझिए, फ्रँक लॉईड राईट, आल्बर अॅल्टो, व्हॉल्टर ग्रोपियस, लुई सुलीवा हे होत. यांनी एक नवीन आंतरराष्ट्रीय वास्तुकलाशैली निर्माण केली आहे.

(इ) **अमूर्त कलाशैली** (Abstraction)— आधुनिक युगात दादाइझम्, सुप्रीमॅटिझम् इत्यादी ज्या अनेक वादांचा उदय झाला त्यांतच अमूर्तवादाचा समावेश होतो. बाकीचे वाद लयास गेले. पण ह्या वादाने चांगलेच मूळ धरले. याला मोठा अनुयायि-वर्ग लाभला व या वादानुसार अनेक कलाकृती काढण्यात आल्या. Abstract शब्दाचा अर्थ अवस्तुनिष्ठ (non-objective), आकृतिनिष्ठरहित (non-figurative) वा अनिदर्शनात्मक (non-representational) असा आहे. या विचार-सरणीप्रमाणे कलावंताने पाहिलेल्या दृश्याच्या चित्रणास महत्त्व नसते.

अमूर्तवाद हे एकोणिसाव्या शतकाचे अपत्य आहे. त्या शतकात निदर्शनात्मक कला खूप मोठ्या प्रमाणात जन्माला आली. त्या काळापर्यंत प्रचलित असलेला आदर्शवाद किंवा अनुकरणवाद मागे पडला आणि कलावंतांनी स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. कलावंतांना रंग, रेषा व चित्रकृतीचा पृष्ठभाग यांचे महत्त्व वाटेनासे झाले. त्यांनी ह्या तीन अंगांच्या वर्णनात्मक वैशिष्ट्यांवरून आपली नजर काढून घेतली आणि ती अर्थवाहक (Expressive) वैशिष्ट्यांवर खिळविली. परिणामी कलेमध्ये आदिवासींच्या कलेची वैशिष्ट्ये काही प्रमाणात अवतरू लागली. कलाकृतींमधून तीव्र भावना व्यक्त होऊ लागल्या. कलावंतांनी रंगांची बंधने झुगारून दिली व नैसर्गिक वस्तूंची विरचना सुरू केली. एकूण कलेत विसाव्या शतकाची गतिशीलता उतरली.

पहिल्या महायुद्धाने अमूर्त कलेत वाढ झाली. या कलेचे दोन प्रकार अस्तित्वात आले. १ मूलभूततावाद (elementarism) व २. मुक्त अमूर्तवाद (free abstraction). पहिल्या प्रकाराचा पुरस्कार करणाऱ्या कलावंतांनी काही मूलभूत आकार व रंग यांना चिकटून राहण्याचे ठरविले तर मुक्त अमूर्तवाद्यांनी गणितीय आकारांना प्राधान्य दिले. मूलभूततावाद्यांनी आपल्या कलेचा उगम बुद्धिवादात असल्याचा दावा मांडला. त्यांनी निसर्गाला विरोध केला. एकूण अमूर्तवादाची उभारणी भावना व प्रेरणा यांवर झालेली होती व तिचे प्रयोजन व परिणाम व्यक्तिनिष्ठ होते.

दोन महायुद्धांच्या दरम्यानच्या कालखंडात कलाविषयक ही चळवळ थंडावली, पुनः १९३० साली पॅरिसमध्ये शिल्पाच्या संदर्भात तिचे पुनरुज्जीवन झाले. दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिकेत ह्या चळवळीने जोर धरला. ब्रिटनमध्येही ही चळवळ फोफावली. Lucio Fontana या कलावंताने ही चळवळ दुसऱ्या टोकास नेऊन भिडवली आहे. ही कला प्रामुख्याने दृश्य असली तरी हिची अभिव्यक्तिशैली संदर्भरहित असल्यामुळे हिने अनेक मातबर रसिकांनाही बुचकळ्यात टाकले आहे.

**प्रश्न ३ : खालील कलावंतांची चरित्रात्मक व कलाकार्यात्मक माहिती लिहून त्यांच्या प्रख्यात कलाकृतींची नावे लिहा.**

(क) रेम्ब्रां, (ख) व्हॅन गॉख, (ग) पॉल गॉगँ, (घ) पेब्लो पिकासो, (ङ) पॉल सेझां, (च) जॉर्ज ब्रेक, (छ) हेन्री मातीस, (ज) क्लॉड मॉने, (झ) पीटर रूबेन्स.

**उत्तर : (क) रेम्ब्रां**–(१६०६–१६६९) याचे पूर्ण नाव Rembrandt Harmensz van Rijn असे होते. हा डच चित्रकार एका सधन चक्कीवाल्याचा

मुलगा होता. त्याने वयाच्या बाराव्या-तेराव्या वर्षीच निरनिराळ्या गुरूंच्या हाताखाली चित्रकलेचे धडे गिरविण्यास सुरुवात केली. त्याचे विशेष शिक्षण पीटर लास्टमन नावाच्या गुरूच्या हाताखाली झाले. त्याने खोदीव चित्रकामा (etching) ने आपल्या कलाजीवनास प्रारंभ केला. येशू ख्रिस्त, तत्त्वज्ञ, एम्मॉस येथील भोजन ही रेम्ब्रांची अगदी सुरुवातीच्या काळातील चित्रे होत. तो १६३१ साली ॲम्स्टरडॅम येथे स्थायिक झाला व तेथे त्याने एका वर्षाच्या अवधीत चाळीस खोदीव चित्रे तयार केली. त्याने 'The Anatomical Lesson' नावाचे एका अप्रतिम व्यक्तिचित्र रेखाटले, त्याच्या योगे त्याला एक श्रेष्ठ व्यक्तिचित्रकार म्हणून कीर्ती लाभली. त्याने १६३४ साली सकिया नावाच्या स्त्रीशी विवाह केला व तिची कितीतरी व्यक्तिचित्रे काढली. तिच्या मृत्यूच्या वर्षी Night watch हे चित्र पुरे झाले. त्याला एका अधिकाऱ्याने पाचारण केले तेव्हा लोकप्रियता बाजूला सारून त्याने अनेक उत्तम कलाकृती साकार केल्या. पुढे तो निर्धन झाला. तरीदेखील त्याने व्यासंग सोडला नाही. उलट त्याने पूर्वीच्या सामर्थ्याने आपले कलाकार्य चालू ठेवले. त्या काळातील त्याची व्यक्तिचित्रे सुटसुटीत, आकर्षक व व्यक्तीच्या स्वभावविशेषांवर प्रकाश टाकणारी अशी होती. त्याने स्वतःचे जे व्यक्तिशिल्प बनविले त्यामुळे त्याची कीर्ती कळसाला पोचली. त्याने आपल्या निसर्गचित्रांत प्रकाशाचा उपयोग भरपूर व परिणामकारकरीत्या केला आहे. त्याने धार्मिक विषयांवरील चित्रणात त्या विषयांभोवतालचे गूढ वातावरण टिकवून धरून शिवाय त्यात साधेपणा आणला. त्याने एकूण ६५० तैलचित्रे काढली, २००० रेखांकने केली आणि ३०० खोदीव चित्रे काढली. त्याने निसर्गाचा साक्षात अभ्यास केला आणि त्याचे चित्रण मानवी व नैसर्गिक आकृतींत केले. त्याच्या कलेत नाजुकपणा व सामर्थ्य यांचे मिश्रण प्रतीत होते. त्याने मनुष्याकृतींचे रेखाटन सहानुभूतिमय मनाने केले. त्याने म्हातारी माणसे व म्हातारपण हा आपल्या निरीक्षणाचा व चित्रणाचा विशेष विषय बनविला होता. रेम्ब्रांला जगातील श्रेष्ठ कलाकारांच्या रांगेत मानाचे स्थान दिले जाते.

(ख) **व्हॅन गॉख** (१८५३–१८९०)--ह्या संस्कारवादोत्तरकालीन डच चित्रकाराचे संपूर्ण नाव Van Gogh Vincent Willem असे होते. व्हॅन गॉख १८६९ साली Goupil & Co. मध्ये सहायक म्हणून लागला व तेथे त्याने १८७६ सालापर्यंत काम केले. सदरहू कंपनी कलावस्तूंचा व्यापार करीत असे. गॉखचे एका इंग्रज शिक्षिकेवर प्रेम जडले पण ते विफल झाल्यामुळे त्याची धर्मभावना बळावली व त्याचे ठायी न्यूनगंड उत्पन्न झाला. तेव्हा त्याने मेथॉडिस्ट संप्रदायाचा प्रवचनकार बनण्याचे शिक्षण घेतले; पण त्यातही त्याला अपयश आले. तेव्हा घरातील माणसांनी त्याच्या निराशेचे निवारण करण्यासाठी त्याला एका पुस्तकाच्या दुकानात चिकटविले. त्याने विद्यापीठाची परीक्षा देऊन तीत उत्तीर्ण व्हावे ह्यासाठी त्याल।

एक शिकवणी ठेवण्यात आली. पण तो ते सारे सोडून एका धर्मसंप्रदायाचा शुभ-वार्तानिवेदक (Evangelist) बनला. पण तेथेही त्याच्या प्रतिष्ठारहित वर्तणुकीमुळे त्याचा जम बसला नाही. तो १८८१ साली कलाशिक्षणार्थ ब्रुसेल्सला गेला पण तेथेही एका प्रेम-प्रकरणात असफल झाला. त्यानंतर तो हेगला स्थायिक झाला व 'Sien' नामक एका वेश्येबरोबर राहू लागला. त्याने तिचे चित्रांकन Sorrow (१८८२) व Sien Posing (१८८३) अशा दोन कलाकृतींमध्ये केले. सीन ही पत्नी या नात्याने टाकाऊ व कर्तव्यहीन असल्यामुळे त्याची खाण्यापिण्याची आबाळ होऊ लागली व त्यामुळे त्याची प्रकृती खालावली. त्याने त्या सुमारास 'The Potato Eaters'(१८८५) या चित्राच्या द्वारे शेतकऱ्यांच्या दारिद्र्याचे प्रभावी चित्रण केले. त्याने रेखाटलेले Boots हे आणखी एक उत्कृष्ट चित्र. त्याची पॅरिस-मध्ये गॉगेंशी गाठ पडली. त्याने गॉगेंचे उत्कृष्ट व्यक्तिचित्र तयार केले. त्याने लवकरच पॅरिस सोडले. तो Arles येथे आला व तेथे त्याने Sunflowers, The Bridge, The Chair and the Pipe अशी गाजलेली चित्रे काढली. त्याने एक कलाकार-मंडळ स्थापन केले. पुढे त्याचे गॉगेंशी भांडण झाले व तो इतका संतापला की, त्या भरात त्याने स्वत:चाच कान वस्तऱ्याने कापून घेतला. त्यानंतर त्याने Remy च्या निर्वासिताश्रमात चित्रे काढली. पुढे तो पॅरिसच्या उपनगरात एका डॉक्टरांच्या देखरेखीखाली राहू लागला. त्या वर्षाच्या एका लेखात त्याच्या कलेच्या प्रशंसापर एक लेख प्रसिद्ध झाला व त्याच्या योगे त्याला प्रतिष्ठा प्राप्त झाली. त्याने Corn-fields with Flight of Birds नावाचे शेवटचे चित्र रंगविले व ते जेथे रंगविले तेथेच त्याने स्वत:वर गोळी झाडून आत्महत्या केली (२७–७–१८९०). गॉख हा संस्कारवादाच्या चळवळीचा खंदा पुरस्कर्ता होता. तो रंगांचा उपयोग भावोत्ते-जनासाठी करीत असे. त्याने फाव्हज व इतर प्रवृत्तींचे अनुयायी या सर्वांवर खूप प्रभाव पाडला. एकूणच विसाव्या शतकातील कलेवर त्याची सखोल छाप उमटली आहे. त्याच्या कलाकृती कित्येक देशांच्या कलासंग्रहांत जतन करून ठेवण्यात आल्या आहेत.

**(ग) पॉल गॉगँ** (१८४८–१९०३) – हा संस्कारवादोत्तरकालीन फ्रेंच चित्रकार होता. त्याचे सबंध नाव Gauguin Eugene Henri Paul असे होते. त्याचा जन्म ७–६–१८४८ रोजी पॅरिसमध्ये झाला. त्याचे वडील पत्रकार होते. तो १८७१ साली पॅरिसमध्ये स्थायिक झाला. त्याने इ. स. १८८३ मध्ये स्वत:च्या कृतींचे एक प्रदर्शन भरविले. त्याने आपले सर्वस्व कलेला अर्पण करण्याचा निश्चय केला. तो १८८७–८८ मध्ये मुलाबाळांना सोडून सागरी प्रवासास निघाला. त्याची बर्नार्ड नामक एका सिद्धान्तवाद्याशी गाठ पडली. पुढे १८९०–९४ या काळात तो पॅरिसमधील प्रतीकवाद्यांच्या मेळाव्यात वावरला. त्याने हळूहळू स्वत:ची

समन्वयवादी ( Synthesism ) चित्रशैली सिद्ध केली. त्याला यांत्रिकी सुधारणा-युगाचा मनस्वी तिटकारा होता. त्याच्या ' Still Life with three puppies', ' The vision after the sermon ', ' Why are you angry ? ' इत्यादी चित्रकृतींमधून रोमनेस्क, जपानी व ब्रेटन (Breton) लोककलांचे प्रतिसाद ऐकू येतात. त्याच्या कलेत हिरवा, लालभडक, तपकिरी इत्यादी विविध रंग मुक्तपणे वापरले गेले आहेत. त्याची काही चित्रे रूपकात्मक आहेत. लाकडावरील कोरीव कामातही त्याचा हातखंडा होता. परंतु, त्याचे एकूण कलाशिक्षण पायाशुद्ध नव्हते व या उणिवेवर त्याला कधीच मात करता आली नाही. मात्र त्याने रानटी टोळयांच्या कलाविलासामधून सौन्दर्य शोधून काढता येते हे दाखवून दिले आणि विसाव्या शतकाच्या प्रत्येक कलासंप्रदायावर आपला प्रभाव पाडला. त्याच्या अनेक कृतींनी कादंबऱ्यांना कथानके पुरविली. उदाहरणार्थ, सॉमरसेट मॉमची The Moon and Six Pence ही कादंबरी गॉगेंच्या चित्रकृतीवर आधारित आहे. त्याने स्वत: Noa-Noa नावाची एक आत्मचरित्रात्मक कादंबरीही लिहिली होती. (१८९४–१९००). त्याने १८९८ सालच्या जानेवारी महिन्यात आत्महत्येचा प्रयत्न केला होता, पण तो अयशस्वी झाला होता. तो १९०३ साली निधन पावला.

(घ) **पेब्लो पिकासो** (१८८१—१९७३) विसाव्या शतकातील हा अत्यन्त प्रभावी चित्रकार जन्माने स्पॅनिश होता. त्याने जॉर्ज ब्राकच्या सहकार्याने क्यूबिझम् नावाच्या कलाप्रणालीचे प्रणयन केले. त्याचे वडील कलाशिक्षक व चित्रकार होते. वयाच्या चौदाव्या वर्षी त्याचा बार्सिलोनाच्या विद्यालयात प्रवेश झाला. त्याने १८९५ साली Barefoot Girl नावाचे वाखाणले गेलेले चित्र काढले. त्याने १८९७ साली कलेच्या प्रशिक्षणासाठी माद्रिदला प्रयाण केले. त्याच्या पुढच्याच वर्षी (१८९८) Customs of Aragon नावाच्या चित्राबद्दल त्याला एक सुवर्ण-पदक देण्यात आले. त्याने १९०१ साली आपला स्टुडिओ स्थापन केला. एव्हापर्यंत तो परंपरागत कलेत चांगलाच प्रवीण झाला होता. त्याने Gipsy Girl on the Beach (१८९८) हे चित्र पारंपरिक पद्धतीने काढले होते. पुढे त्याने पॅरिसला नव्याने उदयाला आलेल्या संप्रदायाची वैशिष्टये झटकन आत्मसात केली व त्या शैलीनुसार Longchamp (१९०१), The Blue Room (१९०१) इत्यादी चित्रे काढून ती शैली प्रत्यक्षात उतरविली. परंतु एवढयाने त्याचे समाधान झाले नाही. त्याने लवकरच स्वत:ची स्वतंत्र शैली सिद्ध केली. त्याने १९०५–०६ साली La Coiflure हे प्रसिद्ध चित्र काढले आणि १९०६ साली Gertrude Stein नावाचे उल्लेखनीय व्यक्तिचित्र काढले. आता त्याने शिल्पकलेत पदार्पण केले. याच सुमारास त्याला Negro Art विषयीही आकर्षण वाटू लागले. त्याने Two Nudes (१९०६) या चित्राच्या द्वारे कलेत युगध्वंसक नावीन्य आणले. त्याच्या

या कलाकृतीने परंपरा मोडल्या. त्याच्या ' Les Demoiselles d' Avignon ' या कलाकृतीत पृथक्करणात्मक क्यूबिझमचे (त्रिमितीचे) दर्शन घडते. त्याने निसर्गाची नक्कल न करता, त्याचे अलंकरण न करता किंवा त्याला निव्वळ काल्पनिक रूप न देता कलासिद्धीसाठी राबवून घेतले. त्याने भौमितिक आकारांचाही उपयोग करून घेतला. क्यूबिझममध्ये analytic, synthetic, hermetic व rococo अशा चार मुख्य पायऱ्या होत्या. त्या कलाशैलीत रंगांच्या बरोबरीने लाकडाचे तुकडे, तारा, वृत्तपत्रांचे कागद, दोऱ्या इत्यादींनाही माध्यमांचा दर्जा लाभला होता. पिकासोने या इतर माध्यमांचा उपयोग करून 'Ma Jolie' नावाची चित्रमालिका काढली. पिकासो व ब्राक यांचे १९१४ मध्ये मतभेद झाले. परिणामी पिकासोने १९१७ साली रशियन नृत्यसंघाशी संबंध जोडला आणि तो पोषाख व देखावे बनवू लागला. त्याने Parade, Le Trains, Blen इत्यादी नृत्यांसाठी जे पोषाख व देखावे तयार केले ते रसिकांना अतिशय आवडले. Three Dancers मधील व्यक्तींच्या चेहऱ्यांची खूपच मोडतोड दाखविण्यात आली आहे, त्याचे श्रेय पिकासोलाच आहे. त्याने Guernica नावाच्या आपल्या एका चित्रात बाँब-वर्षावाचे भयंकर परिणाम दाखविले आहेत. पिकासो १९३६ साली माद्रिदच्या Prado gallery चा संचालक बनला व त्या पदावर त्याने तीन वर्षे काम केले. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात तो प्रायः पॅरिसमध्येच होता आणि युद्ध समाप्त झाल्यावर त्याने कम्युनिस्ट पक्षाचे सभासदत्व स्वीकारले. त्याने १९५३ साली स्टॅलिनचे एक व्यक्तिचित्र रेखाटले. त्याने काढलेल्या 'Picasso Peace Dove' या चित्राला काहीसे प्रचारात्मक मूल्य होते. त्याने काही नाटकांसाठी देखावे तयार केले, अभिजात वाङ्मयकृतींच्या भाषांतरांना चित्ररूप दिले आणि शिल्पकला, कुंभारकाम व शिळाछापाची विद्या या सर्वांमध्ये भरपूर प्रयोग केले. पिकासो चित्र काढीत आहे अशा दृश्यावर फिल्म घेण्यात आली आहे. त्याने एक नाटकही लिहिले होते. त्याच्या दीर्घकालीन कलोपासनेमुळे व प्रयोगनिष्ठ नावीन्यप्रियतेमुळे त्याला स्वतःच्या हयातीत अमाप लोकप्रियता लाभली.

(ङ) **पॉल सेझां** (१८३९–१९०६)–(Paul Cezanne)–हा फ्रेंच कलाकार असून एमिल झोला नामक सुप्रसिद्ध कादंबरीकाराचा मित्र होता. त्याला वाङ्मयातही गोडी होती. त्याने १८५९–६१ मध्ये कायद्याचा अभ्यास केला. झोलाच्या सूचनेवरून त्याने पॅरिसला जाऊन इतर विषयांचा अभ्यास केला. तेथे त्याची एका चित्रकारमंडळाशी गाठ पडली; पण त्या मंडळाशी तो समरस होऊ शकला नाही. तेव्हा त्याने Aix-ला मुक्काम ठोकला. तसा तो मधूनमधून पॅरिसला जाऊन येत असे. त्याने दृक्प्रत्ययवाद्यांच्या प्रथम (१८७४) व तृतीय (१८७७) प्रदर्शनांमध्ये भाग घेऊन आपली चित्रे रसिकांसमोर मांडली. त्याच्यावर पिसारो

(Pissarro)चा प्रभाव पडला होता. त्याने आविष्कारवादाला सोडचिठ्ठी दिली आणि निसर्गाभ्यासाला जवळ केले. त्याने लवकरच आपल्याला प्रिय असलेले झगमगीत रंग वापरण्यास सुरुवात केली. १८८६ साली त्याने निसर्गाच्या मुळाशी असलेल्या दण्डगोल, गोल व शंकू या आकारांवर भर दिला. त्याने रंगीत चित्रे काढून त्यांत लयीस प्राधान्य दिले. अशा प्रकारे तो क्यूबिझम्चा अग्रदूत बनला. झोलाने १८८६ साली एक कादंबरी लिहून तिच्यात एका अयशस्वी व विक्षिप्त चित्रकाराचे वर्णन केले. ते सेझांशी बऱ्याच अंशी मिळतेजुळते होते. ते वाचून सेझांला राग आला व त्या भरात त्याने झोलाशी असलेली आपली मैत्री संपविली. दृक्प्रत्ययवादी कला भक्कम व चिरस्थायी करण्याची जणू प्रतिज्ञाच सेझांने घेतली होती. त्याला आयुष्याच्या अगदी अखेरीअखेरीस मान्यता मिळाली. १८९५ व १८९९ साली त्याच्या चित्रांची प्रदर्शने व्हॉलर्डला भरविण्यात आली. त्याचे 'L'Homme' (१८७१) हे चित्र न्यूयॉर्कमधील मेट्रॉपॉलिटन वस्तुसंग्रहालयात आहे, 'Aix' व 'Le Jardinier' ही अनुक्रमे १८८७ व १९०६ मध्ये काढलेली चित्रे लंडन येथील टेट् गॅलरीत आहेत आणि 'La ville' (१८९७) हे चित्र लंडनच्या नॅशनल् गॅलरीमध्ये आहे.

(च) **जॉर्ज ब्राक**-(१८८२-१९६३)—Georges Braque हा फ्रेंच चित्रकार अभिजात क्यूबिझम्(Classical Cubism)च्या संस्थापकांपैकी एक समजला जातो. त्याने १९०८ पासून १९१४ पर्यंत पिकासोबरोबर काम केले. पहिल्या महायुद्धात तो जखमी झाला होता. महायुद्धानंतर त्याने वैयक्तिक, अ-भौमितिक व अर्धगूढ चित्रशैली सिद्ध केली. त्याने १९२४ व १९२५ साली नृत्यप्रयोगांसाठी दोन देखावे तयार केले. त्याने स्थिर जीवनाचीच चित्रे प्रामुख्याने काढली. त्याच्या चित्रांना दोन मिती (Dimensions) आहेत. त्याची चित्रे चालू युगाच्या उत्कृष्ट कलाकृती समजल्या जातात. त्याच्या कलेचा परिणाम इतर कलाकारांवर झाला. तो ग्रॅण्ड ऑफिसर असून त्याला ऑक्सफर्ड विद्यापीठाने १९५६ साली सन्मान्य डॉक्टरेट् पदवी दिली होती.

(छ) **हेन्री मार्तीस**-Henri Matisse (१८६९-१९५४)-- हा फ्रेंच कलावंत Gustave Moreau-च्या हाताखाली शिकला. तो १९०४ सालापासून फाव्हज् गटाचा पुढारी झाला. तो क्यूबिझम् व संस्कारवाद या दोन विचारसरणींनी प्रभावित झाला होता. त्याने त्या प्रभावाखाली अनेक चित्रे काढली. त्याने आपल्या चित्रांमध्ये झगझगीत प्राथमिक रंगांचा उपयोग धिटाईने केला आहे. त्याच्या चित्रांत दोन मिती असून त्याच्या कलेचे साम्य गॉगेंच्या कलेशी आहे. त्याच्या रेखांकनात कलेची शुद्धता दिसते. ती त्याच्या रंगीत चित्रांतही जाणवते. त्याने १९३०च्या सुमारास युरोप-अमेरिकेत प्रवास केला. त्याने १९४९ मध्ये

व्हेनिस शहरातील Dominican Chapel ची सजावट केली. तो मृत्यूच्या क्षणा-पर्यंत कलोपासना करीत होता. त्याची शैली बदलली नाही. त्याने प्रारंभिक काल-खंडामध्ये रेखाटलेल्या चित्रांपेक्षा नंतरच्या कालखंडामध्ये रेखाटलेली चित्रे अधिक चांगली आहेत. त्याच्या ठायी सूक्ष्म सौन्दर्यदृष्टी होती. शिवाय तो रंगांचा समतोल उत्कृष्टपणे सांभाळू शकत असे. त्याची चित्रे लंडनच्या Tate gallery मध्ये आणि पॅरिस व न्यूयॉर्क येथील Museums of Modern Art मध्ये मांडून ठेवण्यात आली आहेत.

(ज) **क्लॉड मॉने** Claude Monet (१८४०–१९२६)—हा संस्कारवादी फ्रेंच चित्रकार पॅरिसमध्ये जन्मला. Boudin-ने त्याला मोकळ्या वातावरणात काम करण्यास प्रोत्साहन दिले. त्याने पॅरिसला जाऊन Renoir, Pissarro व Sisley यांच्याशी संबध स्थापित केले आणि १८७४ साली भरलेल्या पहिल्या संस्कारवादी प्रदर्शनात आपली चित्रे मांडली. त्याचे एक चित्र 'Impression: solcil levant' नावाचे होते. ते त्या प्रदर्शनात मांडण्यात आले होते. त्या चित्रा-वरूनच ह्या नव्या कलासंप्रदायाला संस्कारवादी चळवळ (Impressionism) असे नाव ठेवण्यात आले. मॉनेला संस्कारवादी चळवळीचा जनक म्हणून पिसारोच्या बरोबरीचे स्थान देण्यात येते. त्याने त्या चळवळीचे प्रतिपादन सुसंगतपणे केले. त्याने इंग्लंड व हॉलंड या देशांना आणि व्हेनिस शहराला भेटी दिल्या. त्याच्या कलेत रंग, वातावरण व प्रकाश यांतील बारकावे व्यक्त झाले आहेत. नदीकाठची व समुद्रकाठची अनेक दृश्ये त्याने रंगविली. तसेच प्रकाशाच्या वेगवेगळ्या पैलूंवर आधारित चित्रमालिका रंगविल्या. उदाहरणार्थ, Haystack (1890-91), Rouen Cathedral (१८९२–१८९५). त्याची Waterlilies ही चित्रमाला प्राय: गूढ आहे त्याची अनेक चित्रे युरोप व अमेरिका खंडांतील अनेक चित्रसंग्रहांत मांडून ठेवण्यात आली आहेत.

(झ) **पीटर रूबेन्स** Peter Paul Rubens (१५७७--१६४०)– या फ्लेमिश चित्रकाराचा जन्म २९-६-१५७७ रोजी झाला. त्याचे वडील वकील होते. ते १५८७ मध्ये वारल्यावर त्याची आई कोलोनहून अँटवर्पला गेली. पीटरचे शिक्षण जेझुईट कॉलेजात झाले. त्याने १३ व्या वर्षी कलाशिक्षणाला सुरुवात केली. १६०० साली व्हेनिसमध्ये जाऊन त्याने टिटियन व व्हेरोनेसे (Titian, Veronese) यांच्या कलाकृतींचा अभ्यास केला. नंतर त्याने मॅण्टुआच्या ड्यूकची चाकरी पत्करली. पुढे सन १६०५ साली मुत्सद्दी या नात्याने त्याच्या कारकीर्दीस प्रारंभ झाला. त्याच्या ठायी तल्लख बुद्धिमत्ता, सुसंस्कृतपणा व भाषेवरील प्रभुत्व हे गुण होते. त्याने माद्रिदला असताना अनेक तैलचित्रे काढली व कित्येक ऐतिहासिक विषयांवर चित्र-कलेचा साज चढविला. स्पेनहून परत आल्यावर त्याने इटलीत प्रवास करून अनेक

चित्रांची प्रतिरेखाटने केली. या काळातील त्याच्या कलेवर इटलीतील पुनरुत्थान चळवळीचा प्रभाव पडला होता. हळूहळू त्याच्या चित्रात ( उदाहरणार्थ, Baptism of Christ, Circumcision इत्यादी ) ठसठशीत मांडणी व झगझगीत रंग ही वैशिष्टचे प्रतीत होऊ लागली. इ. स. १६०९ साली तो अँटवर्पला परतला. तेथे त्याची आर्च डयूक आल्बर्टचा दरबारी चित्रकार म्हणून नेमणूक झाली. नंतर त्याने Isabella Brant-शी विवाह केला व तिची अनेक व्यक्तिचित्रे रेखाटली. (त्यांपैकी एक म्यूनिचमध्ये आहे. ) Adoration of the Kings, Elevation of the Cross ही त्याची काहीशी कमी दर्जाची चित्रे होत. हळूहळू त्याची कला परिपक्व दशेस पोचत होती. 'Descent from the Cross' हे त्याचे चित्र सर्वानुमते सर्वोत्कृष्ट होय. आता त्याला प्रसिद्धी व कामे मिळू लागली; तसेच त्याच्या स्टुडियो-कडे शिष्यांची रीघ सुरू झाली. त्याने काढलेल्या अनेक चित्रांवरून त्याच्या शक्तीची, कल्पनेची व परिश्रमशीलतेची ओळख पटते. फ्रान्सच्या राणीला लक्झेंबर्गचा राजवाडा सजवावयाचा होता. त्यासाठी तिने रूबेन्सला पाचारण केले. त्याने तिच्या आयुष्या-तील २१ प्रसंग निवडून त्यांवर आधारित मोठी चित्रे काढली. ती सर्व त्याने १६२०-२५ च्या दरम्यान, शिष्यांच्या मदतीने, पूर्ण केली. याच काळात त्याने Adoration of the Magi, Assumption of the Virgin इत्यादी चित्रेही काढली. १६२८ साली त्याची स्पेनच्या चवथ्या फिलिपकडे राजनैतिक कार्यासाठी रवानगी करण्यात आली. त्याने तेथील वास्तव्यात सुमारे चाळीस चित्रेही काढली; त्यांत स्पॅनिश सम्राटाची ५ व्यक्तिचित्रे होती. पुढे १६२९ मध्ये त्याची इंग्लंडमधील वकील म्हणून नेमणूक झाली. त्याने शांतता घडवून आणण्याचे प्रयत्न युक्तिपूर्वक केले व त्यांत त्यास यशही आले. त्याने त्याच काळात Peace and War हे चित्र तसेच पहिल्या चार्लस राजाचे व त्याच्या राणीचे अशी व्यक्तिचित्रेही काढली. त्याखेरीज त्याने पहिल्या जेम्स राजाच्या भोजनगृहाच्या सजावटीसाठी रेखाचित्रेही काढली. ती सगळी चित्रे त्याने अँटवर्पला परतल्यावर पुरी केली. इंग्लंडच्या पहिल्या चार्लस राजाने आणि स्पेनच्या चौथ्या फिलिप राजाने त्याला सरदारकी बहाल केली. १६२६ साली त्याची पहिली पत्नी वारली. १६३० मध्ये त्याने Helena Fourment नावाच्या स्त्रीशी दुसरा विवाह केला. नंतर तो स्टीन येथे स्वतःच्या स्थावर मालमत्तेची देखरेख करण्यासाठी गेला. तेथे तो निसर्गदृश्ये काढीत असे. कार्डिनल इन्फण्ट् फर्डिनंड् हा अॅण्टवर्पमधील नेदर्लंडसचा गव्हर्नर म्हणून १६३६ मध्ये आला. त्याच्या स्वागतार्थ उभारलेल्या प्रवेश-कमानीची रचना रूबेन्सने केली. तसेच त्याने The Crucifixion of St. Peter हे चित्र कोलोनमधील प्रार्थना-मंदिरासाठी पुरे केले. रूबेन्स अॅण्टवर्पमध्ये ३०-५-१६४० रोजी मरण पावला.

रूबेन्स यशस्वी मुत्सद्दी, अग्रगण्य मानवतावादी, बहुश्रुत विद्वान व सुसंस्कृत

पुरुष होता. तो स्वतःच्या काळातही अष्टपैलू म्हणून प्रसिद्ध होता. त्याचा स्टुडिओ त्या काळातील नेदर्लंडस, इंग्लंड, स्पेन, मध्य युरोप इत्यादी देशांतील कलाकारांचे प्रमुख आकर्षण-केंद्र होऊन बसला होता. त्याच्या चित्रांत सामर्थ्य, चैतन्य व रसरशीतपणा होता. त्याच्या रेखाटनांत प्रस्फुरण होते, आकारांत अविस्मरणीय मोहकपणा होता आणि प्रकाशयोजनेत विलक्षण नाट्यमयता होती. तो व्यक्तीच्या क्षणिक हालचाली हेरून त्यांचे जिवंत चित्रण करीत असे. त्याने आपल्या आयुष्यात १२०० हून अधिक चित्रे रेखाटली. The Battle of the Amazons, The Rape of the Sabines, The Birth of the Venus, The Castle of Steen ही त्याची अतिशय प्रसिद्ध व गाजलेली चित्रे होत. त्याची अनेक सुंदर चित्रे अँण्टवर्पला असून इतर कित्येक चित्रे म्यूनिच, माद्रिद, प्रादो, व्हिएन्ना इत्यादी ठिकाणच्या कलासंग्रहालयांची अमर भूषणे होऊन राहिली आहेत.

**प्रश्न ४ : पुढील वादांविषयी माहिती लिहा.**

(अ) दृक्प्रत्ययवाद, (ब) घनवाद, (क) आविष्कारवाद व (ड) फाविझम्.

**उत्तर** : (अ) **दृक्प्रत्ययवाद**–बारोक युगामध्ये कलेत गैरवाजवी भडकपणा, आलंकारिकपणा, कृत्रिमपणा, निर्जीवपणा इत्यादी काही अनिष्ट प्रवृत्ती रूढ झाल्या होत्या. त्यांचे उच्चाटन करण्याचा उद्देश आधुनिक युगातील कलाकारांनी मनाशी बाळगला. या उद्देशामधून ज्या कलाप्रणालींचा उदय झाला त्यांमध्ये दृक्प्रत्ययवादाचा समावेश होतो. या वादाच्या पुरस्कर्त्यांनी चित्रात ताजे भडक रंग भरण्यास सुरुवात केली. त्यांनी निसर्गाच्या सान्निध्यात, मोकळ्या हवेत व सूर्यप्रकाशात चित्रे काढावयास सुरुवात केल्यामुळे परंपरागत विचारात आमूलाग्र परिवर्तन झाले. दृक्प्रत्ययवाद्यांनी प्रामुख्याने निसर्गचित्रेच रेखाटली. क्लॉड् मॉने हा या गटाचा अग्रगण्य चित्रकार होता. या कलाशैलीविषयी संदर्भ-ग्रंथात पुढीलप्रमाणे नोंद आढळते: Impressionist, an artist or author who attempts in his work to convey by broad effects of colour or treatment, the impressions which a subject has stamped on his own imagination, apart from detail or form.

(ब) **घनवाद** (Cubism)–आधुनिक युगात ज्या अनेक कलाप्रणाली अस्तित्वात आल्या त्यांपैकी पिकासो व ब्राक यांनी प्रचलित केलेल्या प्रणालीस क्यूबिझम म्हणतात. हिने अनेक चित्रकारांना प्रभावित केले. या शैलीतील चित्रात वस्तूची घनता (volume) रेखाटण्यावर भर दिलेला असतो. उदाहरणार्थ, एखाद्या पाण्याच्या घड्याचे चित्र रेखाटावयाचे झाल्यास या शैलीचा पुरस्कर्ता त्या घड्याचे

सर्व बाजूंनी (समोरून, बाजूने, वरून इ०) चित्रण करतो. परिणामी या शैलीत वस्तूच्या मूलभूत भौमितिक आकाराला महत्त्व असते. त्यामुळे जरी काही चित्रे अनाकलनीय असली तरी या शैलीच्या कलाकारांनी चित्रगत वस्तूंचे आकार व त्यांचे संयोजन यांवर भर देऊन चित्राकडे पाहण्याची एक नवीन दृष्टी रसिकांस दिली यात संदेह नाही. विश्वकोशाने या शैलीविषयी पुढीलप्रमाणे खुलासा केला आहे :

" Post-Impressionism, Cubism and Futurism embrace three latterday art movements which, to some extent, represent the barbaric in artistic expression. The Post-Impressionists regard drawing as secondary to beauty of paint, and leave the artist to scatter his colours as may best convey his impression. The cubists and Futurists go still farther, and aim at realizing, by a series of chaotically placed colours, the pictorial idea in the mind of the artist. While to the lay onlooker all three movements signify little that is understandable, to their devotees they indicate a healthy desire to break away from old conventions."

(क) **आविष्कारवाद** (Expressionism)–प्रारंभी आविष्कारवाद हा शब्द दृक्प्रत्ययवाद या शब्दाहून वेगळेपणा दर्शविण्यासाठी वापरला गेला. परंतु, आता ज्या चित्रात वा शिल्पात जास्तीत जास्त भावना प्रदर्शित केलेल्या असतात त्या चित्राला वा शिल्पाला हा शब्द लावला जातो. या शब्दाची व्याप्ती आता खूपच वाढली असून हा शब्द इतर कलांनाही लावण्यात येतो. उदाहरणार्थ, इ स. १९१४-१९२४ या कालखंडातील जर्मन नाट्यवाङ्मय आविष्कारवादी मानले जाते. आविष्कारवाद्यांचा दृष्टिकोण व्यक्तिनिष्ठ व प्रेरणामूलक मानला जातो. या विचारसरणीनुसार कलावंताच्या भावनांना सर्वांत अधिक महत्त्व असते, तंत्र व विषय यांना गौण स्थान असते. किंबहुना ही कलाच व्यक्तीची असते, विशिष्ट संप्रदायाची नसतेच. या कलेत उत्कट भावनांच्या अभिव्यक्तीवर जोर असतो. कलाकृतीत उत्कटता यावी यासाठी रंग व आकार यांची प्रसंगी मोडतोडही केली जाते किंवा त्यांना हेतूप्रमाणे राबवून घेतले जाते. ही कला आत्मप्रधान असते. व्हॅन गॉख, एडवर्ड मंच व जोन्स एन्सॉर यांच्या कलाकृतींनी युरोपीय कलेवर विसाव्या शतकाच्या आरंभी खूप प्रभाव पाडला. गॉखच्या चित्रकलेत भावनेला प्राधान्य होते. या कलाकारांच्या कलाकृतींमुळेच जर्मनीत एक कलाविषयक चळवळ जन्माला आली. जर्मन कलाकाराच्या कलेत मानवी दुःखाचे मूळ शोधण्याची व सुखाच्या मागे दडलेल्या दुःखाचे स्वरूप व कारण शोधून काढण्याची प्रवृत्ती प्रकट

होऊ लागली. हळूहळू या चळवळीचे लोण रशियात पोचले. रशियन चित्रकारांनी गूढ (abstract) आकारांचे प्रयोग चालू केले. त्यांना तसे आंतरिक गरजेमुळेच (inner necessity) करावेसे वाटले. त्यामुळेच या कलेत गूढ वा अमूर्त आकार वैपुल्याने अवतरले. फ्रान्समधील पिकासोसारख्या अपवादात्मक कलावंतांनी सौंदर्य-निष्ठ मूल्यांना महत्त्व दिले. ज्यांनी या चळवळीत उल्लेखनीय भर घातली असे आणखी काही कलाकार म्हणजे फर्डिनंड होल्डर, ऑस्कर कोकोस्का व मॅक्स बेकमन हे होत. या चळवळीला बेल्जियम, अमेरिका, लॅटिन अमेरिका इत्यादी सर्व देशांतील कलावंतांनी हातभार लावला. शिल्पकारांमधील सर्वांत प्रमुख आविष्कारवादी शिल्पकार म्हणजे बालार्क, लेमबुर्क, व मारिनो जिआकोमेट्टी हे होत.

(ड) **फाविझम्** (Fauvism)–अर्वाचीन काळात कलाविषयक ज्या अनेक चळवळी झाल्या त्यांपैकी ही एक जोरदार चळवळ होय. चालू शतकाच्या सुरुवातीस पॉल सेझां, व्हिन्सेंट् व्हॉन् गॉगें इत्यादींचा प्रभाव जाणवू लागला. १९०५ साली हेन्री मातीसच्या नेतृत्वाखाली कलोपासना करणाऱ्या कलावंतांमुळे हा प्रभाव प्रखरपणे जाणवू लागला. मातीसप्रभृतींनी भडक रंगांतील आपल्या चित्रांनी रसिकांचे लक्ष स्वतःकडे वेधून घेतले व कडक टीकादेखील ओढवून घेतली. लुई व्हॉक्ससेल्स (Vauxcelles) नामक टीकाकाराने मातीसप्रभृतींचे "Donatello amon the wild beasts" असे वर्णन केले! त्यावरून या नव्या संप्रदायास Fauvism हे नाव पडले. भडक रंगांच्या साह्याने चित्रपृष्ठाला झगझगीत करणे हेच रंगांचे उद्दिष्ट मानले जाऊ लागले. व्हॅन् गॉखची वैयक्तिक कलादृष्टी, समृद्ध व ठसठशीत नक्षी व पौर्वात्य व आदिकालीन कलेविषयीची अभिरुची या सर्वांमुळे या चळवळीस प्रतिष्ठा लाभली. जरी या चळवळीचे रूपान्तर संप्रदायात झाले नाही व जरी हिचा निश्चित असा कार्यक्रमही नव्हता तरी काही उत्साही तरुणांनी ही चळवळ उचलून धरली. हेन्री मातीस, जॉर्ज ब्राक, चार्लस् कॅमॉय्, आन्द्रे देरें, केस व्हॅन दोन्जें, राऊल डूफी व हेन्री मॉगिन् हे या चळवळीचे प्रमुख पुरस्कर्ते होते. फ्रान्सबाहेर जर्मनी व रशिया येथेही या चळवळीचे अनुयायी उत्पन्न झाले. १९०८ सालापर्यंत ह्या चळवळीचा जोर टिकला. या चळवळीने Cubism ला जन्म दिला व पुढे Expressionism मध्ये ती प्रतिबिंबित झाली.

# प्रकरण ३७ : आधुनिक भारतीय कला

**प्रश्न १ खालील कलावंतांच्या जीवनाची व कलाविषयक कार्याची ओळख करून द्या :-**

(अ) अमृता शेरगील, (आ) ना. श्री. बन्द्रे, (इ) माधव सातवळेकर, (ई) श्यावक्ष चावडा, (उ) मकबूल फिदा हुसेन, (ऊ) के. के. हेब्बर.

**(अ) अमृता शेरगील**–पंजाबच्या या स्त्री-कलाकार हंगेरियन माता व शीख (भारतीय) पिता यांच्या हृया कन्या. यांनी भारतीय चित्रकलेचे आधुनिकीकरण केले. त्यांनी चित्रकलेचा प्राथमिक अभ्यास पॅरिसमध्ये केला. त्यामुळे त्यांच्या चित्रांत पाश्चिमात्य व पौर्वात्य चित्रशैलींचे मिश्रण झालेले आहे. रंगकामाची रीत व चित्राची रचना यांवर पॉल गॉगेंच्या शैलीचा प्रभाव आहे. मात्र त्यांचे चित्रविषय अस्सल भारतीय आहेत. साधी व सुबक मांडणी आणि मोहक व समतोल रंगभरणी ही त्यांच्या कलेची वैशिष्टये होत. त्यांनी अनेक तरुणांना स्फूर्ती दिली. त्यांचे निधन ऐन तारुण्यात झाले. त्यांची काही चित्रे दिल्लीच्या राष्ट्रीय कलासंग्रहालयात मांडण्यात आली आहेत.

**(आ) ना. श्री. बेंद्रे**–भारताच्या अग्रगण्य चित्रकारांमध्ये यांची गणना होते. त्यांचा जन्म इ. स. १९१० साली झाला. त्यांनी प्रारंभिक कलाशिक्षण इंदुरास घेतले व तदनंतर मुंबईच्या कलामहाविद्यालयामधून डिप्लोमाअखेरचे शिक्षण पूर्ण केले. त्यांच्या कलेवर दृक्प्रत्ययवाद, घनवाद व भारतीय लघुचित्रांची शैली या सर्वांचा प्रभाव पडला आहे. त्यांच्या चित्रांत माधुर्य, भावनात्मकता व स्वप्निलपण यांचा प्रत्यय येतो. ते चित्राद्वारे घटनेचे व मानवी प्रवृत्तींचे वर्णन करतात.

श्री. बेंद्रे गेले पाव शतक सतत कलोपासना करीत आहेत. त्यांच्या शैलीत कोणाही एकाचे अनुकरण नाही. ताजेपणा व नवीनपणा यांचे दर्शन त्यांच्या कलेत नेहमी घडते. त्यांची उत्कट सहृदयता व अव्वल कुशलता प्रत्येक कलाकृतीत प्रतीत होते. त्यांनी प्रारंभी यथातथ्य शैलीत चित्रे रेखाटली व नंतरच्या काळात अमूर्त शैलीत रंग व आकार यांचे अनेक प्रयोग केले. त्यांची दोन्ही शैलींतील चित्रे सारखीच सुंदर आहेत. आकारांची रेखीव मांडणी व मनमोहक रंगभरणी हे बेंद्रे यांच्या चित्रकलेचे विशेष आहेत. श्री. बेंद्रे हे नुसते कलाकारच नाहीत तर कला-विद्यालय-संचालकही आहेत, ते गेली सुमारे दहा वर्षे बडोद्याच्या सयाजीराव विश्वविद्यालयाच्या कलाविभागाचे संचालक आहेत. त्यांचे अनेक विद्यार्थी भारतात व भारताबाहेर कीर्ती मिळवीत आहेत.

श्री. बेंद्रे ललितकला अकादमीचे उपाध्यक्ष असून त्यांच्या चित्रांची प्रदर्शने देशात व विदेशांत अनेकदा भरली आहेत.

(इ) **माधव सातवळेकर**-यांचा जन्म १९१५ साली झाला. त्यांनी प्रारंभिक शिक्षण वेदमहर्षी श्री. दा. सातवळेकर यांच्या हाताखाली औंध संस्थानात घेतले. पुढे ते १९३५ साली जे. जे. महाविद्यालयाची अन्तिम परीक्षा सन्मानासह पास झाले. त्यांनी त्या परीक्षेत मेयो पदक मिळविले. नंतर ते १९३७ साली तीन वर्षांच्या युरोपच्या दौऱ्यावर गेले. त्यांनी इटली, इंग्लंड व फ्रान्स या देशांत कलाशिक्षण संपादन केले. ते १९४० साली भारतात परत आले व मुंबईत स्थायिक झाले. त्यांनी लौकरच एक उत्कृष्ट व्यक्तिचित्रकार म्हणून ख्याती मिळविली.

श्री. सातवळेकरांच्या कलेत सफाईदारपणा असून समृद्ध रंगांची श्रीमंती जाणवते. त्यांच्या चित्रातील रेषा ठळक असून एकूण रेखाटन जोरदार असते. चित्रातील आकार व रंग चित्रविषयाशी एकजीव झालेले असल्यामुळे चित्र उठावदार दिसते.

त्यांनी आजपावेतो भारतात व भारताबाहेर अशी सुमारे २० प्रदर्शने स्वतःच्या चित्रांची भरविली. त्यांनी १९६४ साली Indian Art Society स्थापन केली. ते Bombay Art Society व Federation of Art Institute या संस्थांचे अध्यक्ष होते १९६९ सालच्या जानेवारी महिन्यात त्यांची Director of Art, Maharashtra State या पदावर नेमणूक झाली.

(ई) **श्यावक्ष चावडा**-या पारशी कलाकाराचा जन्म १९१४ साली नवसारीला झाला. जे. जे. महाविद्यालयातील अभ्यासक्रम यशस्वीपणे पुरा करून श्री. चावडा खास अध्ययनार्थ लंडन व पॅरिस येथे गेले. त्यांनी लंडनमध्ये रेन्डॉल्फ श्वाब नामक प्रसिद्ध रेखाटनकाराच्या हाताखाली शिक्षण घेतले. त्यांची कलासाधना निरंतर चालू असते. त्यांनी भारतीय चित्रकारांत मानाचे स्थान मिळविले आहे.

श्री. चावडा यांची चित्रे रेखाटनप्रधान आहेत. त्यांची नर्तक व प्राणी यांची रेखांकने विशेष लक्षवेधक असून त्यांतील रेखाटन जोरदार व वेगवान आहे. त्यांच्या चित्रांत गतिमान रेषांना महत्त्व असते. त्यांच्या रेषा वस्तू व मनुष्याकृती यांचे प्रत्ययकारी दर्शन घडवितात. ते ललितकला अकादमीचे सभासद असून त्यांनी परदेशात स्वतःच्या चित्रांची प्रदर्शने भरविली आहेत.

(उ) **श्री. मकबूल फिदा हुसेन**-यांनी काही काळ इंदूरच्या कलाविद्यालयात कलाशिक्षण घेतले. त्यांना आधुनिक कलाकारांत उच्च स्थान प्राप्त झाले आहे. त्यांनी युरोपात व अमेरिकेत स्वतःच्या कलेची प्रदर्शने भरवून आंतरराष्ट्रीय

ख्याती मिळविली आहे. त्यांची चित्रे जगातील प्रसिद्ध संग्रहालयांत जपून ठेवण्यात आली आहेत. व्यक्तिचित्रण, प्राणिचित्रण आणि निसर्गचित्रण यांत हुसेन यांचा हातखंडा आहे.

या कलावंताचा जन्म १९१५ साली झाला असून त्याचे वास्तव्य सध्या मुंबईत असते. ते कलाधुंदीत वावरणारे एक कलावंत आहेत. त्यांनी स्वत:वर कोणत्याही विशिष्ट चित्रशैलीचे बंधन लादून घेतलेले नाही. रेषांतील जोरकसपणा, ताजेपणा व आकर्षक रंगांचा मुक्त उपयोग आणि मनुष्याकृती रेखाटण्याची खास ढब ही श्री. हुसेन यांच्या कलेची वैशिष्टये आहेत.

(ऊ) **के. के. हेब्बर** (जन्म १९११)–हे मुंबईच्या जे. जे. महाविद्यालयाचे एक नामांकित माजी विद्यार्थी असून सध्याचे प्रसिद्ध भारतीय चित्रकार आहेत. त्यांनी प्रारंभिक कलाशिक्षण मुंबईस घेऊन मग पॅरिसला प्रयाण केले. त्यांची चित्रे प्रयोगात्मक आहेत. सुरुवातीची त्यांची कला भारतीय शैलीची आहे पुढे त्यांनी रंगकामाची पद्धती, मानवी आकार रेखाटण्याची रीत, आकारांच्या रचनेची ढब इत्यादी बाबतीत प्रयोग सुरू केले. त्यामुळे त्यांच्या शैलीत एकरूपपणा नाही. त्यांच्या चित्रशैलीत लयदार रेषांतील मानवी आकृती व आकारांची आकर्षक मांडणी ही वैशिष्टये आहेत. ग्रामीण जीवन, शेतकरी, कामगारवर्ग, लोकनृत्य इत्यादींविषयी त्यांना विशेष आकर्षण वाटते.

ते ललितकला अकादमीचे सदस्य असून दिल्लीच्या सरकारी कचेरीतील भित्तिचित्रे त्यांनीच रेखाटलेली आहेत. त्यांना आजवर अनेक पुरस्कार मिळाले आहेत.

# प्रकरण ३८ : चित्रकाराची साधने

**प्रश्न १ : चित्रकाराची मुख्य साधने नमूद करा.**

**उत्तर :** (१) पेन्सिल, (२) शाई, (३) कोळशाच्या कांड्या (चारकोल), (४) रंगीत खडूच्या कांड्या (पेस्टल्स), (५) जलरंग व (६) तैलरंग ही चित्रकाराची मुख्य साधने होत.

**प्रश्न २ : चित्रकाराच्या मुख्य साधनांचे प्रत्येकी दोन गुणधर्म लिहा.**

**उत्तर :** (१) **पेन्सिल**–(अ) कमीजास्त जाडीच्या व कमीजास्त काळ-

सरपणाच्या रेषा काढता येणे. (आ) छायाप्रकाश व भरीवपणा/खोली दाखविता येणे.

(२) **शाई**-(अ) ठसठशीतपणा व रंगीबेरंगीपणा, (आ) मुद्रणसुलभता.

(३) **चारकोल**-(अ) चारकोलच्या रेषा चटकन व पूर्णपणे पुसून टाकता येतात. (आ) रेखाटनाच्या सरावास मदत होते.

(४) **पेस्टल्स**-(अ) रंगांचा उबदारपणा व सुंदरपणा. (आ) हाताळण्यास सोपे माध्यम.

(५) **जलरंग**-(अ) पारदर्शक जलरंगांमुळे चित्रात तरलता, सतेजपणा व पारदर्शकपणा हे गुणधर्म उतरतात. (आ) अपारदर्शक रंगांमुळे नितळपणा, भरीवपणा व जोमदारपणा हे गुण चित्रात उतरतात.

(६) **तैलरंग**-( अ ) पोत व आवेशयुक्तता हे विशेष साधता येतात, (आ) हे रंग अतिशय टिकाऊ असतात.

# प्रकरण ३९ : दृक्संवेदना आणि कलावंत

**प्रश्न १ : खालील प्रश्नांची एकेका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) दृक्कला कोणत्या ?

(आ) एकच वस्तू वेगवेगळ्या स्वरूपांत दिसण्याची कारणे कोणती ?

(इ) सृष्टीमधून कलावंताला लाभलेल्या संवेदनांना कलात्मक आकार केव्हा प्राप्त होतो ?

( ई ) कलाकार बाह्यजगाखेरीज आणखी कशाला चित्ररूप देतो ?

(उ) चित्र ही कोणत्या प्रकारची भाषा आहे ?

(ऊ), चित्रकार कोणत्या घटकांच्या मदतीने रसिकांशी संवाद साधतो ?

(ए ) कलावंत कोणत्या दोन कारणांमुळे चित्र काढण्यास प्रवृत्त होतो ?

(ऐ) चित्रकाराला वेगवेगळ्या प्रतिमांचा उपयोग का करावा लागतो ?

**उत्तर** : (अ) चित्र, शिल्प व वास्तू या दृक्कला होत.

(आ) एकच वस्तू अंतर, काळ, गती व पार्श्वभूमी अशा अनेक कारणांमुळ वेग वेगळ्या स्वरूपांत दिसते.

(इ) सृष्टीमधून कलावंताला लाभलेल्या संवेदना जेव्हा त्याच्या मनाच्या मुशीतून बाहेर पडतात तेव्हा त्यांना कलात्मक आकार प्राप्त होतो.

(ई) कलाकार बाह्यजगाखेरीज त्या जगामुळे मनात उमटलेल्या प्रतिमांना चित्ररूप देतो.

(उ) चित्र ही फक्त डोळ्यांच्या संवेदनांच्या द्वारेच समजणारी भाषा आहे.

(ऊ) चित्रकार रेषा, रंग, आकार व पोत या घटकांच्या मदतीने रसिकांशी संवाद साधतो.

(ए) कलावंत १ बाह्य जग पाहून झालेल्या संवेदना प्रकट करणे व २. चित्र-घटकांचे निराळ्या स्वरूपांतील ज्ञान समजून घेणे अशा दोन कारणांसाठी चित्र काढण्यास प्रवृत्त होतो.

(ऐ) चित्रकाराला मनातील संवेदना प्रकट करण्यासाठी वेगवेगळ्या प्रति-मांचा उपयोग करावा लागतो.

## प्रश्न २ : चित्रनिर्मितीची प्रक्रिया थोडक्यात उलगडून सांगा.

चित्रकार जेव्हा भोवतालच्या जगाकडे सूक्ष्म दृष्टीने बघतो तेव्हा त्या जगातील विविध वस्तूंचे विविध आकार व रंग त्याच्या नजरेत भरतात. अशा प्रकारे बाह्य जगाचा त्याच्या दृष्टीवर जो परिणाम झालेला असतो त्याचा त्याच्या मनावर ठसा उमटतो. कधी त्याला हा ठसा किंवा संस्कार पूर्णपणे उमगलेला असतो तर कधी हा संस्कार अस्पष्ट असतो. ह्या संस्कारामुळे त्याला आनंदाचा अनुभव आलेला असतो. तसाच आनंद कलाप्रेमी रसिकांना व्हावा या इच्छेने कलावंत आपल्या मनावर झालेला संस्कार रेषा, रंग, आकार, पोत इत्यादी घटकांच्या मदतीने साकार करतो. अशा प्रकारे साकार झालेला संस्कार म्हणजेच चित्रकृती किंवा कलाकृती होय. तिच्या दर्शनाने रसिकांच्या मनातही चित्रकाराच्या मनातल्या संस्कारासारखा संस्कार जागृत होऊन त्यालाही आनंदाचा अनुभव येतो.

# प्रकरण ४० : रसिकाची दृष्टी

**प्रश्न १ : खालील विधानांतील चुका दुरुस्त करून ती पुन्हा लिहा.**

(अ) उत्कृष्ट कलाकृती कोणती व निकृष्ट कलाकृती कोणती हे ठरविणे सोपे आहे.

(आ) चित्राच्या आस्वादासाठी रसिकत्वाची किंवा सुसंस्कृत सौन्दर्यदृष्टीची गरज नाही.

(इ) कलाशैलीचा युगधर्माशी संबंध नसतो.

(ई) रसिकाच्या मनाला एखाद्या कलापंथाचा अभिनिवेश अवश्य असावा.

(उ) काळाचा किंवा परिस्थितीचा ठसा कलेवर फारसा उमटत नाही.

(ऊ) कलेचा रसास्वाद घेताना रसिकाने थोडीशी तटस्थता राखावी.

(ए) दृक्‌कलांचे मूळ घटक कलाकृतीत कसेही मांडले गेलेले चालतात.

(ऐ) प्रत्येक कलाकृतीत तिचे स्वतःचे वैशिष्टच असतेच असे नाही.

**उत्तर :** (अ) उत्कृष्ट कलाकृती कोणती व निकृष्ट कलाकृती कोणती हे ठरविणे अवघड आहे.

(आ) चित्राच्या आस्वादासाठी रसिकत्वाची किंवा सुसंस्कृत सौन्दर्यदृष्टीची अतिशय गरज आहे.

(इ) कलाशैलीचा युगधर्माशी घनिष्ट संबंध असतो.

(ई) रसिकाच्या मनाला कोणत्याही कलापंथाचा अभिनिवेश नसावा.

(उ) काळाचा किंवा परिस्थितीचा ठसा कलेवर अवश्य उमटतो.

(ऊ) कलेचा रसास्वाद घेताना रसिकाने तद्रूपता साधावी.

(ए) दृक्‌कलांचे मूळ घटक कलाकृतीत उत्तम प्रकारे मांडले जावे लागतात.

(ऐ) प्रत्येक कलाकृतीत तिचे स्वतःचे वैशिष्ट्य अवश्य असते.

**प्रश्न २ : कलाकृतीचे रसग्रहण करताना कोणते मुद्दे लक्षात ठेवावयास हवेत ?**

**उत्तर :** कलाकृतीचे रसग्रहण करताना खालील मुद्दे लक्षात ठेवावयास हवेत–

(अ) कलाकृती ज्या काल-मान-परिस्थितीत निर्माण झालेली असेल त्या परिस्थितीला अनुरूप असे तिचे (कलाकृतीचे) स्वरूप आहे की नाही.

(आ) रंग, रेषा, आकार, घनता इत्यादी कलेचे मूळ घटक उत्तम प्रकारे आविष्कृत झाले आहेत किंवा नाहीत.

(इ) कलाकृतीत खास तिचे असे स्वतंत्र वैशिष्टय उतरले आहे की नाही.

(ई) कलावंताला अभिप्रेत असलेला कलात्मक आशय कलाकृतीत प्रकट झाला आहे की नाही.

# प्रकरण ४१ : काव्यमय सौंदर्याने बहरलेली भारतीय चित्रकला

**प्रश्न १ : कंसांतील शब्दांपैकी योग्य शब्दांची निवड करून खालील वाक्ये पूर्ण करा व पुन्हा लिहा.**

(अ) पाश्चात्त्य चित्रकलेत·········या कलाघटकाला महत्त्व आहे तर पौर्वात्य चित्रकलेत·········या कलाघटकाला महत्त्व आहे (रंग, घनाकार, रेषा, पोत)

(आ) सुंदर व लयबद्ध रेषा हे भारतीय चित्रकलेचे············आहे. (भूषण, दूषण)

(इ) छायाप्रकाशामुळे चित्रे·········वाटतात. (उठावदार, क्षणिक, खोटी)

(ई) यथादर्शनात दूरच्या वस्तू·········दिसतात. (सुस्पष्ट, अस्पष्ट)

(उ) 'बुद्ध भिक्षा मागत आहे' या प्रसिद्ध चित्रात राहुल व त्याची आई यांच्यापेक्षा बुद्ध·········मोठा दाखविला आहे. (चौपट, तिप्पट)

(ऊ) भारतीय चित्रकलेची मुख्य अंगे·········आहेत. (आठ, सहा)

(ए) भारतीय चित्रकार चित्रगत व्यक्तीच्या स्वभाववैशिष्टयानुसार······· वापर करतो. (रेषाकृतींचा, रंगसंगतीचा)

(ऐ) भारतीय चित्रकार भावदर्शनासाठी अनेक·········उपयोग करतो. (रंगांचा, प्रतीकांचा)

(ओ) भारतीय चित्रातील लावण्य ··············· आहे. (आदर्शवादी, वास्तववादी)

(औ) उपनिषत्कालीन चित्रकार कुंचल्यासाठी···········वापरीत असावेत. (केस, तंतू)

(अं) बौद्ध चित्रकार·········रंगाने रेषाकृती काढीत असत. (पिवळ्या, तांबड्या)

(अ) सर्व चित्र प्रथम एका रंगात पुरे करण्याची पद्धत········भित्तिचित्रांत आढळते. (ग्रीक, इटालियन)

(क) मोगल, राजपूत व कांग्रा शैलींतील सर्व चित्रे········आहेत. (बृहच्चित्रे, लघुचित्रे)

(ख) माऊंटच्या नक्षीच्या पट्टीचे दोन प्रकार असतात; एक फुलखडी व दुसरा········ (वृक्ष, वेल)

**उत्तर**: (अ) पाश्चात्त्य चित्रकलेत **घनाकार** या कलाघटकाला महत्त्व आहे तर पौर्वात्य चित्रकलेत **रेषा** या कलाघटकाला महत्त्व आहे.

(आ) सुंदर व लयबद्ध रेषा हे भारतीय चित्रकलेचे **भूषण** आहे.

(इ) छायाप्रकाशामुळे चित्रे **क्षणिक** वाटतात.

(ई) यथादर्शनात दूरच्या वस्तू **अस्पष्ट** दिसतात.

(उ) 'बुद्ध भिक्षा मागत आहे' या प्रसिद्ध चित्रात राहुल व त्याची आई यांच्यापेक्षा बुद्ध **तिप्पट** मोठा दाखविला आहे.

(ऊ) भारतीय चित्रकलेची मुख्य अंगे **सहा** आहेत.

(ए) भारतीय चित्रकार चित्रगत व्यक्तीच्या स्वभाववैशिष्ट्यानुसार **रंगसंगतीचा** वापर करतो.

(ऐ) भारतीय चित्रकार भावदर्शनासाठी अनेक **प्रतीकांचा** उपयोग करतो.

(ओ) भारतीय चित्रातील लावण्य **आदर्शवादी** आहे.

(औ) उपनिषत्कालीन चित्रकार कुंचल्यासाठी **तंतू** वापरीत असावेत.

(अं) बौद्ध चित्रकार **तांबड्या** रंगाने रेषाकृती काढीत असत.

(अः) सर्व चित्र प्रथम एका रंगात पुरे करण्याची पद्धत **इटालियन** भित्ति-चित्रांत आढळते.

(क) मोगल, राजपूत व कांग्रा शैलींतील सर्व चित्रे **लघुचित्रे** आहेत.

(ख) माऊंटच्या नक्षीच्या पट्टीचे दोन प्रकार असतात; एक फुलखडी व दुसरा **वेल**.

**प्रश्न २ : भारतीय चित्रकलेची मुख्य वशिष्ट्ये कोणती ?**

**उत्तर :** (१) कलानंद देणाऱ्या लयबद्ध रेषा, (२) वस्तुमानाचे पूर्ण व स्पष्ट स्वरूपदर्शन आणि (३) चित्रपरिणामावर वा रसनिष्पत्तीवर भर ही भारतीय चित्रकलेची मुख्य वैशिष्ट्ये होत.

**प्रश्न ३ : भारतीय चित्रकलेची सहा अंगे नमूद करून त्यांचे प्रत्येकी दोन वाक्यांत वर्णन करा**

**उत्तर :** वात्स्यायनाच्या कामसूत्रांवरील यशोधर पंडिताच्या टीकेत (म्हणजे

विवरणग्रंथात) भारतीय चित्रकलेची सहा अंगे नमूद केलेली आहेत ती अशी:

रूपभेदाः प्रमाणानि भावलावण्ययोजनम् ।
सादृश्यं वर्णिकाभङ्गं इति चित्रं षडङ्गकम् ॥

(१) **रूपभेदा**-चित्रातील विविध व्यक्तींच्या स्वभावधर्मातील भेद. हा भेद रंगांच्या व लहानमोठ्या आकारांच्या द्वारे दर्शविला जाई.

(२) **प्रमाणानि**-चित्रगत व्यक्तीच्या शारीरिक अवयवांचे किंवा एका वस्तूचे दुसऱ्या वस्तूशी प्रमाण. लयबद्ध रेषांच्या गतीला प्राधान्य.

(३) **भावयोजनम्**-चित्रगत व्यक्तीचे विविध भाव भोवतालच्या निसर्गातून आविष्कृत करून दाखविले जात. या आविष्कारासाठी प्रतीकांचा उपयोग.

(४) **लावण्ययोजनम्**-चित्रगत लावण्यात साहित्यगत सौन्दर्यसंकेतांचा आविष्कार. हे लावण्य आदर्शवादी अतएव आलंकारिक.

(५) **सादृश्यम्**-मानवाच्या अथवा प्राण्याच्या विशिष्ट मनःस्थितीतील शारीरिक ठेवणीचा हुबेहूबपणा. उदा. केसांच्या बटेशी खेळणारी स्त्री, भ्यालेला हत्ती इत्यादी भावनांचे मार्मिक रेखाटन.

(६) **वर्णिकाभङ्गम्**-मोहक व टवटवीत रंगांचा उपयोग. त्यामुळे रसिक मन उल्हसित होऊन त्याला कलानंदाचा अनुभव येतो.

**प्रश्न ३: पुढील विषयांवर प्रत्येकी पाच ओळींची टीप लिहा:**

(अ) भारतीय चित्रकाराचा कुंचला, (आ) बौद्धकालीन भित्तिचित्रांचे रंगकाम, (इ) लघुचित्रांचा कागद.

**उत्तर: (अ) भारतीय चित्रकाराचा कुंचला**-१ उपनिषत्कालीन चित्रकार तंतूंचे कुंचले वापरीत असत. २ लघुचित्रे काढणारे कलावंत बकरी, उंट, खार आणि मुंगूस यांच्या केसांचे कुंचले बनवीत असत. ३ केवळ एकच केस असलेले कुंचलेही बनविण्यात येत असत. ४ अशा कुंचल्यासाठी साळिंद्रीच्या अंगावरील पोकळ काटा उपयोगात आणीत असत. ५ खारीच्या पिल्लाच्या शेपटीच्या केसांचा बारीक कुंचला बनवीत असत.

**(आ) बौद्धकालीन भित्तिचित्रांचे रंगकाम**-१ प्रथमतः चित्रकार तांबड्या रंगाने अतिशय काळजीपूर्वक रेषाकृती काढीत असे. २ त्यानंतर तो काळपट हिरव्या रंगाने (पातळ स्वरूपात) छटा भरीत असे. ३ अशा प्रकारे एका रंगात चित्र पुरे झाल्यावर मग इतर रंगांत संपूर्ण काम केले जाई. ४ सर्व रंगांत एक प्रकारची एकतानता साधण्यात येई. ५ सर्व रंगकाम पूर्ण झाल्यावर चित्रकार काळ्या व तपकिरी रंगाने पुन्हा एकदा रेषाकृती काढीत असे.

(इ) **लघुचित्रांचा कागद**-१ लघुचित्रकार कागद स्वत: बनवीत असे किंवा आपल्या देखरेखीखाली बनवून घेत असे. २ दोन किंवा तीन कागद एकावर एक चिकटवून जाड कागद बनविण्यात येई. ३ ग्रंथासाठी चित्र काढावयाचे असल्यास एकच कागद घेण्यात येत असे. ४ चित्र काढावयाची बाजू गुळगुळीत दगडावर ठेवून तिची मागची बाजू पॉलिश करावयाच्या दगडाने चांगली घोटीत असत व कागदाला झिलई देत असत. ५ अनुरेखनासाठी हरिणाजिनापासून तयार केलेला 'चरब' नावाचा कागद वापरीत असत.

# प्रकरण ४२ : अध्यात्माला साकार करणारी भारतीय शिल्पकला

**प्रश्न १ : प्राचीन भारत त कोणकोणत्या माध्यमांत मूर्ती बनविल्या जात असत ?**

**उत्तर** : प्राचीन भारतात पुढील सात माध्यमांत मूर्ती बनविल्या जात असत-१. लाकूड, २. दगड, ३. माती, ४. धातू, ५. रत्ने, ६. गंध व ७. फुले.

**प्रश्न २ : वरील माध्यमांतील मूर्तींना कोणती नावे होती ?**

**उत्तर** : वरील माध्यमांतील मूर्तींना अनुक्रमे खालील नावे होती- १. दारुघटिता, २. शैलजा, ३. मृण्मयी, ४. पाकजा, ५. रत्नजा, ६. गंधजा व ७. कौसुमी.

**प्रश्न ३ : पुढील प्रश्नांची एकेका वाक्यात उत्तरे लिहा :**

(अ) भारतीय शिल्पकलेचे मुख्य प्रयोजन कोणते होते ?

(आ) प्रतिमाशिल्पाची नियमावली कोणत्या संस्कृत ग्रंथांत दिली आहे ?

(इ) लाकडी मूर्तीसाठी कोणती झाडे निषिद्ध मानण्यात येत असत ?

(ई) दगडी मूर्तीसाठी शिल्पकाराने कोणता दगड निवडावा ?

(उ) मातीची मूर्ती बनविण्यासाठी मातीत इतर कोणते पदार्थ मिसळत असत ?

(ऊ) भारतीय प्रमाणपद्धतीची दोन ठळक वैशिष्टय लिहा.

(ए) भारतीय शिल्पकाराच्या डोळ्यांपुढे कोणता ध्येयवाद होता ?

(ऐ) प्रतिमा-शिल्पांवर कोणत्या दोन कलांचा प्रभाव पडला आहे ?

**उत्तर** : (अ) धर्मतत्त्वांचा प्रसार करणे हे भारतीय शिल्पकलेचे मुख्य प्रयोजन होते.

(आ) प्रतिमाशिल्पाची नियमावली बृहत्संहिता व मत्स्यपुराण या संस्कृत ग्रंथांत दिली आहे.

(इ) लाकडी मूर्तीसाठी उपयुक्त, अपवित्र ठिकाणची, मृत व कमकुवत झाडे निषिद्ध मानण्यात येत असत.

(ई) दगडी मूर्तीसाठी शिल्पकाराने जमिनीपासून दूर न झालेला, ज्याच्या थरात वाळूचे कण नाहीत असा, दिसायला चांगला, पाण्यात असलेला, झऱ्याच्या पाण्याने धुतला गेलेला, झाडाच्या सावलीतला, तीर्थक्षेत्री असलेला व भरपूर लांबरुंद असलेला दगड निवडावा.

(उ) मातीची मूर्ती बनविण्यासाठी मातीत दगड, वाळू व लोखंड यांची भुकटी, खदिर, अर्जुन, कुंकुम, कुटजा, लाकूड, ताक, दूध व शुद्ध केलेले लोणी हे पदार्थ मिसळत असत.

(ऊ) भारतीय प्रमाणपद्धती १. बिनचूक व २. सूक्ष्म आहे.

(ए) भारतीय शिल्पकाराच्या डोळ्यांपुढे ईश्वराच्या अलौकिक सौंदर्याचा साक्षात्कार घडविणे हा उदात्त ध्येयवाद होता.

(ऐ) प्रतिमाशिल्पांवर साहित्य व नृत्य या दोन ललितकलांचा प्रभाव पडला आहे.

**प्रश्न ४ : 'अ' गटातील शब्दांना जुळतील असे 'ब' गटातील शब्द निवडून जोड्या जुळवा व लिहा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १. भारतीय शिल्पकला | १. भक्तवत्सल भगवंत. |
| २. नटराजाची मूर्ती | २. विष्णुधर्मोत्तरपुराण |
| ३. पंढरीचा विठ्ठल | ३. मृण्मयी मूर्ती |
| ४. प्रतिमाशिल्पनियमावली | ४. वेदान्ताचे ज्ञान. |
| ५. दगडी मूर्ती | ५. बृहत्संहिता |
| ६. हयशीर्ष पंकरात्र | ६. ज्ञानशक्तीचे तांडव |
| ७. शरीरशास्त्राची चर्चा | ७. मथुराशिल्प |
| ८. हस्तमुद्रा | ८. मत्स्यपुराण |

| उत्तर : 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १. भारतीय शिल्पकला | १. वेदान्ताचे ज्ञान. |
| २. नटराजाची मूर्ती | २. ज्ञानशक्तीचे तांडव. |
| ३. पंढरीचा विठ्ठल | ३. भक्तवत्सल भगवंत |
| ४. प्रतिमाशिल्पनियमावली | ४. मत्स्यपुराण |
| ५. दगडी मूर्ती | ५. विष्णुधर्मोत्तरपुराण |
| ६. हयशीर्ष पंचरात्र | ६. मृण्मयी मूर्ती |
| ७. शरीरशास्त्राची चर्चा | ७. बृहत्संहिता |
| ८. हस्तमुद्रा | ८. मथुराशिल्प |

**प्रश्न ५ : पुढील विधानांचे तीन-तीन वाक्यांत स्पष्टीकरण करा.**

(अ) भारतीय शिल्पकार वेदान्ताचा जाणकार असे.
(ब) गुप्तकालीन भारतीय कलावंत ओतकामकलेत निपुण होता.
(क) भारतीय प्रमाणपद्धती बिनचूक व सूक्ष्म होती.
(ड) भारतीय कलाकार हृदयस्थ स्वरूप साकार करीत असे.
(इ) भारतीय शिल्पकलेचा नृत्यकलेशी जिव्हाळ्याचा संबंध होता.

**उत्तर : (अ) भारतीय शिल्पकार वेदान्ताचा जाणकार असे** (१) धार्मिक तत्त्वांचा प्रसार करणे हे प्राचीन भारतीय शिल्पकलेचे मुख्य उद्दिष्ट होते. (२) प्राचीन कलाकाराला वेदांतील अवघड तत्त्वज्ञान समजावून सांगावयाचे असे, उदा. देव-प्रतिमा अमूर्त तत्त्वज्ञानाची मूर्ती असे, नटराज म्हणजे अज्ञाननाशक ज्ञानशक्ती, त्रिमूर्ती हे उत्पादन-रक्षणनाशनांचे प्रतीक, इ. ३. म्हणून शिल्पकार शिल्पनिपुण असेच पण त्याबरोबरच तो वेदान्ताचा जाणकार असे.

**(ब) गुप्तकालीन भारतीय कलावंत ओतकामकलेत निपुण होता.** (१) गुप्तकालीन कलावंत लोखंड, पितळ, सोने इत्यादी धातूंच्या उत्कृष्ट मूर्ती बनवीत असे. (२) त्यासाठी मेणाची प्रतिमा बनवून तिचा मृण्मय साचा बनविण्याचे कसब त्याने संपादिले होते. (३) या साच्यात धातूचा रस विशिष्ट पद्धतीने ओतून तो 'पाकजा' मूर्ती बनवीत असे.

**(क) भारतीय प्रमाणपद्धती बिनचूक व सूक्ष्म होती.** १. बृहत्संहिता, मत्स्यपुराण इत्यादी ग्रंथांमधून मानवी शरीराच्या सर्व अवयवांच्या प्रमाणांचे वर्णन आढळते. २. उदाहरणार्थ, डोळा, त्यातील बुबुळ, त्यातील बाहुली इत्यादी सर्व अवयवांची बिनचूक लांबीरुंदी देण्यात आली आहे. ३. तिच्या आधारे भारतीय शिल्पकार प्रतिमा घडवीत असत.

**(ड) भारतीय कलाकार हृदयस्थ स्वरूप साकार करीत असे.** १. भारतीय शिल्पकाराचा ध्येयवाद ईश्वरीय सौंदर्याचा साक्षात्कार घडविणे हा होता. २. तो शरीरशास्त्राचे नियम केवळ मार्गदर्शनापुरते मानीत असे, तो त्यात स्वतःला गुंतवून घेत नसे. ३. तो शुक्राचार्यांच्या शुक्रनीतीतील, 'कलावंताने हृदयात निर्माण होणारे स्वरूप साकार करावे', हा आदेश शिरोधार्य मानून कलानिर्मिती करीत असे.

**(इ) भारतीय शिल्पकलेचा नृत्यकलेशी जिव्हाळ्याचा संबंध होता.** १. भारतीय नृत्यात करपल्लवी नेत्रपल्लवी इत्यादी शारीरिक हालचालींना विशेष महत्त्व आहे. २. भारतीय प्रतिमाकलेने या हालचाली शिल्पांकित करून शिल्पे सजीव बनविली, उदा. मथुरा-शिल्पे. ३. अशा प्रकारे भारतीय शिल्पकलेने नृत्य-कलेशी जिव्हाळ्याचा संबंध प्रस्थापित केला होता.

# प्रकरण ४३ : शिल्पसौंदर्याने नटलेली भारतीय वास्तुकला

**प्रश्न १ : खालील वाक्यांतील चुका दुरुस्त करून ती पुन्हा लिहा.**

(अ) भारतीय कलेत वास्तुकला व चित्रकला यांचा मधुर संगम झाला आहे.
(आ) कैलास मंदिराचे काम शंभर वर्षे चालू होते.
(इ) वास्तुशास्त्रावर सामाजिक कल्पनांचा पगडा फार मोठा होता.
(ई) विश्वकर्मा हा दक्षिणेकडील व मय हा उत्तरेकडील श्रेष्ठ स्थपती होता.
(उ) लेण्यांजवळ सापडलेल्या शिलालेखांवर कारागिरांची नावे आढळतात.
(ऊ) लेण्याच्या खोदकामास खालपासून आरंभ केला जाई.
(ए) कार्ला येथील चैत्यगृहातील तुळया एक टन वजनाच्या आहेत.
(ऐ) प्रचंड दगडांची वाहतूक जमिनीवरून करीत असावेत.
(ओ) दक्षिणेतील गोपुरांचे खालचे मजले विटांचे असून वरचे सर्व मजले दगडांचे आहेत.
(औ) मंदिरावरील कळसाचा प्रचंड दगड उंटांच्या मदतीने वर नेला जाई.

**उत्तर :** (अ) भारतीय कलेत वास्तुकला व **शिल्पकला** यांचा मधुर संगम झाला आहे.

(आ) कैलास मंदिराचे काम **तीनशे** वर्षे चालू होते.

(इ) वास्तुशास्त्रावर **धार्मिक** कल्पनांचा पगडा फार मोठा होता.

(ई) विश्वकर्मा हा **उत्तरेकडील** व मय हा **दक्षिणेकडील** श्रेष्ठ स्थपती होता.

(उ) लेण्यांजवळ सापडलेल्या शिलालेखांवर **देणगीदारांची** नावे आढळतात.

(ऊ) लेण्याच्या खोदकामास **वरपासून** आरंभ केला जाई.

(ए) कार्ला येथील चैत्यगृहातील तुळया **साडेतीन टन** वजनाच्या आहेत.

(ऐ) प्रचंड दगडांची वाहतूक **नदीच्या पात्रातून** करीत असावेत.

(ओ) दक्षिणेतील गोपुरांचे खालचे मजले **दगडांचे** असून वरचे सर्व मजले **विटांचे** आहेत.

(औ) मंदिरावरील कळसाचा प्रचंड दगड **हत्तींच्या/बैलगाडीच्या** मदतीने वर नेला जाई.

**प्रश्न २ : खालील विषयांवर टिपणे लिहा :**

(अ) दीर्घकालीन प्राचीन बांधकामे, (आ) चार स्थपती, (इ) लेणी खोदण्याची पद्धती, (ई) प्रचंड दगडांची वाहतूक, (उ) मंदिराचा कळस बसविण्याची युक्ती, (ऊ) 'वास्तु' शब्दाची व्याप्ती.

**उत्तर :** (अ) प्राचीन बांधकामे शेकडो वर्षे चालत. उदा कैलास मंदिराचे बांधकाम तीनशे वर्षे चालू होते तर ताजमहालाचे बारा वर्षे चालू होते. कैलास मंदिराच्या बांधकामासाठी स्थपतींच्या तीन पिढ्या राबल्या तर ताजमहालाच्या उभारणीसाठी दररोज वीस हजार कामगार खपत होते. अशा प्रकारे जुन्या काळातील बांधकामे पिढ्यान्‌पिढ्या चालू राहात असल्यामुळे त्यांवर निरनिराळ्या युगधर्मांचा वा कलाशैलीचा परिणाम अपरिहार्यपणे होत असे. तरीदेखील मूळ संकल्पकाने संपूर्ण वास्तूचा आराखडा तपशीलवार काढलेला असल्याने समस्त बांधकामात सुसंगती असे.

(आ) **चार स्थपती :** मयमत, मानसार इत्यादी ग्रंथांत असे नमूद करण्यात आले आहे की, ब्रह्मदेवाने पुढील चार स्थपती निर्माण केले–विश्वकर्मा, मय, त्वष्टा व मनू. ह्यांपैकी विश्वकर्मा हा उत्तरेकडील व मय हा दक्षिणेकडील प्रसिद्ध स्थपती होता. वरील ग्रंथांत या चार स्थपतींचा उल्लेख 'स्वर्गाची रचना करणारे' अशा गौरवपूर्ण शब्दांत्‌ केलेला आहे.

(इ) **लेणी खोदण्याची पद्धती–** लेणी खोदण्याच्या दोन पद्धती होत्या. पहिल्या पद्धतीत भिंतीपासून पायऱ्यापायऱ्यांची रचना खोदून तयार केली जाई. भिंतीकडचे खोदलेले दगड पायऱ्यांवरून लोटीतलोटीत दरवाज्यापर्यंत आणले जात.

दुसऱ्या पद्धतीत मीटर-दीडमीटर अंतराचे खंदक अंतरा-अंतराने खणले जात. दोन्हीकडच्या खंदकांमध्ये जो उभा भाग शिल्लक राही त्यावर छिन्नी चालवून खोदकाम करीत. ज्या ठिकाणी लेणे खोदावयाचे असे त्या ठिकाणी प्रथम भिंती-सारखा पृष्ठभाग तयार करून घेत. नंतर वरपासून खोदकामास प्रारंभ करीत. उदा. प्रवेशद्वारावरील खिडकी अगोदर खोदली जाई व मग प्रवेशद्वार खोदले जाई. अशा प्रकारे अगदी शेवटी खालची जमीन तयार होई. खोदकाम सुरू असतानाच झालेल्या कामास झिलई देण्याचे काम हाती घेण्यात येत असे.

(ई) **प्रचंड दगडांची वाहतूक**- अनेक बांधकामांत प्रचंड आकाराचे व वजनाचे दगड वापरण्यात आले आहेत. उदा. अशोकस्तंभ १५ मीटर लांब व ५० टन वजनाचा आहे. शिवाय तो चुनारच्या खाणीतून सांचीसारख्या ५०० मैल अंतरावर असलेल्या ठिकाणी बसविला गेला. ती वाहतूक नद्यांना पूर आला असता केली गेली असावी.

(उ) **मंदिराचा कळस बसविण्याची युक्ती**-मंदिराचा कळस बसविणे ही अवघड गोष्ट असे. देवळाभोवती मातीचा वर्तुळाकार ढीग रचला जाई आणि गाभारा कोरड्या वाळूने भरून टाकीत. अशा प्रकारे उभ्या बांधकामास आतून व बाहेरून भक्कम टेकू देत असत. नंतर बाहेरील मातीच्या ढिगाऱ्यावरून सरळ किंवा वर्तुळाकार मार्गाने हत्तींच्या किंवा बैलगाडीच्या मदतीने प्रचंड वजनाचे दगड वर नेले जात असत. अशा प्रकारे विज्ञानातील Slanting planeच्या तत्त्वाचा उपयोग करून प्रचंड आकाराचे व वजनाचे कळस बसवीत असत.

(ऊ) **'वास्तु' शब्दाची व्याप्ती**–मयमत, मानसार इत्यादी ग्रंथांमध्ये वास्तु शब्द व्यापक अर्थाने वापरला आहे. त्या शब्दाचे धरा (जमीन), हर्म्य (राजवाडा, हवेली), यान (वाहन) व पर्यंक (पलग, पालखी) असे चार अर्थ दिलेले आहेत. अर्थात ज्या जमिनीवरून आपण चालतो ती जमीन किंवा भूमी, त्या भूमीवरील हवेली, भूमीवरून जाणारे वाहन व भूमीवर रचण्यात आलेला पलंग इत्यादी सर्वांचा समावेश वास्तु शब्दात होत असे. मनुष्य जमिनीवर बसतो, हवेलीत राहतो, वाहनात बसून प्रवास करतो व पलंगावर किंवा पालखीत बसतो. अशा प्रकारे वरील चारी गोष्टींशी मनुष्याच्या राहण्याचा (वास्तु शब्दातील मूळ क्रियावाचक शब्द 'वस्' हा असून त्याचा अर्थ राहणे किंवा असणे हा आहे) संबंध असल्यामुळे वास्तु शब्दाचा वरील चतुर्विध अर्थ योग्य आहे.

# प्रकरण ४४ : परंपरेची जपणूक करणारी भारतीय हस्तकला

**प्रश्न १ : कंसांत दिलेल्या शब्दांपैकी योग्य शब्द रिकाम्या जागी भरून खालील वाक्ये पूर्ण करा व पुन्हा लिहा.**

(अ) भारतीय हस्तकलेचा इतिहास·········आहे. (प्राचीन, मध्ययुगीन, अर्वाचीन)

(आ) उत्तम कारागिरी, मोहक आकार व सुंदर ··········· ही भारतीय हस्तकलेची वैशिष्टये आहेत. (अलंकरण, रंगसंगती)

(इ) हस्तकला ही प्रामुख्याने········निर्माण होते. (शहरात, खेड्यात)

(ई) हस्तकलेत यंत्रसामुग्रीचा वापर·········प्रमाणात केलेला असतो. (मोठ्या, कमी)

(उ) हस्तकलाविलास·········वस्तूंतून प्रत्ययास येतो. (छानछोकीच्या, नित्योपयोगाच्या)

(ऊ) प्राचीन काळी ··············संघ स्थापन झाले होते. (ग्राहकांचे, कारागिरांचे)

**उत्तर :** (अ) भारतीय हस्तकलेचा इतिहास **प्राचीन** आहे.

(आ) उत्तम कारागिरी, मोहक आकार व सुंदर **अलंकरण** ही भारतीय हस्तकलेची वैशिष्टये आहेत.

किंवा

उत्तम कारागिरी, मोहक आकार व सुंदर **रंगसंगती** ही भारतीय हस्तकलेची वैशिष्टये आहेत.

(इ) हस्तकला ही प्रामुख्याने **खेड्यात** निर्माण होते.

(ई) हस्तकलेत यंत्रसामुग्रीचा वापर **कमी** प्रमाणात केलेला असतो.

(उ) हस्तकलाविलास **नित्योपयोगाच्या** वस्तूंतून प्रत्ययास येतो.

(ऊ) प्राचीन काळी **कारागिरांचे** संघ स्थापन झाले होते.

**प्रश्न २ : खालील शहरे कोणकोणत्या हस्तव्यवसायांसाठी प्रसिद्ध आहेत ते लिहा.**

(१) दिल्ली, (२) गौर, (३) जयपूर, (४) बनारस, (५) अहमदाबाद, (६) मुरबाड, (७) लखनौ, (८) अल्मोडा, (९) म्हैसूर, (१०) जोधपूर, (११) तंजावर, (१२) सुरत, (१३) हैदराबाद, (१४) सखेडा, (१५) मदुरा.

**उत्तर** : (१) **दिल्ली**–निळ्या रंगाची झिलईदार मातीची भांडी.

( २ ) **गौर**-गुळगुळीत फरशा.

( ३ ) **जयपूर**-मातीची शोभेची भांडी.

( ४ ) **बनारस**-धातूच्या मूर्ती, रंगीत लाकडी खेळणी, हस्तीदंती कोरीव काम व शाल्.

( ५ ) **अहमदाबाद**–धातूतील जाळीचे पडदे, पानदाने आणि हस्तीदंती कोरीव काम.

( ६ ) **मुरबाड**–नव्या तऱ्हेची तांब्याची भांडी.

( ७ ) **लखनौ**-निकानचे भरतकाम.

( ८ ) **अल्मोडा**–भौमितिक संकल्पाचे गालिचे.

( ९ ) **म्हैसूर**–कापडाचे व रेशमाचे गालिचे, लाकडी, चंदनी व हस्तीदंती कोरीव काम.

(१०) **जोधपूर**–रंगीत लाकडी कोरीव पाळणे.

(११) **तंजावर** -किनखाबाचे विणकाम.

(१२) **सुरत**–चंदनी व हस्तीदंती कोरीव काम आणि किनखाबाचे विणकाम.

(१३) **हैदराबाद**–मलमलीचे विणकाम व बीडरी काम.

(१४) **संखेडा**-लाकडावरील विशिष्ट रंगकाम ( संखेडा काम).

(१५) **मदुरा**-चंदनावरील कोरीव काम.

**प्रश्न ३ : खालील तीन हस्तव्यवसायांविषयी विस्ताराने माहिती लिहा :**

(अ) लाकडी कोरीव काम, (आ) लाखेवरील काम, (इ) विणकाम.

**उत्तर** :(अ) **लाकडी कोरीव काम**–शोभेच्या व सुंदर वस्तू बनविण्याच्या हेतूने लाकडावर कोरीव काम प्राचीन काळात केले जात असे व आजही केले जाते. याबाबतीत शिल्पकार व लाकडी खोदकाम करणारे कारागीर असे दोन प्रकारचे कलावंत प्रसिद्ध आहेत. प्राचीन काळी दगड, शिंपले व प्राण्यांचे दात ही हत्यारे लाकडी कोरीव कामासाठी वापरली जात असत. जरी मौर्य काळात उत्कृष्ट लाकडी कोरीव काम होत असे तरी एकंदरीने लाकडी फर्निचरच्या कलेच्या इतिहासात भारतीय कारागिराचे स्थान परिवर्तकाचेच आहे. त्याने फर्निचरच्या स्वतंत्र पद्धती शोधून काढण्याऐवजी पाश्चिमात्य पद्धतींत फेरफार करण्यावरच लक्ष दिले. युरोपात घरगुती फर्निचर वापरण्याची प्रथा सर्रास होती. तशी ती भारतात सोळाव्या शतकानंतर रूढ झाली. पोर्तुगीज, इंग्लिश व डच फर्निचरच्या प्रसारानंतर टेबले व खुर्च्या वापरण्याचा प्रघात पडला. भारतीय कारागीर विदेशी फर्निचरला मुरड वा वळण देण्यात वाकबगार होता. त्यामुळेच फर्निचरची एक इंडो-युरोपीय पद्धती अस्तित्वात

आली. तिची छाप पश्चिमात्य देशांतील फर्निचरच्या कलेवरही पडली. इंडो-पोर्तुगीज फर्निचरकलेत प्रांतिक मोगल शैलीचा समावेश होता. परंतु या प्रकाराहून काहीसा भिन्न प्रकार म्हणजे इंडो-डच फर्निचर. या प्रकारच्या लाकडी वस्तूंत लाखेचा वापर अधिक प्रमाणात करण्यात येतो. शिवाय, त्यात फुलांचे आकार साधलेले असतात. अठराव्या शतकात भारतात ब्रिटिशांची सत्ता जसजशी वाढू लागली तसतशा सर्व इंडो-युरोपीय फर्निचरपद्धती इंग्लिश पद्धतीने प्रभावित झाल्या. त्यांत हस्तीदंताचा उपयोग भरपूर प्रमाणात करण्यात येऊ लागला. देशी राजांनी फर्निचरच्या युरोपीय पद्धतींना प्रोत्साहन दिले. एकोणिसाव्या शतकात भारतातील कलाकारागिरीचा दर्जा घसरला. या अधोगतीचे प्रतिबिंब तत्कालीन फर्निचरमध्येही पडलेले आढळते. त्यात अतिविस्तृत अलंकरणावर भर देण्यात येऊ लागला व ते अलंकरणही अलंकरणासाठीच साधले जाऊ लागले. एकोणिसाव्या शतकातील लाकडी कोरीव कामात तंत्रकुशलता दिसते हे खरे; परंतु, ते कोरीव काम निराकार व एकसुरी आहे. सध्या गुजरात, पंजाब, काश्मीर व उत्तर प्रदेश या प्रांतांत लाकडी कोरीव काम करणारे अनेक कुशल कारागीर आहेत. बरेलीचे साधे लाकडी व काश्मीरचे अक्रोडाचे लाकडी फर्निचर प्रसिद्ध आहे.

(आ) **लाखेवरील काम**-चीन देशात आठव्या शतकात काळचा लाखेचे खोके बनवीत असत. ते अजून जपानमधील वस्तुसंग्रहालयांत जपून ठेवण्यात आले आहेत. कपाटे, टेबले वगैरे वस्तू काळ्या व लाल लाखेच्या बनवीत असत. लाकडावर लाखेचे कोरीव काम करण्याचा प्रघात जपानमध्येही होता. सध्या लाकडी फर्निचरच्या वस्तूंवर लाखेचा पातळ थर दिला जातो. जिच्यावर ओरखडा उठू शकत नाही अशा सिंथेटिक लाखेचा शोध दुसऱ्या महायुद्धानंतर लावण्यात आला व तिचा वापर फर्निचरमध्ये करण्यात येऊ लागला. पूर्वी फर्निचरला चकाकी आणण्यासाठी फ्रेंच पॉलिश व व्हार्निश यांचा उपयोग करीत असत. अलिकडे अमेरिकेत त्या पदार्थांच्या जागी लाखेचा उपयोग केला जातो.

भारतात लाखेच्या साहाय्याने लाकडावर जे विशिष्ट प्रकारचे रंगकाम केले जाते त्यास संखेडा काम असे म्हणतात. हा व्यवसाय मुख्यत: गुजरातेत प्रचलित आहे. कलात्मक पाळणे, खेळणी, खुर्च्या व इतर फर्निचर या वस्तूंसाठी गुजरातेतील संखेडा, महुवा, गोध्रा व दाहोद ही ठिकाणे प्रसिद्ध आहेत. चमकदार रंगांतील या वस्तू अतिशय आकर्षक दिसतात.

(इ) **विणकाम**-सुती व रेशमी वस्त्रांचे विणकाम भारतात प्राचीन काळापासून होत आले आहे. प्राचीन भारतीय विणकर कलादृष्ट्या खूपच प्रगत होता. प्राचीन भारतीयांना जरीचे कपडे वापरण्याची हौस होती.

महंमद तघलखाने ५०० विणकारांना आपल्या पदरी बाळगले होते. किन-

खाबाचे काम इंग्रजांनाही आवडत असे. इंग्रज सरदारांच्या स्त्रियांसाठी किनखाबी वस्त्रे भारतातून पाठविण्यात येत असत. भारतीय राजेरजवाडेदेखील त्यांचा मर्रास उपयोग करीत असत. सध्याच्या काळात किनखाबाला पूर्वीइतकी मागणी राहिलेली नसली तरी बनारस, मुर्शिदाबाद, तंजावर, अहमदाबाद व सुरत या ठिकाणी ही कला जिवंत आहे.

गुजरातचे पटोळे जगप्रसिद्ध आहेत. रंगांचो सुंदर संगती व मोहक नक्षी ही पटोळ्यांची वैशिष्टचे आहेत. रेशमाचे हे पटोळे करण्याचे काम परिश्रमपूर्वक, शांतपणे व चिकाटीने करावे लागते. पाटण शहरात ही कला जाणणारे मोजके कारागीर विद्यमान आहेत. ओरिसाचा इकात, महाराष्ट्राची पैठणी, बनारसचे शालू व आंध्रच्या हिमरू शाली ही वस्त्रे प्रसिद्ध आहेत. सुती कापडाच्या विणकामाच्या बाबतीतही भारतीय कलाकार अग्रगण्य होते. भारतीय मलमल जगप्रसिद्ध आहे; ढाक्याची मलमल दवबिंदूप्रमाणे पातळ व पारदर्शक असे. १५ फूट लांबीचे वस्त्र केवळ ९०० ग्राम वजनाचे असे. ढाक्का (बांगला देश), म्हैसूर, हैदराबाद, जयपूर, बनारस ही मलमलीच्या कारागिरीची केंद्रे आहेत.

भारतीय कारागीर गालिचे विणण्याची कला इराणी कारागिरांकडून शिकले. मोगलांच्या काळात हा एक मोठा व्यवसाय होता. मिर्झापूर, अमृतसर, बिकानेर व मच्छलीपट्टण ही गालिचे विणण्याची मुख्य केन्द्रे आहेत. भारतात लोकरीचे, कापडाचे, रेशमाचे व मखमलीचे गालिचे तयार होतात. म्हैसूर व तमिळनाड् प्रांतांत कापडाचे व रेशमाचे गालिचे बनवितात.

**प्रश्न ४ : भारतातील खालील हस्तव्यवसायांसंबंधी टीपा लिहा :**

( १ ) चंदनी कोरीव काम, ( २ ) हस्तीदंती कोरीव काम, ( ३ ) धातुकाम, (४) जडावाची कुसर, ( ५ ) कुंभारकाम.

**उत्तर : ( १ ) चंदनी कोरीव काम**–हा भारतीय व्यवसाय प्राचीन आहे. हा अद्यापि पूर्वीइतकाच जिवंत आहे. म्हैसूर, मदुरा, त्रावणकोर, त्रिचनापल्ली, कोईमतूर व सुरत ही या व्यवसायाची प्रसिद्ध केन्द्रे आहेत. सुरत चंदनी पेट्यांसाठी विशेष प्रसिद्ध असून म्हैसूर कॅलेण्डर, पेपरकटर, खेळणी इत्यादी वस्तूंसाठी प्रसिद्ध आहे. म्हैसूरच्या कोरीव कामात पौराणिक विषय व फुलापानांची नक्षी दाटीवाटीने कोरलेली असतात.

**(२) हस्तीदंती कोरीव काम**–ही कला खूप जुनी आहे. सांचीच्या स्तूपावर या कलेची छाप असावी असे भासते. दक्षिणेतील म्हैसूर, त्रावणकोर व त्रिवेंद्रम् या ठिकाणी खेळणी, देवतांच्या मूर्ती, पेट्या यांवर हस्तीदंती कोरीव काम

केले जाते. सुरत, अहमदाबाद, अमृतसर, पतियाळा, दिल्ली, बनारस इत्यादी ठिकाणीही ही कला प्रचलित आहे.

(३) **धातुकाम**–सोने, चांदी, तांबे, पितळ इत्यादी वेगवेगळया धातूंच्या वस्तू भारतात बनतात. धातूंवर खडे वा मीना बसविण्याची भारतीय कारागिरी केवळ निरुपम आहे. बनारसला बशा, ट्रे, कलश, ढाली, अडकित्ते इत्यादी विविध आकारांच्या व सुंदर नक्षीच्या वस्तू बनविल्या जातात. या वस्तूंमध्ये नक्षीची विविधता आणि कुशलता व समृद्ध रंगभरणी यांचा आढळ होतो. मुरादाबादेच्या पानदाण्या, पेटया व भांडी यांवरील सुघड नक्षीकाम अजोड आहे. भारतीय कारागिरांनी तलवारी, ढाली, खंजीर इत्यादी हत्यारांनाही नक्षीने मढविले. अशी हत्यारे आता वस्तुसंग्रहालयांतच पाहावयास मिळतात. दागिन्यांची नक्षी प्रसिद्धच आहे. भारतीय स्त्रीला ( मोहेंजोदाडोच्या काळापासून आजतागायत ) नक्षीयुक्त दागिन्यांची हौस आहे. नाजुक, बारीक व कलात्मक कोरीव काम सोन्याचांदीच्या सर्व दागिन्यांवर केलेले असते. या कोरीव कामातील विविधता अवर्णनीय आहे.

(४) **जडावाची कुसर**–( Inlay work ) हा एक वैशिष्टयपूर्ण हस्त-व्यवसाय आहे. लाकूड, धातू, चंदन इत्यादींमध्ये हस्तिदंत, मीना वगैरे वस्तू जडवून साधलेली नक्षी म्हणजे जडावकाम. चंदनी पेटया, टेबले वगैरे वस्तू जडावकामाच्या द्वारे सुशोभित केल्या जातात.

बीडरी काम हाही जडावकामाचाच एक प्रकार आहे. हे काम आंध्रमधील बीडर येथे होत असल्यामुळे त्यास बीडरी काम म्हणतात. मोहक व भिन्न आकारांच्या भांडयांवरील बीडरी काम प्रेक्षणीय असते. हैद्राबादेत मुलीच्या लग्नाच्या वेळी बीडरी कामाचा सेट आंदण म्हणून देण्याची प्रथा आहे.

(५) **कुंभारकाम**–प्राचीन भारतीय कुंभार वेगवेगळ्या घाटांची मातीची भांडी बनविण्यात वाकबगार होता. तो त्या भांडयांना उत्कृष्ट झिलई देत असे. मोहेंजोदाडोच्या संस्कृतीच्या काळीदेखील भारतीय मृत्तिकापात्रांना विदेशात मागणी होती. दिल्ली व कणिगिरी येथील झिलईची भांडी, गौर येथील गुळगुळीत फरशा, काश्मीरातले हुक्के व राजस्थानातील शोभेची भांडी हे भारतीय कुंभार-कामाचे प्रशंसनीय नमुने आहेत.



# Success Questions and Answers

ON

# English Reader for Standard X

by S. D. KALE, B. A. B. T. ( Winner of Pavari Prize for English )

## —: या पुस्तकांची वैशिष्ट्ये :—

१. पाठ्य पुस्तकांतील प्रत्येक धड्यावर अपेक्षित अशा तिन्ही प्रकारच्या प्रश्नांचा अंतर्भाव.
   (अ) Short Questions ( Answer–in–one–sentence Type )
   (ब) Longer Questions ( Answer–in–3–4–sentences Type )
   (क) Short Paragraphs ( Answer–in–5–6–sentences Type )

२. पद्य विभागांतील प्रत्येक कवितेच्या प्रत्येक कडव्यावर ( Stanza ) Comprehension Tests पद्धतीचे भरपूर प्रश्न व त्यांची उत्तरे.

३. मूलभूत प्रश्नोत्तरांचे आधारे धड्यांतील संपूर्ण विषयांची मांडणी.

४. सरकारी हँडबुकमध्ये निर्दिष्ट केलेला शब्दसंग्रह ( Vocabulary ), भाषेचा अभ्यास ( Language Items ) व विविध वाक्यरचना ( Structural Items ) यांचा प्रश्नोत्तरांत समावेश.

५. सर्व प्रकारचे Objective Type प्रश्न सोडविण्यास उपयुक्त असे प्रत्येक धड्यावर प्रश्न व त्यांची उत्तरे.

६. सरकारी कोर्समध्ये निर्दिष्ट केलेल्या शब्दसंग्रहाचे व विशिष्ट शब्दप्रयोगाचे ( Idioms ) चे प्रत्येक धड्याखाली मराठीत अर्थ.

७. मूळ पाठ्य-पुस्तकाला धरून पण विद्यार्थ्यांना स्वत: सहज वापरता येईल ( Active use of language ) अशी सोपी व सरळ भाषाशैली.

८. पाठांतरास योग्य असे प्रत्येक धड्यावर परिच्छेद व त्या परिच्छेदांचे आधारे नियंत्रित निबंध रचना ( Guided Composition ) या प्रश्न प्रकाराची उत्कृष्ट तयारी.

९. दैनंदिन व अगदी आयत्या वेळच्या अशा दोन्ही प्रकारच्या उजळणीस उपयुक्त.

१०. प्रश्नांची सर्वकषता — या पुस्तकाच्या बाहेरचा प्रश्न सहसा परीक्षेत विचारला जाणार नाही.

११. शुद्ध व्याकरण ( Pure Grammar ) एवढा प्रश्न प्रकार वगळता, संपूर्ण इंग्लिश पेपरची तयारी करून देणारे एकच एक पुस्तक.

हे अद्वितीय पुस्तक आजच नजिकचे पुस्तक विक्रेत्यांकडून खरेदी करा व परीक्षेत भरघोस व हमखास यश पदरात पाडून घ्या. किंमत रु. ३–७५ ट. ख. रु. २–५०

नजिकच्या पुस्तक विक्रत्याकडे मागा. नसल्यास लिहा.

**सौ. मंगला इंगळे, २१६४/६५ सदाशिव पेठ, पुणे ३०**